
महाराष्ट्रातील
काँग्रेसचा
स्वातंत्र्यलढा
(१८८५-१९२०)
डॉ. सुमन वैद्य
डॉ. शांता कोठेकर
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# महाराष्ट्रातील काँग्रेसचा स्वातंत्र्यलढा
## (१८८५-१९२०)

लेखक

**डॉ. सुमन वैद्य**
एम्. ए. (इंग्रजी), एम.ए (इतिहास)
पीएच. डी. (इतिहास)
माजी प्रपाठक, पदव्युत्तर इतिहास
विभाग, नागपूर विद्यापीठ
नागपूर.

**डॉ. शांता कोठेकर**
एम्. ए. (मराठी), एम्. ए.(इंग्रजी)
एम्. ए. पीएच्. डी. (इतिहास)
अधिव्याख्याता, पदव्यत्तुर इतिहास
विभाग, नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

www.mpscmantra.com

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : ९ ऑगस्ट, १९८५
द्वितीयावृत्ती : डिसेंबर, २००८

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई - १३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

किंमत : रु. ६५/-

www.mpscmantra.com

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

प्रास्ताविक ....................................................................................................५

निवेदन ..........................................................................................................७

महाराष्ट्रातील राजकीय प्रबोधन ....................................................................९

काँग्रेसची प्रारंभीची वाटचाल ......................................................................२०

मवाळ-जहाल संघर्ष....................................................................................४६

दुभंगलेली काँग्रेस ......................................................................................७१

टिळक युग ..................................................................................................८४

संदर्भ ग्रंथ सूची ........................................................................................१०७

www.mpscmantra.com

# प्रास्ताविक

इतिहासाची तुलना कधी कधी बुद्धीबळाच्या खेळाशी करण्यात येते. फरक एवढाच की बुद्धीबळाचा खेळ मर्यादित पटावर व दोन व्यक्तीत चालतो तर इतिहासाचा खेळ अमर्याद पटावर अनंत काळ चालूच असतो. फक्त ह्या खेळातील राजे, वझीर, प्यादे, हत्ती, घोडे, उंट सर्व काही माणसेच असतात. त्यामुळेच आपण असे म्हणू शकतो की, इतिहास म्हणजे माणसाचा कालप्रवाहातला अभ्यास. हा प्रवाह कोठे सुरू होतो आणि कोठे संपतो हे कधीच सांगता यावयाचे नाही. त्यामुळे कालप्रवाहाच्या अभ्यासाची कोठेही सुरवात करता येते आणि कोठेही संपवता येते. फक्त असा अभ्यास हा संपूर्ण कालप्रवाहाच्या काही भागाचा असतो एवढे मात्र ध्यानात घेतले पाहिजे.

भूखंडातील कोणत्याही एका भागाचा किंवा त्या भागातील समाजाचा असा अभ्यास करता येतो. १८१८ साली इंग्रजांनी पेशवाई बुडवून मराठ्यांचे राज्य हिसकावून घेतले. १८५४ मध्ये नागपूरच्या भोसल्यांचे राज्य संपुष्टात आले. शिंदे, होळकर, गायकवाड, किंवा निजाम यांची राज्ये राहिली, पण केवळ नाममात्र. पण स्वराज्य नष्ट झाल्यावर स्वराज्य मिळविण्याचे प्रयत्न मात्र जोरात सुरू झाले. हिंदुस्थानात असे एक वर्षही गेले नसेल जेव्हा भारतीय असंतोषाचे उद्रेक क्षितिजावर उमटले नाहीत. १८५७ चा इतिहास तर प्रसिद्धच आहे. तंट्या भिल्ल, वासुदेव बळवंत फडके इत्यादींनी इंग्रजांविरुद्धच्या आपल्या भावनांचा ठसा इतिहासात उमटविला आहे. पण शस्त्रसामर्थ्यावर इंग्रजांच्या विरुद्ध लढा देणे केवळ अशक्य होते. गांधीजींनी हे जाणले, म्हणून त्यांनी अहिंसक असहकाराची चळवळ सुरू केली. त्याचे पर्यवसान पुढे सत्याग्रहाच्या तंत्रात आणि तत्त्वज्ञानात झाले. पण गांधीजींच्या पूर्वी लोकमान्य टिळकांनी "तेल्या तांबोळ्यांची" चळवळ जेव्हा सुरू केली तेव्हाही त्यांच्या मनामध्ये इंग्रजांच्या विरुद्ध लढा देण्याकरिता एक नवीन शस्त्राचीच पैदास करावयाची होती. ते शस्त्र म्हणजे त्यांचा चतुःसुत्री कार्यक्रम, सामुदायिक लढ्याची कल्पना. या चतुःसुत्री कार्यक्रमाची तुलनासुद्धा एका रीतीने नेमस्तांनी सुरू केलेल्या मवाळ विचारसरणीत दिसून येते. एकूण हिंदुस्थानच्या या कालप्रवाहात मवाळ, जहाल, आणि अतीजहाल अशा सामान्यपणे तीन पदरी वेणींची पदरे स्पष्टपणे दिसतात. खरे म्हणजे सूक्ष्मपणे पाहिल्यास या इतिहासाच्या वेणीचे असंख्य पेड दिसून येतील. पण या तीन पदरी वेणीचा गुंतवळा सोडवता सोडवताच हिंदुस्थानचा आणि महाराष्ट्राचा इतिहास पुढे गेलेला आहे, ही गोष्ट कॉंग्रेसच्या इतिहासात स्पष्टपणे जाणवते. १८८५ मध्ये ह्युम, वेडरबर्न आणि नेमस्त यांनी सुरू केलेली कॉंग्रेस जहालांच्या हातात जाणे, आणि त्याचवेळी या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वासुदेव बळवंत फडके, चाफेकर, सावरकर, भगतसिंग, राजगुरू यांच्यासारखे अतीजहाल लोकांचे तोरण इतिहासाला लागणे हीसुद्धा एक महत्त्वाची घटना आहे. पण अशा रीतीने आपला इतिहास जरी तीन पदरी वेणीचा इतिहास असला तरी यातील मुख्य पेड हे अतीजहालही नाही आणि नेमस्तही नाही. विकास हा मधल्या मार्गाने झालेला आहे. या मार्गात दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार पटेल इत्यादी बहुतेक होते. अर्थात नेमस्त मंडळीतही रानडे, गोखले, दिनशा वाछा, फिरोझशहा मेहता अशी फारच मोठी व्यक्तिमत्त्वे निर्माण झाली हे कबूलच केले पाहिजे. सामाजिक इतिहासाची पण अशीच दिशा आहे. १८८५ त कॉंग्रेसची स्थापना झाली. त्यानंतरचा स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास म्हणजे मुख्यतः कॉंग्रेसचा इतिहास. स्वातंत्र्याच्या इतिहासातील हे कॉंग्रेसचे पर्व आहे असे समजावयास हरकत नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करताना १८१८ ते १८८५ हा एक भाग, १८८५ ते १९२० हा दुसरा भाग, १९२० ते १९३० हा तिसरा भाग, १९३० ते १९३९ हा चौथा भाग, १९३९ ते १९४७ हा पाचवा भाग. असे टप्पे स्पष्टपणे दृष्टोत्पत्तीस येतील.

या निरनिराळ्या भागांचा विचार करून त्यांच्या अनुरोधाने महाराष्ट्राचा आणि त्यातील मुख्य सूत्राचा विचार करण्याची ही योजना. त्यापैकी १८८५ ते १९२० हे एक महत्त्वाचे पर्व. खरे तर १८८५ ते १८९५ ला नेमस्तांचे पर्व व

www.mpscmantra.com

१८९५ ते १९२० ला टिळक पर्व म्हणावे. १८९५ सालापासूनच टिळकांच्या प्रभावाची प्रसादचिन्हे दिसू लागली होती, १८८५ मध्ये फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. तत्पूर्वी केसरी मराठा संस्था निघाली. १९२० मध्ये टिळक कालवश झाले, आणि चळवळीची सूत्रे गांधीजींच्या हातात गेली. १८८५ ते १९२० पर्यंतच्या काळाचा, त्या काळातील माणसांचा आणि समाजाचा अभ्यास या ग्रंथात करण्यात आलेला आहे. डॉ. सुमन वैद्य आणि डॉ. शांता कोठेकर यांनी परिश्रमपूर्वक या अभ्यासाची निर्मिती केली याबद्दल त्यांना धन्यवाद. या कॉंग्रेस शताब्दी वर्षात हे पुस्तक प्रकाशित करण्यात साहित्य संस्कृती मंडळास आनंद होत आहे.

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

# निवेदन

काँग्रेस शताब्दीच्या निमित्ताने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास नव्याने लिहिण्याचा उपक्रम आज देशातील निरनिराळ्या भागात हाती घेतला गेला आहे. असा इतिहास लिहिला जावा हे दोन तीन दृष्टींनी अगत्याचे झाले आहे. एक तर स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वी उपलब्ध नसलेले स्रोत साहित्य अलीकडे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ लागले आहे. त्यामुळे त्या स्रोत साहित्याच्या आधारे गतकालीन घटनांचा आढावा अधिक सत्यनिष्ठपणे घेणे शक्य झाले आहे. दुसरे म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळून आज सुमारे चाळीस वर्षांचा काळ लोटत आहे. त्या काळी स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्यांची पिढी काळाच्या पडद्याआड जात आहे. स्वतंत्र भारतात जन्माला आलेल्या पिढीच्या हाती राष्ट्राच्या भवितव्याची सूत्रे येत आहेत. या उमलत्या पिढीतील तरुणांना देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या स्वरूपाची माहिती असावी, या संग्रामात तनमनधनाने झिजलेल्या नेत्यांच्या त्यागाची जाणीव व्हावी, आणि त्यातून त्यांना राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळावी याकरिता स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास आजच्या तरुण पिढीपर्यंत पोचणे अगत्याचे ठरते. तसेच, स्वातंत्र्याचा लढा संपून इतकी वर्षे लोटल्यानंतर या इतिहासाकडे अधिक वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून पाहणे, त्याचे टीकात्मक विश्लेषण करणे व त्यातील चुका वा उणीवा समजून घेणे हे आज राष्ट्राचा इतिहास घडविणाऱ्यांच्या दृष्टीने उपकारक ठरणारे आहे.

काँग्रेसची चळवळ ही राष्ट्रीय चळवळ होती. त्यात देशाच्या सर्वच भागातील लोक सहभागी झाले होते. म्हणून त्या सर्व भागांचे काँग्रेस चळवळीतील योगदानही अभ्यासणे आवश्यक ठरते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने काँग्रेस कार्यातील महाराष्ट्राच्या सहभागाचा आढावा घेण्यासाठी एक प्रकल्प हाती घेतला. हा ग्रंथ त्या प्रकल्पाचाच एक भाग आहे.

१८८५ साली मुंबई येथे काँग्रेसची मुहूर्तमेढ रोवली गेली त्यावेळी मुंबई – पुण्याचा पश्चिम महाराष्ट्राचा भाग मुंबई इलाख्यात मोडत होता. वऱ्हाडचे चार जिल्हे हे ब्रिटिश अधिकाऱ्याच्या शासनाखाली पण निजामच्या सार्वभौमत्वाखाली होते, तर नागपूरकडील चार जिल्हे मध्यप्रांतात मोडत होते. पुढे १९०३ मध्ये वऱ्हाडचा भाग मध्यप्रांतात समाविष्ट करण्यात आला. हा इतिहास ध्यानात घेऊन आजच्या महाराष्ट्रातील काँग्रेसचा इतिहास लिहिताना पश्चिम महाराष्ट्र, वऱ्हाड व नागपूरकडील भाग असे स्वतंत्र उल्लेख या ग्रंथात केले आहेत.

काँग्रेसमधील महाराष्ट्राच्या सहभागाचा हा ३५ वर्षांचा इतिहास उपलब्ध स्रोत साधनांचे परिशीलन करून लिहिला आहे. त्या काळातील महाराष्ट्राच्या आघाडीच्या नेत्यांचे चरित्रग्रंथही अभ्यासिले आहेत. या काळात प्रांतिक काँग्रेस समित्या कार्य करू लागल्या असल्या व प्रांतिक अधिवेशने होत असली तरी प्रांतिक समित्यांच्या नेतृत्वाखाली जनआंदोलने मात्र गांधीयुगात सुरू झाली. त्यामुळे या ग्रंथात महाराष्ट्रातील भिन्न विचारधारा, महाराष्ट्राच्या भूमीवर झालेली काँग्रेस अधिवेशने, काँग्रेस अधिवेशनातील महाराष्ट्रीय सदस्यांचा सहभाग, महत्त्वाची प्रांतिक अधिवेशने व महाराष्ट्रीय नेत्यांचे प्रांतिक व राष्ट्रीय स्तरावरील कार्य यावर भर दिला आहे.

महाराष्ट्रातील काँग्रेस चळवळीच्या ३५ वर्षाच्या इतिहासाला शब्दरूप देण्याचे काम आमच्याकडे सोपविल्याबद्दल आम्ही महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या शताब्दी समारोह समितीचे व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे आभारी आहोत.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

मुद्रण निर्दोष व सुबक व्हावे याकडे जातीने लक्ष घालून ठराविक वेळात हे काम पूर्ण करून दिल्याबद्दल श्री प्रसाद मुद्रणालयाचे श्री. चंद्रकांत तापस यांचे व आकर्षक मुखपृष्ठ तयार करून दिल्याबद्दल श्री. राजेंद्र मदत बक्षी व राज ब्लॉक मेकर्स यांचे आभारी आहोत.

**डॉ. सुमन वैद्य**
**डॉ. शांता कोठेकर**

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

**प्रकरण १**

# महाराष्ट्रातील राजकीय प्रबोधन

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासात १९८५ हे साल सुवर्णाक्षरात लिहिले जावे इतके ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. १८८५ साली प्रस्थापित झालेली राष्ट्रीय काँग्रेस यावर्षी शतायुषी झाली. शंभर वर्षांपूर्वी या संघटनेची महाराष्ट्रात पायाभरणी झाली आणि तिच्या स्थापनेने देशाच्या तत्कालीन राजकीय जीवनातली एक मोठी उणीव भरून काढली, म्हणून महाराष्ट्रालाही हे वर्ष अभिमानाचे आहे. पारतंत्र्यात पिचत पडलेल्या, परकीय साम्राज्यवादी सत्तेच्या वरवंट्याखाली चिरडल्या जाणाऱ्या व राजकीय क्षेत्रात पूर्णतः निष्प्रभ बनलेल्या भारतीयांना काँग्रेसच्या स्थापनेने राजकीय वाचा फुटली. तिच्या रुपाने एकराष्ट्रीयत्वाची जाणीव उमटू लागली. राष्ट्राच्या इतिहासातील नव्या चैतन्यपूर्ण पर्वाला प्रारंभ झाला.

एका शतकाच्या आपल्या जीवनप्रवाहात काँग्रेसने देशात अनेक ऐतिहासिक स्थित्यंतरे घडवून आणण्यात आघाडीची भूमिका बजावली. भारतीयांची गाऱ्हाणी व राजकीय आशा – आकांक्षा परकीय राज्यकर्त्यांच्या कानी घालाव्या या अतिशय सीमित हेतूने जन्माला आलेल्या काँग्रेसने राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्रामाचे आयोजन केले, राष्ट्रवादी चळवळीला वैचारिक अधिष्ठान दिले. ही चळवळ शहरांपासून खेडोपाडी जनसामान्यांपर्यंत पोचविली आणि स्वातंत्र्यप्राप्तीचे ईप्सित पूर्ण होईपर्यंत बलशाली परकीय सत्तेविरुद्ध नेटाने, चिकाटीने अविरत लढा दिला. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीचे श्रेय बऱ्याच अंशी या राष्ट्रीय संघटनेला आहे हे निर्विवाद.

काँग्रेसने केलेल्या या मौलिक कामगिरीमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवराष्ट्राच्या उभारणीचे कार्यही भारतीय जनतेने मोठ्या विश्वासाने या संघटनेवर टाकले. हे विधायक कार्याचे आव्हानही काँग्रेसने स्वीकारले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजवर, अल्पकाळ वगळता, केंद्रीय शासनाची धुरा या संघटनेने आपल्या समर्थ खांद्यावर वाहिली, आणि जेमतेम पस्तीस वर्षांच्या अल्पावधीत राष्ट्राच्या इतिहासात एवढा काळ अगदी नगण्यच म्हणायचा – नानाविध आपत्तींना खंबीरपणे तोंड देत आर्थिकदृष्ट्या खुरटलेल्या व औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या या देशाला यंत्रयुगात आणून सोडले. याबरोबरच जागतिक राजकारणात भारतासाठी मानाचे स्थानही तिने निर्माण केले. जागतिक राजनैतिक क्षेत्रात अलिप्त राष्ट्रगटाचे धुरीणत्व आज भारताकडे येण्याचे श्रेयही काँग्रेस नेतृत्वालाच आहे.

आपल्या समृद्ध व संपन्न अशा शंभर वर्षांच्या जीवनकाळात काँग्रेसने यशापयशाचे अनेक चढउतार अनुभवले. कधी यशाचे अत्युच्च शिखर गाठल्याचा आनंद उपभोगला, तर कधी अपयशाचे हलाहल घशाखाली उतरविले; कधी जनसामान्यांच्या पाठिंब्याची भरगच्च शिदोरी पाठीशी बाळगली तर कधी जनतेचा रोषही पचवला; वर्षानुवर्षे राष्ट्राचे नेतृत्व एकमुखाने अविरोधपणे करण्याचा मान पटकाविला, तर कधी अंतर्गत दुफळीची कटुता व दुःखद व्यथाही गिळली; वर्षानुवर्षे मूलभूत उद्दिष्टांप्रत खंबीरपणे व अविचलितपणे पावले टाकली, तर क्वचित ही पावले मूळ उद्दिष्टांपासून भरकटणार की काय अशी चिंता जनमनात निर्माण केली. मात्र अशा नानाविध अवस्थांतून, अनुभवातून, चढउतारातून वाटचाल करीत असता या संघटनेने राष्ट्रीय ऐक्य व जनसामान्यांचे कल्याण या मूलभूत उद्दिष्टांवरून आपली दृष्टी कदापीही ढळू दिली नाही. तसेच गंभीर समस्यांना तोंड देताना अगर मतभेदांची वावटळ उठली असतानाही संघटनेचा कणा कधी मोडू दिला नाही. याचे मर्म दोन गोष्टीत साठवले आहे. एक तर तिने उराशी बाळगलेल्या राष्ट्रैक्य, लोकशाही, सर्वधर्मसमभाव व समाजवाद या तत्त्वांशी तिने कधी प्रतारणा केली नाही आणि दुसरे म्हणजे, राष्ट्रवादाच्या चौकटीत राहून काहीशा भिन्न विचारांचा पुरस्कार करणारे गट आपल्या

www.mpscmantra.com

समन्वयात्मक व सर्वसमावेशक भूमिकेतून तिने आपल्यात सामावून घेतले, व त्यांचा राष्ट्रोन्नतीच्या कार्यासाठी योग्य तो उपयोग करून घेतला. यामुळे काँग्रेस हा एकांगी पक्ष न बनता राष्ट्रीय मंच बनला, आणि म्हणूनच ही राष्ट्रीय संघटना शंभर नाबाद राहू शकली.

महाराष्ट्राच्या दृष्टीने काँग्रेस शताब्दीची घटना विशेष अर्थपूर्ण आणि अभिमानाची आहे. कारण आधुनिक भारताचा इतिहास घडविण्यात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या या संघटनेचा जन्म महाराष्ट्राच्या भूमित झाला. राष्ट्रीय ऐक्याचे हे रोपटे लावण्यास अनेक महाराष्ट्रीय विचारवंतांचा व कार्यकर्त्यांचा हातभार लागला. त्यांच्या सहकार्याखेरीज महाराष्ट्राच्या भूमीत हे रोपटे लागणे शक्य झाले नसते. तसेच या रोपट्याला नंतरच्या काळात खतपाणी घालण्याचे, वैचारिक खाद्य पुरवून फुलविण्याचे, परिस्थितीनुरूप वेळोवेळी योग्य ती नवी दिशा देण्याचे, तिला गतिमान करण्याचे आणि लोकमताचा व्यापक आधार मिळवून देऊन तिला बलशाली करण्याचे मोलाचे कार्य अनेक महाराष्ट्रीय रथी महारथींनी केले. महाराष्ट्राच्या भूमीवर काँग्रेसची अधिवेशने अनेकदा भरली. त्यामुळे येथील जनजागृतीला मदत झाली व प्रांतिक काँग्रेसचे रोपटे फुलाफळाला आले. इतर प्रांतात भरलेल्या वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान महाराष्ट्रीय क्राँग्रेस नेत्यांना अनेकदा लाभला. ह्यूमनंतर काँग्रेसचे सचिवपद कित्येक वर्षे सांभाळण्याची जबाबदारीही लागोपाठ तीन महाराष्ट्रीय नेत्यांवरच टाकली गेली. देशाच्या कोणत्याही भागात काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरले तरी महाराष्ट्राचा बुलंद आवाज तेथे पोहचविण्याचे कार्य महाराष्ट्राच्या काँग्रेस सदस्यांनी केले. तसेच भारतीयांची गाऱ्हाणी व मागण्या राज्यकर्त्यांच्या कानी घालण्यासाठी इंग्लंडला गेलेल्या काँग्रेसच्या शिष्टमंडळातही महाराष्ट्रीय काँग्रेसचे नेते आघाडीला होते. अशाप्रकारे काँग्रेसच्या जन्मापासूनच या राष्ट्रीय संघटनेशी महाराष्ट्राचे अतिशय निकटचे नाते प्रस्थापित झाले आणि काळाच्या ओघात हे नाते अतूट राहिले आणि अधिक दृढमूलही होत गेले.

१८८५ ते १९२० या कालखंडात महाराष्ट्राने काँग्रेसच्या दृढीकरणाला केलेले योगदान विशेष महत्त्वपूर्ण व भरीव असे आहे. या कालखंडात काँग्रेसची तात्त्विक बैठक, तसेच तिच्या वैचारिक धारणांची व कार्यपद्धतीची दिशा बऱ्याच अंशी महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांनी निर्धारित केली. या कालखंडात काँग्रेसमध्ये जे दोन भिन्न विचारप्रवाह निर्माण झाले, त्यांचे मूळ बरेचसे तत्कालीन महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांच्या भिन्न वैचारिक धारणेत होते. किंबहुना काँग्रेसमधील हे दोन भिन्न प्रवाह म्हणजे महाराष्ट्रातील दोन भिन्न विचारप्रणालीचे प्रतिध्वनी होते असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. या कालावधीत महाराष्ट्रातील काँग्रेस नेते या संघटनेच्या नीतिनिर्धारणाच्या कार्यात आघाडीला होते. तिला लोकमान्यतेचा व्यापक आधार मिळवून देण्याचे मोलाचे कार्यही महाराष्ट्रातील काँग्रेस पुढाऱ्यांनी केले. त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसचे व काँग्रेस पुढाऱ्यांचे या कालखंडातील कार्य विशेष मौलिक ठरते.

१८८५ साली काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबईला भरले आणि त्याद्वारा भारतीय राष्ट्रवादाला संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. भारतीय राष्ट्रवादाची संस्थात्मक मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली जावी हा केवळ अनपेक्षित योगायोग नव्हता. यापूर्वी सुमारे चाळीस पन्नास वर्षे काँग्रेसच्या स्थापनेला पोषक ठरेल अशी वैचारिक भूमिका महाराष्ट्रात तयार होत होती. या संघटनेला मूर्त स्वरूप देणाऱ्या व तिला तात्त्विक अधिष्ठान देणाऱ्या विचारवंतांची घडण या काळात महाराष्ट्रात तयार होत होती.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

## महाराष्ट्रातील प्रबोधन

मराठ्यांचे राज्य १८१८ साली अस्ताला जाऊन महाराष्ट्रात इंग्रजी राजवट सुरू झाल्यानंतर अल्पावधीतच येथे युगपरिवर्तनाची, मोठ्या वैचारिक स्थित्यंतराची लक्षणे आढळून येऊ लागली. बलशाली, संपन्न व प्रगतीशील अशा पाश्चात्य संस्कृतीशी इंग्रजी शासनाच्या द्वारा महाराष्ट्रीय जनतेचा संपर्क प्रस्थापित झाला. आरंभीला हा बदल सामान्यांना सुखावह वाटला. कारण पेशव्यांची एकाधिकारी सत्ता जाऊन कायद्याचे राज्य आले. पेशवाईच्या अखेरच्या काळातील अराजक व अंदाधुंदी यांची जागा शांतता व सुव्यवस्थने घेतली. भिल्ल रामोश्यांचे उपद्रव थांबून जीवित व मालमत्ता सुरक्षित झाल्याचा आभास निर्माण झाला. मराठेशाही गेल्यामुळे नाराज झालेल्या जहागिरदार व शास्त्री पंडितांना नव्या परकीय राज्यकर्त्यांनी इनामे, दक्षिणा देऊन संतुष्ट केले. विद्यादानाची नवी केंद्रे सुरू करून पाश्चात्य विद्येची नवी क्षितिजे खुली केली आणि पाश्चात्य शिक्षण संपादन केलेल्या महाराष्ट्रीय तरुणांना शासकीय सेवेची दारे काही प्रमाणात मोकळी करून देऊन त्यांच्या निष्ठा परकीय राज्यसत्तेशी बांधून घेतल्या.

मुंबईला १८२७ साली एलफिन्स्टन विद्यालय स्थापन झाल्यानंतर तेथून आधुनिक पाश्चात्य शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तरुणांनी महाराष्ट्रात सर्वांगीण प्रबोधनाची प्रकिया सुरू केली. पाश्चात्य शिक्षणक्रमातून या तरुणांना इंग्रजी भाषेतील अभिजात साहित्य, पाश्चात्य समाजसंस्था, युरोपात प्रचलित असलेले निरनिराळे विचारसंप्रदाय, इंग्लंड व इतर युरोपीय राष्ट्रांचा इतिहास, तसेच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल इत्यादी विज्ञान शाखा अभ्यासता आल्या. या अध्ययनातून त्यांना आधुनिक युगाचे दर्शन घडले. ज्ञानाची नवी क्षितिजे त्यांच्यापुढे खुली झाली. तसेच इंग्लंडच्या तत्कालीन राजकीय जीवनावर ज्या उदारमतवादी विचारवंतांचा विशेष प्रभाव होता, त्या बर्क, बेंथम, मिल, स्पेन्सर इत्यादींच्या विचारप्रणालींचा पगडा त्यांच्याही मनावर बसला. त्यामुळे मानवी जीवनाकडे, सामाजिक व राजकीय जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन त्यांना लाभला. पाश्चात्य शिक्षणाने त्यांची स्वतंत्र प्रज्ञा जागृत झाली, आणि बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून मानवी व्यवहाराचे परीक्षण करण्याची बौद्धिक क्षमता त्यांच्यात निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्यामधील परंपरानिष्ठा, गतानुगतिकता, शब्दप्रामाण्य व अंधश्रद्धा लयाला जाऊन सर्व मानवी व्यवहार बुद्धीच्या, उपयुक्ततेच्या व मानवतेच्या निकषावर घासून तपासून घेण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. अंधश्रद्धेची जागा डोळस तर्कवादाने व बुद्धिनिष्ठ जिज्ञासेने घेतली. नवी जीवनमूल्ये आंग्लशिक्षित तरुणात रुजू लागली. आधुनिक युगाची ही लक्षणे होती.

आरंभीच्या काही वर्षात पाश्चात्य राज्यकर्त्यांच्या समृद्ध संस्कृतीने, भौतिक विकासाने व वैभवाने पाश्चात्य विद्या संपादन केलेले महाराष्ट्रीय तरुण काहीसे भारावून गेले. पाश्चात्य जगाच्या तुलनेत भारतीय समाजाची अधोगती त्यांना विशेषच जाणवली. यामुळे ते काही काळ न्यूनगंडाचे भक्ष्य बनले. अवनतीच्या गर्तेत रुतून पडलेल्या भारतीय समाजावर प्रगमनशील पाश्चात्य संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित झाले हा ईश्वरी अनुग्रहच होय अशी भावनाही काहींच्या मनात प्रादुर्भूत झाली.

मात्र या मानसिक अवस्थेतून निर्माण झालेली किंकर्तव्यमूढता महाराष्ट्रात फार काळ टिकली नाही. पाश्चात्य विद्येने नवे ज्ञानचक्षू लाभलेले व नव्या आधुनिक विचारांनी प्रभावित झालेले महाराष्ट्रीय तरुण १८४० नंतर अंतर्मुख बनले व आत्मपरीक्षण करू लागले. बुद्धिवादाच्या व उपयुक्ततावादाच्या आधारे ते आपल्या समाजाच्या गुणदोषांची, यशापयशाची, उत्कर्षापकर्षाची कारणमीमांसा करू लागले. हे करीत असता परंपरानिष्ठ, शब्दप्रामाण्य, अंधश्रद्धा, कर्मकांड, पारलौकिक जीवनाच्या विचारामुळे ऐहिक जीवनाकडे झालेले दुर्लक्ष, धार्मिक बाबींना समाज जीवनात दिले जात असलेले अवास्तव महत्त्व यामुळे देशातील सामाजिक प्रगतीचे स्रोत आटून

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

गेल्याचे त्यांच्या ध्यानात आले. त्याबरोबरच विज्ञान, यंत्रव्यवसाय, राष्ट्रवाद व लोकशाही शासनव्यवस्था यात पाश्चात्य जगाच्या भौतिक विकासाची व वैभवाची गुरूकिल्ली आहे हेही त्यांनी ताडले. म्हणून आपल्या देशाची उन्नती साधावयाची असेल तर व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, मानवता व उपयुक्तता या आधुनिक मानवी मूल्यांच्या कसोट्या लावून आपल्या प्रचलित समाजपद्धतीतील कालबाह्य झालेल्या रूढी व चालीरीती टाकून द्यायला पाहिजेत, व गतिहीन बनलेल्या भारतीय समाजात नव्या आधुनिक मूल्यांचे रक्त ओतून त्याला सजीव, सचेतन व प्रगमनशील बनविण्यासाठी पाश्चात्य विद्येचा प्रसार करायला पाहिजे याची त्यांना तीव्र जाणीव झाली. तसेच निष्प्राण व शुष्क झालेल्या समाजाचा कायाकल्प पाश्चात्य वैचारिक धारणांच्या आधारे करावयाचा असल्याने हे कार्य परकीय सत्ताधाऱ्यांचे बोट धरुनच, त्यांच्या मदतीने व सहकार्यानेच करावे लागेल अशीही त्यांची दृढ धारणा बनली. या वैचारिक घडणीने महाराष्ट्रातील प्रबोधनाला आकार व आशय प्राप्त करून दिला.

धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील अनिष्ट रूढी व परंपराचे विश्लेषण व परीक्षण करून आधुनिक पुरोगामी विचारांचा पुरस्कार महाराष्ट्रात प्रथम करण्याचे श्रेय आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना आहे. जांभेकरांनी मुंबईत 'दर्पण' साप्ताहिक सुरू करून त्याद्वारा सुमारे आठ साडेआठ वर्षे प्रचलित 'लोकस्थिती, धर्मरीती व राज्यरीती' यात काळानुरूप योग्य ते फेरफार घडवून आणण्याची गरज सातत्याने प्रतिपादित केली. तसेच उच्चार व आचार स्वातंत्र्य, समता व लोकसत्ताक पद्धतीचा महिमा लोकांच्या गळी उतरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'दर्पण' सारखी, महाराष्ट्रात नवविचारांच्या प्रचाराचे व प्रसाराचे अमोघ साधन बनलेली त्या काळातील इतर काही उल्लेखनीय नियतकालिके म्हणजे, दिग्दर्शन, प्रभाकर, ज्ञानप्रसारक, ज्ञानप्रकाश ही होत.

आचार्य जांभेकर समाजसुधारणेची निकड प्रतिपादित असता इतर काही आंग्लशिक्षित सुबुद्ध मंडळी बुद्धिवादाच्या निकषावर रुढ धार्मिक विचार पारखून घेऊन मूलभूत धर्मतत्त्वांचा शोध घेत होती. हिंदू धर्मातील निरर्थक कर्मकांड त्याज्य मानून एकेश्वरवाद, मानवधर्म, भूतदया, विश्वबंधुत्व सत्यप्रीती, सामाजिक समता हाच खरा धर्म आहे ही त्यांची श्रद्धा होती. या विचारांचा प्रसार करण्यासाठी दादोबा पांडुरंग, त्याचे बंधू डॉ. आत्माराम पांडुरंग, भाऊ महाजन, राम बाळकृष्ण इत्यादींनी 'परमहंस मंडळी' नावाची संस्था स्थापन केली. परंतु या नव्या विचारांचा उघड प्रचार करून परंपरानिष्ठ समाजाचा रोष ओढवून घेण्याची त्यांची मानसिक तयारी नव्हती. म्हणून ही 'परमहंस मंडळी' गुप्तपणे कार्य करीत राहिली व त्यामुळे समाज प्रबोधनाच्या दृष्टीने ही संस्था फारशी परिणामकारक ठरली नाही. याचवेळी आपल्या धर्मशास्त्रांना पूर्णपणे झुगारून न देता, समाजोन्नतीला आवश्यक असणाऱ्या धार्मिक व समाजिक सुधारणांना शास्त्राधार शोधण्याचा प्रयत्न विष्णूशास्त्री बापट, आचार्य जांभेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादी मंडळी करीत होती.

## लोकहितवादींचे निर्भीड समाजपरीक्षण

नवविचारांच्या उघड व निःसंकोच स्वागतासाठी त्यांचा हिरीरीने पुरस्कार करण्याचे व ते समाजाच्या गळी उतरविण्यासाठी परंपरेच्या गर्तेत रुतलेल्या समाजावर टीकेचे कठोर प्रहार करण्याचे नैतिक धैर्य महाराष्ट्रात जर कुणी प्रथम दाखविले असेल तर ते लोकहितवादींनी! त्यांनी लोकहिताच्या उत्कट तळमळीने आपली जुनी शास्त्रे व त्यावर आधारित असलेल्या कालबाह्य रीतीरिवाजांवर प्रखर टीका करून निद्रिस्त महाराष्ट्रीय समाजाला खडबडून जागे करण्याचे मोलाचे कार्य आपल्या 'शतपत्रा'द्वारा केले. तसेच आधुनिक जीवनमूल्यांच्या आधाराने, बुद्धिनिष्ठ पुरोगामी दृष्टीकोनातून आपल्या समाजाची पुनर्रचना करण्याची निकड अतिशय निःस्पृहपणे व पोटतिडिकीने त्यांनी आपल्या बांधवांच्या गळी उतरविण्याची खटपट केली. जुनी शास्त्रे, रूढी, आचार व परंपरा ह्या आधुनिक युगात



www.mpscmantra.com

निरर्थक व निरुपयोगी ठरल्या आहेत हा त्यांचा पक्का समज होता. ऐहिक उपयुक्ततेची कसोटी लावून आपल्या आचारविचारांची फेरतपासणी केल्यास व त्याच निकषावर नवे आधुनिक विचार आत्मसात केल्यास समाजाला ऐश्वर्य व सुख लाभेल अशी त्यांची निश्चित धारणा होती. म्हणूनच "शास्त्रांस एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा" आणि "ऐहिक सुखाचा मार्ग दाखविणारी पाश्चात्य विद्या व विचार आत्मसात करा" असे आवाहन महाराष्ट्रीय समाजाला त्यांनी आवर्जून केले.

धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या पुरस्काराबरोबर देशाच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषणही त्यांनी केले. राजकीय सत्तेच्या बळावर भारतात आर्थिक मक्तेदारी स्थापन करून परकीय राज्यकर्त्यांनी चालविलेल्या आर्थिक शोषणावर त्यांनी विदारक प्रकाश टाकला. त्यांच्यापूर्वी रामकृष्ण विश्वनाथ यांनी आपल्या "हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे त्याचा काय परिणाम होणार याविषयी विचार" या निबंधातून परकीय राज्यकर्त्यांकडून होत असलेल्या आर्थिक पिळवणुकीचे भयावह परिणाम विशद केले होते. ज्यावेळी बंगालमध्ये काही मंडळी पाश्चात्यांच्या भौतिक विकासाने भारावून जाऊन परकीय राज्यकर्त्यांनी आपले भांडवल येथे गुंतवून उद्योग सुरू करावेत असे सुचवीत होती, त्यावेळी परकीय सत्तेच्या आर्थिक पिळवणुकीच्या उद्दिष्टावर व देशावरील त्याच्या विघातक परिणामावर या महाराष्ट्रीय विचारवंताने नेमके बोट ठेऊन महाराष्ट्रीयांना सतर्क केले ही बाब लक्षणीय आहे. लोकहितवादींनीही इंग्रजी राजवटीचे व त्यांच्या भौतिक ज्ञानाचे स्वागत करीत असतानाच परकीय सत्ताधाऱ्यांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाचा निषेध केला, त्यांच्या मारक व्यापारी स्पर्धेला विरोध केला आणि "सर्वांनी असा कट करावा की जे आपल्या देशात पिकेल तेच नेसू, तेच वापरू..... आणि तितक्याच चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास विद्या शिकू." असे म्हणून स्वदेशीचा मंत्र दिला.

आपल्या शतपत्रांतून लोकहितवादींनी नव्या राजकीय आकांक्षांचेही बीजारोपण केले. एकराष्ट्रीयत्वाची कल्पना त्यांनी महाराष्ट्रात पुरस्कृत केली. देशात शांतता व सुव्यवस्था टिकविणे हेच केवळ राज्यकर्त्यांचे कर्तव्य नसून प्रजेचे दुःखहरण व हितसाधन ही त्यांची जबाबदारी आहे असे प्रतिपादन करून त्यांनी कल्याणकारी राज्याची कल्पना मांडली. तसेच "सरकारची मातोश्री लोक आहेत" या साध्या सोप्या शब्दात जनतेच्या सार्वभौमत्वाचा व लोकसत्ताक राज्याचा विचारही त्यांनी पुरस्कृत केला. भारतीयांच्या राजकीय मागण्यांना त्यांनी वाचा फोडली. "इंग्लंडसारखे एक पार्लमेंट हिंदुस्थानात असावे" त्यात देशातील सर्व भागांचे व गटांचे प्रतिनिधी असावे, त्यांनी जनकल्याणाचे कायदे करावे, तसेच आपली शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवून भारतीयांच्या मागण्या राज्यकर्त्यांपुढे मांडाव्या असा प्रातिनिधिक शासनपद्धतीचा व सनदशीर राजकारणाचा मार्गही त्यांनी सुचविला. त्याबरोबरच, राज्यकर्त्यांनी हे न केल्यास अमेरिकेप्रमाणे येथेही बंड होईल असे बजाविण्यासही ते चुकले नाहीत. अशा प्रकारे आपल्या समाजजीवनातील दोषांवर, उणीवांवर प्रकाश टाकून व आधुनिक विचारांचा मागोवा घेत समाजोन्नतीचा मार्ग सुचवून लोकहितवादींनी महाराष्ट्रात राष्ट्रवादाच्या उदयाला अनुकूल भूमी तयार केली.

याच सुमारास आपल्या "सुखदायक राज्यप्रकरणी" या निबंधातून विष्णुबुवा ब्रह्मचारी देशोन्नतीच्या हेतूने वैदिक धर्माच्या आधारे एक प्रकारचा समाजसत्तावाद पुरस्कृत करीत होते. परंतु त्यांचा हा विचार अतिशय क्रांतिकारी वाटला म्हणून की काय तत्कालीन महाराष्ट्रीय समाजाने त्यांच्या विचारांची दखल घेतली नाही. ज्याकाळी युरोपालाही समाजवादाचा पूर्ण परिचय झाला नव्हता, त्यावेळी एका महाराष्ट्रीय प्रज्ञावंताने वैदिक धर्माच्या आधारे सामाजिक व आर्थिक समतेचा संदेश द्यावा ही बाब निश्चितच आश्चर्यजनक आहे.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

## संस्थात्मक कार्याचा प्रारंभ

महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या आरंभीच्या काळात आचार्य जांभेकर, लोकहितवादी यासारखे आद्य सुधारक नवविचारांच्या प्रसाराचे कार्य वैयक्तिकरीत्या करीत होते. त्यांनी सुरू केलेले सर्वांगीण सुधारणेचे कार्य संघटितरीत्या व संस्थांच्या माध्यमातून केल्यास ते अधिक प्रभावीपणे करता येईल हा विचार महाराष्ट्रीय सुशिक्षित तरुणांच्या मनात लवकरच मूळ धरु लागला. कारण पाश्चात्य जगात सार्वजनिक संस्थांनी केलेल्या सुधारणा कार्यांची त्यांना माहिती होती. या जाणिवेतूनच एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात सार्वजनिक कल्याणाच्या हेतूने प्रेरित झालेल्या बॉम्बे असोसिएशन, डेक्कन प्रांतस्थ मंडळी, कल्याणोन्नायक मंडळी, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, सार्वजनिक सभा यासारख्या संस्था महाराष्ट्रात जन्माला आल्या. त्यांच्या स्थापनेत मुंबईचे जगन्नाथ शंकरशेट, दादोबा पांडुरंग, डॉ. आत्माराम पांडुरंग, दादाभाई नवरोजी, फिरोझशहा मेहता, बहरामजी मलबारी व पुण्याचे कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णु मोरेश्वर भिडे, सदाशिव बल्लाळ गोवंड्ये, गणेश वासुदेव जोशी, ज्योतिबा व सावित्रीबाई फुले इत्यादी अनेकांचा सहभाग होता. त्यांनी धर्म व समाज सुधारणेसाठी संस्था काढल्या, विधवाविवाहाला उत्तेजन दिले व ते घडवून आणले, स्त्रीशिक्षणासाठी शाळा काढल्या व समाजशिक्षणाच्या हेतूने वृत्तपत्र व नियतकालिके चालविली.

समाजकार्याची धुरा वाहणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी भारतीयांच्या तक्रारी व मागण्या अर्ज निवेदनांद्वारा राज्यकर्त्यांच्या कानी घालण्याचा उपक्रमही सुरू केला. परकीय राज्यकर्त्यांच्या शासनपद्धतीच्या मूलभूत स्वरूपाची जाणीव ठेऊन संघटित लोकमताच्या बळावर सनदशीर मार्गाने भारतीयांच्या राजकीय हक्कांची मागणी ब्रिटिश पार्लमेंटकडे करण्याचा प्रयत्न १८५२ साली महाराष्ट्रात बॉम्बे असोसिएशनने प्रथम केला. यानंतरच्या दोन दशकात महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गात राजकीय हक्कांची जाणीव निर्माण करण्याच्या व भारतीयांच्या तक्रारी व मागण्या सत्ताधाऱ्यांच्या कानावर घालण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या महाराष्ट्रातील दोन उल्लेखनीय संस्था म्हणजे, १८६६ साली दादाभाई नवरोजींनी लंडनला प्रस्थापित केलेल्या ईस्ट इंडिया असोसिएशनची १८६९ साली स्थापन करण्यात आलेली मुंबई शाखा आणि १८७० साली पुण्याला कार्य करू लागलेली सार्वजनिक सभा या होत.

१८७० ते १८८५ हा पंधरा वर्षांचा काळ महाराष्ट्रातील मूलगामी वैचारिक परिवर्तनाचा व संस्थात्मक कार्याचा काळ होता. १८७० सालापासून न्या. महादेव गोविंद रानडे यांनी सार्वजनिक सभेच्या माध्यामातून राजकीय लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे कार्य सुरू केले. १८७४ साली विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंधमालेने न्यूनगंडाने पछाडलेल्या महाराष्ट्रीय समाजाची अस्मिता जागृत केली आणि हतबल बनलेल्या या समाजात प्रतिकारक्षमता निर्माण केली. तसेच समाजसेवेला आजन्म निःस्वार्थपणे वाहून घेणाऱ्या काही आदर्शवादी तरुणांच्या सहकार्याने त्यांनी न्यू इंग्लिश स्कूल काढून राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घातला आणि प्रखर राष्ट्रवादाची दीक्षा देणारी केसरी व मराठा ही मुखपत्रे जन्माला घातली. १८८५ साली मुंबईला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची मुहूर्तमेढ रोवली गेली व तिने भारतीय राष्ट्रवादाला व राष्ट्रैक्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप दिले. या पंधरा वर्षांच्या दरम्यान दादाभाई नवरोजी व न्या. रानडे व विष्णुशास्त्री चिपळूणकर या तीन थोर महाराष्ट्रीय प्रज्ञावंतांनी महाराष्ट्रातील राजकीय जीवनाला चालना दिली व सुशिक्षित वर्गात राष्ट्रवादी विचारांचे अधिष्ठान निर्माण केले.

www.mpscmantra.com

## दादाभाईंचा आर्थिक राष्ट्रवाद

दादाभाईंनी आपल्या जीवनकार्याचा प्रारंभ सामाजिक सुधारणा कार्याने केला खरा, परंतु त्यांचे मन व बुद्धी खऱ्या अर्थाने रमली ती राजकारणात व अर्थकारणात. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे आणि इंग्लंडमधील अनेक वर्षांच्या वास्तव्यामुळे ब्रिटिश उदारमतवादी विचारप्रणालीचा पगडा त्यांच्या मनावर बसणे स्वाभाविकच होते. व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिवाद, उपयुक्ततावाद, मानवतावाद, लोकशाही या इंग्लंडमध्ये प्रचलित असलेल्या तत्त्वांवरच त्यांचे राजकीय विचार अधिष्ठित झाले. ब्रिटिशांनी ज्या विचारप्रणालीच्या आधारे आपली अभूतपूर्व प्रगती करून घेतली त्याच विचारप्रणालीचा अंगिकार करून भारताची उन्नती घडवून आणता येईल ही त्यांची मूलगामी श्रद्धा बनली. इंग्लंडच्या सामर्थ्याचे व संपन्नतेचे मर्म लोकशाही शासनव्यवस्थेत आहे अशी पक्की धारणा झाल्याने भारतातही प्रातिनिधिक शासनपद्धती अस्तित्वात आणली जावी, भारतीयांना सर्व मूलभूत अधिकार मिळावेत, सनदी सेवेत भारतीयांना स्थान मिळावे इत्यादी राजकीय हक्कांच्या मागण्या त्यांनी सातत्याने केल्या. इंग्लंड ही प्रातिनिधिक शासनसंस्थांची जननी असल्यामुळे आणि ब्रिटिश साम्राज्यातील कॅनडासारख्या वसाहतीत ब्रिटिश राज्यकर्ते प्रातिनिधिक शासनसंस्था स्थापन करीत असल्यामुळे अशी शासनव्यवस्था ब्रिटिश सत्ताधारी भारतातही स्थापन करण्यास सिद्ध होतील अशी त्यांना खात्री होती. तसेच इंग्लंडने ज्या उत्क्रांतीच्या मार्गाने प्रगती साधली, त्याच पद्धतीचा अवलंब करून शांततेने, सनदशीरपणे व संघटितपणे राज्यकर्त्यांकडे आपल्या हक्काची मागणी करीत राहिल्यास भारतीयांना राजकीय अधिकार निश्चित मिळतील अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच ईस्ट इंडिया असोसिएशन व बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन मार्फत अशा अर्जविनंत्या राज्यकर्त्यांकडे पाठविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. मात्र दादाभाईंची ही राजकीय विचारप्रणाली साचेबंद नसून परिवर्तनशील होती. अनुभवानुसार व परिस्थितीनुसार त्यांचा राजकीय विचार बदलणारा होता. म्हणूनच भारतीयांच्या प्रशासकीय गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याच्या प्रयत्नापासून तो स्वराज्याची मागणी करेपर्यंत व राजकीय हक्क संपादनासाठी अखंड चळवळ करण्याचा संदेश देईपर्यंत त्यांच्या राजकीय विचारधारणेची झेप गेली. सुमारे साठ वर्षांच्या त्यांच्या राजकीय कार्यकाळात झालेल्या त्यांच्या या वैचारिक उत्क्रांतीचे पडसाद वेळोवेळी काँग्रेसने केलेल्या ठरावांतून उमटलेले आढळतात.

दादाभाईंनी राष्ट्रवादाच्या विकासाला याहीपेक्षा केलेले मौलिक योगदान म्हणजे त्यांनी मांडलेला आर्थिक शोषणाचा सिद्धांत हे होय. ज्या अनेक मार्गांनी ब्रिटिश राज्यकर्ते भारताचे आर्थिक शोषण करीत होते, त्या सर्व मार्गांवर विदारक प्रकाश टाकून त्यांनी राष्ट्रवादाला आर्थिक आशय प्राप्त करून दिला. ज्यावेळी अनेक सुशिक्षित भारतीय ब्रिटिशांच्या भौतिक विकासाने दिपून जाऊन त्यांच्या वैभवसंपन्नतेचे गोडवे गात होते, त्यावेळी राज्यकर्त्यांचे हे वैभव भारताच्या शोषणावर उभारलेले आहे हे त्यांनी साधार सिद्ध केले आणि साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेने चालविलेल्या अमाप अर्थशोषणामुळे देशाच्या होत असलेल्या आर्थिक व नैतिक अधोगतीकडे त्यांनी सुशिक्षितांचे लक्ष आकृष्ट केले. त्याबरोबरच हे अर्थशोषण असेच चालू राहिल्यास भारतीयांत असंतोष माजून, ते जुलूमी शोषक सत्तेविरुद्ध उठाव करण्यास प्रवृत्त होतील असा परखड इशाराही त्यांनी राज्यकर्त्यांना दिला; आणि हे टाळण्यास भारताचे व इंग्लंडचेही कल्याण आहे असे सांगून भारताच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावण्याचे आवाहन त्यांनी राज्यकर्त्यांना केले.

दादाभाईंच्या या प्रभावी विचारांचा व ईस्ट इंडिया असोसिएशन तर्फे त्यांनी केलेल्या कार्याचा परिणाम महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गावर निश्चितच झाला. परंतु या काळात त्यांचे वास्तव्य मुंबईला फारसे न राहिल्यामुळे ईस्ट



www.mpscmantra.com

इंडिया असोसिएशनची सूत्रे त्यांच्या सहकाऱ्यांच्या हाती गेली, आणि या संस्थेतील त्यांचे अनेक सहकारी हे सधन वर्गातील व्यापारी व उद्योजक असल्यामुळे या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित राहिले.

### न्या. रानडे : आधुनिक महाराष्ट्राचे जनक

पुण्याच्या सार्वजनिक सभेने मात्र राजकीय जागृतीचे कार्य अतिशय हिरीरीने व सातत्याने केले. याचे श्रेय बऱ्याच अंशी या सभेचे चिटणीस गणेश वासुदेव जोशी आणि त्यांचे प्रेरणास्थान असलेले न्या. रानडे यांना आहे. दादाभाईंप्रमाणे रानड्यांचा वैचारिक पिंड ब्रिटिश उदारमतवादावर पोसला गेला होता; आणि आपल्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभही त्यांनी समाजसुधारणा कार्याने केला. परंतु समाजजीवनाच्या कोणत्याही एका अंगावरच लक्ष केंद्रित न करता, त्यांनी आपल्या समन्वयात्मक व व्यापक दृष्टीकोनामुळे समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगाचे परीक्षण केले आणि सर्वांगीण सुधारणेचा पुरस्कार केला. व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिनिष्ठा, उपयुक्ततावाद, मानवतावाद व लोकशाही या तत्त्वांची बैठक त्यांनी सर्वांगीण सुधारणेला दिली. कोणतीही सुधारणा ही बाह्य वस्तू नाही व म्हणून वरून लादलेली सुधारणा चिरस्थायी होऊ शकत नाही असे सांगून, विवेकबुद्धीच्या आधारे उत्क्रांतीच्या मार्गाने सुधारणा घडवून आणण्याचा त्यांनी आग्रह धरला. आधुनिक विचारांच्या अनुषंगाने भारतीय समाजव्यवस्थेला इष्ट असे वळण सावकाशपणे देणे श्रेयस्कर आहे ही त्यांची श्रद्धा होती. मात्र बुद्धिनिष्ठ भूमिकेतून समाज सुधारणेचा पुरस्कार करताना त्यांच्या उपजत अशा समतोल, सहिष्णु व समन्वयात्मक प्रवृत्तीमुळे परंपरानिष्ठ समाजावर लोकहितवादींप्रमाणे ते टीकेचे आसूड ओढू शकले नाहीत. तसेच अनिष्ट चालीरीती टाकून द्याव्या असे सांगताना जुनी चांगली मूल्ये त्यांनी त्याज्य मानली नाहीत, उलट ती टिकवून धरण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यामुळे एखादे वेळी परंपरेशी नको ती तडजोड करण्याची पाळी त्यांच्यावर आली.

न्या. रानड्यांच्या सामाजिक विचाराप्रमाणे त्यांच्या राजकीय विचारांचा उगमही पाश्चात्य उदारमतवादात होता. व्यक्तिस्वातंत्र्य, नागरिकांचे मूलभूत हक्क, घटनात्मक शासनपद्धती, कायद्याचे राज्य, लोकशाही, सनदशीर राजकरण व उत्क्रांतीच्या मार्गाने विकास ही उदारमतवादी मूल्ये त्यांनी पुरस्कृत केली. जास्तीत जास्त लोकांचे अधिकाधिक सुख हे राज्यशासनाचे कर्तव्य आहे असे मानून कल्याणकारी राज्याचा विचार त्यांनी प्रतिपादित केला. इंग्रजी राजवट हे ईश्वरी वरदान आहे असे त्यांनी मानले नाही, परंतु इंग्रजी राजवटीमुळे आधुनिक युगाचा परिचय होण्याची संधी योगायोगाने भारतीयांना लाभली आहे, तिचा देशोन्नतीसाठी पुरेपूर फायदा करून घ्यावा व पाश्चात्यांच्या प्रागतिक विचारांच्या अनुषंगाने भारतात सुधारणा घडवून आणावी अशी त्यांची भूमिका होती. परकीय राज्यकर्त्यांकडून मूलभूत राजकीय अधिकार मिळविण्याचे साधन म्हणून लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे महत्त्व त्यांनी ताडले आणि म्हणूनच सार्वजनिक सभेमार्फत जनतेच्या गाऱ्हाऱ्यांची व मागण्यांची निवेदने त्यांनी वेळोवेळी सरकारकडे धाडण्यास प्रेरणा दिली. दक्षिणेत १८७५–७६ साली झालेल्या शेतकऱ्यांच्या दंग्यांचे मूळ कारण सारावसुलीचे कडक धोरण आहे हे त्यांनी सभेमार्फत माहिती गोळा करून सरकारच्या निदर्शनास आणून दिले. फौजदारी खटल्यात ज्यूरींचे हक्क, रेल्वे उतारूंच्या तक्रारी, म्युनिसिपालटीत लोकनिर्वाचित सदस्यांचा अंतर्भाव, संस्थानिक व सरकार यांचे परस्पर संबंध अशा अनेक विषयांवरही त्यांच्या प्रोत्साहनामुळे सार्वजनिक सभेने सरकारकडे वेळोवेळी सूचना पाठविल्या. १८७७ साली वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा करण्याचा सरकार प्रयत्न करीत असता, त्याला विरोध करण्याच्या हेतूने पत्रकारांना संघटित करण्यासाठी सार्वजनिक काकांनी देशभर दौरा केला. महाराष्ट्रातील दुष्काळांचे मूळ कारण धान्यांची टंचाई हे नसून दारिद्र्य हे आहे व या दारिद्र्यायाला सरकारचे आर्थिक धोरण जबाबदार आहे हे सिद्ध करणारे अहवाल सभेने प्रकाशित केले. तसेच दिल्ली दरबाराचे वेळी सभेमार्फत ब्रिटिश राजसत्तेला मानपत्र पाठवून त्यातून भारतीयांच्या राजकीय हक्कांची मागणी



www.mpscmantra.com

करण्यामागील प्रेरणा न्या. रानडे यांची होती. सरकारला प्रजेच्या दुःसह परिस्थितीची जाणीव करून देऊन ती सुधारण्यास प्रवृत्त करणे आणि राजकीय हक्कांची जाणीव जनतेला करून देऊन ते संपादन करण्यासाठी सनदशीर मार्गाने चळवळ करण्यास प्रवृत्त करणे असे न्या. रानड्यांचे सार्वजनिक सभेमार्फत चालविलेल्या कार्याचे दुहेरी उद्दिष्ट होते.

ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या न्यायप्रियतेवरील श्रद्धेने रानड्यांना अंधश्रद्ध बनविले नाही. राज्यकर्त्यांनी चालविलेल्या अर्थशोषणाची त्यांना पूर्ण जाणीव होती व त्याच्या समाजावरील दुष्परिणामांचीही त्यांना कल्पना होती. म्हणून यावर स्वदेशीचा तोडगा त्यांनी सुचविला आणि देशी उद्योग सुरू करण्याचे आवाहन त्यांनी देशबांधवांना केले. तसेच ब्रिटिश उदारमतवादात अनुस्यूत असलेले आर्थिक क्षेत्राबाबतचे शासकीय तटस्थेचे तत्त्व भारताला हानीकारक ठरल्याचे ओळखून, भारतात हे तत्त्व लागू केले जाऊ नये, उलटपक्षी सरकारने येथील उद्योगांना व व्यापाराला संरक्षण व उत्तेजन देण्याचे धोरण अंगिकारावे असे आवाहन त्यांनी केले. यावरुन न्या. रानड्यांचा उदारमतवाद डोळस होता हे सिद्ध होते.

अशा प्रकारे न्या. रानड्यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय सुधारणा एकसमयावच्छेदेकरून व्हायला पाहिजेत असा आग्रही विचार मांडला आणि त्यादृष्टीने कार्य केले. आपल्या लिखाणाने व भाषणांनी त्यांनी अचेतन झालेल्या महाराष्ट्रीय समाजात नवविचारांचे रक्त ओतून समतोल विवेकी सुधारणेचा मार्ग दाखविला. प्रार्थना समाज, सार्वजनिक सभा, वक्तृत्त्वोत्तेजक सभा, औद्योगिक परिषद इत्यादी संस्थांद्वारा महाराष्ट्रीय समाजाला त्यांनी बहिर्मुख, समाजाभिमुख बनविले, व संस्थात्मक कार्याची उभारणी केली. राजकीय अधिकारांची जाणीव निर्माण करून व ते प्राप्त करण्याचे मार्ग दाखवून महाराष्ट्रात त्यांनी राष्ट्रवादाचा भक्कम पाया घातला. म्हणूनच ते 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' अगर 'महाराष्ट्रातील आधुनिक राष्ट्रवादाचे प्रवर्तक' ठरतात. "महाराष्ट्र देश ज्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता.... त्या थंड गोळ्यास कोणत्या रीतीने उब दिली असता तो पुन्हा सजीव होईल व हातपाय हलवू लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतींनी त्यास पुन्हा सजीव करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनीच केली," असे गौरवोद्गार मतभिन्नतेमुळे त्यांच्यावर अधूनमधून टीकेचे प्रहार करणाऱ्या टिळकांनी काढून त्यांच्या मौलिक योगदानाचे पुरेपूर माप त्यांच्या पदरी टाकले आहे. सरकारी नोकरीमुळे रानड्यांच्या सार्वजनिक कार्यावर अनेक बंधने पडली. देशसेवेला पूर्णतः वाहून घेणेही त्यांना जमले नाही. परंतु आजन्म देशसेवेचे कठोर व्रत घेणाऱ्या व्यक्तींचे मोल मोकळ्या मनाने मान्य करण्याचे मोठेपण मात्र त्यांच्या ठिकाणी निश्चितच होते. १८७९ साली राष्ट्रीय शिक्षण प्रसाराच्या हेतूने पुण्याला शाळा काढण्याचा टिळक आगरकरांचा संकल्प त्यांच्या कानी आला तेव्हा, "आजवर सार्वजनिक कार्य सरकारी नोकरीतील मंडळींनी फावल्या वेळी केले. ही तरुण मुले ते जीवनकार्य म्हणून करणार आहेत, त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे." असे उद्गार त्यांनी काढले. यावरुन सार्वजनिक सेवाकार्य जीवनकार्य म्हणून अंगिकृत करण्याचे महत्त्व व निकड ते ओळखून होते हे स्पष्ट दिसते.

**विष्णुशास्त्रींचा प्रखर राष्ट्रवाद**

महाराष्ट्रातील दादाभाई व रानडे यांच्या आंग्लशिक्षित पिढीने परकीय राज्यकर्त्यांच्या पाश्चात्य संस्कृतीचे श्रेष्ठत्व प्रांजलपणे मान्य केले व त्या संस्कृतीचे इष्ट मार्गाने अनुसरण करून प्रगतीचा मार्ग चोखाळण्याचा संदेश आपल्या पिढीला दिला. भारतीय समाजाचा कायापालट करण्याची क्षमता आमच्या संस्कृतीत नाही असा सूर



www.mpscmantra.com

त्यांच्या विचारप्रणालीतून निघत होता. यामुळे पाश्चात्य संस्कृती श्रेष्ठ व आमची संस्कृती हीन अशी न्यूनगंडाची भावना सुशिक्षितांत बळावत होती व त्यातून नैतिक औदासिन्य निर्माण होत होते. ही परिस्थिती समाजाच्या प्रगतीला मारक ठरणारी आहे हे ओळखून तिला छेद देण्याचे महत्त्वाचे कार्य महाराष्ट्रात विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंधमालेद्वारा केले.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात महाराष्ट्रातील डॉ. भांडारकर, न्या. तेलंग यासारखे प्राच्यविद्याविशारद, साने, मोडक यासारखे इतिहास संशोधक व काही शास्त्रीपंडित प्राचीन साहित्य, वेद, उपनिषदे, दर्शने यांचे व भारताच्या वैभवशाली इतिहासाचे पुनरुज्जीवन करून त्याची महती प्रतिपादित करण्याच्या कार्याला लागले होते. चिपळूणकरांच्या निबंधमालेने हाच धागा उचलला आणि आपल्या संपन्न सांस्कृतिक परंपरेची व ओजस्वी ऐतिहासिक घटनांची व विभूतींची माहिती जनतेच्या पुढे मांडली. विष्णुशास्त्रींच्या लालित्यपूर्ण परंतु ओजस्वी शैलीने स्वभाषा, स्वधर्म, स्वसंस्कृती व इतिहास याविषयीच्या सुशिक्षितांच्यात नाहीसा झालेला अभिमान जागृत केला. पाश्चात्य संस्कृतीच्या तुलनेत, त्यातील गुण मान्य करूनही, प्राचीन भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व लोकांच्या गळी उतरविण्याची त्यांची धडपड होती. देशाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी परकीयांचे अनुकरण करण्याची गरज नसून त्यासाठी लागणारे आवश्यक ते प्रेरणास्रोत आमच्या इतिहासातच सापडतात हे सुशिक्षितांना पटवून देण्याचा त्यांचा खटाटोप होता. इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे असा विचार मांडणाऱ्या नेतृत्वावर कोरडे ओढून आंग्लशिक्षितांत निर्माण झालेली परावलंबित्वाची व न्यूनगंडाची भावना त्यांनी ठेचून टाकली. इंग्रजी राजवटीच्या शोषक स्वरूपावर व या राजवटीमुळे समाजाच्या झालेल्या नैतिक ऱ्हासावर विष्णुशास्त्रींनी प्रकाश टाकला. शोषक राजकर्त्यांकडून न्याय्य अधिकार मिळण्याची अपेक्षा वांझोटी ठरेल असा इशारा देऊन त्यांनी स्वावलंबनाचा मार्ग हिरीरीने पुरस्कृत केला. तसेच पारतंत्र्यामुळे निराशेने खचून जाण्याचे कारण नाही, अमेरिकन वसाहतकारांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा देऊन स्वातंत्र्य संपादन केले तसे करणे आम्हांस अशक्य नाही असा आशावादी विचार मांडून समाजात प्रतिकारक्षमता निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परकीय राज्यकर्त्यांचे हित आणि भारतीयांची उन्नती या गोष्टी परस्परविरोधी आहेत, त्यांचा समन्वय कधीच साधला जाणे शक्य नाही आणि म्हणून राज्यकर्त्यांच्या प्रजाकल्याणाच्या घोषणांनी व त्यांच्या मायावी सुधारणावादाने मोहून न जाता स्वातंत्र्यासाठी धडपड करण्याचा प्रेरक संदेश शास्त्रीबुवांनी महाराष्ट्राला दिला. त्यांच्या अशा ओजस्वी विचाराने आणि शैलीने नैराश्य व न्यूनगंडाच्या छायेत वावरणाऱ्या महाराष्ट्रीय समाजात नवा उत्साह, नवी चेतना, नवा ध्येयवाद निर्माण करण्याचे, तसेच या समाजाची अस्मिता व स्वाभिमान जागृत करून त्यात प्रतिकारक्षमता व लढाऊ बाणा निर्माण करण्याचे मौलिक कार्य केले. गतिहीन होऊन पडलेल्या महाराष्ट्रीय समाजात त्यांनी नवी महत्त्वाकांक्षा चेतविली. त्याबरोबरच फावल्या वेळी राष्ट्रकार्य करण्याचा तत्कालीन समाजसुधारकांचा पायंडा मोडून निःस्वार्थपणे आजन्म देशसेवेचे सतीचे वाण हाती घेण्याचा ओजस्वी आदर्शही त्यांनी समाजापुढे ठेवला.

महाराष्ट्रीय मनाचा मूळ पिंड राजकारणनिष्ठ आहे. स्वाभिमान, अन्यायाची चीड, स्वातंत्र्यप्रियता हे या समाजाचे स्थायीभाव आहेत. यामुळे महाराष्ट्रातील राज्यसत्तेने—मराठ्यांनी परकीयांविरुद्ध अखेरपर्यंत लढा दिला. १८५७ च्या उठावातही महाराष्ट्रीय नेतृत्व आघाडीला होते. या उज्ज्वल इतिहासाची स्मृती करून देत विष्णुशास्त्रींनी मराठी समाजाचे सुप्त स्थायीभाव जागृत केले. आपल्या प्रेरक आचारविचारांनी त्यांनी टिळक, आगरकर, नामजोशी यासारख्या ध्येयवादी तरुणांची पिढी प्रभावित केली. प्रखर राष्ट्रवादाची ज्योत प्रज्वलित करून विष्णुशास्त्रींनी महाराष्ट्रीयांत नवे मन:सामर्थ्य निर्माण केले, आणि स्वार्थत्यागी, ध्येयवादी व क्रियाशील राष्ट्रवादाचा पाया महाराष्ट्रात घातला.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

## वऱ्हाडातील पुनरुज्जीवन

पश्चिम महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास सुरू झालेली सर्वांगीण पुनरुज्जीवनाची प्रक्रिया वऱ्हाड व मध्यप्रांतातील नागपूरकडील मराठी भाषिक भागात मात्र काहीशी उशीरा सुरू झाली. वऱ्हाडचा भाग लॉर्ड डलहौसीने १८५४ साली निजामाच्या हातून काढून घेऊन तो ब्रिटिश सत्तेखाली आणला. परंतु १८५७ सालच्या उठावाच्या वेळी निजामाने ब्रिटिशांना केलेल्या मदतीच्या मोबदल्यादाखल पश्चिम वऱ्हाडचा भाग १८६१ साली त्याला परत देण्यात आला. पूर्व वऱ्हाडच्या भागाचे सार्वभौमत्व निजामाकडे राहिले तर या भागाचे प्रशासन मात्र ब्रिटिशांनी आपल्या हाती ठेवले. त्यानंतर या भागात इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था स्थापन झाल्या. यामुळे आधुनिक विचारांचे लोण या भागात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत उशीरा पसरले व आधुनिक पाश्चात्य विचारांनी प्रेरित होऊन समाजसुधारणेच्या कार्याला प्रवृत्त झालेली मंडळी साधारणतः १८८० च्या सुमारास पुढे येऊ लागली.

## नागपूरच्या भागात राष्ट्रवादाचा उदय

अशीच स्थिती नागपूरकडील भागात होती. नागपूरच्या भोसले राजकुटुंबातील राजा तिसरा रघुजी १८५३ साली निपुत्रिक वारल्यानंतर गव्हर्नर जनरल डलहौसीने या संधीचा फायदा घेऊन भोसल्यांच्या दत्तकाचा वारसा हक्क नामंजूर ठरविला आणि नागपूरचे राज्य खालसा केले व तो भाग ब्रिटिश शासनाखाली असलेल्या प्रांतात समाविष्ट करण्यात आला. त्यानंतर येथे इंग्रजी शिक्षणाला व आधुनिक विचारांच्या प्रसाराला चालना मिळाली. १८६९ साली नागपूरला नील सिटी स्कूल व १८८३ मध्ये मॉरिस कॉलेज व मिशनऱ्यांचे हिस्लॉप कॉलेज जन्माला आले. १८८१ साली येथे पहिला छापखाना काम करू लागला. १८८८ साली नागपूरला 'सी. पी. न्यूजपेपर' व १८९१ साली ' इंडिपेडंट' व 'देशसेवक' ही पत्रके निघू लागली. तोवर पश्चिम महाराष्ट्रातील लोकहितवादी, रानडे, चिपळूणकर इत्यादींच्या विचारांचे लोण इकडे पोचले होते. १८८५ पर्यंत सर बिपिन कृष्ण बोस, बापूराव किनखेडे, गोपाळराव भिडे, गंगाधरराव चिटणवीस, कृष्णराव देशपांडे, केशवराव ताम्हन, वामनराव कोल्हटकर इत्यादी मंडळी सुधारणाकार्यात रस घेऊ लागली होती. पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या धर्तीवर कार्य करण्याच्या उद्देशाने नागपूर व अमरावती येथे १८८६ साली सार्वजनिक लोकसभा स्थापन झाल्या. यावरून ह्या भागात संस्थात्मक कार्याचा श्रीगणेशा पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत उशीरा झाला असे दिसते. १८८५ सालच्या कॉंग्रेसच्या स्थापनेत वऱ्हाड नागपूरकडील मंडळींचा सहभाग नव्हता. १८८६ पासून मात्र ह्या भागातील लोकांचा कॉंग्रेस चळवळीतील सहभाग वाढत्या प्रमाणात राहिला. यावरून वऱ्हाड नागपूरकडील भागात कॉंग्रेसच्या जन्मकाळापर्यंत राजकीय जागृती झाली होती हे निःसंदिग्धपणे निदर्शनास येते.

अशा प्रकारे महाराष्ट्रात इंग्रजी राजवटीला प्रारंभ झाल्यानंतर १८८५ पर्यंतच्या सुमारे साठ वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रीय विचारवंताच्या तीन पिढ्यांनी भिन्न मार्गांनी सर्वांगीण प्रबोधनाचे कार्य केले. पहिल्या पिढीतील लोकहितवादींनी महाराष्ट्राच्या गतानुगतिक समाजातील दोषस्थळांवर बोट ठेवून समाजाला खडबडून जागे केले. दुसऱ्या पिढीतील दादाभाई व न्या. रानडे यांनी विवेकी व डोळस राष्ट्रवादाचा पुरस्कार करून संस्थात्मक कार्याचा पायंडा घातला, तर तिसऱ्या पिढीतील विष्णुशास्त्रींनी गलितगात्र झालेल्या महाराष्ट्रीय समाजाला सामर्थ्य संपादनाचा आणि लढाऊ बाण्याचा प्रेरक मंत्र दिला. या व अशा इतर काही विचारवंतांच्या वैचारिक प्रेरणेने व कार्याने आधुनिक महाराष्ट्राचा राजकीय पिंड घडविला. येथे राष्ट्रवादाचे भक्कम अधिष्ठान निर्माण केले, आणि राष्ट्रीय कॉंग्रेसने स्थापनेला अनुकूल अशी भूमी तयार केली.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

प्रकरण २

# काँग्रेसची प्रारंभीची वाटचाल

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म १८८५ साली झाला असला तरी तिच्या स्थापनेची प्रक्रिया १८८३ पासूनच सुरू झाली होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही प्रक्रिया सुरू केली ती एका सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्याने. तो अधिकारी होता ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम.

ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत एक अधिकारी म्हणून ह्यूम भारतात कामाला लागल्यापासून भारतात कल्याणकारी शासकाची भूमिका ब्रिटिशांनी घ्यावी असे त्यांचे मत बनू लागले होते. १८५७ च्या उठावाने भारतीय मनात धुमसत असलेल्या प्रचंड ब्रिटिश विरोधाची त्यांना पूर्ण कल्पना आली होती. हा असंतोष दूर केल्याखेरीज ब्रिटिश सत्तेला भारतात दृढता येणार नाही आणि ह्या असंतोषांचे निराकरण उदारमतवादी शासकीय धोरणानेच करता येईल अशी त्यांची धारणा बनली होती. भारतीयांच्या उठावाचा उपशम केल्यानंतर ब्रिटिश राजवट येथे निर्वेध झाली आहे असे त्यांना वाटत नव्हते. विशेषतः १८७० ते १८७९ च्या दरम्यान केंद्रीय सरकारच्या गृहखात्याचे सचिव म्हणून काम करीत असताना देशातील निरनिराळ्या भागात चाललेल्या घडामोडीबाबत गुप्तचर विभागाने पाठविलेले अहवाल त्यांच्या नजरेखालून गेले. या अहवालांनी देशातील निरनिराळ्या वर्गात व भागात खदखदत असलेल्या तीव्र असंतोषाची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. यामुळे देश पुन्हा दुसऱ्या प्रचंड उठावाच्या उंबरठ्यावर उभा आहे की काय असे भय त्यांना भेडसावू लागले. ते विशेष चिंतित झाले ते शेतकरी वर्गातील आणि आंग्लशिक्षित भारतीय तरुणांतील प्रखर असंतोषामुळे. या दोन वर्गांची युती झाल्यास पुन्हा राष्ट्रीय उठावाचा वणवा पेटायला वेळ लागणार नाही अशी त्यांची ठाम समजूत बनली. ही संभाव्य दुर्घटना टाळणे त्यांना इंग्लंडच्या व भारतीयांच्या दृष्टीनेही अगत्याचे वाटले. इंग्लंडची सत्ता भारतात टिकावी हे त्यांना वाटत होते. त्याबरोबरच उदारमतवादी ब्रिटिश अंमलाखालीच भारताची प्रगती होऊ शकेल अशीही त्यांची धारणा होती. म्हणून राष्ट्रीय विद्रोहाचा संभाव्य धोका टाळण्याचा एक तोडगा त्यांनी शोधला. तो म्हणजे भारतीय आंग्लशिक्षितांना विधायक कार्याला जुंपण्याचा. ब्रिटिश उदारमतवादाने भारावलेल्या व त्या तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने आपल्या देशाचा कायापालट घडवून आणण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या उत्साही व कार्यप्रवण भारतीय तरुणांचे लक्ष विधायक सार्वजनिक कल्याणकार्यावर केंद्रित केल्यास, आणि ब्रिटिश प्रशासनाबाबतच्या त्यांच्या तक्रारींना वाचा फोडण्यासाठी व त्यांच्या मनात खदखदत असलेल्या असंतोषाला सांडवाट मिळवून देण्यासाठी सनदशीर मार्गाने कार्य करणारे एखादे राष्ट्रीय व्यासपीठ निर्माण केल्यास त्यांच्या असंतोषाचा विद्रोहाच्या रूपाने स्फोट होणार नाही अशी त्यांची धारणा बनली.

## ह्यूम यांचा उपक्रम

या हेतूने प्रेरित होऊन १८८२ साली सेवानिवृत्त होताच ह्यूम यांनी आपल्या धोरणाचे सूतोवाच कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना उद्देशून लिहिलेल्या एका अनावृत्त पत्राने केले. १ मार्च १८८३ रोजी काढलेल्या या पत्राने, वैयक्तिक स्वार्थ व सुखासीन जीवनाचा मोह सोडून सार्वजनिक कल्याणकार्यासाठी पुढे सरसावण्याचे आवाहन त्यांनी आंग्लशिक्षित भारतीयांना केले. या आवाहनाला आशादायक प्रतिसाद मिळताच, त्यांना सहकार्य देण्यास पुढे आलेल्या भारतीयांच्या मदतीने १८८४ साली त्यांनी 'इंडियन नॅशनल युनियन' नावाची संस्था प्रस्थापित केली. या संस्थेच्या द्वारा एक कायम स्वरूपाची राष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचा निर्णय भारतीय कार्यकर्त्यांशी विचारविमर्ष केल्यानंतर ह्यूम यांनी पक्का केला.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

या निर्णयाला मूर्त स्वरूप देण्याच्या मार्गात येणारी संभाव्य धोंड उत्साहाच्या भरातही ह्यूम यांच्या नजरेतून सुटली नाही. कट्टर साम्राज्यवादी असा कंझर्वेटिव्ह पक्ष इंग्लंडमध्ये अधिकारारूढ असताना आणि ब्रिटिश नोकरशाहीतील बव्हंशी अधिकारी याच धोरणाचे पुरस्कर्ते असताना भारतीयांची एखादी राष्ट्रीय संघटना स्थापन होणे त्यांना रुचणार नाही हे ह्यूम जाणून होते. यावर उतारा म्हणून ब्रिटिश पार्लमेंटमधील उदारमतवादी सदस्यांची आपल्या संकल्पाला त्यांनी संमती मिळवून घेतली. लॉर्ड नॉर्थब्रुक, लॉर्ड रीपन यासारख्या भारतातील स्फोटक परिस्थितीची कल्पना असलेल्या भूतपूर्व उदारमतवादी व्हाइसरॉयशी आणि नुकत्याच व्हाइसरॉय पदी आलेल्या लॉर्ड डफीनशीही सल्लामसलत करून त्यांची आपल्या योजनेला मूक मान्यता ह्यूम यांनी मिळविली. या पूर्व तयारीनंतरच राष्ट्रीय संघटनेच्या आयोजनाची तयारी सुरू झाली.

या सुमारास देशाच्या वेगवेगळ्या भागात राष्ट्रवादाच्या प्रसाराचे कार्य कलकत्त्याची इंडियन असोसिएशन, पुण्याची सार्वजनिक सभा, मुंबईची बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन, मद्रासची महाजन सभा यासारख्या संस्था स्वतंत्रपणे प्रांतिक स्तरावर करीत होत्या. त्यांचे कार्य राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीने अपुरे पडत असल्याची आणि ब्रिटिश राजवटीत निर्माण होणाऱ्या भारतीयांपुढील समान प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यासाठी राष्ट्रीय संघटना उभारण्याची निकड सुबुद्ध सुशिक्षित भारतीयांना, विशेषतः लॉर्ड लिटन व लार्ड रीपनच्या शासनकाळात जाणवू लागली होती. राष्ट्रीय स्तरावर संघटित झाल्याखेरीज भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण होणार नाही ही त्यांची खात्री झाली. लॉर्ड लिटनने १८७९ साली आयोजित केलेल्या दरबारासाठी देशाच्या वेगवेगळ्या भागांचे प्रतिनिधी एकत्र गोळा झालेले पाहून अशाच प्रकारचे भारतीयांचे अधिवेशन देशापुढील समस्यांचा विचार करण्यासाठी भारतीयांनी आयोजित करावा या कल्पनेने काही भारतीयांच्या मनात मूळ धरले. त्यापैकी दोन व्यक्ती महाराष्ट्राच्या होत्या. पुण्याच्या सार्वजनिक सभेचे गणेश वासुदेव जोशी आणि सदाशिव बल्लाळ गोवंड्ये यांनी रा.ब. विश्वनाथ नारायण मंडलिक यांना यावेळी एक पत्रक पाठविले होते व त्यात भारतीयांचे 'स्थानिक पार्लमेंट' भरविण्याचा विचार मांडला होता असा स्पष्ट उल्लेख हवालदारांनी लिहिलेल्या मंडलिकांच्या चरित्रात आढळतो.

ह्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न उत्साही बंगाली नेते सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी केला. १८७९ साली लंडन येथील स्पर्धा परीक्षेसाठी उमेदवारांची कमाल वयोमर्यादा २१ वरून १९ वर्षावर आणून भारतीय तरुणांना सनदी सेवेची दारे अप्रत्यक्षरीत्या बंद करण्याच्या ब्रिटिश सरकारच्या निर्णयाविरुद्ध आंदोलन करण्यास भारतीय सुशिक्षितांना संघटित करण्याची खटपट बॅनर्जींनी केली. त्यावेळी त्यांना मिळालेल्या अनुकूल प्रतिसादामुळे समान राष्ट्रीय समस्यांवर विचारविनिमय करण्यासाठी राष्ट्रीय परिषद भरविणे शक्य असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. सुशिक्षित भारतीयांत वसत आलेल्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा सुखद प्रयत्न यावेळी बॅनर्जींना आला आणि ही भावना अधिक दृढ करण्याच्या हेतूने एक राष्ट्रीय परिषद त्यांनी १८८३ च्या अखेरी कलकत्त्याला घेतली. यासाठी देशातील अनेक भागांचे प्रतिनिधी आले होते. याच परिषदेचे दुसरे अधिवेशन डिसेंबर १८८५ मध्ये कलकत्त्याला भरले. हा भारतीयांचा एकराष्ट्रीयत्वाच्या जाणीवेचा पहिला स्पष्ट हुंकार होता.

## काँग्रेसच्या स्थापनेत महाराष्ट्राचा हातभार

या दरम्यान राष्ट्रीय संघटना स्थापन करण्याबाबत ॲलन ह्यूम हे मुंबई व पुण्याच्या कार्यकर्त्यांशी वाटाघाटी करीत होते. मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशनचे फिरोझशहा मेहता, दिनशा वाछा, दादाभाई नौरोजी, काशिनाथ त्र्यंबक तेलंग, तसेच पुण्याचे न्या. रानडे, डॉ. भांडारकर इत्यादींशी त्यांनी चर्चा केली. न्या. रानड्यांशी विचारविमर्ष

www.mpscmantra.com

करण्यासाठी ह्यूम १८८४ व १८८५ साली दोनदा पुण्याला येऊन गेले. या सर्व वाटाघाटीतून इंडियन नॅशनल युनियन तर्फे राष्ट्रीय अधिवेशन घेण्याचा विचार पक्का झाला. पुणं हे त्यावेळी वैचारिक व सांस्कृतिक प्रगतीचे आघाडीचे केंद्र मानले जात असल्यामुळे न्या. रानड्यांच्या प्रेरणेने हे राष्ट्रीय अधिवेशन पुण्याला घेतले जावे असे ठरले.

श्रीमती ॲनी बेझंट यांनी लिहिलेल्या कॉंग्रेसच्या इतिहासाबाबतच्या ग्रंथात राष्ट्रीय सभा बोलविण्याची कल्पना डिसेंबर १८८४ मध्ये मद्रास येथे भरलेल्या सतरा भारतीय कार्यकर्त्यांच्या बैठकीत जन्माला आली व या बैठकीला ह्यूम व सुरेंद्रनाथ बॅनर्जी उपस्थित होते असा उल्लेख आढळतो. परंतु या विधानाची पुष्टी करणारा पुरावा मिळत नाही. उलटपक्षी ह्यूम यांनी मुंबई व पुण्याच्या कार्यकर्त्यांशी केलेल्या वाटाघाटीतून हा विचार निश्चित झाला याला मात्र भरपूर सबळ पुरावा मिळतो. तसेच राष्ट्रीय सभेची कल्पना कोठून निघाली याविषयी १८९६ साली न. चि. केळकरांनी न्या. रानडे यांना विचारले असता, ह्यूम व त्यांचे सहकारी वेडरबर्न यांनी ही कल्पना पुरस्कृत केली आणि रानडे वगैरे पुण्या-मुंबईच्या मंडळींनी त्यांना साथ दिली असे रानड्यांनी केळकरांना सांगितल्याचा निर्देश केळकरांनी डिसेंबर १९३५ च्या सह्याद्री मासिकातील आपल्या लेखात केला आहे. यावरून कॉंग्रेसच्या प्रस्थापनेला महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात हातभार लावला असे निश्चितपणे आढळून येते.

## पुण्याला अधिवेशनाची तयारी

इंडियन नॅशनल युनियन तर्फे पुण्याला राष्ट्रीय परिषद घेण्याचे निश्चित ठरल्यानंतर मार्च १८८५ मध्ये निरनिराळ्या प्रांतातील सार्वजनिक संस्थांना एक परिपत्रक पाठवून संकल्पित राष्ट्रीय सभेसाठी प्रतिनिधी पाठविण्याचे आवाहन ह्यूम यांनी केले. राष्ट्रोन्नतीच्या कार्यात रूची असलेल्या आंग्लशिक्षित भारतीयांना एकत्र येऊन परस्पर परिचय करून घेता यावा, विचारांच्या देवाणघेवाणीला त्यांना संधी मिळावी आणि देशहिताच्या दृष्टीने सर्वांनी मिळून कोणता उपक्रम हाती घेणे श्रेयस्कर ठरेल यावर मोकळेपणाने चर्चा करून निर्णय घेता यावा हे या अधिवेशनामागील उद्देश असल्याचे या पत्रकात स्पष्ट करण्यात आले. तसेच या अधिवेशनात राष्ट्रीय सभेचे बीजारोपण होईल आणि प्रातिनिधिक शासनाला भारतीय लायक नाहीत या काही ब्रिटिशांनी चालविलेल्या अपप्रचाराचे वैय्यर्थ्य सिद्ध करता येईल असा विचारही या परिपत्रकात नमूद करण्यात आला.

डिसेंबर १८८५ च्या अखेरी राष्ट्रीय अधिवेशन पुण्याला होणार असल्याची बातमी ८ डिसेंबरच्या केसरीच्या अंकात प्रसिद्ध झाली. पुणे हे मध्यवर्ती व म्हणून सोयीचे ठिकाण वाटल्यावरून व विशेष म्हणजे येथे नेटाने सार्वजनिक कार्य करणारी मंडळी असल्यामुळे पुण्याला हे अधिवेशन घेण्याचा निर्णय औचित्यपूर्ण आहे असा अभिप्राय व्यक्त करून या निर्णयाचे केसरीने स्वागत केले. अधिवेशनाच्या आयोजनाची जबाबदारी न्या. रानड्यांच्या प्रोत्साहनामुळे सार्वजनिक सभेने पत्करली आणि हे अधिवेशन यशस्वी करण्याच्या जिद्दीने सभेचे कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले. आघाडीच्या स्थानिक कार्यकर्त्यांची व शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची मिळून एक स्वागत समिती गठीत करण्यात आली. अधिवेशनासाठी लागणारा निधी फारसे प्रयास न पडता देणग्यांच्या रूपाने गोळा होऊ लागला. अधिवेशनासाठी देशाच्या निरनिराळ्या भागांतून येणाऱ्या प्रतिनिधींची सर्व व्यवस्था करण्याचे उत्तरदायित्व स्वागत समितीने पत्करले. पुण्याला पोचल्यापासून तो पुणे सोडेपर्यंत प्रतिनिधींच्या राहण्याचा व खाण्यापिण्याचा सर्व खर्च स्वागत समिती करणार असे ठरले. आलेल्या प्रतिनिधींना एकमेकांशी चर्चा करणे सोईस्कर व्हावे म्हणून पर्वती नजीकच्या रम्य परिसरातील पेशव्यांच्या भव्य प्रासादात प्रतिनिधींच्या राहण्याची व्यवस्था केली गेली. तेथेच अधिवेशनही भरावयाचे होते.

www.mpscmantra.com

## कॉंग्रेसचा शिलान्यास

अधिवेशनाची सिद्धता अशा प्रकारे अगदी ऐन भरात असताना, पुण्याला अचानक कॉलऱ्याची साथ सुरू झाली. यामुळे संयोजकांच्या उत्साहावर साहजिकच पाणी पडले. शेवटी नाईलाजाने अधिवेशन पुण्याला न घेता मुंबईला भरविण्याचा निर्णय घ्यावा लागला. अधिवेशनाची वेळ अगदी जवळ येऊन ठेपली असताही अल्पावधीत मुंबईला अधिवेशनाची सिद्धता करण्याची तयारी बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या कार्यकर्त्यांनी आणि गोकुलदास तेजपाल संस्कृत कॉलेजच्या व्यवस्थापकांनी दाखविली. गोवालिया तलावानजीकची आपली मोठी इमारत कॉलेजच्या व्यवस्थापकांनी अधिवेशनासाठी संयोजकांच्या स्वाधीन केली.

## मुंबईचे अधिवेशन

अधिवेशनाला उपस्थित असलेल्या अधिकृत प्रतिनिधींची संख्या बहात्तर होती. हे देशाच्या निरनिराळ्या भागातील स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी होते. याखेरीज काही तांत्रिक अडचणीमुळे ज्यांची नावे प्रतिनिधींच्या यादीत समाविष्ट केली गेली नाहीत अशी न्या. महादेव गोविंद रानडे, डेक्कन कॉलेजचे प्राचार्य डॉ. भांडारकर यासारखी काही प्रतिष्ठित मंडळीही अधिवेशनाला हजर होती. अधिवेशनासाठी आलेल्या सदस्यांशी चर्चा करण्यासाठी मुंबईतील प्रो. वर्डस्वर्थ, कर्नल फेलफ्स्, सर वेडरबर्न वगैरे ब्रिटिश मंडळी अधिवेशनाच्या स्थळी आली. मुंबई व पुण्याहून निघणाऱ्या ज्ञानप्रकाश, मराठा, केसरी, इंदुप्रकाश इत्यादी वृत्तपत्रांचे व नियतकालिकांचे संपादकही अधिवेशनासाठी हजर होते. अधिवेशनात सहभागी झालेल्या मुंबई पुण्यातील सदस्यांत दादाभाई नवरोजी, त्यावेळचे मुंबई म्युनिसिपालटीचे अध्यक्ष बॅ. फिरोजशहा मेहता, बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनचे सचिव दिनशा वाछा, प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते बहरामजी मलबारी, सॉलिसीटर रहिमतुल्ला सयानी, इंदुप्रकाशचे संपादक नारायण गणेश चंदावरकर, पुण्याच्या सार्वजनिक सभेचे अध्यक्ष रा.ब. कृष्णाजी नूलकर, सार्वजनिक सभेचे सचिव शिवराम हरी साठे, न्यू इंग्लिश हायस्कूलचे प्रमुख व्यवस्थापक वामन शिवराम आपटे, ज्ञानप्रकाशचे संपादक रामचंद्र मोरेश्वर साने, सार्वजनिक सभेच्या नियतकालिकाचे संपादक सीताराम हरी चिपळूणकर, केसरी – मराठ्याचे संपादक गोपाळ गणेश आगरकर यांचा समावेश होता. मुंबई विधिमंडळाचे सदस्य असलेले काशिनाथ त्र्यंबक तेलंग हे अधिवेशनाचे कार्यवाह होते.

देशाच्या निरनिराळ्या भागातून अधिवेशनाला आलेले हे सदस्य म्हणजे भारतीयांच्या वरवरच्या विविधतेखाली असणाऱ्या मूलभूत ऐक्याचे दृश्य रूप होते. त्यात हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन अशा भिन्न धर्मांचे लोक होते. तसेच त्यांच्यात भिन्न व्यवसाय करणारे लोक होते. त्यांच्यापैकी बरेच लोक कायदेपंडित होते. त्याबरोबरच त्यांच्यात व्यापारी होते. डॉक्टर होते, जमीनदार होते. बँकेचे व्यवस्थापक होते, वृत्तपत्रांचे संपादक होते, सामाजिक कार्यकर्ते होते व शाळा कॉलेजमधील अध्यापकही होते. त्यांच्यापैकी काही सदस्य इंग्रजांनाही लाजवील अशा नखशिखांत पाश्चात्य पोशाखात आले होते, तर बंगाल, मद्रास व पुण्याजवळील काही लोक आपल्या खास प्रादेशिक पोशाखात येऊन स्वसंस्कृतीवरील निष्ठा व्यक्त करीत होते. अशा नानाविध पोषाखात आलेल्या भारतीयांनी एकत्रित येऊन परकीय राज्यकर्त्यांच्या भाषेत आपल्या देशाच्या समस्यांवर विचारविनिमय करावा ही एक अभूतपूर्व घटना होती.

२८ डिसेंबर रोजी अधिवेशनाचे कामकाज मोठ्या उत्साहाने सुरू झाले. अधिवेशनातील वातावरण गंभीर होते. एका ऐतिहासिक महत्त्वाच्या घटनेचा शुभारंभ आपण करीत आहोत ही जाणीव जणू काय उपस्थितांच्या

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

अंतर्मनात वसत होती. ह्यूम यांनी अधिवेशनाच्या प्रारंभी बॅ. उमेशचंद्र बॉनर्जी यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले आणि मद्रासचे सुब्रह्मण्यम अय्यर व मुंबईचे तेलंग यांनी त्या सूचनेला दुजोरा दिला. ह्यूम यांच्या भाषणाने अधिवेशनाची सुरूवात झाली. त्यांनी आपल्या भाषणाच्या प्रारंभी इंग्लंडच्या राजसत्तेप्रती आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांप्रती निष्ठा व कृतज्ञता व्यक्त केली. इंग्लंडने घालून दिलेल्या शांततापूर्ण व सनदशीर मार्गानेच आपले विचार राज्यकर्त्यांपुढे नम्रपणे मांडण्याचा या सभेचा कृतसंकल्प असल्यामुळे तिच्यावर राजद्रोहाचा आरोप करणं उचित नाही हे त्यांनी ठासून सांगितले. या सभेच्या कार्याने भारतीयांचेच नव्हे तर इंग्लंडचेही हित साधले जाणार आहे असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. देशाच्या उन्नतीला हातभार लावण्याची तळमळ असलेल्या देशाच्या सर्व भागातील मंडळींना एकत्र आणणे, धर्म, वंश, जात व प्रादेशिक भेदांच्या कृत्रिम मर्यादा नाहीशा करून एकराष्ट्रीयत्वाची भावना दृढ करणे, भारतीय जनतेपुढे असणाऱ्या महत्त्वाच्या व निकडीच्या प्रश्नांचा उहापोह करण्यासाठी देशातील परिपक्व बुद्धीच्या कार्यकर्त्यांसाठी एक राष्ट्रीय व्यासपीठ निर्माण करणे आणि देशहिताच्या दृष्टीने कोणते कार्य करणे श्रेयस्कर ठरेल याविषयी निर्णय घेणे ही ह्या सभेची मूलभूत उद्दिष्टे असल्याचे त्यांनी घोषित केले. यानंतर बॉनर्जी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ह्यूम यांनी निर्देशित केलेल्या उद्दिष्टांचा पुनरुच्चार केला आणि इंग्लंडच्या राजसत्तेप्रती भारतीयांच्या मनात नितांत श्रद्धा वसत असल्याचा आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांचे बोट धरुनच ते आपल्या प्रगतीची वाटचाल करू इच्छितात असा स्पष्ट निर्वाळा दिला.

चर्चासत्रात भारतीयांना हानीकारक व अन्याय्य वाटणाऱ्या अनेक प्रशासकीय निर्णयाबाबत आणि धोरणाबाबत उपस्थित सदस्यांनी आपली मते मांडली. न्या. रानडे हे अधिवेशनाचे अधिकृत सदस्य नसल्यामुळे त्यांना चर्चेत भाग घेता आला नाही. परंतु राष्ट्रीय समस्यांशी त्यांचे इतके तादात्म्य झाले होते की चर्चासत्रातील आपली भूमिका श्रोत्यांची आहे, प्रतिनिधीची नाही हे ते साफ विसरत आणि ठराव योग्य शब्दांत मांडले जात नाहीत असे लक्षात आल्यास उत्स्फूर्तपणे भाषणासाठी उठत. या सभेत ज्या नानाविध विषयांवर चर्चा झाली त्यावरून अधिवेशनाला हजर असलेले सदस्य हे देशातील मूठभर मध्यमवर्गीय आंग्लशिक्षित वर्गाचे प्रतिनिधी असले, तरी त्यांचे विचार व मागण्या मात्र त्यांच्या वर्गापुरत्या सीमित नव्हत्या, उलट भारतीयांपुढील सर्वसामान्य प्रश्नांची दखल घेतली आणि त्या अनुषंगानेच आवश्यक त्या मागण्या पुढे केल्या हे स्पष्ट दिसते.

अधिवेशनातील चर्चेनंतर आठ ठराव पारित करण्यात आले आणि त्या द्वारा भारतीयांच्या कल्याणाच्या हेतूने काही मागण्या करण्यात आल्या. भारतातील प्रशासन यंत्रणेतील दोषांची व उणीवांची चौकशी करण्यासाठी एक शासकीय चौकशी समिती नियुक्त केली जावी व त्यात काही भारतीयांचाही समावेश असावा; लंडनमध्ये असलेले इंडिया कौन्सिल हे भारतमंत्र्याचे सल्लागार मंडळ निरूपयोग असल्यामुळे बरखास्त केले जावे, प्रांतिक व क्रेंदीय विधिमंडळात निर्वाचित भारतीय सदस्यांचा अंतर्भाव केला जावा; तसेच या विधिमंडळांचा विस्तार केला जावा आणि अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा त्यांना अधिकार दिला जावा; भारतीयांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटची एक कायम स्वरूपाची उपसमिती स्थापन केली जावी; शासकीय सनदी सेवेत भारतीयांना प्रवेश मिळविता यावा यासाठी इंग्लंडप्रमाणे भारतातही स्पर्धा परीक्षा घेण्यात याव्या आणि स्पर्धापरीक्षेसाठी उमेदवाराची कमाल वयोमर्यादा १९ वरून २३ वर्षांपर्यंत वाढविण्यात यावी; भारत सरकारच्या अवाढव्य लष्करी खर्चात कपात केली जावी; भारतात आयात होणाऱ्या मालावर जकात कर बसवून भारतीय उद्योगव्यवसायांना संरक्षण दिले जावे; मिठावरील कर रद्द करून सर्वसामान्य भारतीय जनतेवर पडणारा कराचा बोजा हलका करावा ह्या त्या प्रमुख मागण्या होत्या.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

अधिवेशनात पारित झालेल्या ठरावांची प्रत विचारार्थ व कार्यवाहीसाठी ब्रिटिश सरकारकडे पाठविली जावी असा निर्णय घेण्यात आला. तसेच याच्या प्रती देशाच्या सर्व भागातील सार्वजनिक संस्थांना पाठविल्या जाव्यात व त्यावर ऊहापोह करण्यासाठी तेथील स्थानिक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक सभा आयोजित कराव्या असाही प्रस्ताव सदस्यांनी सर्वांनुमते मंजूर केला. ह्या राष्ट्रीय सभेने सुरू केलेल्या राष्ट्रकार्याची माहिती देशातील सर्व भागात प्रसृत व्हावी आणि भविष्यात तेथील लोकांचे सहकार्य ह्या सभेला लाभावे हा यामागील उद्देश होता. अधिवेशनाच्या अखेरी या सभेचे नामकरण "इंडियन नॅशनल कॉंग्रेस" असे करण्यात आले व या सभेला कायम रूप देऊन तिची अधिवेशने देशातील वेगवेगळ्या शहरी दर वर्षी डिसेंबर अखेरी भरविली जावीत असा ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णयही या अधिवेशनाने घेतला. पुढील वर्षीचे अधिवेशन कलकत्त्याला घेण्याचे ठरवून कॉंग्रेसचे प्रतिनिधी नव्या उत्साहाची शिदोरी घेऊन आपआपल्या स्थानी परतले.

राष्ट्रीय कॉंग्रेसचा श्रीगणेशा हा अशा प्रकारे अनौपचारिक रीतीने झाला. तिच्या कार्यवाहीसाठी कोणत्याच प्रकारचे नियम नव्हते आणि तिच्यासाठी नियमावली अगर घटना तयार करण्याचा विचारही यावेळी कोणाच्या मनात डोकावला नाही. कदाचित या संस्थेला कायम स्वरूप प्राप्त होईल की नाही ही शंकाही काहींना भेडसावीत असावी. मात्र यापुढे दरवर्षी झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनांना सुशिक्षितांकडून वाढत्या प्रमाणात प्रतिसाद मिळत गेला. अधिवेशनांना उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींची संख्या झपाट्याने वाढू लागली. त्यामुळे कॉंग्रेसने मूळ धरल्याची व पहिल्या पाच वर्षातच तिने बाळसे धरल्याची तिच्या संस्थापकांची खात्री झाली.

## कॉंग्रेससंबंधीची प्रतिक्रिया

कॉंग्रेस अधिवेशनाच्या अभूतपूर्व घटनेने भारतातीलच नव्हे तर इंग्लंडमधील वृत्तपत्रांचेही लक्ष आकृष्ट करून घेतले. वृत्तपत्रांतून कॉंग्रेसविषयी व्यक्त झालेले अभिप्राय त्यांच्या संपादकांच्या दृष्टीकोनांचे आविष्कार होते. केसरी, मराठा, इंदुप्रकाश यासारख्या भारतीयांनी चालविलेल्या वृत्तपत्रांनी कॉंग्रेस स्थापनेचे उत्साहाने स्वागत केले. अकोल्याहून निघणाऱ्या वऱ्हाड समाचार या साप्ताहिकानेही देशहितकारक गोष्टींबाबत जे उपयुक्त राजमार्ग आहेत त्यापैकी कॉंग्रेसची चळवळ हा एक आहे असा अभिप्राय १८८८ च्या मध्यात व्यक्त केला.

साम्राज्यवाद ब्रिटिश सत्तेचे मुखपत्र असलेल्या लंडन टाईम्स या वृत्तपत्राची कॉंग्रेसबाबतची प्रतिक्रिया मात्र निःसंदिग्धपणे प्रतिकूल होती. भारतातील बहुतेक प्रमुख राजकीय संस्थाचे प्रतिनिधी कॉंग्रेस अधिवेशनाला आले असले तरी ते कोणाचे प्रतिनिधित्व करतात ते कळत नाही असा खवचट अभिप्राय टाईम्सने दिला; तसेच कॉंग्रेस प्रतिनिधींमध्ये मुसलमान कोठे दिसले नाहीत असे खोडसाळ असत्य विधानही टाईम्सने केले. याशिवाय देशाचे प्रतिनिधित्व आपण करीत असल्याचा कॉंग्रेसने केलेला दावा खरा नाही असे मत व्यक्त करून कॉंग्रेसचे सुशिक्षित सदस्य देशाचे शासन चालविण्याच्या लायकीचे नाहीत असेही टाईम्सने सूचित केले. यापेक्षाही अधिक कठोर व कडवट टीका टाईम्सने कॉंग्रेसच्या पुढील वर्षीच्या अधिवेशनाचे वेळी केली. कॉंग्रेसचे प्रतिनिधी कवडी किंमतीचे नाहीत, शासकीय सेवेत मोठी पदे न मिळाल्याने चिडलेले हे असंतुष्ट आत्मे आहेत, राष्ट्रीय सभेचे आयोजन ते स्वार्थसिद्धीसाठी करीत आहेत, त्यांना देशहिताचे अजिबात सोयरसुतक नाही अशा विषारी शब्दात टाईम्सने १८८६ साली कॉंग्रेसवर आग पाखडली.

टाईम्सच्या खोडसाळ टीकेला न्या. तेलंग यांनी कॉंग्रेसच्या कार्यवाहाच्या नात्याने उत्तर दिले. ९ मार्च १८८६ रोजी टाईम्सच्या संपादकाला पत्र लिहून टाईम्सने केलेल्या आक्षेपाचे त्यांनी मुद्देसूदपणे खंडन केले.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

काँग्रेसची भूमिका राजद्रोह्याची नाही; सनदशीर मार्गाने भारतीय प्रजेची गाऱ्हाणी सत्ताधीशांच्या कानापर्यंत पोचविण्याचा फक्त तिचा हेतू आहे हे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले. तसेच मुंबईच्या अधिवेशनाला मुसलमान सदस्य उपस्थित नव्हते हे टाईम्सने केलेले विधान धादांत खोटे असल्याचे सांगून मुंबईचे दोन प्रतिष्ठित मुसलमान नागरिक व मुंबई हायकोर्टाचे ख्यातमान वकील रहिमतुल्ला सयानी व ए. एम. धरमसी हे दोघे अधिवेशनाला हजर होते हे त्यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले.

काँग्रेस स्थापनेच्या वृत्ताने इंग्लंडमधील साम्राज्यवादी मंडळींच्या अंगाचा तिळपापड झाला. काँग्रेस जन्माला घालण्यात पुढाकार घेणाऱ्या ह्यूम व आपल्या देशबांधवाला अनेकांनी शिव्यांच्या लाखोल्या वाहिल्या. काँग्रेस सदस्यांनी आपल्या राजनिष्ठेचा वारंवार उच्चार केला असला तरी काँग्रेसचे अस्तित्व ब्रिटिश सत्तेला अशुभसूचक आव्हान आहे अशी प्रतिक्रिया काहींनी व्यक्त केली. काँग्रेसने केलेल्या मागण्यांचा ब्रिटिश सरकारने विचार करू नये, कारण त्या मागण्या पूर्ण करणे म्हणजे भारतीयांना स्वयंशासनाचे अधिकार देणे होईल आणि इंग्लंडच्या हिताच्या दृष्टीने हे घडता कामा नये असा विचार टाईम्सच्या संपादकीयात आग्रहाने मांडला गेला. अशाप्रकारे काँग्रेसच्या जन्माने ब्रिटिश वर्तुळात बरीच खळबळ माजविली.

### काँग्रेसच्या ठरावांची अंमलबजावणी

मुंबई अधिवेशनात झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी अधिवेशन संपवून परत गेलेल्या कार्यकर्त्यांनी आपआपल्या भागात सुरू केली. त्यांनी आपल्या संस्थांतून काँग्रेसच्या ठरावांवर चर्चा आयोजित केल्या. तसेच सार्वजनिक सभा घेऊन काँग्रेसच्या ध्येयधोरणांची माहिती त्यांनी स्थानिक लोकांना करून दिली. महाराष्ट्रातही अहमदनगर, अलिबाग, बेळगाव, धुळे, पुणे, सातारा, रत्नागिरी, ठाणे, सोलापूर इत्यादी अनेक शहरी सभा घेण्यात आल्या आणि काँग्रेसने केलेल्या ठरावांची ओळख लोकांना करून देण्यात आली. यामुळे सुशिक्षित वर्गात काँग्रेसबद्दल जिज्ञासा निर्माण होण्यास मदत झाली. निरनिराळ्या प्रांतांतील वृत्तपत्रांनीही काँग्रेसच्या ठरावांना प्रसिद्धी दिली, इतकेच नाही तर काहींनी यापुढे काँग्रेसने कोणते विषय हाताळावेत याविषयी विधायक सूचनाही केल्या. अनेक वर्षे न्यूनगंडाने पछाडलेल्या भारतीय समाजाला अखेर काँग्रेसने राजकीय वाचा मिळवून दिल्याचे समाधान काही भारतीय वृत्तपत्रांनी व्यक्त केले. काँग्रेस स्थापनेचा प्रभाव म्हणून की काय १८८६ साली नागपूर व वऱ्हाडचे केंद्रस्थान असलेल्या अमरावती या शहरी लोकसभा स्थापन झाल्या. नागपूरच्या लोकसभेच्या स्थापनेत कृष्णराव पाठक, गंगाधरराव चिटणवीस, बापूराव किनखेडे इत्यादींचा, तर अमरावतीच्या लोकसभेच्या स्थापनेत मोरोपंत जोशी, रंगनाथ नरसिंह मुधोळकर, दादासाहेब खापर्डे यांचा पुढाकार होता.

### कलकत्ता अधिवेशनातील महाराष्ट्राचा सहभाग

कलकत्त्याला १८८६ साली भरलेल्या काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान मुंबईचे नामवंत पुढारी दादाभाई नवरोजी यांना मिळाला. महाराष्ट्रापासून दूर असलेल्या शहरी काँग्रेसचे दुसरे अधिवेशन भरले असले तरी महाराष्ट्राचे प्रतिनिधी अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. त्यांची संख्या सत्तेचाळीस असून, ते मुंबई, पुणे, सांगली, सातारा, बेळगाव, वसई इत्यादी अनेक शहरांतून आले होते.महत्त्वाची बाब म्हणजे वेगवेगळ्या स्थानिक संस्थांनी निवडलेले ते प्रतिनिधी होते. त्यात मुंबईचे दिनशा वाछा, रहिमतुल्ला सयानी, दाजी आबाजी खरे, पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक संस्थापक महादेव बल्लाळ नामजोशी व सार्वजनिक सभेच्या नियतकालिकाचे संपादक सीताराम हरी चिपळूणकर इत्यादी मंडळी होती. यावेळी मध्यप्रांत व वऱ्हाडचेही

www.mpscmantra.com

आठ प्रतिनिधी अधिवेशनाला हजर राहिले. त्यातील उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे बापूराव किनखेडे, गंगाधरराव चिटणवीस, गोपाळ हरी भिडे, आर. एन्. मुधोळकर या होत. कामठीहून गेलेल्या अब्दुल अझीझ या प्रतिनिधीने उर्दूत आवेशपूर्ण भाषण करून श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले. महाराष्ट्राचे वाछा, दाजी खरे, चंदावरकर, मुधोळकर यांनी या अधिवेशनात महत्त्वाचे प्रस्ताव मांडले. यावेळी व्हाईसरॉयला भेटायला गेलेल्या काँग्रेसच्या शिष्टमंडळात दादाभाई नवरोजी, चंदावरकर, चिपळूणकर आणि गंगाधरराव चिटणवीस या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचा अंतर्भाव होता.

महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दादाभाईंनी आपल्या अध्यक्षीय भाषणाने केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांनी आपल्या अधिकारवाणीने भारताच्या वाढत्या दारिद्र्याची कारणमीमांसा केली, ब्रिटिश विचारवंतांच्या विचारांचे दाखले देऊन भारतात उदार धोरणाच्या अंमलबजावणीची मागणी केली व सनदी सेवेत प्रवेश मिळविण्यासाठी भारतात स्पर्धा परीक्षा घेतली जावी असा आग्रह धरला. केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळांतील भारतीयांची संख्या वाढविली जावी एवढीच मागणी करून ते थांबले नाहीत, तर भारत हा ब्रिटिश साम्राज्याचा घटक असल्यामुळे भारतीय प्रतिनिधींना ब्रिटिश पार्लमेंटमध्ये स्थान मिळणे अगत्याचे आहे, नव्हे हा त्यांचा अधिकारच आहे, असेही त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले. ब्रिटिश राज्यसत्तेप्रती निष्ठा त्यांनी व्यक्त केली, ब्रिटिशांच्या उदारमतवादी तत्त्वज्ञानाचे ऋणही मान्य केले, परंतु हे करताना ब्रिटिश उदार तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी भारतात केली जात नाही हे परखड शब्दात निदर्शनास आणून देण्यास ते चुकले नाहीत.

दादाभाईंनी यावेळी काँग्रेसच्या मूलभूत नीतीला केलेले विशेष उल्लेखनीय योगदान म्हणजे काँग्रेस ही राजकीय संस्था असावी, ते सामाजिक सुधारणाकार्याचे व्यासपीठ असू नये हा त्यांनी ठामपणे मांडलेला विचार हे होय. याचा अर्थ त्यांना समाजसुधारणेची निकड वाटत नव्हती असा नाही. पण काँग्रेस हा समाजसुधारणेच्या चर्चेचा मंच बनल्यास या संस्थेचे राष्ट्रीय स्वरूप टिकून राहणार नाही अशी त्यांना धास्ती होती आणि ती रास्तही होती. देशात भिन्न वंशाचे, धर्माचे व जातीचे लोक असल्यामुळे त्यांना आवश्यक वाटणाऱ्या सामाजिक सुधारणांच्या स्वरूपाबाबत देशाच्या निरनिराळ्या भागातून येणाऱ्या काँग्रेस सदस्यांत एकमत राहणार नाही हे उघडच होते यामुळे या विषयांबाबत सर्वमान्य ठरतील असे निर्णय घेणे काँग्रेसला कठीण होईल असे त्यांचे स्पष्ट मत होते. याशिवाय, परंपरावादी परंतु राष्ट्रनिष्ठ असे जे काही गट भारतीय समाजात होते, ते काँग्रेसमध्ये समाजसुधारणेवर चर्चा होऊ लागल्यास काँग्रेसपासून दुरावतील असा विचारही कदाचित त्यांच्या मनात डोकावला असेल. म्हणून काँग्रेस ही राष्ट्रीय संघटना म्हणून टिकून राहावी, तिच्या द्वारा राष्ट्रैक्याची भाषा भारतातील भिन्न धर्मीयांत व जातीत दृढ व्हावी म्हणून सर्व भारतीयांना सारख्याच निकडीच्या वाटणाऱ्या राजकीय मुद्द्यांवरच फक्त काँग्रेसमध्ये विचारविनिमय व्हावा असे मत दादाभाईंनी आग्रहाने मांडले आणि त्याला सर्वांनी अनुकूल कौल दिला. देशातील प्रचलित परिस्थितीच्या संदर्भात काँग्रेसला दादाभाईंनी दिलेला हा गुरूमंत्र तिचे राष्ट्रीय संघटनेचे स्वरूप टिकवून धरण्याच्या दृष्टीने अतिशय उपकारक ठरला.

**मद्रास काँग्रेस**

कलकत्ता काँग्रेसप्रमाणे त्यापुढील मद्रास अधिवेशनाचे अध्यक्षपदही एका महाराष्ट्रीय व्यक्तीला-मुंबईच्या बॅ. बद्रूद्दीन तय्यबजी यांना मिळाले. यावेळी पश्चिम महाराष्ट्रातून गेलेल्या सदस्यांची संख्या नव्व्याण्णव, तर वऱ्हाड व मध्यप्रांतच्या सदस्यांची संख्या तेरापर्यंत वाढली. या सदस्यांत हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन अशा सर्व धर्मांच्या सदस्यांचा अंतर्भाव होता. या अधिवेशनात महाराष्ट्राच्या दाजी खरे आणि रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांनी मांडलेले प्रस्ताव एकमुखाने मान्य झाले. कृषिव्यवस्था, जमीन महसूलपद्धती, सामान्य व्यवस्था या विषयांचा विशेष अभ्यास

www.mpscmantra.com

असलेल्या खऱ्यांनी प्राप्ती कर लावावयाच्या उत्पन्नाची किमान मर्यादा पाचशे वरून हजार रुपयांवर नेली जावी व असे करून समाजातील खालच्या वर्गावर पडणारा कराचा बोजा कमी केला जावा असा प्रस्ताव मांडला. काँग्रेससाठी घटना तयार केली जावी या एका सदस्याने मांडलेल्या प्रस्तावाला सातारच्या करंदीकरांनी विरोध केला. जोवर देशाच्या सर्व भागातील लोकांचा सहभाग काँग्रेसला लाभत नाही तोवर काँग्रेसला कोणत्याही प्रकारच्या साचेबंद घटनेने बांधून ठेवू नये, देशाच्या सर्व भागातील लोक काँग्रेसमध्ये सहभागी होऊ लागल्यानंतर सर्वसंमतीने घटना तयार केली जावी असा सूज्ञ विचार करंदीकरांनी मांडला आणि तो सर्वानुमते मान्य करण्यात आला.

मुंबईचे ख्यातनाम कायदेपंडित बद्रूद्दिन तय्यबजी यांना देण्यात आलेला अध्यक्षपदाचा मान औचित्यपूर्ण व अर्थगर्भ होता. या निवडीने काँग्रेसने दोन गोष्टी साधल्या. एक तर भारतीय मुसलमान काँग्रेसशी फटकून आहेत आणि म्हणून राष्ट्रीय संघटना असल्याचा काँग्रेसचा दावा खोटा आहे ही काही भेदनीतीनिपुण ब्रिटिश अधिकाऱ्यांनी व ब्रिटिश वृत्तपत्रांनी चालविलेली हाकाटी असत्य असल्याचे सिद्ध झाले आणि दुसरे म्हणजे तय्यबजींना अध्यक्षपद देऊन मुस्लीम बांधवाना काँग्रेसकडे ओढण्याची अप्रत्यक्ष जबाबदारीही जणु काँग्रेसने त्यांच्यावर टाकली. त्यांच्यावर काँग्रेसने टाकलेला हा विश्वास अनाठायी ठरला नाही. त्यांनी आपल्या भाषणातून मुसलमान हे काँग्रेस विरोधी असल्याचा आरोप खोडसाळ आहे, भारतीय मुसलमान काँग्रेसमध्ये मोठ्या संख्येने आले नाहीत याचा अर्थ ते काँग्रेसला प्रतिकूल आहेत असा करण्याचे कारण नाही असे निक्षून सांगितले आणि आपल्या मुस्लीम बांधवांना देशहितासाठी तसेच देशातील सर्व नागरिकांच्या कल्याणासाठी काँग्रेसला सहकार्य देण्याचे आवाहन त्यांनी केली.

## तय्यबजींची राष्ट्रवादी भूमिका

बॅ. तय्यबजींनी यानंतरच्या काळात मुसलमानांना काँग्रेसकडे वळविण्याचा आणि एका प्रतिगामी मुस्लीम गटाचा काँग्रेसला होऊ लागलेला विरोध मोडून काढण्याचा कसोशीने प्रयत्न केला. काँग्रेसच्या स्थापनेमुळे अस्वस्थ झालेल्या काही कट्टर साम्राज्यवादी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी काँग्रेसला बळकटी येऊ नये म्हणून मुसलमानांना काँग्रेसपासून दूर ठेवण्याची खटपट सुरू केली होती. त्यावेळचे अलीगढ मुस्लीम स्कूलचे प्राचार्य बेक हे या ब्रिटिश भेदनीतीचे परिणामकारक माध्यम बनले. अलीगढ स्कूलचे प्राचार्य या नात्याने काम करीत असता मुस्लीम नेत्यांशी येणाऱ्या निकटच्या संबंधांचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे, काँग्रेस करीत असलेली प्रातिनिधिक शासनपद्धतीची मागणी भारतीय मुसलमानांना हिंदूंच्या राजकीय वर्चस्वाखाली आणणारी आहे अशा विषारी विचारांचे बीज त्यांनी सर सय्यद अहमद खान व अमीर अली यासारख्या मुस्लिम नेत्यांच्या मनात रुजविले आणि त्यांना काँग्रेस विरोधाला प्रवृत्त केले. बेकच्या खोडसाळ प्रचाराला बळी पडलेले अलीगढ गटाचे नेते तय्यबजींशी पत्रव्यवहार करून त्यांना काँग्रेसपासून अलिप्त राहण्याचे आवाहन करू लागले.

सर सय्यद अहमद खान व अमीर अली यांनी १८८८ साली तय्यबजींशी केलेला पत्रव्यवहार तय्यबजींच्या राष्ट्रनिष्ठ भूमिकेवर व एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेवर प्रकाश टाकणारा आहे. २४ जानेवारी १८८८ रोजी तय्यबजींना पाठविलेल्या पत्रात सय्यद अहमद खान यांनी काँग्रेसच्या मागण्या भारतीय मुसलमांनासाठी हानीकारक आहेत, मुसलमानांना हिंदू वर्चस्वाखाली आणण्याचा काँग्रेसचा हेतू आहे, मुसलमानांचे हितसंबंध हिंदूंहून भिन्न आहेत आणि म्हणून भारताला एक राष्ट्र मानणाऱ्या काँग्रेसला आपण तीव्र विरोध करू असे मत मांडले आणि तय्यबजींनीही काँग्रेसशी संबंध तोडावा अशी विनंती केली. याला १८ फेब्रुवारी रोजी पाठविलेल्या उत्तरात तय्यबजींनी काँग्रेसवरील आरोपांचे खंडन केले. काँग्रेसचे कार्य मुस्लीमांना कोणत्याही प्रकारे विघातक नसून ते त्यांच्या



www.mpscmantra.com

उत्थानाला उपकारक ठरणारे आहे व काँग्रेस ही धर्मनिरपेक्ष वृत्तीने सर्व भारतीयांच्या समान समस्यांचे निराकरण करू इच्छिणारी राष्ट्रीय संघटना आहे असा स्पष्ट निर्वाळा देऊन त्यांनी अलीगढ नेत्यांचे शंका निरसन करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना राष्ट्रकार्यासाठी काँग्रेसमध्ये सामील होण्याचे कळकळीचे आवाहनही केले. अशा प्रकारे काँग्रेसला सहकार्य देण्यापासून तय्यबजींना परावृत्त करण्याचा ब्रिटिश नोकरशाहीने अलीगढ नेत्यांना पुढे करून केलेला प्रयत्न व्यर्थ ठरला. तय्यबीजींच्या राष्ट्रवादी भूमिकेत यत्किंचितही बदल झाला नाही. त्यांच्या प्रमाणेच रहिमतुल्ला सयानीसारख्या इतर राष्ट्रनिष्ठ मुस्लीम नेत्यांचे सहकार्य काँग्रेसला मिळत राहिले. त्यांच्या प्रेरणेने ब्रिटिशांच्या चिथावणीला बळी न पडता व अलीगढ गटाच्या विषारी प्रचाराने प्रभावित न होता, काही सुशिक्षित मुस्लीम काँग्रेस गटात सामील झाले. तय्यबजी, सयानी यासारख्या महाराष्ट्रीय मुस्लीम नेत्यांनी पाजळलेली एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची व काँग्रेस निष्ठतेची ज्योत महाराष्ट्रातील मुस्लीम नेत्यांत बरीच वर्षे तेवत राहिली.

अलीगढ नेत्यांशी झालेल्या पत्रव्यवहाराने तय्यबजी काहीसे अस्वस्थ मात्र झाले. अलीगढ गटाच्या अपप्रचाराचा प्रभाव अशिक्षित व कट्टर धर्मनिष्ठ मुस्लीम समाजावर पडून भारतीय समाजात दुही निर्माण होईल की काय अशी धास्ती तय्यबजींना भेडसावू लागली. ती भीती त्यांनी ह्यूमपुढे व्यक्तही केली आणि मुसलमान समाजात अलीगढ गटाचे अनिष्ट विचार रुजू नयेत याची खबरदारी घेणे अगत्याचे आहे असे मत त्यांनी मांडले. २७ ऑक्टोबर १८८८ रोजी ह्यूम यांना लिहिलेल्या पत्रात काँग्रेसची अधिवेशने पाच वर्षे स्थगित करावी आणि या दरम्यान हिंदू-मुसलमानांना जवळ आणण्याचा आणि मुसलमानात काँग्रेसविषयी निर्माण झालेला अपसमज, त्यांच्या मनात निर्माण झालेली काँग्रेसविषयीची अढी दूर करण्याचा प्रयत्न करावा असे त्यांनी सुचविले. काँग्रेसची अधिवेशने पाच वर्षे स्थगित करण्याची त्यांची सूचना इतर काँग्रेस नेत्यांना पटली नाही. परंतु अलीगढचे मुस्लीम नेते व्यक्त करीत असलेली काँग्रेसच्या हेतूविषयीची शंका दूर करावी या उद्देशाने तय्यबजींच्या सूचनेवरून १८८८ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात एक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. काँग्रेसपुढे चर्चेला येणारा कोणताही प्रस्ताव काँग्रेसमधील बहुसंख्य मुस्लीम सदस्यांना त्यांच्या संप्रदायाच्या हिताला बाधक ठरेल असे वाटत असल्यास तो प्रस्ताव चर्चेसाठी ठेवला जाऊ नये अशा आशयाचा हा ठराव होता. महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाल्यास येथे १८९२ नंतर अधूनमधून हिंदू-मुस्लीम दंग्यांच्या ठिणग्या जरी उडू लागल्या, तरी बरेच सुशिक्षित मुस्लीम नेते व्यापक देशहिताच्या भावनेने प्रेरित होऊन १९२० पर्यंतच्या काळात काँग्रेसला सहकार्य देत असलेले आढळतात.

## अलाहाबाद अधिवेशनातील महाराष्ट्राचा सहभाग

काँग्रेसची पहिली तीन अधिवेशने देशाच्या दक्षिण भागात भरल्यानंतर चवथ्या वर्षीचे अधिवेशन गंगा-यमुनेच्या संगमाने पुनीत झालेल्या अलाहाबादला आयोजित करण्यात आले. अधिवेशन जॉर्ज यूल या भारताविषयी सहानुभूती असलेल्या व त्यावेळी कलकत्त्याला व्यापार करीत असलेल्या आयरिश गृहस्थाच्या अध्यक्षतेखाली झाले. पश्चिम महाराष्ट्राचे सुमारे १६३ तर वऱ्हाड, नागपूर भागाकडील ७३ प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित होते. त्यात मुंबईकडील फिरोजशहा मेहता, वाछा, तेलंग, करंदीकर, रामचंद्र किर्लोस्कर, चंदावरकर, नागपुरचे बिपिनकृष्ण बोस, हरी वामन केळकर, वासुदेव कृष्ण अभ्यंकर, मार्तंड बापूजी वाईकर व वऱ्हाडचे मोरोपंत जोशी, रंगनाथ नरसिंग मुधोळकर यांचा उल्लेख सापडतो.

महाराष्ट्राच्या प्रतिनिधींनी अधिवेशनातील चर्चेत हिरीरीने भाग घेतला. यावेळी मुंबई विधिमंडळाचे सदस्य असलेल्या तेलंगांनी कौन्सिल सुधारणेवर भर दिला आणि भारताच्या प्रशासनकार्यात भारतीयांना स्थान दिले जावे अशी जोरदार मागणी केली. काँग्रेस ही देशातील अत्यल्प वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी संघटना आहे, राष्ट्राचे



www.mpscmantra.com

प्रतिनिधित्व ती करीत नाही, हा गव्हर्नर जनरल लॅार्ड डफरीनने केलेला आरोप त्यांनी समर्पक युक्तिवादाने खोडून काढला. तसेच भारतात शिक्षणप्रसाराची जबाबदारी ब्रिटिश सरकारची नाही ही ब्रिटिश सरकारने घेतलेली भूमिका इंग्लडला प्रचलित परंपरांना हरताळ फासणारी आहे असे सोदाहरण दाखवून देऊन शिक्षण प्रसार हे सरकारचे कर्तव्य असल्याचे त्यांनी ठासून सांगितले. मिठावरील करात घट करण्याची काँग्रेसने वारंवार केलेली मागणी धुडकावून देऊन त्या करात उलटपक्षी वृद्धी केल्याबद्दल काही महाराष्ट्रीय प्रतिनिधींनी सरकारविषयी रोष व्यक्त केला. काहींनी देशातील ज्या भागात शेतसारा निश्चितपणे निर्धारित झालेला नाही तेथे सरकारने कायमधारा पद्धतीचा अंगिकार करावा अशी मागणी केली. अमरावतीचे प्रख्यात वकील मुधोळकर हे यावर्षी प्रथम काँग्रेस अधिवेशनासाठी आले होते. त्यांनी वऱ्हाडच्या भागात चाललेल्या पोलीस अत्याचाराकडे प्रतिनिधींचे लक्ष वेधले व त्याला आळा घालण्याची सूचना मांडली.

या अधिवेशनात काँग्रेसच्या कामकाजासंबंधी एक नवा पायंडा घातला गेला. विषयक नियामक समिती यावर्षी प्रथमच कार्यान्वित झाली. अधिनेशनांना येणाऱ्या प्रतिनिधींची संख्या वाढत गेल्यामुळे चर्चेच्या वेळी प्रतिनिधीच्या भाषणात तेच ते विषय येत. त्यामुळे चर्चेत सुसगंती न राहता गोंधळ माजे.तो टाळण्यासाठी व चर्चेसाठी येणाऱ्या विषयावर अभ्यासपूर्ण भाषणे व्हावीत या हेतूने विषय नियामक समितीचे गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला. वार्षिक अधिवेशनासाठी निरनिराळ्या प्रांतातून आलेल्या सदस्यांनी विषय नियामक समितीवर आपले निर्वाचित प्रतिनिधी पाठवावेत. अधिवेशनाच्या उद्‌घाटन समारंभानंतर ह्या समितीच्या सदस्यांची बैठक व्हावी आणि स्थानिक स्वागत समितीने पुढे ठेवलेल्या प्रस्तावांपैकी कोणते प्रस्ताव चर्चेसाठी अधिवेशनापुढे मांडावयाचे व ते कोणी मांडावयाचे ते ठरवावे अशी कार्यप्रणाली निश्चित केली गेली. यामुळे अधिवेशनातील चर्चेत बरीच सुसूत्रता आली आणि ज्या सदस्याचा एखाद्या विषयाचा विशेष अभ्यास असेल, त्या सदस्याकडे त्या विषयावरील प्रस्ताव मांडण्याचे काम सोपविले जाऊ लागल्यामुळे अधिवेशनातील भाषणे माहितीपूर्ण व म्हणून प्रभावी होऊ लागली.

## प्रांतिक परिषदांचा प्रारंभ

काँग्रेसचे कार्य वार्षिक अधिवेशनापुरते मर्यादित न ठेवता देशात सर्वत्र काँग्रेसच्या कार्याला चालना दिली जावी असा आरंभापासून काँग्रेस नेत्यांचा मानस होता. या दृष्टीने १८८६ च्या कलकत्ता अधिवेशनाचे वेळी, सर्व प्रांतातून काँग्रेसच्या स्थायी समित्या स्थापन कराव्या व या समित्यांनी अधिकाअधिक स्थानिक लोकांना काँग्रेसकडे आकृष्ट करावे अशा आशयाचा प्रस्ताव पास करण्यात आला. मद्रास काँग्रेसच्या वेळी यावर शिक्कामोर्तब झाले आणि त्यानुसार मुंबई इलाख्याच्या काँग्रेस समितीचे—प्रांतिक काँग्रेसचे अधिवेशन १८८८ च्या मे महिन्यात आयोजित करण्यात आले. मेहता, वाछा, खरे, तेलंग इत्यादी मंडळींची प्रेरणा यामागे होती. प्रांतिक काँग्रेस समितीची अधिवेशने पुढील चार वर्षे पुण्याला झाली. १८८९ पासून दोन तीन वर्षे या समितीचे कार्यवाहपद बाळ गंगाधर टिळक यांच्या उत्साही हाती होते.

राष्ट्रीय अधिवेशनात प्रत्येक प्रांतातील वेगवेगळ्या प्रश्नांचा व अडचणींचा विचार होणे अशक्य होते. हे काम प्रांतिक परिषदांनी करावे व अशी प्रांतिक अधिवेशने प्रांतातील निरनिराळ्या शहरी घेऊन समाजात राजकीय जागृती वाढवावी अशी प्रांतिक सभांमागील कल्पना होती. म्हणून १८९२ नंतरची प्रांतिक सभेची अधिवेशने अहमदाबाद, मुंबई, बेळगाव, कराची, सातारा, धुळे इत्यादी वेगवेगळ्या शहरी घेतली गेली. या प्रांतिक सभांचे उद्दिष्ट काय यावर १८९२ च्या पुण्याच्या प्रांतिक परिषदेपूर्वी टिळकांनी केसरीतून अतिशय उदबोधक लेख लिहिला. "वर्षातून एकदा जमणाऱ्या हजार पाचशे लोकांच्या राष्ट्रसभेने एखादे मागणे केले, म्हणजे सरकार लागलीच कबूल होईल असे

www.mpscmantra.com

नाही. तर प्रत्येक प्रांतातून, जिल्ह्यातून, शहरातून, इतकेच काय पण प्रत्येक खेड्यातूनही तशा प्रकारचे अर्ज गेले पाहिजेत, तरच त्या मागण्याला काही वजन येणार आहे." असे प्रतिपादन करून प्रांतिक अधिवेशनाचे राजकीय जागृतीचे माध्यम म्हणून असलेले महत्त्व टिळकांनी स्पष्ट केले. या प्रांतिक सभातून महाराष्ट्रातील जहाल राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते पुढे आले.

काँग्रेसच्या प्रांतिक अधिवेशनात प्रांतिक समस्या चर्चेला घेतल्या जात. राष्ट्रीय काँग्रेसने निर्धारित केलेल्या नीतीच्या अनुरोधाने ठराव पास केले जात आणि ते ठराव विचारार्थ प्रांतिक सरकारकडे पाठवले जात. महाराष्ट्रात होऊ लागलेल्या या प्रांतिक अधिवेशनात, शेतसारा कमी केला जावा, मिठावरील कर रद्द केला जावा, आबकर बंद केला जावा, स्थानिक स्वशासन संस्थावर शासनाचा प्रत्यक्ष ताबा नसावा, पोलीस अत्याचारांना लगाम लावला जावा, वनविभागाने केलेले नियम शेतकऱ्यांना जाचक असल्यामुळे ते शिथील केले जावे, शासकीय वैद्यक सेवा सुरू केली जावी, शिक्षण प्रचारासाठी शासनाने उपाययोजना करावी अशा स्वरूपाच्या मागण्या केल्या जात असत. मुंबई पुण्याकडील मेहता, वाछा, खरे, तेलंग यांच्याबरोबर गोपाळ कृष्ण गोखले, बाळ गंगाधर टिळक, सातारचे रघुनाथ पांडुरंग करंदीकर, बेळगावचे नातू, भाटे इत्यादी मंडळीही प्रांतिक अधिवेशनात उत्साहाने भाग घेत. यातून महाराष्ट्रातील नेतृत्वाची नवी पिढी आकार घेऊ लागली. वऱ्हाड व नागपूरकडे मात्र अशा प्रकारची प्रांतिक अधिवेशने बरीच उशीरा म्हणजे १९०५ सालापासून सुरू झाली. नागपूरच्या डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनी पुढाकार घेऊन वऱ्हाडच्या सहकार्याने १९०५ साली नागपूरला पहिल्या प्रांतिक अधिवेशनाचा बार उडविला.

*

१८८९ साली काँग्रेसला पाच वर्षे पूर्ण झाली. या अल्पावधीत वार्षिक अधिवेशनांसाठी देशाच्या निरनिराळ्या भागातून येणाऱ्या प्रतिनिधींची वाढती संख्या काँग्रेसने बाळसे धरल्याची साक्ष पटवीत होती. या काळात काँग्रेस नित्य नेमाने ब्रिटिश राजसत्तेप्रती निष्ठा व कृतज्ञता व्यक्त करणारे ठराव पास करीत राहिली खरी. पण आरंभी अन्याय्य शासकीय धोरणाविषयी दबकत दबकत मतप्रदर्शन करणारे काँग्रेस सदस्य हळूहळू अधिक उघडपणे सरकारवर टीका करू लागले. त्यांच्या भाषणांचा पूर्वीचा नम्र सूर जाऊन त्यांच्या मागण्या आग्रही होऊ लागल्या. नव्या आत्मविश्वासाचा प्रत्यय त्यांच्या भाषणांतून घडू लागला. पाचच वर्षांपूर्वी लावण्यात आलेल्या या रोपट्याने आता पक्की मुळे धरली आहेत याबद्दल काँग्रेसच्या समर्थकांना अगर विरोधकांनाही शंका राहिली नाही.

## मुंबई काँग्रेस

१८८९ सालच्या काँग्रेस अधिवेशनाचे आमंत्रण मुंबईकरांनी दिले. वस्तुतः या वर्षी अधिवेशन पुण्याला व्हावे असे उत्साही पुणेकरांना तीव्रतेने वाटत होते. काँग्रेसचे पहिले अधिवेशन पुण्याला होऊ न शकल्यामुळे पुणेकरांचा जो विरस झाला होता. तो त्यांना दूर करायचा होता. म्हणून सार्वजनिक सभेच्या मंडळींनी मुंबईच्या नेत्यांशी बोलणी करून पुण्याला अधिवेशन भरविण्याची इच्छा प्रदर्शित केली. परंतु मुंबईच्या मंडळींनी त्यांना होकार दिला नाही. तरीही निरुत्साही न होता टिळक, नामजोशी इत्यादींनी पश्चिम महाराष्ट्रातील अनेक शहरांना भेटी देऊन काँग्रेस अधिवेशनासाठी दहा हजार रुपयांचा निधी गोळा केला. तसेच निवेदने व परिपत्रके तयार करून काँग्रेसचा प्रचार केला. हा त्यांचा उत्साह पाहून मुंबई अधिवेशनासाठी येणाऱ्या प्रतिनिधींच्या स्वागतासाठी सार्वजनिक सभेच्या वतीने टिळक व नामजोशी यांना मुंबईला पाठविले गेले. काँग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहण्याची टिळकांची ही पहिलीच वेळ होती.



www.mpscmantra.com

मुंबईने अधिवेशनाची सिद्धता प्रचंड उत्साहाने केली. कुशल संघटक असलेले फिरोजशहा मेहता स्वागताध्यक्ष होते. मुंबईच्या धनिक वर्गात त्यांचा प्रभाव असल्यामुळे अधिवेशनाचे आयोजन उत्तम रीतीने झाले. मुंबईतील सर अलबर्ट ससून नावाच्या एका ज्यू सदगृहस्थाने आपल्या मालकीची जागा अधिवेशनासाठी स्वागतसमितीच्या स्वाधीन केली. स्वागत समितीने महाराष्ट्रातील सर्व संघटनांना प्रतिनिधी पाठविण्याचे आवाहन केले. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक शहरांतून आलेले प्रतिनिधी मुंबईला एकत्र झाले. वऱ्हाड व नागपूरकडेही अधिवेशनाला प्रतिनिधी पाठविण्यासाठी एक लहानशी मोहीमच घडली गेली. परिणामतः १८८९ सालच्या अधिवेशनाला तेवढ्याच संख्येत उपस्थित असलेल्या एकूण सदस्यांपैकी ८२१ प्रतिनिधी मुंबई इलाख्याचे तर २१४ सदस्य वऱ्हाड व नागपूरकडील होते. त्यात भिन्न धर्म व वंशाचे तर लोक होतेच, पण यावेळी प्रथमच शेतकरी, कारागीर व महिलाही आल्या होत्या. अधिवेशनासाठी आलेल्या दहा महिलांपैकी महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या दोघी होत्या. त्या म्हणजे शारदा सदनाच्या संस्थापिका पंडिता रमाबाई आणि मनोरंजन मासिकाचे संपादक कानीटकर यांच्या पत्नी काशीबाई कानीटकर या होत.

या अधिवेशनाच्या वेळेची एक लहानशीच परंतु उल्लेखनीय बाब म्हणजे महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांचे दारिद्र्य व भयानक अनावस्था याकडे काँग्रेसचे लक्ष वेधावे या हेतूने सत्यशोधक समाजाने शेतकऱ्यांचा एक मोर्चा आयोजित केला व गवताच्या पेंडीचा बनविलेला शेतकऱ्याचा एक पुतळा अधिवेशनाच्या दाराशी उभा केला. दलितांच्या उत्थानासाठी कटिबद्ध असलेल्या आणि तळमळीने कार्य करणाऱ्या ज्योतिबांच्या सत्यशोधक समाजाच्या सदस्यांनी काँग्रेस अधिवेशनात मात्र भाग घेतला नाही. महाराष्ट्रातील दलित वर्गाच्या नेत्यांची काँग्रेसबाबतची ही अलिप्ततेची भूमिका कित्येक वर्षे तशीच राहिली. काँग्रेसची चळवळ ही सुशिक्षित ब्राम्हणांची चळवळ आहे, ज्या ब्राम्हण वर्गाने दलितांना शूद्र लेखून शतकानुशतके वाळीत टाकले व त्यांचा अनन्वित छळ केला, त्या वर्गाच्या नेतृत्वाखालील चळवळ दलितांना कधीही न्याय मिळवून देण्याची खटपट करणार नाही, ह्या संघटनेकडून मदतीची आशा करणे निरर्थक आहे; शिवाय दलितांना प्रथम राजकीय अधिकारांची नव्हे तर, सामाजिक व आर्थिक सुधारणेची निकड आहे, त्यांना सामाजिक न्याय हवा आहे व हे सरकारी मदतीची कास धरूनच मिळविता येईल या मताचा इतका जबरदस्त पगडा ज्योतिबा व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनावर होता की त्यामुळे ही मंडळी काँग्रेसची जातीनिरपेक्षतेची व सामाजिक समतेची भूमिका लक्षात न घेता तिच्यापासून दूर राहिली. तसेच महाराष्ट्रातील काँग्रेस नेतृत्वानेही समतेसाठी व सामाजिक न्यायासाठी धडपड करू लागलेल्या या समाजाला काँग्रेसकडे आकृष्ट करण्याचे महत्त्व प्रारंभी जाणले नाही, किंवा काहींनी हे महत्त्व ओळखले असले तरी, ह्या वर्गाच्या नेत्यांच्या मनात काँग्रेसविषयी रुजलेले अपसमज दूर करण्याचा जो हेतुपुरस्सर प्रयत्न करायला हवा होता तो या अवधीत काँग्रेस नेत्यांनी केलेला आढळत नाही. असा प्रयत्न महात्मा गांधींच्या उदयानंतर होऊ लागला आणि त्याबरोबर हा वर्ग काँग्रेस चळवळीत सहभागी होऊ लागला.

मुंबई अधिवेशनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ब्रिटिश पार्लमेंटमधील लिबरल पक्षाचे सदस्य चार्लस् ब्रॅडलॉ यांची अधिवेशनातील उपस्थिती. ते काँग्रेस अधिवेशनासाठी मुद्दाम इंग्लंडमधून आले होते. लंडनमधील काँग्रेस समर्थकांनी त्यांचे लक्ष काँग्रेसच्या कार्याकडे वेधले होते. ह्यूमचे निकटचे सहकारी व ह्यूम इतकीच भारतीयांविषयी सहानुभूती असलेले सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकारी विलियम वेडरबर्न हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते. ब्रॅडलॉ यांनी भारतीय पुढाऱ्यांशी बराच विचारविनियम करून भारतीयांच्या राजकीय मागण्यांचा एक कच्चा आराखडा तयार केला. त्यावर अधिवेशनात चर्चा झाल्यावर त्याविषयी ठराव पास करण्यात आला. ह्या ठरावातील मागण्या ब्रॅडलॉ यांनी ब्रिटिश पार्लमेंटपुढे मांडाव्यात असे ठरले. विधिमंडळातील भारतीयांची संख्या वाढविली

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

जावी, केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळात समाविष्ट करावयाचे भारतीयांचे प्रतिनिधी निर्वाचित असावेत, लोकसंख्येचे प्रमाण आधारभूत मानून समान मतदारसंघ बनविले जावेत, एकवीस वर्षांवरील सर्व पुरुषांना मतदानाचा अधिकार असावा, निर्वाचन गुप्त मतदान पद्धतीने व्हावे, अल्पसंख्याक गटांना प्रतिनिधित्वाची हमी दिली जावी, त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधित्व मिळावे, आणि जिल्हा स्तरावरील प्रतिनिधी प्रत्यक्ष मतदान पद्धतीने, तर प्रांतिक व केंद्रीय मंडळातील प्रतिनिधी मतदार गटांनी निर्वाचित करावेत अशी या ठरावातील महत्त्वाची कलमे होती.

ह्या ठरावातील प्रतिनिधींच्या निर्वाचनाबाबतच्या तरतुदीसंबंधी टिळकांनी वेगळा पर्याय सुचविला. प्रांतिक व केंद्रीय विधिमंडळांच्या सदस्यांचे निर्वाचन मतदार गटांनी करण्याऐवजी फक्त प्रांतिक विधिमंडळांच्या सदस्यांचे निर्वाचन त्यांनी करावे आणि अशा रीतीने निवडून आलेल्या प्रांतिक सदस्यांनी केंद्रीय विधिमंळावर पाठवावयाचे सदस्य निर्वाचित करावे असा प्रस्ताव टिळकांनी मांडला. त्याला गोपाळ कृष्ण गोखल्यांनी पुष्टी दिली. परंतु हा प्रस्ताव मंजूर झाला नाही. कॉंग्रेस अधिवेशनात सहभागी होण्याची टिळकांप्रमाणेच गोखल्यांचीही ही पहिलीच वेळ होती. त्यांनी चर्चेत विशेष उत्साहाने भाग घेतला. त्यांच्या तर्कशुद्ध वक्तृत्वाची ओळख कॉंग्रेस सदस्यांना या वेळी पटली. गोखल्यांनी आपल्या भाषणात सनदी सेवेत भारतीयांच्या प्रवेशाबाबत तपशीलवार माहिती देऊन ब्रिटिशांप्रमाणे भारतीयांनाही स्पर्धा परीक्षा खऱ्या अर्थाने खुल्या करण्यात याव्या अशी मागणी केली. अमरावतीचे प्रसिद्ध वकील गणेश श्रीकृष्ण खापर्डे हेही प्रथमच कॉंग्रेस अधिवेशनाला उपस्थित होते. त्यांचे शेतीसुधारणेसंबंधी भाषण अतिशय अभ्यासपूर्ण व मननीय झाले. भविष्यात कॉंग्रेस चळवळीचे आघाडीचे नेतृत्व करणारे हे तीन कार्यकर्ते अशा रीतीने मुंबई अधिवेशनाचे वेळी प्रथमच पुढे आले.

अधिवेशनातील चर्चेच्या वेळी घडलेली एक लहानशी घटना यावेळी काहीशी दुर्लक्षित राहिली खरी; पण कॉंग्रेसचा पुढचा इतिहास ध्यानात घेता ती घटना अशुभसूचक होती असे म्हणावे लागते. विधिमंडळावर पाठवावयाच्या भारतीय प्रतिनिधींची संख्या किती असावी याविषयी चर्चा चालू असता एका मुस्लीम प्रतिनिधीने मुस्लीमांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाऊ नये, त्यांना हिंदूंच्या बरोबरीने प्रतिनिधित्व मिळावे अशी मागणी केली. अलीगढ गटाने कॉंग्रेसबाबत चालविलेल्या अपप्रचाराचा, प्रातिनिधिक शासनव्यवस्था भारतात प्रस्थापित झाल्यास एकेकाळी भारताचे राज्य केलेल्या मुसलमान समाजावर हिंदू समाजाचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित होईल असा गैरसमज प्रसृत झाल्याचा हा दृश्य परिणाम होता. सुदैवाने या प्रस्तावाला हिंदूनीच केवळ नव्हे तर मुस्लीम सदस्यांनीही अनुचित ठरवून विरोध केला व त्यामुळे हा प्रस्ताव बाजूला सारला गेला. मात्र याकडे विघ्नसंतोषी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे लक्ष गेल्याखेरीज राहिले नाही आणि भविष्यात त्याचे भरपूर भांडवल त्यांनी करून घेतले.

प्रातिनिधिक शासनाच्या मागणीबरोबरच कॉंग्रेस तोवर करीत आलेल्या इतर मागण्यासंबंधीचे ठराव या अधिवेशनात पारित करण्यात आले. त्याखेरीज भारतीयांच्या राजकीय अधिकारांची मागणी न्याय्य असल्याबद्दल ब्रिटिश लोकमताची खात्री पटवून देणे निकडीचे आहे असे वेडरबर्न, दादाभाई, ह्यूम इत्यादींचे मत होते. म्हणून इंग्लंडमध्ये कॉंग्रेसचे प्रचारकार्य करण्यासाठी कॉंग्रेसची एक शाखा लंडनला स्थापन करण्याचा निर्णय या अधिवेशनाने घेतला. तसेच कॉंग्रेसची कौन्सिल सुधारणेची मागणी इंग्लंडमधील राजकीय वर्तुळात पुढे रेटण्यासाठी कॉंग्रेस सदस्यांचे एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठवावे असेही ठरले. या शिष्टमंडळात महाराष्ट्राचे फिरोजशहा मेहता व मुधोळकर यांचा समावेश होता.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

महाराष्ट्रात झालेले हे काँग्रेसचे दुसरे अधिवेशन अतिशय यशस्वीरीत्या पार पडले. या अधिवेशनाला महाराष्ट्रातील अनेक शहारांतून लोक आले असल्यामुळे त्यांच्यामार्फत काँग्रेस कार्याचे वृत्त शहरोशहरी पसरले. वृत्तपत्रांनीही याला बरीच प्रसिद्धी दिली. केसरीच्या व्यवस्थापकांनी तर केसरीचा अंक अधिवेशनाच्या काळात रोज मुंबईहून काढण्याची आणि अधिवेशनाची ताजी बातमी रोज लोकांपर्यंत पोचविण्याची व्यवस्था केली.

*

पुढील वर्षीच्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद महाराष्ट्रीय नेत्याने फिरोजशहा मेहता यांनी विभूषित केले. कलकत्त्याला झालेल्या या अधिवेशनात महाराष्ट्राच्या वतीने गोखले, वाछा, दाजी खरे, करंदीकर, नागपूरचे सी. व्ही. नायडू व अमरावतीचे मुधोळकर व खापर्डे यांनी चर्चेत उत्साहाने भाग घेतला. मिठावरील कर, शेतसारा, सर्वसामान्य करव्यवस्था, लष्करावरील खर्च, सनदी सेवेत व लष्करात भारतीयांना प्रवेश इत्यादीविषयांवरची त्यांची भाषणे अभ्यासपूर्ण झाली. काँग्रेसच्या मागण्यांबाबत ब्रिटिश पार्लमेंटच्या सदस्यांशी बोलणी करण्यासाठी जाणाऱ्या काँग्रेसच्या शिष्टमंडळात महाराष्ट्राचे दादाभाई नवरोजी, दाजी खरे व मोरोपंत जोशी यांची नावे समाविष्ट करण्यात आली. या अधिवेशनाच्या सुमारास काँग्रेस चळवळ दडपू पाहणाऱ्या ब्रिटिश सरकारने सरकारी नोकरीतील मंडळींनी काँग्रेस अधिवेशनाला प्रेक्षक म्हणून देखील हजर राहण्यावर बंदी घातल्यामुळे न्या. रानडे यांच्यासारख्या राष्ट्रोन्नतीच्या कार्याची तळमळ असलेल्या मंडळींची मानसिक कुचंबणा होऊ लागली. परंतु काँग्रेस अधिवेशनाला लागूनच सामाजिक परिषद घेण्याची प्रथा १८८७ पासून रूढ करण्यात आल्याचा फायदा त्यांनी घेतला आणि सामाजिक परिषदेच्या निमित्ताने काँग्रेस अधिवेशनाच्या शहरी जाऊन ते काँग्रेस सदस्यांशी अनौपचारिक चर्चा करीत राहिले.

## नागपूर अधिवेशन

१८९१ सालचे काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला झाले, नागपूरच्या पुढाऱ्यांनी या वर्षीची काँग्रेस नागपूरला आंमत्रित केली हे या भागात होऊ लागलेल्या राजकीय जागृतीचे निदर्शक होते. नागपूरला अधिवेशन भरण्याच्या मार्गांत यावेळी एक अडचण उपस्थित झाली. अधिवेशनापूर्वी काही दिवस भारतात होत असलेली काँग्रेसची अधिवेशने यापुढे बंद करावी, इंग्लंडमधील जनमत जागृत करण्यावर काँग्रेसने काही वर्षे आपले लक्ष केंद्रित करावे व त्यासाठी इंग्लंडमध्ये काँग्रेसची अधिवेशने घ्यावीत अशी सूचना ह्यूम यांनी जाहीररीत्या मांडली. तेव्हा भारतीयांच्या न्याय्य हक्काबाबत इंग्लंडमधील जनमत जागृत करणे आवश्यक असले, तरी त्यासाठी भारतात चाललेली काँग्रेसच्या अधिवेशनांची सत्रे बंद करण्याचे प्रयोजन नाही, उलट येथील जनजागृती अजून हवी तेवढी झालेली नाही, म्हणून काँग्रेसची देशातील चळवळ बंद करणे इष्ट नाही, उलट ती अधिक व्यापक करायला पाहिजे अशा आशयाचा अतिशय विचारप्रवण लेख गोपाळ गणेश आगरकरांनी आपल्या सुधारकांतून लिहिला. या संपादकीय लेखावरुन सामाजिक सुधारणांवर विशेष भर देणारे आगरकर देशाच्या राजकीय प्रगतीबाबतही किती जागरूक होते ते स्पष्ट दिसते. वस्तुतः महाराष्ट्रात यावेळी उदभवू लागलेली 'आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा' हा वाद फारसा मूलगामी नव्हता. कारण सामाजिक सुधारणांचा आग्रही पुरस्कार करणारी रानडे, आगरकरांसारखी मंडळी राजकीय सुधारणांचे मर्म ओळखून होती, तर राजकीय सुधारणांवर भर देणारे टिळकांसारखे पुढारी सामाजिक सुधारणांची महती जाणून होते.

अनुक्रमणिका

नागपूरच्या अधिवेशनासाठी नागपूरकरांनी वऱ्हाडच्या नेत्यांचे सहकार्य मिळविले. दोन्ही भागातील सदस्यांची मिळून स्वागत समिती गठित करण्यात आली. स्वागत समितीच्या अध्यक्षपदी त्यावेळी नागपूर म्युनिसिपालटीचे अध्यक्ष व ज्युडिशियल कमिशनरच्या कोर्टात वकील असलेले सी. नारायणस्वामी नायडू यांची निवड झाली. कार्यवाहपद हिस्लॅाप कॉलेजमधील गणिताचे प्राध्यापक व नागपूरच्या कॉंग्रेस समितीने कार्यवाह भगीरथप्रसाद आणि नीलसिटी हायस्कूलचे त्यावेळचे मुख्याध्यापक केशवराव जोशी यांच्याकडे सोपविले गेले. अधिवेशनासंबंधी स्थानिक लोकांना माहिती द्यावी, त्यांच्यात उत्साह निर्माण करावा म्हणून नागपूर व अमरावतीच्या पुढाऱ्यांनी गावोगावी हिंडून भाषणे दिली. जोशींनी तर बैलगाडीने गावोगावी जाऊन अधिवेशनासाठी निधी उभा केला. वऱ्हाड व मध्यप्रांताच्या अनेक शहरातील कार्यकर्ते स्वागत समितीत समाविष्ट केले गेल्यामुळे त्या त्या शहरातील लोक कॉंग्रेसमध्ये सहभागी होण्यास आपोआपच प्रवृत्त झाले. भगीरथप्रसादांचा उत्साह तर इतका दांडगा होता की अधिवेशन संपल्यानंतर उरलेले बटाटे विकण्यासाठी ते स्वतः बाजारात बसले आणि त्यामार्गे गोळा झालेला पैसा त्यांनी कॉंग्रेसच्या स्वाधीन केला.

नागपूरच्या नवलोजीराव गुजरांची रेल्वेस्थानकानजीकची लालबागची जागा कॉंग्रेसचा मंडप घालण्यासाठी निवडली गेली. सुमारे चार हजार मंडळी बसू शकतील असा भव्य मंडप उभारला गेला. तेथेच प्रतिनिधींच्या राहण्याचीही व्यवस्था करण्यात आली. नागपूर हे प्रेक्षणीय अगर प्रसिद्ध शहर म्हणून नावाजलेले नसताही ८१२ प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित राहिले. यापैकी ४८० सदस्य वऱ्हाड व नागपूरकडील तर १३५ पश्चिम महाराष्ट्रातून आले होते. अधिवेशनासाठी आलेल्या प्रतिनिधींनी प्रत्येकी दहा रुपये वर्गणी दिली. अधिवेशनासाठी येणाऱ्या खर्चाचा पाच अष्टमांश वाटा नागपूरकडील भागाने, तर तीन अष्टमांश वाटा वऱ्हाडने उचलावा असे स्वागत समितीने एकमुखाने ठरविले.

अधिवेशनाचे अध्यक्षपद मद्रासचे सुब्रह्मण्यम अय्यर यांना द्यावयचे ठरले होते. परंतु अधिवेशनापूर्वी मद्रास हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नेमणूक झाल्यामुळे त्यांच्या जागी मद्रासचे ख्यातनाम वकील व मद्रास महाजन सभेचे सहकार्यवाह आनंद चार्लू यांची निवड करण्यात आली. कॉंग्रेसच्या स्थापनेत त्यांचा सहभाग होता आणि ते कॉंग्रेसचे दक्षिणेकडील आघाडीचे पुढारी होते.

ह्या अधिवेशनात झालेल्या अनेक भाषणांचा गाभा देशातील वाढते दारिद्र्य आणि सतत पडणारे दुष्काळ हा होता. वाछा, मुधोळकर व गोखले यांची भाषणे अतिशय प्रभावी झाली. मुधोळकरांनी आपल्या भाषणात भारतीयांचे दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न जेमतेम २७ रूपये, तर इंग्रज नागरिकांचे ५७० रूपये आहे. त्यांच्या उत्पन्नात इतकी मोठी तफावत असूनही ब्रिटिश नागरिकांवर व भारतीयांवर लादण्यात येणाऱ्या कराचे प्रमाण मात्र सारखेच आहे असे सांगून भारतीयांवरील अवास्तव कर त्यांच्या आर्थिक हलाखीला कारणीभूत असल्याचा त्यांनी दावा केला. हा मुद्दा तर्कशुद्ध रीतीने पटवून देण्यासाठी दुष्काळ आयोगाच्या अहवालातील आकडेवारीचा त्यांनी भरपूर उपयोग केला. वाछांनी लष्करी खर्चात कपात करण्याची निकड प्रतिपादन करताना १८६९ साली चौदा कोटी असलेला लष्करी खर्चाचा आकडा १८९० साली चौपन कोटीपर्यंत म्हणजे चौपटीने फुगला असल्याचे निदर्शनास आणून दिले आणि यापैकी बराच खर्च भारतासाठी नव्हे तर ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणासाठी केला जातो हे पुराव्यानिशी सिद्ध केले. गोखल्यांनी इंग्लंड व इतर युरोपीय राष्ट्रांतील पुरागामी शिक्षणपद्धतीकडे व सरकारकडून तेथे शिक्षणाला मिळणाऱ्या प्रोत्साहनाकडे सदस्यांचे लक्ष वेधले आणि भारतीयांच्या हितसंवर्धनासाठी सरकारने शिक्षणप्रसाराला उत्तेजन देण्याची निकड ठासून प्रतिपादित केली.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

अध्यक्षांनी आपल्या भाषणात भारतातील कौन्सिल सुधारणेचा काँग्रेसने तयार केलेला प्रस्ताव पार्लमेंटपुढे मांडल्याबद्दल चार्लस् बॅडलॉविषयी कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांच्या मृत्यूचा उल्लेख करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. भारतमंत्री लॉर्ड क्रॉस याने पार्लमेंटपुढे मांडलेल्या कौन्सिल सुधारणाविषयक विधेयकावर इंग्लंडमध्ये काही ब्रिटिश अधिकारी करीत असलेल्या टीकेचा त्यांनी उल्लेख केला. काँग्रेस ही राष्ट्रीय संघटना नाही व त्यामुळे तिची मागणी विचारात घेण्याचे कारण नाही असा इंग्लंडमध्ये केला जात असलेला प्रचार खोडसाळ आहे हे ठामपणे प्रतिपादन करून त्यांनी काँग्रेसच्या राष्ट्रीय स्वरूपावर भर दिला. तसेच कौन्सिल सुधारणा विधेयकावर पार्लमेंटमध्ये चर्चा चालू असताना भारताविषयी तेथे मुद्दाम केल्या जाणाऱ्या अपप्रचाराचा ब्रिटिश लोकमतावर प्रभाव पडू नये म्हणून काँग्रेसचे पुढील अधिवेशन लंडनला भरविण्याची यापूर्वी करण्यात आलेली सूचना त्यांनी उचलून धरली. मात्र त्याबरोबरच भारतातही राजकीय जागृती करीत राहण्याची गरज त्यांनी आवर्जून प्रतिपादन केली.

काँग्रेसचे पुढील अधिवेशन लंडनला घेतले जावे व ते होईपर्यंत भारतात अधिवेशन घेतले जाऊ नये ही सूचना वादाचा विषय बनल्यामुळे त्यावर निर्णय घेण्यास नागपूर अधिवेशनाने वीस सदस्यांची एक समिती नेमली. त्यात पश्चिम महाराष्ट्राचे वाछा, महादेव नामजोशी, दाजी खरे, विष्णु भिडे, नागपूरचे बिपिन कृष्ण बोस, गोपाळराव भिडे व अमरावतीचे मुधोळकर यांचा समावेश होता. या समितीने असा निर्णय घेतला की १८९२ साली व्हावयाच्या पार्लमेंटच्या निवडणुकांची धामधूम इंग्लंडमध्ये चालू असल्याने ही निवडणूक झाल्यानंतर तेथे काँग्रेसचे अधिवेशन भरवावे व तोवर देशातील अधिवेशने स्थगित करू नयेत. या निर्णयामुळे काँग्रेस अधिवेशनात येऊ पाहणारी बाधा दूर झाली आणि काँग्रेस अधिवेशनांचे सत्र अखंड चालू राहिले. नागपूर अधिवेशनात पारित झालेल्या अठरा ठरावात नेहमीच्या विषयांबरोबर शेतकऱ्यांच्या आर्थिक मदतीसाठी कृषिपेढ्या स्थापन करण्यात याव्या, भारतीयांना लष्करी शिक्षण देण्यासाठी लष्करी विद्यालये स्थापन करण्यात यावीत, इंग्लंडमध्ये असलेल्या लष्करी स्वयंसेवक पथकांच्या धर्तीवर येथेही भारतीयांची स्वयंसेवक दले उभारली जावीत, तांत्रिक शिक्षणसंस्था स्थापन केल्या जाव्या इत्यादी मागण्या अंतर्भूत होत्या.

नागपूर अधिवेशनाच्या वेळी घडलेली एक उल्लेखनीय घटना म्हणजे खापर्डे व टिळक यांच्यात झालेली खडाजंगी. याचे कारण सामाजिक परिषद हे होते. काँग्रेस ही पूर्णतः राजकीय संस्था असावी असा निर्णय काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनात घेण्यात आल्यामुळे समाजसुधारणेच्या प्रचारासाठी स्वतंत्र मंच उभा करण्याची गरज न्या. रानडे यांना वाटली, देशाच्या निरनिराळ्या भांगाचे प्रतिनिधी काँग्रेस अधिवेशनासाठी एकत्र येतात, याचा फायदा घेऊन काँग्रेस अधिवेशनाच्या कालावधीत काँग्रेसच्या मंडपातच सामाजिक परिषद घ्यावी आणि उपस्थित मंडळीनी समाजसुधारणेचाही ऊहापोह करावा असा विचार रानड्यांनी मांडला होता. याला सर्वांचाच पाठिंबा मिळाला व १८८७ पासून काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषदेची अधिवेशने होऊ लागली. मात्र या दोन संघटना स्वतंत्र मानल्या जात आणि एका संघटनेच्या सदस्याने दुसऱ्या संघटनेचे सदस्यत्व पत्करावे असे बंधन नसे. सामाजिक व राजकीय सुधारणा परस्परभिन्न नसून एकाच सुधारणा चळवळची ही दोन परस्परपूरक अंगे आहेत असे न्या. रानडे यांचे प्रामाणिक मत होते. यातूनच सामाजिक परिषदेची कल्पना प्रादुर्भूत झाली आणि काँग्रेस अधिवेशनाला येणारे बहुसंख्य सदस्य या परिषदेतही सहभागी होऊ लागले. सामाजिक परिषदेच्या अधिवेशनात देशाच्या निरनिराळ्या भागातील सामाजिक समस्यांचे स्वरूप विशद करणारी भाषणे होत व त्यांच्या निराकरणार्थ उपाययोजना सुचविली जाई. न्या. रानडे हे सामाजिक परिषदेचा आत्मा होते.

न्या. रानडे यांच्या सूचनेनुसार काँग्रेस अधिवेशनाला लागून सामाजिक परिषद घेण्याची सुरू झालेली प्रथा काही काँग्रेस सदस्यांना गर्हणीय वाटत होती. त्यामुळे सामाजिक परिषद हे काँग्रेसचेच एक अंग आहे असा समज



www.mpscmantra.com

निर्माण होतो, सामाजिक परिषदेत प्रचलित सामाजिक व धार्मिक रीतीरिवाजावर होणाऱ्या प्रखर टीकेमुळे परंपरानिष्ठ मंडळींची मने दुखावली जातात आणि त्यामुळे ते काँग्रेसपासून दुरावतात असे त्यांचे मत होते, राजकीय सुधारणेचा वेग वाढविण्यासाठी काँग्रेसला समाजातील सर्व वर्गाचा भरघोस पाठिंबा मिळणे या मंडळींना अत्यावश्यक वाटत होते. आणि म्हणून सामाजिक परिषदेमुळे समाजातील एका गटाचा पाठिंबा काँग्रेसने घालवून बसणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने परवडणारे नाही अशी त्यांची प्रामाणिक धारणा होती. या मतप्रणालीचे काँग्रेसमधील अध्वर्यू टिळक होते. सामाजिक परिषदेला त्यांचा तत्त्वतः विरोध नव्हता. फक्त तिची अधिवेशने काँग्रेसच्या मंडपात घेण्यावर त्यांचा आक्षेप होता. हे मत त्यांनी १८९० साली काँग्रेस श्रेष्ठींच्या कानी घातले होते.

याच मुद्यावरून नागपूर अधिवेशनाच्या वेळी भरलेल्या सामाजिक परिषदेच्या सभेत टिळकांची रानड्यांशी वादावादी झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी अमरावतीचे प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे ख्यातनाम पुढारी दादासाहेब खापर्डे हे होते. यावेळी टिळकांची खरी ओळख खापर्ड्यांना पटली नव्हती. रानड्यांसारख्या एका मान्यवर ज्येष्ठ नेत्यांशी टिळक वितंडवाद करीत आहेत असे वाटून, टिळकांनी वाद न थांबविल्यास त्यांना सभा सोडून जाण्यास आपल्याला फर्मावावे लागेल असा कडक इशारा त्यांनी टिळकांना दिला. टिळक-खापर्डे मुलाखतीचा पहिला बार हा असा खडाजंगीने उडाला. यानंतरच्या काही वर्षात मात्र टिळकांची प्रखर राष्ट्रनिष्ठा, देशकार्यासाठी कोणताही त्याग करण्याची त्यांची सिद्धता आणि त्यांचे राजकीय दूरदर्शित्व हे गुणविशेष त्यांच्या डोळ्यात भरले आणि खापर्डे हे टिळकाचे कट्टर समर्थक व वऱ्हाडात टिळकवादाचे उत्साही प्रचारक बनले. या दोघांतील तादात्म्य काही वर्षांतच इतके वाढले की खापर्डे यांच्याविषयी बोलताना, "I cannot do without him" असे उद्गार टिळक काढीत असा उल्लेख बाबासाहेब खापर्डे यांनी लिहिलेल्या दादासाहेब खापर्ड्यांच्या चरित्रात आढळतो.

नागपूरच्या अधिवेशनाने नागपूरकडील व वऱ्हाडातील जनतेला काँग्रेसची जवळून ओळख करून घेण्याची संधी मिळाली. अधिवेशनाला पाठवावयाचे प्रतिनिधी निवडण्यासाठी या भागात गावोगावी झालेल्या सभांमुळे काँग्रेसला अनेकांचा पाठिंबा मिळाला. अधिवेशनाला हजर असलेल्या प्रतिनिधींनीही काँग्रेसचा संदेश आपआपल्या गावी पोहोचविला. ह्या अधिवेशनामुळे नागपूर व अमरावतीच्या विद्यार्थी वर्गातही बरीच राजकीय जागृती होण्यास मदत झाली.

### ह्यूमच्या परिपत्रकावरील वादळ

नागपूर अधिवेशनानंतरच्या काही महिन्यात काँग्रेस वर्तुळात उठलेल्या वादळाचे पडसाद महाराष्ट्रातील काँग्रेस गोटात उमटल्याखेरीज राहिले नाहीत. काँग्रेसच्या स्थापनेपासून तिने ठरावाच्या व अर्जविनंत्यांच्या रूपाने भारतीयांच्या मागण्या राज्यकर्त्यांपुढे ठेवल्या होत्या. सरकार त्यांची निश्चित दखल घेईल आणि काही सुधारणा भारतीयांच्या पदरात टाकील अशी काँग्रेसच्या संस्थापकांची दृढ निष्ठा होती. परंतु १८९२ पर्यंत काँग्रेसची एकही मागणी पूर्ण न झाल्यामुळे काँग्रेसच्या सदनशीर कार्यपद्धतीवरील काही काँग्रेस सदस्यांचा विश्वास उडू लागला, आणि काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर ते टीका करू लागले. काँग्रेसचे तीन दिवसाचे अधिवेशन म्हणजे एक निरर्थक सोहळा आहे, अर्जविनंत्याचा मार्ग म्हणजे भिक्षादेहीचा दुबळा मार्ग आहे, या मार्गाला परकीय राज्यकर्ते दाद देणार माहीत, म्हणून काँग्रेसने आपली कार्यपद्धती बदलावी अशी सूचनाही काही सदस्य करू लागले.

ब्रिटिश सरकार काँग्रेसकडे करीत असलेले दुर्लक्ष ह्यूम यांनाही अस्वस्थ करीत होते. सरकारचे काँग्रेसबाबतचे बेमुवर्तखोर धोरण असेच कायम राहिल्यास सुशिक्षित भारतीयांचा काँग्रेसच्या उपयुक्ततेवरील विश्वास



www.mpscmantra.com

नाहीसा होईल आणि त्यांच्या मनातील असंतोष गैरसनदशीर मार्गाने आविष्कृत होऊ लागले असे त्यांना वाटु लागले. हे टाळण्यासाठी बुद्धिजीवी वर्गापुरती सीमित असलेली काँग्रेस संघटना जनसामान्यांपर्यंत पोचवावी, काँग्रेसच्या मागण्यांना लोकमताचा पाठिंबा मिळवावा, इंग्लंडमधील चार्टिस्टसारखी चळवळ येथे आयोजित करावी आणि अशा चळवळीद्वारा सरकारवर दडपण आणून भारतीयांच्या मागण्या काही अंशी का होईना मान्य करण्यास सरकारला भाग पाडावे असे ह्यूम यांचे मत बनले. याच भूमिकेतून काँग्रेसच्या मागण्याबद्दल सामान्य जनतेत जागृती करण्याचा व वार्षिक अधिवेशने घेऊन स्वस्थ न बसता जनतेची चळवळ उभी करण्याचा मार्ग काँग्रेसने अंगिकारावा असा विचार पुरस्कृत करणारे एक परिपत्रक ह्यूम यांनी १८ फेब्रुवारी १८९२ रोजी काढले. त्याच्या प्रती सर्व प्रांतीय काँग्रेस समित्याकडे त्यांनी पाठविल्या.

या परिपत्रकाने ब्रिटिश शासकीय वर्तुळात विलक्षण खळबळ माजविली. एका सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्याने भारतीयांना जन आंदोलन उभे करण्याचा सल्ला देणे ही बाब सत्ताधाऱ्यांना जबरदस्त धक्का देणारी होती. याबद्दल ह्यूम यांचा खरपूस समाचार घेणारे जळजळीत संपादकीय लेख अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांनी प्रकाशित केले. हा विषय ब्रिटिश पार्लमेंटमध्ये चर्चेला आला तेव्हा मॅकलीन नावाच्या एका सदस्याने ह्यूम राजद्रोही असल्याचा आरोप केला आणि या गुन्ह्यासाठी त्यांना ताबडतोब गोळी घालायला पाहिजे असा अभिप्रायही दिला.

## महाराष्ट्राची प्रतिक्रिया

ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची ही प्रतिक्रिया अपेक्षितच होती. अनपेक्षित होती ती त्याबाबतची काही काँग्रेस संस्थापकांची प्रतिक्रिया. मद्रास व संयुक्त प्रांताच्या काँग्रेस समित्यांप्रमाणे मुंबई इलाख्याच्या काँग्रेस समितीच्या वतीने मेहतांनी ह्यूमच्या सूचनेबाबत प्रतिकूल मत दिले. मुख्य म्हणजे प्रांतिक काँग्रेस समितीच्या सर्व सदस्यांशी विचारविनिमय न करताच त्यांनी त्यांचा विरोध व्यक्त केला. मेहता, वाछा गटाने ह्यूमच्या परिपत्रकासंबंधी घेतलेल्या प्रतिकूल भूमिकेवर वाछांनी त्यावेळी लंडनला असलेल्या दादाभाईंना १९ मार्च १८९२ रोजी पाठविलेल्या पत्राने प्रकाश पडतो. काँग्रेसवर ब्रिटिश सत्ताधाऱ्यांची अगोदरच वक्रदृष्टी झालेली असताना ह्यूमच्या सूचनेचा काँग्रेसने अंगिकार केल्यास काँग्रेसवरील सरकारचा रोष अधिकच बळावेल आणि काँग्रेस जनतेत राजद्रोहाची भावना प्रसृत करीत आहे अशी सबब पुढे करून सरकार ही संघटना चिरडून टाकेल, म्हणून काँग्रेसने हा धोका पत्करणे उचित होणार नाही असा अभिप्राय वाछांनी या पत्रात व्यक्त केला. मात्र ह्यूमच्या परिपत्रकातील माहिती चूक नाही अशी कबुली त्यांनी दिली. मेहतांचा तर जनसंपर्काच्या धोरणालाच मुळातच तात्त्विक विरोध होता.

मुंबईच्या ज्येष्ठ नेत्यांनी दडपून ठेवलेल्या ह्यूमच्या परिपत्रकाला अँग्लो- इंडियन वृत्तपत्रांनी प्रसिद्धी दिली. त्याबरोबर महाराष्ट्रातील काँग्रेस सदस्यांच्या व राष्ट्रवाद्यांच्या त्याबाबतच्या प्रतिक्रिया प्रगट होऊ लागल्या. अमरावतीचे मुधोळकर ह्यूमशी सहमत होते. अकोल्यांच्या 'वऱ्हाड समाचार' ने १८ एप्रिल १८९२ च्या अंकात 'ह्यूम साहेबांच्या पत्रात बाऊ वाटण्याजोगे काही नाही, त्यांनी भावी दुःखस्थितीचा बावटा उभारून लोकांना जागे केले आहे याबद्दल त्यांचे उतराई होणेच योग्य आहे' असा अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. केसरीनेही आपल्या नेहमीच्या प्रखर शैलीत या विषयाला तोंड फोडले. ५ एप्रिल रोजी केसरीच्या संपादकीयात त्यांनी ह्यूमच्या सूचनेचे स्वागत केले, त्यांच्या युक्तीवादावरील तथ्य विशद केले आणि "काँग्रेसच्या कामात धक्का येऊ नये एवढ्यासाठी तरी हे सर्क्युलर प्रसिद्ध होणे इष्ट नाही" असे म्हणणाऱ्या मेहता-वाछा गटावर खरपूस टीका केली. "आपला भित्रेपणा कसा झाकावा हे आम्ही फार चांगले शिकलो आहो. बाकी राष्ट्रहिताच्या कामी झटून, कळकळीने व स्वार्थाकडे लक्ष न देता, मेहनत करण्याचा मक्ता मात्र आम्ही ह्यूमसाहेबांवर सोपविला आहे. त्याने खुशाल मेहनत करावी व एखाद्या

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

वेळी कडक सर्क्युलर काढले, तर आम्ही त्याचा भिऊन निषेध करावा, असा त्यांचा आमचा श्रमविभाग झाला आहे" अशी मेहतांच्यावर उपहासगर्भ टीका टिळकांनी केली. २४ मेच्या संपादकीयात तर टिळकांनी मुंबईच्या मेहता गटावर अधिकच घणाघाती प्रहार केले आणि "ह्यूमसाहेबांनी या कामात जो कित्ता घालून दिला आहे तोच आपणास गिरविला पाहिजे, मग बडेबडे नीतिनिपुण अगर त्यांचे तरफदार इंग्रज वर्तमान-पत्रकार आम्हास शिव्या देवोत वा वंदोत" असे म्हणून ह्यूमची सूचना अंगिकृत करणे श्रेयस्कर असल्याचा स्पष्ट कौल टिळकांनी दिला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सामाजिक सुधारणांना एरवी अग्रक्रम देणाऱ्या आगरकरांनीही ह्यूम यांच्या परिपत्रकाचे जोरदार समर्थन केले आणि "अँग्लो-इंडियन पत्रांबरोबर आमच्या लोकांनी ह्यूमसाहेब अतिशयोक्ति करतात.... वार्धक्यामुळे ह्यूमसाहेबांस वेड लागल्यासारखे झाले आहे, अशा रीतीने बरळणे हा केवढा प्रमाद व कृतघ्नपणा होय!....चार साहेब लोकांकडून बरे म्हणवून घेण्यासाठी हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या खऱ्या हितचिंतकावर अशा रीतीने उलटून पडणे हे आम्हा भेकड, लोभी, अविचारी व स्वार्थी हिंदू लोकांशिवाय दुसऱ्या कोणाच्यानेही होण्यासारखे कर्म नाही." असे नामोल्लेख न करता, मेहता गटावर कठोर वाक्प्रहार केले.

काँग्रेसमधील तरुण गट ह्यूम यांच्या विचारांचे समर्थन करण्यास पुढे सरसावलेला पाहून वाछांसारखी काही मंडळी त्यावर फेरविचार करू लागली. १८९२ च्या अखेरी वाछांनी या विषयावर लेख प्रकाशित केले आणि ह्यूम यांनी भारताच्या वाढत्या दारिद्र्याबद्दल आणि असंतोषाबद्दल केलेली विधाने तंतोतंत खरी असल्याचे वेगवेगळ्या शासकीय व अहवालातील माहिती उद्‌धृत करून पुराव्यानिशी सिद्ध केले. या धाडसाबद्दल वाछांना धन्यवाद देण्यास 'केसरी' चुकला नाही.

*

ह्यूम यांच्या परिपत्रकावर इतकी भवती न भवती झाल्यानंतरही १८९२ सालच्या अलाहाबादच्या काँग्रेस अधिवेशनात ह्यूम यांनी सुचविलेल्या मार्गाचा अवलंब करण्याचे धाडस काँग्रेसने दाखविले नाही. या अधिवेशनाला मुंबई इलाख्याचे ऐंशी व वऱ्हाड व नागपूरकडील भागाचे चाळीस प्रतिनिधी गेले होते. मुंबईच्या वतीने विषयनियामक समितीवर मुंबईचे वाछा, खरे, चिमणलाल सेटलवाड, पुण्याचे गो. कृ. गोखले, विष्णु मोरेश्वर भिडे, महादेव बल्लाळ नामजोशी, सोलापूरचे चक्रदेव व नागपूरकर, सातारचे सहस्रबुद्धे व करंदीकर, अमरावतीचे देवराव विनायक, रंगनाथ नरसिंह मुधोळकर, दादासाहेब खापर्डे, नागपपूरचे नायडू, भागीरथप्रसाद, केशवराव जोशी, हरी महादेव पंडित ही मंडळी होती.

*

इंग्लंडच्या मतदारसंघातून ब्रिटिश पार्लमेंटवर १८९२ साली निवडून येण्याचा विक्रम करणारे पहिले भारतीय दादाभाई नवरोजी हे महाराष्ट्रातील पुढारी. त्यांच्या या अपूर्व यशाबरोबर १८९३ सालच्या लाहोरच्या काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मानही त्यांना मिळाला. ह्या अधिवेशनापूर्वी १८९२ च्या कौन्सिल कायद्यानुसार व्हावयाच्या विधिमंडळाच्या पुनर्रचनेबाबतचे नियम सरकारने घोषित केले होते. त्यातील तरतुदीपासून भारतीयांना खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व देण्याचा सरकारचा मानस नाही असा अनेक काँग्रेस नेत्यांचा समज झाला. यातून सरकार विषयी वाढलेल्या असमाधानाला या अधिवेशनात वाचा फुटली. गोखले व मुधोळकर यांनी कौन्सिल कायद्यावर व त्या अंतर्गत झालेल्या नियमावर कठोर टीका केली. या कायद्याने जमीनदार व व्यापारी संघांना स्वतंत्र प्रतिनिधित्व दिले गेल्यामुळे भारतीय समाजात कलहाचे बीज रोवले जाईल हे निदर्शनास आणून देऊन, जमीनदारांऐवजी

www.mpscmantra.com

शेतकऱ्यांना प्रतिनिधित्व दिले जाणे आवश्यक होते असे मत मुधोळकरांनी मांडले; तर सरकारने निवडणुकीबाबत केलेले नियम पाहून सरकार सुशिक्षित भारतीयांकडे संशयित नजरेने पाहत असल्याचे स्पष्ट होते असा आरोप गोखल्यांनी केला. विधिमंडळात भारतीयांचा सहभाग वाढविण्याच्या सरकारने घोषित केलेल्या उद्देशाशी हे नियम सुसंगत नाहीत हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. तसेच भारताच्या तिजोरीवर कर्जाचा किती बोजा असावा, त्यातील किती वाटा इंग्लंडने उचलावा यावर विचार करण्यास पार्लमेंटने एक वित्तसमिती नेमावी अशी महत्त्वाची मागणीही गोखल्यांनी केली. दाजी खरे व दादासाहेब खापर्डे यांनी अन्याय्य करव्यवस्थेवर टीका केली, तर वाछांनी, त्यांचा विशेष अभ्यास असलेल्या भारतातील चलनाच्या समस्येवर प्रकाश टाकला. यावेळी ह्यूम इंग्लंडला जाण्याचे घाटत असल्यामुळे काँग्रेसच्या सचिवपदी दिनशा वाछांची सर्वसंमतीने निवड झाली. हे जबाबदारीचे पद अशा रीतीने महाराष्ट्रीय पुढाऱ्याकडे आले व ते त्यांनी अनेक वर्षे सांभाळले.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

## गाजलेले पुणे अधिवेशन

१८९५ साली दहा वर्षाची झालेली काँग्रेस पुण्याला भरली. या अधिवेशनाच्या पूर्वी काही अडचणी निर्माण होऊनही हे अधिवेशन यशस्वीपणे पार पडले. मात्र पुण्यातील राजकीय वर्तुळात यापूर्वी उद्‌भवलेले मतभेद व वैचारिक अंतर यानंतर अधिक वाढले आणि त्याचा परिणाम महाराष्ट्रातीलच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावरील काँग्रेसच्या धोरणावरही स्पष्टपणे दिसून येऊ लागला. काँग्रेस संघटनेत वैचारिक ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. काँग्रेस अधिवेशनाच्या मंडपात सामाजिक परिषदेचे अधिवेशन घ्यावे की नाही ह्या मुद्यावरील मतभेद यावेळी पराकोटीला गेले असले, तरी त्या मतभेदाचे मूळ पुण्यात काही वर्षापासून गाजत असलेल्या "आधी राजकीय सुधारणा की सामाजिक?" या विषयावरील वादात सामावले होते. त्याचा पहिला प्रतिध्वनी नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनाचे वेळी उमटला होता.

महाराष्ट्रात १८७० पासून प्रबोधनाच्या स्वरूपाबाबत बरेच विचारमंथन सुरू झाले होते. या काळात रानडे व त्यांच्या अनुयायांचा सर्वांगीण सुधारणेवर भर देणारा व नेमस्त राजकीय विचारांचा पुरस्कार करणारा एक विचारप्रवाह पुढे आला; दुसरा प्रवाह आगरकर पुरस्कृत करीत असलेल्या प्रखर, बुद्धिनिष्ठ, मूलगामी सुधारणावादाचा होता; तर समाज सुधारणेवर भारतीयांची शक्ती व्यर्थ खर्ची न घालता जहाल व क्रियाशील राष्ट्रवादाचा संदेश देणारा विष्णुशास्त्री चिपळूणकर प्रवर्तित तिसरा विचारप्रवाह होता. हे तिन्ही गट सामाजिक व राजकीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचे महत्त्व प्रकर्षाने जाणून होते. वाद होता तो फक्त या सुधारणा कशा घडवून आणावयाच्या व कोणत्या क्षेत्राला अग्रक्रम द्यावयाचा या मुद्यांवर! याबाबत त्यांच्यात असलेले मतभेद मात्र मूलगामी स्वरूपाचे होते. १८९० साली सरकारने मांडलेल्या संमतीवयाच्या विधेयकावर पुण्यात उठलेल्या वादळाने या मतभेदांना खतपाणी घातले गेले आणि पुण्यातील राजकीय वातावरण अधिकाधिक गढूळ होऊ लागले.

## सामाजिक परिषदेसंबंधी रणधुमाळी

संमतीवयाच्या विधेयकाला रानडे गटाने व आगरकरांनीही पूर्ण पाठिंबा व्यक्त केला. पाश्चात्य उदारमतवादी विचारांच्या अनुषंगाने भारतीय समाजात सुधारणा घडवून आणून प्रगमनशील समाज उभा केल्याखेरीज राजकीय सुधारणांना अर्थ उरणार नाही आणि आवश्यक त्या समाजसुधारणा घडवून आणण्यास समाज प्रवृत्त होत नसेल तर परकीय राज्यकर्त्यांच्या मदतीने, कायद्याचा आधार घेऊन सुधारणा घडवून आणण्यास प्रत्यवाय नाही अशी रानडे गटाची धारणा होती. प्रखर राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या आगरकरांनी, "सामान्य दृष्टीने पाहता कायद्याची मदत घेणे जरी सर्वांशी ग्राह्य नाही, तथापि आमच्या समाजाचा पूर्व इतिहास व सांप्रतची स्थिती ही मनात आणता हे आमचे निगरगट्ट तट्टू कायद्याच्या फोकावाचून हालणार नाही." असाच अभिप्राय देऊन समाज सुधारणेसाठी परकीय उदारमतवादी शासनाची मदत घेण्याची तयारी दर्शविली.

चिपळूणकरांची वैचारिक परंपरा काही अंशी पुढे चालविणाऱ्या टिळकांचा दृष्टीकोन मात्र रानडे-आगरकरांहून सर्वस्वी भिन्न होता. समाजसुधारणेच्या मूलतत्त्वांना त्यांचा कधीच विरोध नव्हता. त्यांच्या मते विवाद्य प्रश्न होता तो या धोरणातील तपशीलाचा आणि पूर्वापरभावाचा, समाजात अनिष्ट रूढी, चालीरीती प्रचलित आहेत हे त्यांना मान्य होते, परंतु त्यावर सतत प्रहार करीत राहिल्यामुळे समाजाचा तेजोभंग होतो, परकीय शासनामुळे समाजात निर्माण झालेल्या न्यूनगंडात यामुळे अधिक भर पडते, त्यामुळे सामाजिक उत्थानासाठी आवश्यक असलेली चेतना समाजात शिल्लक राहत नाही व समाजोन्नतीच्या मार्गात मोठी धोंड निर्माण होते, म्हणून निष्प्रभ बनलेल्या औदासिन्यग्रस्त भारतीय समाजात नवे ओज, नवी चेतना, नवे सामर्थ्य यांचा प्रादुर्भाव करणे ही त्यांच्या


www.mpscmantra.com

मते प्राथमिक गरज होती. तसेच भारतीय समाजात इतके असंख्य सामाजिक प्रश्न आहेत आणि ते इतके दृढमूल झाले आहेत की त्यांचे निर्मूलन करण्यास कित्येक वर्षांचा काळ लागेल, त्यांच्यात शब्दात सांगायचे तर हा "वर्षशतकाचा किंवा सहस्राचा प्रश्न" आहे, या दरम्यान सामाजिक सुधारणांना अग्रक्रम देण्याचा अट्टाहास धरल्यास व राजकीय सुधारणेला गौण स्थान दिल्यास देशाची अर्थिक व राजकीय स्थिती अधिकाधिक खालावत जाईल असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून हे टाळण्यासाठी देशाची अनन्वित पिळवणूक करणाऱ्या परकीय राज्यकर्त्यांना देशाबाहेर घालविण्यावर देशाची सगळी शक्ती केंद्रित करावी, जनतेची अस्मिता व आत्मसन्मानाची भावना पुन्हा जागृत करून त्यांच्यात प्रतिकाराची वृत्ती चेतवावी, समाजाला युयुत्सू बनवावे अशी टिळकांची पक्की धारणा बनली होती. एकदा राजकीय अधिकार भारतीयांच्या हाती आले की हव्या तशा समाजसुधारणा घडवून आणण्यास वेळ लागणार नाही असा त्यांचा युक्तीवाद होता. त्यांच्या या भूमिकेमुळे आपल्या जातीबांधवांना आपण समान हक्क देत नाही तोवर हे हक्क राज्यकर्तांकडून मागण्याचा हक्क पोहचत नाही हा रानडे आदी सुधारकांचा विचार टिळकांना देशहिताच्या दृष्टीने श्रेयस्कर वाटत नव्हता याखेरील सरकारच्या मदतीने सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास त्यांचा तत्त्वतः विरोध होता. यामुळे समाज अधिकच पंगू व परावलंबी बनेल असे त्यांचे स्पष्ट होते. ज्या सुधारणा घडवून आणावयाच्या त्या आमच्या आम्हीच हळू हळू घडवून आणणे हितकार असल्याबद्दल त्यांची खात्री होती. या वैचारिक भूमिकेवरून टिळकांनी संमतीवयाच्या विधेयकाला विरोध केला, समाजसुधारणेपेक्षा राजकीय जागृतीला महत्त्व दिले व राजकीय जागृतीसाठी लोकसंग्रह व लोकसंघटनेचा मार्ग अंगिकारला. लोकशिक्षणासाठी त्यांनी मराठा व केसरी ही वृत्तपत्रे राबविली तर लोकसंग्रह व लोकसंघटनेसाठी १८९३ व १८९५ मध्ये अनुक्रमे सार्वजनिक गणेशोत्सव व शिवाजी उत्सव सुरू केले. या उत्सवाच्या आयोजनाने त्यांना धार्मिक व ऐतिहासिक अंधश्रद्धा वाढवावयाची नव्हती, तर सर्वसामान्य श्रद्धास्थानांचे सार्वजनिक स्तरावर पुनरुज्जीवन करून जनतेत राष्ट्राभिमानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा व समाजात प्रतिकारक्षमता निर्माण करण्याचा टिळकांचा हेतू होता.

याशिवाय १८९२-९३ च्या सुमारास पश्चिम महाराष्ट्रात उफाळलेल्या हिंदू-मुस्लीम दंग्यांनी लोकसंघटनेची गरज टिळकांना विशेष प्रकर्षाने जाणवली. हे दंगे उत्स्फूर्त नव्हते, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या कुटिल चिथावणीमुळे काही मुसलमान दंग्याला प्रवृत्त झाले होते याबद्दल टिळक, आगरकर यांची पक्की खात्री होती. वाछांसारख्या नेमस्ताचेही असेच मत होते. भारतीय आपआपसात भांडताहेत असे इंग्लंडच्या सरकारच्या निदर्शनास आणून देऊन ते स्वयंशासनास लायक नाहीत हे मत ब्रिटिश पार्लमेंटच्या सदस्यांच्या मनावर बिंबवावे या उद्देशाने ब्रिटिश अधिकारी हे दंगे पेटवीत आहेत असा स्पष्ट आरोप वाछांनी ११ ऑगस्ट १८९३ रोजी दादाभाई यांना लिहिलेल्या पत्रात केलेला आढळतो. अशा परिस्थितीत हिंदू समाज संघटित झाल्यास मुस्लीम त्यांच्यावर हल्ले करण्यास धजावणार नाहीत व त्यामुळे भेदनीतीचे ब्रिटिश अधिकाऱ्यांचे कारस्थान आपोआपच थंडावेल अशी टिळकांची धारणा होती. उलटपक्षी रानडे आदी सुधारकांना मात्र या उत्सवांच्यामुळे हिंदू-मुसलमान समाजातील अंतर आणखी वाढेल याविषयी शंका नव्हती. यावरून टिळक-रानडे गटातील वैचारिक दरी अधिकच रूंदावली.

या दोन गटातील मतभेदाचा आणखी एक विषय होता तो म्हणजे काँग्रेसची कार्यपद्धती. काँग्रेसविषयीची राज्यकर्त्यांची बेपर्वाई पाहून वार्षिक सभासंमेलने व अर्जविनत्यांनी राजकीय अधिकार मिळणार नाहीत, ते झगडून सनदशीर मार्गाने लढून मिळवावे लागतील, मात्र सनदशीरपणे द्यावयाचा लढा परिणामकारक व्हावयाचा असेल तर त्यामागे संघटित जनशक्ती उभी करायला पाहिजे, त्यासाठी राजकीय लोकजागृतीचे कार्य स्थानिक संघटनांनी जोमाने करावयाला पाहिजे आणि या कार्याचे नेतृत्व बुद्धिजीव पुढाऱ्यांनी करायला पाहिजे अशी टिळकांची पक्की धारणा बनली होती. म्हणून ते प्रांताप्रांतातूनच नव्हे, तर जिल्ह्यातून, शहरांतून, खेड्यांतून लोकशिक्षणाचे कार्य अगत्याचे असल्याचे आवर्जून सांगू लागले. मुंबई इलाख्याचे प्रांतिक सभातून हिरीरीने भाग घेऊन आपल्या

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

विचारांना अनुकूल असा गट टिळक संघटित करू लागले, आणि राष्ट्रोन्नतीसाठी आरामखुर्चीचे राजकारण अपुरे आहे, त्यासाठी नेत्यांनी क्रियाशील बनण्याची, पूर्णतः राष्ट्रकार्याला वाहून घेण्याची गरज आहे असे ते आग्रहाने प्रतिपादन करू लागले, तसेच राष्ट्रकार्याच्या गाड्याला समाजातील सर्व वर्गांना जुंपणे आवश्यक असल्यामुळे कॉंग्रेसच्या मंडपात फक्त राजकीय विषयच चर्चिले जावेत, तीव्र मतभिन्नता असलेल्या सामाजिक सुधारणांवर चर्चा करणारी सामाजिक परिषद कॉंग्रेसमंडपात घेतली जाऊ नये, असे त्यांना वाटत होते. या त्यांच्या विचारामुळे त्यांचे रानडे गटाशी वारंवार खटके उडू लागले. रानडे गट राजकीय बाबतीत लोकशिक्षणाचे क्षेत्र व्यापक करीत नाही, अर्जविनंत्यापलीकडे जात नाही अशी खात्री पटल्यावर टिळकांनी सार्वजनिक सभेची सूत्रे १८९५ साली आपल्या गटाच्या हाती घेतली. यामुळे रानडे आदींचा सुधारक गट अधिकच रूष्ट झाला. आणि लागलीच पुढील वर्षी त्यांनी आपली डेक्कन सभा नावाची स्वतंत्र संस्था प्रस्थापित केली. रानड्यांच्या पाठोपाठ त्यांचे शिष्य गोपाळ कृष्ण गोखले हे देखील डेक्कन सभेत सामील झाले.

अशा प्रकारे सामाजिक व राजकीय समस्या हाताळण्याच्या मार्गांबाबत पुण्याच्या कार्यकर्त्यांत १८९५ पर्यंत स्पष्टपणे दोन गट पडले होते. कॉंग्रेस वर्तुळातील ज्येष्ठ नेत्यांचा पाठिंबा साहजिकच नेमस्त रानडे गटाला होता. जहाल राजकारणाचा प्रचार करू लागलेले टिळक त्यांना बंडखोर वाटत. पुण्यात टिळकांच्या भोवती बराच मोठा गट संघटित झाला होता. रानडे टिळकांच्या विचारांशी सहमत नसले आणि टिळकांच्या प्रखर टीकेमुळे दुखावले जात असले तरी टिळकांचे मोठेपण तेही मनोमन ओळखून होते. त्यांच्या एका सहकाऱ्याने टिळकांच्याविषयी अपशब्द काढले असता, "बळवंतरावांच्या मनगटात सामर्थ्य आहे. सरकारशी आम्ही कारणांपेक्षा जास्त संबंध ठेवतो याचाच त्यांना जास्त राग येतो. त्यास हे स्वाभाविक आवडत नाही. तेव्हा त्याने आम्हास नावे ठेविल्यास, नव्हे मनापासून शिव्याही दिल्यास ते त्यास शोभण्यासारखे आहे. असा मर्द व निर्भीड मनुष्य तरी आपणात कोठे आहे?" असे उद्‌गार काढून रानड्यांनी आपल्या सहकाऱ्याला गप्प बसविले होते.

**मतभेदांचा स्फोट**

कॉंग्रेस अधिवेशने १८९५ साली पुण्याला भरण्याचे ठरविले, तेव्हा अधिवेशनाच्या पूर्वतयारीच्या कार्यात रानडे यांनी टिळकांनाही सामील करून घेतले. रानडे-टिळक गटातील मूलगामी वैचारिक अंतर लक्षात घेऊन स्वागत समितीत टिळकांचा अंतर्भाव न करण्याची काहींनी केलेली सूचना रानड्यांनी फेटाळून लावली आणि अधिवेशनाकरिता निधी गोळा करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचे सहसचिव म्हणून त्यांनीच टिळकांचे नाव सुचविले. अशा सहकार्याच्या आणि सुसंवादाच्या वातावरणात दोन्ही गट अधिवेशनाच्या तयारीला लागले. परंतु अधिवेशनासाठी फंड गोळा करण्याच्या मोहीमेच्या दरम्यान, कॉंग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषदेची सभा घेतली जाणार असल्यास आपण कॉंग्रेसमध्ये सहभागी होणार नाही असा विचार पुण्यातील काही परंपरावादी मंडळी व्यक्त करू लागताच टिळक पेचात सापडले. पुण्याचे कॉंग्रेसचे अधिवेशन यशस्वीरीत्या पार पाडणे विशेष निकडीचे आहे, असे न झाल्यास देशात सर्वत्र पुण्याची छी थू होईल, म्हणून सामाजिक परिषदेचा विषय गौण मानावा आणि राष्ट्रहिताला अग्रस्थान द्यावे अशी परंपरावादी गटाची समजूत घालण्याचा टिळकांनी प्रयत्नही केला.

पुण्यातील या कुरबुरीची कुणकुण साताराच्या मंडळींना लागली आणि पुण्याला एकमताने अधिवेशनाचे काम होणार नसल्यास हे अधिवेशन सातारला घेण्यात यावे असे त्यांनी कॉंग्रेस नेत्यांना सूचित केले. हे कळताच अधिवेशन पुण्यालाच होईल हे घोषित करण्याकरिता २२ ऑक्टोबरला टिळक गटाने एक जाहीर सभा आयोजित केली. त्यात काही सुधारणावाद्यांनी गोंधळ केला. टिळक परंपरानिष्ठ गटाचे अध्वर्यू बनले आहेत असे टीकेचे काहूर

www.mpscmantra.com

काही सुधारणावादी मंडळींनी उठविले. यामुळे तोवर द्विधा मन:स्थितीत असलेले टिळक सामाजिक परिषद काँग्रेस अधिवेशनाच्या मंडपात घेतली जाऊ नये असे मत उघडपणे मांडू लागले.

या मुद्यावरील वाद वाढू लागलेला पाहून रानडे गटाने या विषयाबाबत सर्व प्रांतिक समित्यांची आणि महाराष्ट्रातील विभिन्न संस्थांची मते मागविली. दोन तृतियांश काँग्रेस समित्यांनी सामाजिक परिषदेबाबत अनुकूल कौल दिला, पण त्याबरोबरच या विषयावरून काँग्रेसमध्ये फूट न पडू देण्याचीही गळ रानडे यांना घातली. रानडे गटालाही हे प्रकरण तुटेपर्यंत ताणायचे नव्हते. अखेरीस रानड्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून माघार घेतली. सामाजिक परिषदेचे अधिवेशन काँग्रेस मंडपात घेतले जाणार नाही असे त्यांनी घोषित केले. यामुळे पुण्यातील वादंग शमले. परंतु रानड्यांच्या या निर्णयामुळे मुंबईचा मेहता-वाछांचा नेमस्त गट अस्वस्थ झाला. पुण्याच्या अधिवेशनात यामुळे टिळक गटाचा वरचष्मा राहील अशी त्यांना धास्ती वाटली. असे घडू नये म्हणून मेहतांनी पुण्याच्या दोन्ही गटांच्या अध्वर्यूंना वाटाघाटीसाठी मुंबईला आमंत्रित केले आणि पुण्याच्या स्वागत समितीच्या कामकाजात सुसूत्रता असावी या सबबीवर वाछा, चिमणलाल सेटलवाड आणि दाजी खरे यांची नियुक्ती टिळक व गोखले यांच्याबरोबरीने स्वागत समितीचे सचिव म्हणून केली. टिळकांना हा अपमान झोंबला. त्यांनी लागलीच आपल्या सचिवपदाचा राजीनामा दिला. मात्र सामान्य सदस्य म्हणून अधिवेशनाला सहकार्य देण्याचा आपला निर्णय त्यांनी घोषित केला.

अशा प्रकारे पुण्यात सनातनी विरुद्ध सुधारक यांच्यात १८७० पासून चाललेल्या वैचारिक संघर्षाची परिसीमा होऊन टिळकांनी स्वागत समितीच्या सचिवपदावर पाणी सोडले खरे. परंतु अधिवेशनाच्या काळात ते निष्क्रिय राहिले नाहीत. अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी येत असलेल्या सुरेंद्रनाथ बॅनर्जींचे त्यांनी दौंडपर्यंत जाऊन स्वागत केले. तसेच काँग्रेस अधिवेशनाच्या समाप्तीनंतर पुण्याला आलेल्या अग्रगण्य काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत मंडईच्या जागी जंगी सार्वजनिक सभा त्यांनी आयोजित केली आणि ही सभा यशस्वी करून पुण्यातील जहाल गटाचा प्रभाव राष्ट्रीय नेत्यांच्या दृष्टोत्पतीस आणून दिला.

## पुणे अधिवेशनाची यशस्विता

पुण्याला उठलेल्या वादळाचा परिणाम काँग्रेसच्या अधिवेशनावर मात्र विपरीत असा झाला. १५८४ प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित राहिले. तसेच प्रेक्षकांसाठी प्रवेश फी वाढवून दहा रूपये केली, तरीही प्रचंड संख्येने लोक प्रेक्षक म्हणून अधिवेशनाला हजर राहिले. मंडपात सुमारे पाच हजारांची बसण्याची व्यवस्था होती. मंडपाभोवतीच्या मोठ्या मोकळ्या आवाराला कुंपण घातले गेले होते आणि आवारात काँग्रेस प्रतिनिधींना लागेल ती सर्व मदत करण्यासाठी स्वंसेवकांची कार्यालये उघडली गेली होती. टपालाची आणि वैद्यकीय मदतीची व्यवस्थाही आवारातच केली गेली होती. सुमारे तीनशे विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने अहोरात्र खपत होते.

२७ डिसेंबरला अधिवेशनाचे उद्‌घाटन झाले. स्वागताध्यक्ष रा. ब. भिडे हे वयोवृद्ध असल्याने त्यांचे भाषण गोखल्यांनी वाचून दाखविले. त्यात पुण्यात उपस्थित झालेल्या वादाचा ओझरता उल्लेख केला गेला. पण हा वाद कोणत्याही व्यक्तीच्या स्वार्थातून नव्हे तर काँग्रेस हिताच्या तळमळीतून उद्‌भवला होता हे आवर्जून स्पष्ट करण्यात आले. त्याचबरोबरच या अधिवेशनापूर्वी पुण्यातील काही मुसलमानांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांना संयुक्तिकरीत्या बिनतोड उत्तरे दिली गेली आणि सर्व भारतीयांच्या दृष्टीने, मग ते कोणत्याही धर्माचे, जातीचे वा वंशाचे असोत, काँग्रेसची उपयुक्तता ठामपणे प्रतिपादित करण्यात आली.

www.mpscmantra.com

सुरेंद्रनाथांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुण्यातील वादाच्या संदर्भात रानड्यांनी दर्शविलेल्या संयमाची व समन्वय वृत्तीची प्रशंसा केली. टिळकांनी केलेल्या त्यागाचाही त्यांनी निर्देश केला आणि यापुढे हे दोन्ही गट काँग्रेस कार्याचा गाडा समर्थपणे एकजुटीने चालवतील असा विश्वास व्यक्त केला. १८९२ च्या कौन्सिल कायद्यातील तरतुदीचे मूल्यमापन करताना त्यातील दोषांवर त्यांनी प्रकाश टाकला. ब्रिटिश शासनाच्या आक्रमक सीमानीतीवर टीका करून त्यावर होणाऱ्या अवास्तव खर्चात कपात आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले. तसेच शिक्षणप्रसाराला व औद्योगिक विकासाला सरकारने हातभार लावावा अशी आग्रहाची मागणी केली. त्यांच्या भाषणाचा सूर मेहता-रानडे यांच्या नेमस्त गटाला रूचेल असाच होता.

चर्चासत्रात गोखले, वाछा, नातू, समर्थ, टिळक, मुधोळकर, नायडू, भगीरथप्रसाद इत्यादी महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांनी उत्साहाने भाग घेतला. अधिवेशनाने सव्वीस ठराव पारित केले. त्यात नेहमीच्या विषयांबरोबर, दक्षिण आफ्रिकेत भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाकडे इंग्लंडच्या सरकारला लक्ष वेधण्याचा प्रयत्न प्रथमच करण्यात आला, आणि त्याचे निराकरण करण्यास इंग्लंडच्या सरकारने दक्षिण आफ्रिकेच्या सरकारवर दडपण आणावे अशी मागणी केली गेली. काँग्रेस ही देशातीलच नव्हे, तर देशाबाहेरील भारतीयांच्या हितरक्षणाकडेही लक्ष पुरवीत होती हे यावरून सिद्ध झाले. काँग्रेसच्या व्यापक भूमिकेचे हे निदर्शक होते.

पुण्याचे अधिवेशन यशस्वीरीत्या पार पडले आणि परंपरावादी गटाच्या आग्रहानुसार सुधारणावादी गटाने सामाजिक परिषदा काँग्रेसच्या मंडपात न घेता त्याच शहरात पण वेगळ्या जागी भरविण्यास प्रारंभ केला. मात्र यावेळी माजलेल्या वादंगापासून पुण्यातील परस्परविरोधी विचारसरणीचे दोन गट परस्परांपासून दूर झाले ते कायमचेच. सार्वजनिक सभा टिळक गटाच्या हाती राहिली, तर रानडे गटाने डेक्कन सभा स्थापन केली. त्याबरोबर सार्वजनिक सभेचे सचिव पद सोडून गोखले डेक्कन सभेत दाखल झाले. यापुढे महाराष्ट्रातील काँग्रेसच्या राजकारणातही हे गट परस्परविरोधक म्हणून उभे ठाकले. त्यांच्या वैचारिक भिन्नतेचा परिणाम महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नाही. राष्ट्रीय स्तरावरील काँग्रेस वर्तुळातही याचे प्रतिध्वनी लवकरच उमटू लागले. मेहता-वाछा यांच्याबरोबर मवाळ राजकारणाचा पुरस्कार करण्यास रानड्यांचे पट्टशिष्य गोखले हे पुढे सरसावले. यानंतर एकीकडे निःस्वार्थ सेवावृत्तीतून उत्स्फूर्त झालेल्या गोखल्यांच्या नेतृत्वाचे तेज काँग्रेसजनांच्या डोळ्यात भरू लागले आणि अल्पावधीतच ते नेमस्ताग्रणी मानले जाऊ लागले; तर दुसरीकडे सनदशीर परंतु जहाल राजकारणाचा पुरस्कार टिळक अधिक हिरीरीने करू लागले. महाराष्ट्रातच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर आपल्या समविचारी मंडळींचा गट ते संघटित करू लागले आणि म्हणून ते जहाल गटाचे अध्वर्यू बनले. अशा प्रकारे महाराष्ट्रातील वैचारिक मतभिन्नतेने काँग्रेसमध्ये ध्रुवीकरणाच्या प्रक्रियेला गती दिली.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

**प्रकरण ३**

# मवाळ-जहाल संघर्ष

१८९५ सालचे पुणे येथे झालेले काँग्रेस अधिवेशन हा महाराष्ट्राच्या काँग्रेस चळवळीतील कलाटणीचा बिंदू होय. या अधिवेशनाच्या प्रसंगी उठलेल्या वैचारिक वावटळीमुळे पुण्यातील सार्वजनिक कार्यकर्त्यांमधील उरला सुरला सुसंवाद नाहीसा झाला. त्यांच्यात फारकत होऊन रानडे-गोखले यांचा नेमस्त गट मेहता-वाछा गटाबरोबर मवाळ राजकारणाचा पुरस्कार करू लागला, तर टिळक नव्या जोमाने जहाल राष्ट्रवादाच्या प्रचाराला लागले. दोन्ही गट काँग्रेसमध्ये आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करू लागले. त्यामुळे १८९६ पासून काँग्रेस वर्तुळात मवाळ-जहाल रस्सीखेच सुरू झाली व त्याचे पर्यावसन अखेर १९०७ साली काँग्रेसच्या विभाजनात झाले.

महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर आपल्या जहाल राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करण्याच्या हेतूने टिळकांनी अंगिकृत केलेल्या कार्यपद्धतीची तीन प्रमुख सूत्रे होती. पहिले सूत्र म्हणजे महाराष्ट्रात जहाल राष्ट्रवादाला भक्कम अधिष्ठान मिळवून देण्यासाठी प्रांतिक परिषदांतून समविचारी मंडळीचा गट संघटित करावयाचा; दुसरे म्हणजे काँग्रेसच्या कक्षेबाहेर स्वतंत्रपणे स्थानिक संघटनामार्फत राजकीय लोकजागृतीचे व लोकसंघटनेचे कार्य करावयाचे आणि लोकांना त्यांच्या न्याय्य अधिकारांच्या प्राप्तीसाठी चळवळ करण्यास प्रवृत्त करावयाचे; आणि तिसरे म्हणजे काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाचे वेळी भिन्न प्रांतांतून येणाऱ्या सदस्यांशी चर्चा करून कृतिशील राजकारणाची निकड त्यांच्या मनावर बिंबवायची, अधिकाधिक सदस्यांना जहाल राष्ट्रवादी राजकारणाला अनुकूल करून घ्यावयाचे आणि या गटाचे दडपण काँग्रेसमधील ज्येष्ठ मवाळ नेत्यांवर आणून त्यांना काँग्रेसची प्रचलित कार्यपद्धती बदलण्यास, काँग्रेसला सक्रिय बनविण्यास भाग पाडावयाचे. अशा रीतीने बहुमताच्या जोरावर काँग्रेसमध्ये आपल्या गटाचा प्रभाव प्रस्थापित करण्याचा व सनदशीर व लोकशाही मार्गानेच काँग्रेसच्या कार्याची दिशा बदलण्याचा त्यांचा मानस होता.

योगायोगाने टिळकांच्या संकल्पित कार्याला अनुकूल अशी परिस्थिती महाराष्ट्रात १८९६ साली निर्माण झाली. भीषण दुष्काळ व त्या पाठोपाठ आलेल्या प्लेगच्या दुर्धर साथीने पश्चिम महाराष्ट्र हादरून गेला. दुष्काळामुळे होणाऱ्या लोकांच्या हालअपेष्टांची व दुष्काळाच्या भीषण स्वरूपाची माहिती सरकारला करून देण्याची आणि त्याचबरोबरच फॅमिन रिलीफ कोडप्रमाणे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मिळावयाच्या सवलतींची जाणीव शेतकऱ्यांना करून देण्याची जबाबदारी टिळकांनी उचलली. शासनाच्या दुष्काळ मदतकार्यात तर त्यांनी भाग घेतलाच पण त्याचबरोबरच सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांना फॅमिन रिलीफ कोडच्या प्रती देऊन त्यांनी दुष्काळी भागात पाठविले आणि त्यात अनुस्यूत असलेल्या सवलती देण्यास अधिकारी का कू करू लागले, तर त्यांना सनदशीर मार्गाने प्रतिकार करण्याचे धडे शेतकऱ्यांना देण्याचे कार्यही या कार्यकर्त्यांकडे सोपविले. या प्रचाराला अनुकूल प्रतिसाद मिळाला. दुष्काळाने त्रस्त झालेले शेतकरी शेतसारा गोळा करण्यास आलेल्या अधिकाऱ्यांना संघटितरीत्या विरोध करू लागले. अधिकाऱ्यांच्या दंडुकेशाहीलाही ते भीक घालीनासे झाले. शेतकऱ्यांचा हा संघटित विरोध पाहून अधिकारी वर्ग अस्वस्थ झाला. सार्वजनिक सभेमार्फत सुरू झालेली ही चळवळ दडपून टाकण्यासाठी अच्युतराव साठे, दत्तोपंत आपटे यासारख्या काही कार्यकर्त्यांवर खटले भरण्यात आले. अशा प्रकारे अशिक्षित समाजात सरकारविरुद्ध कायद्याच्या आधारे संघटितपणे लढण्यासाठी आवश्यक असलेले नैतिक सामर्थ्य निर्माण करण्याचा टिळकांचा हा प्रयोग सफल ठरला.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

याच सुमारास टिळकांनी शहरातील व्यापारी वर्गात सरकारविरोधी चळवळ प्रसृत करण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडहून येणाऱ्या जाड सुती कापडाशी देशी मालाला स्पर्धा करता येऊ नये म्हणून सरकारने यावेळी तलम कापडाबरोबरच जाड सुती कापडावर साडे तीन टक्के जकात बसविली. यामुळे देशातील गिरणीमालक रूष्ट झाले. शिवाय या निर्णयामुळे गरीब लोक वापरीत असलेले जाडेभरडे कापड महागणार होते. या अन्यायाच्या प्रतिकारार्थ टिळकांनी स्वदेशीची घोषणा दिली. मुंबई, ठाणे, सातारा, नगर, अमरावती इत्यादी शहरी सभा घेऊन लोकांना स्वदेशीच्या शपथा घेण्यास त्यांनी प्रवृत्त केले. जुलुमी परकीय, सत्तेविरुद्ध सनदशीर मार्गाने झगडण्यासाठी लोकशक्ती जागृत करून तिच्या द्वारा शासनाला शह देण्याचा पहिला यशस्वी प्रयोग करण्याचे श्रेय टिळकांना आहे. त्याचा हा उपक्रम महाराष्ट्रातील मवाळांच्या मात्र पचनी पडला नाही.

याच सुमारास देशातील ब्रिटिश शासनाला हादरा देणारी खळबळजनक घटना पुण्याला घडली. प्लेग निवारण कार्यासाठी पुण्यात ठेवण्यात आलेल्या गोऱ्या सोजिरांनी जनतेवर केलेल्या अनन्वित अत्याचारामुळे व त्याबाबत शासनाकडे पाठविण्यात आलेल्या अनेक निवेदनांकडे सरकारने केलेल्या दुर्लक्षामुळे पुण्यात निर्माण झालेल्या विलक्षण असंतोषाचे पर्यवसान प्लेग कमिशनर रँड व आयर्स्ट यांच्या हत्येत झाले. विशेष म्हणजे पुण्यात कडेकोट लष्करी बंदोबस्त असता व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हीरक महोत्सवाच्या समारंभाच्या दिवशीच नेमकी ही घटना घडली. यामुळे मुंबई सरकारच नव्हे तर केंद्रीय सरकारही हादरले. शासकीय दमननीतीचे चक्र तात्काळ घरघरू लागले. अनेक निरपराध व्यक्तींना अटक झाली. कित्येकांना खटला न भरता पोलीस कोठडीत ठेवण्यात आले. निर्भीडपणे शासकीय अन्यायाला वाचा फोडणाऱ्या केसरी, काळ, प्रतोद यासारख्या वृत्तपत्रांवरही धाड पडली. पुण्याच्या आसपास दहशतीचे साम्राज्य पसरले. सरकारी दडपशाहीला अनुलक्षून टिळकांनी केसरीतून "सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?" असा खडा सवाल केला आणि "राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे" असे सरकारला ठणकावून सांगण्यास कमी केले नाही. या लेखांचे निमित्त सरकारला पुरले. राजद्रोहाच्या आरोपाखाली त्यांना अटक झाली आणि सबळ पुरावा नसताही जुलै १८९७ मध्ये त्यांना अठरा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली गेली. राष्ट्रहितासाठी निःशस्त्र चळवळीचा मार्ग पत्करल्यामुळे कारगृहात डांबले जाणारे पहिले काँग्रेस पुढारी टिळक होते. निर्भीड, निःस्वार्थ व त्यागमय राष्ट्रसेवेचा नवा आदर्श देशापुढे ठेवण्याचा मान त्यांनी महाराष्ट्राला मिळवून दिला.

*

महाराष्ट्रात दुष्काळ व प्लेगचे थैमान सुरू असता मुंबईच्या बॅ. रहिमतुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली १८९६ सालचे काँग्रेस अधिवेशन कलकत्त्याला भरले. महाराष्ट्रातील अस्मानी व सुलतानी आपत्तीमुळे या अधिवेशनात महाराष्ट्रीय प्रतिनिधींची संख्या रोडावली. वाछा, गोखले, टिळक, काळकर्ते परांजपे, करंदीकर इत्यादी मंडळी मात्र अधिवेशनासाठी गेली. वेल्बी, कमिशनरसमोर साक्ष देण्यासाठी काँग्रेसच्या वतीने वाछा यांची निवड झाली. याच कामासाठी पुण्याच्या डेक्कन सभेतर्फे रानड्यांनी गोखल्यांना इंग्लंडला धाडले. हे दोघेही पुढील वर्षीच्या अमरावती अधिवेशनापूर्वी इंग्लंडहून परत आले.

**अमरावती अधिवेशन**

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

१८९७ साली अमरावतीला झालेले काँग्रेस अधिवेशन हे वऱ्हाडातील पहिलेच अधिवेशन होते. या अधिवेशनाच्या सिद्धतेसाठी अमरावतीच्या स्वागत समितीला अनेक अडचणींना सामना करावा लागला. यापूर्वीच्या तीन वर्षांत नागपूर लगतच्या भागात लोगोपाठ पिके बुडाल्यामुळे तेथून आर्थिक सहभागाची आशा फारशी नव्हती. पश्चिम महाराष्ट्रामधील स्फोटक परिस्थितीमुळे विशेषतः टिळकांच्या कारावासाच्या वृत्ताने व शासकीय दडपशाहीच्या बातम्यांमुळे अमरावतीचे पुढारीही अस्वस्थ झाले होते. याचवेळी देशाच्या इतर काही भागातून भूकंप, अतिवर्षण व दुष्काळाचे तांडव चालू असल्याच्या वार्ता येत होत्या. अशा परिस्थितीत अधिवेशनाला कितपत प्रतिसाद मिळेल याविषयी स्थानिक नेते साशंक होते. तशातच अमरावतीच्या काँग्रेस अधिवेशनावर बंदी घालण्यात यावी अशी हाकाटी काही ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सुरू केली. वऱ्हाडच्या प्रशासनाचा प्रमुख असलेल्या हैद्राबादच्या रेसिडेंटला तसा सल्लाही काही विघ्नसंतोषी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दिला. हे अधिवेशन घेऊन निष्कारण सरकारचा रोष ओढावून घेऊ नये असे खाजगीरीत्या स्थानिक नेत्यांना काही हितचिंतकांनी सुचविले. परंतु अमरावतीच्या नेत्यांनी माघार घेतली नाही. खापर्डे, मुधोळकर, मोरोपंत जोशी यांनी अधिवेशनाची तयारी सुरू ठेवली. पश्चिम महाराष्ट्रातील प्लेगची लागण वऱ्हाडकडे होऊ न देण्याची पूर्ण खबरदारी घेण्याचे आश्वासन देऊन त्यांनी शेवटी अधिवेशनासाठी परवानगी मिळविली. पश्चिम महाराष्ट्राकडून येणाऱ्या प्रतिनिधींच्या वैद्यकीय तपासणीची मलकापूर येथे व्यवस्था करण्यात आली. त्याबरोबरच वैद्यकीय तपासणीत दिरंगाई होऊ नये आणि तेथे येणाऱ्या प्रतिनिधींची गैरसोय होऊ नये याची खबरदारी अमरावतीच्या स्वागत समितीने घेतली. मात्र या सर्व अडचणींचा परिणाम प्रतिनिधींच्या संख्येवर निश्चितपणे झाला. केवळ ६९२ प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित राहिले.

स्थानिक लोकांचा अधिवेशनाबाबतचा उत्साह मात्र अवर्णनीय होता. काँग्रेससाठी घातलेल्या खास मंडपात मुख्य सभागृहाबरोबरच वाचनालयाची व वैद्यकीय मदतीची सोय होती. मंडपाच्या एका भागात वऱ्हाड व नागपूरकडे तयार होणाऱ्या कलाकसुरींच्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते आयोजित करण्यात मोरोपंत जोशींच्या सुविद्य पत्नी यशोदाबाई व इतर स्थानिक महिलांचा पुढाकार होता. अधिवेशनाला उपस्थित असलेल्या महिलांची संख्या डोळ्यात भरण्याजोगी होती. वऱ्हाडवर केल्या जाणाऱ्या मागासलेपणाच्या आरोपाला हे चांगले उत्तर होते.

अधिवेशनाला प्रारंभ होण्यापूर्वी उपस्थित झालेल्या एका पेचप्रसंगाचा उल्लेख दादासाहेब खापर्डे यांच्या रोजनिशीत आढळतो. राष्ट्रकार्यासाठी सश्रम कारावास भोगत असलेल्या टिळकांविषयी निष्ठा व सहानुभूती व्यक्त करण्याच्या हेतूने त्यांचे छायाचित्र सभामंडपात लावण्याचा स्वागत समितीतील खापर्डे गटाचा मानस होता. असे केल्याने सरकारला डिवचल्यासारखे होईल आणि अधिवेशनाकडे सरकारची वक्रदृष्टी वळेल म्हणून असे करू नये असे दुसऱ्या गटाचे मत होते. शेवटी हा मुद्दा निर्णयासाठी काँग्रेस श्रेष्ठींच्या पुढे मांडण्यात आला. उमेशचंद्र बॅनर्जी, वाछा, सेटलवाड, आनंद चार्लू, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, मुधोळकर इत्यादींशी खापर्ड्यांनी बोलणी केली आणि सभामंडपात टिळकांचे छायाचित्र लावू न दिल्यास या मुद्यावरून झालेल्या वादाचा उल्लेख आपण आपल्या स्वागतपर भाषणात करू असे त्यांनी काँग्रेस श्रेष्ठींना बजावले. यावर बराच ऊहापोह झाल्यानंतर शेवटी सुरेंद्रनाथ आणि अधिवेशनाचे अध्यक्ष सी. शंकरन नायर यांनी आपल्या भाषणात आपण टिळकांचा गौरवपर उल्लेख करू असे अभिवचन दिल्यानंतर खापर्ड्यांनी आपला आग्रह सोडला आणि अधिवेशन सुरळीतपणे पार पडले. या अधिवेशनाचा मनोरंजक तपशील खापर्डे यांच्या रोजनिशीत आणि सर मोरोपंत जोशींच्या पत्नी यशोदाबाई यांच्या “आमचा जीवनप्रवास” या आत्मवृत्तात सापडतो.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

सी. शंकरन नायर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या प्रारंभी इंग्लंडचे राजकीय ऋण मान्य केले आणि इंग्लंडमध्ये प्रचलित असलेली शासनव्यवस्था हाच आपला आदर्श असून, ब्रिटिश कृपाछत्राखाली राहूनच ते उद्दिष्ट साध्य करण्याचा काँग्रेसचा निर्धार असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. त्याबरोबरच ब्रिटिश शासनकाळात देशाचे दारिद्र्य बेसुमार वाढत असल्याची भावना सुशिक्षितात बळावत असल्याचेही त्यांनी सांगितले. पुण्यातील शासकीय दडपशाहीचा उल्लेख त्यांनी केला व त्या संदर्भात मुद्रणनिर्बंध घालून आणि नातू बंधूंना अटक करून सरकार नागरिकांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करीत आहे असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. तसेच टिळकांवरील खटल्याच्या वेळी ज्यूरीपैकी निम्मे सदस्य भारतीय असते तर टिळक निर्दोषी म्हणून सुटले असते असेही विधान करण्यास ते कचरले नाहीत. अमरावती अधिवेशनाने एकवीस ठराव पास केले. टिळकांच्या शिक्षेचा निषेध करणारा ठराव करण्याचे धाडस मात्र काँग्रेसने दाखविले नाही. सुरेंद्रनाथांनी आपल्या भाषणात टिळकांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना, “कारावासाच्या भिंती ओलांडून माझे मन टिळकांकडे धाव घेत आहे-सर्व देशाचे डोळे दुःखाश्रुंनी डबडबले आहेत” असे भावपूर्ण उद्‌गार काढताच मंडपातील श्रोत्यांनी जो उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, तो टिळकांच्या वाढत्या लोकप्रियतेचा पुरावा होता. पारित झालेल्या ठरावात नेहमीच्या मागण्यांबरोबर वऱ्हाडसंबंधी कायदे करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या हाती न ठेवता तो केंद्रीय विधिमंडळाकडे सोपविला जावा असा प्रल्हाद नारायण जोग यांनी मांडलेला प्रस्तावही होता. नामदार गोखले वेल्बी कमिशनरपुढे साक्ष देऊन नुकतेच परतले होते. या अधिवेशनाला आले असले तरी चर्चेत ते सहभागी झाले नाहीत. पुण्यातील प्लेग निवारण कार्याच्या कालावधीत गोऱ्या सोजिरांनी काही स्त्रियांवर बलात्कार केल्याची बातमी त्यांच्या एका मित्राने त्यांना लंडनला कळविली होती, व त्या आधारावर पुण्यात गोरे सोजीर करीत असलेल्या अत्याचाराचा दाखला म्हणून याचा उल्लेख त्यांनी लंडनच्या वास्तव्यात केला होता. हा आरोप पुराव्यानिशी सिद्ध करा असे आव्हान त्यांना लंडन येथे देण्यात आले होते. पुण्याला परत आल्यानंतर त्या विधानाच्या पुष्ट्यर्थ ठोस पुरावा देता येत नाही असे आढळून आल्यावर गोखल्यांनी जाहीर माफी मागितली. पुण्याला यावेळी हे माफी प्रकरण फार गाजले. त्यामुळे अनेकांचा त्यांच्यावर रोष झाला. त्यांनी केलेल्या विधानाची पुष्टी करणारा निश्चित पुरावा हाती आला नसला तरी पुण्यात स्त्रियांवर अत्याचार झाले याबद्दल यत्किंचित शंका नसताना गोखल्यांनी उन्मत्त ब्रिटिश नोकरशाहीची माफी मागावी हे अनेकांना रुचले नव्हते. त्यामुळे महाराष्ट्रातील वातावरण त्यांच्याविरुद्ध बरेच तापले होते. अधिवेशनात ते बोलायला उठल्यास त्यांचा उपमर्द केला जाईल अशीच भीती स्थानिक संयोजकांना होती. म्हणून त्यांचा असा अवमान होऊ न देण्याची पूर्ण खबरदारी मोरोपंत जोशी, मुधोळकर व खापर्डे इत्यादींनी घेतली.

## नागपूरकडे टिळकवादाचे लोण

१८९७ च्या अमरावतीच्या अधिवेशनाच्या वेळी वऱ्हाडातील काही काँग्रेस पुढाऱ्यांवरील टिळकवादाचा प्रभाव जसा स्पष्टपणे निदर्शनास आला, तसाच तो नागपूरच्या काँग्रेस वर्तुळातही दृग्गोचर होऊ लागला. १८९५ साली पुण्यात सामाजिक परिषदेवरून उठलेल्या वावटळीचे पडसाद नागपूरला उठल्याचा उल्लेख सापडतो. त्यावेळेच्या मॅकडोनाल्ड म्हणजे आजच्या टाऊन हॉलमध्ये या विषयावर जाहीर चर्चा करण्यासाठी सभा घेण्यात आल्या. नीळकंठराव उधोजी, कृष्णराव देशपांडे, सदाशिवराव देहाडराय हे टिळकांच्या विचारप्रणालीचे समर्थन करू लागले, तर नायडू, भगीरथप्रसाद, बोस, चिटणवीस, किनखेडे, देशसेवक पत्राचे त्यावेळचे संपादक माधवराव पाध्ये हे रानडे गटाचे समर्थक होते. १८९७ सालच्या टिळकांच्या कारावासाच्या वेळी या दोन गटातील मतभेद अधिक वाढले. याच सुमारास बरीच वर्षे नागपूर काँग्रेसच्या अध्यक्षपदी असलेले सी. व्ही. नायडू दिवंगत झाले. त्यांच्या जागी गंगाधरराव चिटणवीसांची निवड झाली, तर भगीरथप्रसादांनी कार्यवाहपद सोडल्यामुळे ते पद केशवराव ताम्हन यांच्याकडे आले.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

## १८९८ ते १९०३ च्या दरम्यान महाराष्ट्रातील काँग्रेसचे कार्य

१८९८ ते १९०३ पर्यंतच्या सहा वर्षांच्या कालावधीत काँग्रेसची अधिवेशने महाराष्ट्राबाहेर, मद्रास (१८९८), लखनौ (१८९९), लाहोर (१९००), कलकत्ता (१९०१), अहमदाबाद (१९०२, आज महाराष्ट्र राज्यात नसलेले अहमदाबाद त्यावेळी मुंबई इलाख्यात मोडत होते.) व मद्रास (१९०३) या शहरी भरली. यापैकी लाहोर व कलकत्ता अधिवेशनांचे अध्यक्षपद अनुक्रमे न्या. चंदावरकर आणि दिनशा वाछा यांच्याकडे आले. अध्यक्षाच्या नावाबद्दल तोवर कधीही न उमटलेले आक्षेपाचे सूर न्या. चंदावरकर यांच्या निवडीवरून ऐकू आले. याची दोन कारणे होते. एक तर काँग्रेसची आरंभीची काही वर्षे वगळता सुमारे दहा वर्षे चंदावरकरांनी काँग्रेसशी फारसा संबंध ठेवला नव्हता.बरीच वर्षे ते वार्षिक अधिवेशनांनाही उपस्थित राहिले नव्हते. दुसरे म्हणजे लाहोर अधिवेशनापूर्वी काही महिने त्यांची मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली होती; आणि शासकिय सेवेतील व्यक्तीला काँग्रेसचे अध्यक्षपद देऊ नये असा पायंडा पडला होता. शिवाय काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्यास त्यांनी सरकारची परवानगी मागितली असून आपले अध्यक्षीय भाषणही परवानगीसाठी त्यांनी सरकारकडे पाठविल्याची वदंता होती. यामुळे 'मराठा'मधून त्यांच्या निवडीबद्दल प्रथम आक्षेप घेतला गेला. १८९१ च्या नागपूर अधिवेशनाचे वेळी सुब्रह्मण्यम अय्यर यांना अध्यक्षपद द्यावयाचे ठरवलेले असताना तत्पूर्वी त्यांची नियुक्ती मद्रास हायकोर्टावर न्यायाधीश म्हणून झाल्याने त्यांच्या जागी अध्यक्षपद चार्लू यांना देण्यात आले होते. या पायंड्याप्रमाणे लाहोर काँग्रेसचे अध्यक्षपद चंदावरकरांना दिले जाऊ नये अशी काही काँग्रेस सदस्यांची इच्छा होती. परंतु स्वागत समितीने आपला निर्णय बदलला नाही आणि चंदावरकरांनीही अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार दिला नाही.

*

लाहोर अधिवेशनाचे वेळी अध्यक्षपदासाठी न्या. चंदावरकरांच्या नावाला दुजोरा देताना लाहोरच्या मौलवी मोहरम अली चिस्ती यांनी मुंबई इलाख्याने पर्यायाने महाराष्ट्राने, राष्ट्रीय चळवळीला केलेल्या योगदानाची तोंड भरून केलेली प्रशंसा महाराष्ट्रीय सदस्यांच्या अंगावर मूठभर मास चढविणारी होती. "या भूमीने काँग्रेसला जन्म दिला, तेथेच तिची पहिली सभा झाली, काँग्रेसचे आघाडीचे नेतेही याच भूमीतून पुढे आले, काँग्रेसचे दोन मुस्लीम अध्यक्षही महाराष्ट्रातूनच आले. काँग्रेसचे सचिव वाछा हेही तिथलेच," असा मौलवी चिस्तींनी केलेला गौरवपूर्ण उल्लेख म्हणजे काँग्रेसच्या कामकाजात महाराष्ट्र पार पाडीत असलेल्या महत्त्वाच्या भूमिकेवर काँग्रेसने केलेले जणु शिक्कामोर्तबच होते.

१९०१ साली न्या. रानडे दिवंगत झाल्यानंतर काँग्रेस अधिवेशनाच्या राष्ट्रीय मंचावरून त्यांना श्रद्धांजली वाहिली गेली. कलकत्ता येथील काँग्रेस अधिवेशनाचे वेळी अध्यक्ष वाछांनी न्या. रानडे यांच्या कार्याची महती विशद करताना त्यांच्या भव्योदात्त व्यक्तिमत्वाची सॉक्रेटिसशी तुलना केली, तर अहमदाबादच्या १९०२ च्या अधिवेशनाचे वेळी सुरेंद्रनाथांनी "मुंबई इलाख्याचे बौद्धिक केंद्र असलेल्या पुणे शहराचा महान पुत्र" म्हणून रानडेंचा निर्देश केला आणि त्यांचे "जीवनकार्य, विशुद्ध चारित्र्य आणि प्रगाढ विचारसंपदा हा मौलिक राष्ट्रीय वारसा आहे." असा अभिप्राय व्यक्त करून रानड्यांना श्रद्धांजली अर्पण केली. काँग्रेसचे अधिकृत सदस्य कधीही नसलेल्या आणि काँग्रेस कार्यात प्रत्यक्षपणे सहभागी होऊ न शकलेल्या महाराष्ट्राच्या या महान विचारवंताला काँग्रेस श्रेष्ठींनी वाहिलेली ही श्रद्धासुमने त्यांचे आगळे मोठेपण दर्शवितात.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

*

या अधिवेशनांच्या काळात काँग्रेससाठी घटना तयार करण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. घटनेचा मसुदा तयार करण्यास स्थापन झालेल्या समितीचे कार्यवाहपद वऱ्हाडच्या मुधोळकरांना देण्यात आले होते. या समितीत पश्चिम महाराष्ट्रांच्या वाछा, करंदीकर व नागपूरच्या किनखेड्यांचा समावेश होता. काँग्रेसच्या वाढत्या व्यापावर लक्ष ठेवण्यासाठी इंडियन काँग्रेस कमिटीची स्थापना १८९९ साली करण्यात आली. या समितीत कोणत्या प्रांताच्या किती प्रतिनिधींचा अंतर्भाव करावयाचा हेही ठरविण्यात आले. १९०० साली याबाबत करण्यात आलेल्या नियमांचे ह्या केंद्रीय समितीतीला एकूण ४० निर्वाचित सदस्यांपैकी मुंबई इलाख्याचे सात आणि वऱ्हाड व मध्यप्रांताचे प्रत्येकी तीन प्रतिनिधी असावेत असे निर्धारित केले गेले. या समितीवर पश्चिम महाराष्ट्राचे गोखले, वाछा, मेहता, टिळक, सेटलवाड, खरे, करंदीकर, अमरावतीचे दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, मुधोळकर, देवराय विनायक तर नागपूरचे चिटणवीस, किनखेडे, भगीरथप्रसाद इत्यादी मंडळी बहुधा आलटून पालटून निवडली जात.

*

कारागृहातून बाहेर पडल्यानंतर १९०० सालापासून टिळक पुन्हा काँग्रेस कार्यात उत्साहाने भाग घेऊ लागले. कारावासाच्या हालअपेष्टांनी त्यांचा उत्साह मंदावला नव्हता. १९०० सालच्या लाहोर अधिवेशनात ते बोलायला उभे राहताच टाळ्यांचा कडकडाट करून उपस्थितांनी त्यांचे स्वागत केले. राष्ट्रीय स्तरावर त्यांना मान्यता मिळू लागल्याचे ते द्योतक होते. याच सुमारास झालेल्या न्या. रानड्यांच्या देहावसानानंतर ना. गोखल्यांच्या कार्याचे क्षेत्रही विस्तारू लागले. १९०१ साली ते केंद्रीय विधिमंडळावर निवडले गेले. १९०३ साली वाछांबरोबर त्यांचीही काँग्रेसचे सचिव म्हणून नियुक्ती झाली. काँग्रेसचे कार्यालयीन कामकाज वाछांनी सांभाळावे आणि काँग्रेससाठी निधी गोळा करण्याचे व प्रांतिक समित्यांच्या कामाला चालना देण्याचे कार्य गोखल्यांनी करावे असे खातेवाटप या दोघांत केले गेले. रानड्यांचा मृत्यू ही महाराष्ट्राच्या काँग्रेस वर्तुळामधील ज्येष्ठ पिढीचे युग संपून तेथे नव्या तरुण नेतृत्वाच्या उदयाची पदचिन्हे दर्शविणारी जणू सीमारेषा होती.

## मुंबई येथे तिसरे अधिवेशन

१९०४ सालच्या काँग्रेस अधिवेशनाचे आमंत्रण मुंबईच्या वतीने फिरोझशहा मेहतांनी दिले. मुंबईत त्यांचा असलेला दरारा, त्यांचे योजनाकौशल्य आणि धनिक व्यापारी वर्गाशी व सरकारी अधिकाऱ्यांशी असलेले त्यांचे निकटचे संबंध यामुळे अधिवेशनाच्या आयोजनात कोणतेही अडथळे आले नाहीत. मेहता स्वतःच स्वागताध्यक्ष असल्यामुळे अधिवेशनाची सिद्धता मोठ्या प्रमाणावर झाली. क्रेसंट साईट येथे घातलेला भव्य सुशोभित मंडपात २६ डिसेंबरला अधिवेशनाचा शुभारंभ झाला.

लॉर्ड कर्झनच्या आत्यंतिक प्रतिगामी व कट्टर साम्राज्यवादी शासकीय निर्णयाच्या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन भरत होते. कलकत्ता म्युनिसिपालटीतील भारतीय सदस्यांची त्याने घटविलेली संख्या व या स्थानिक संस्थेच्या अधिकारांचा केलेला संकोच, विद्यापीठ कायद्याद्वारा उच्च शिक्षणावर घातलेले निर्बंध, उच्चशिक्षित भारतीयांसंबधी वारंवार आविष्कृत केलेली तुच्छतेची भावना, काँग्रेसबाबतची त्याची उपहासाची वृत्ती आणि बंगालच्या फाळणीचे त्याने केलेले सूतोवाच यामुळे सुशिक्षित भारतीय अतिशय असंतुष्ट होते. या असंतोषाला काँग्रेस मंचावर वाचा फुटणार हे निश्चित होते.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे अधिवेशनापूर्वी टिळक व मेहता गट यांच्यात बराच बेबनाव निर्माण झाला होता. काँग्रेसच्या धोरणावर सतत टीकेचे प्रहार करून टिळक काँग्रेस फोडू इच्छितात अशी कागाळी मुंबईच्या मेहता गटाने दादाभाई नवरोजी यांच्याकडे केली असावी. या संदर्भात २ नोव्हेंबर १९०४ रोजी दादाभाईंनी टिळकांना पत्र लिहून काँग्रेससंबंधी विधायक भूमिका पत्करण्याचा त्यांना सल्ला दिला. वृत्तपत्रांतून काँग्रेसच्या धोरणावर सतत टीका करीत गेल्यास जनतेचा काँग्रेसवरील विश्वास उडून जाईल आणि राजकारणातील काँग्रेसचा प्रभाव कमी होऊन सरकारची बाजू बळकट होईल; म्हणून असे घडू देऊ नये; काँग्रेस निष्क्रिय बनली आहे असे वाटत असल्यास काँग्रेसला सक्रिय बनविण्यासाठी काँग्रेसपुढे विधायक कार्यक्रम मांडावा आणि काँग्रेसला सक्रिय आणि बळकट बनविण्याचा प्रयत्न करावा असा "स्नेहभावाचा सल्ला" दादाभाईंनी टिळकांना दिला. त्याबरोबरच टिळकांच्या त्यागी राष्ट्रनिष्ठेचा गौरवपर उल्लेख करून आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाने टिळक काँग्रेसला सक्रिय बनवू शकतील अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. दादाभाईंच्या या पत्रातील पुढील सल्ला टिळकांच्या मनावर विशेष ठसला. "पुढील राजकारणाच्या क्षेत्रात युद्ध करण्याचे काँग्रेस हे एक आपले शस्त्र झाले पाहिजे", म्हणून तिला अधिक गतिमान आणि शक्तीशाली बनविली पाहिजे आणि काँग्रेसमध्ये भिन्न मतांचे गट आहेत, त्यांनी आपापली मतप्रणाली अधिवेशनात सदस्यांपुढे मांडावी आणि बहुमताने होईल तो निर्णय सर्वांनी शिरोधार्य मानावा, या दादाभाईंनी मांडलेल्या विचारांनी टिळकांच्या काँग्रेसबाबतच्या भूमिकेला निश्चित दिशा दिली. अधिवेशनापूर्वी काही दिवस १७ नोव्हेंबरचे विलियम वेडरबर्नचेही पत्र टिळकांना मिळाले. त्यात "तुम्ही अधिवेशनाला या, तुम्ही आम्ही सर्वच मिळून विचार ठरवू" असे सुचविले होते. त्याप्रमाणे टिळकांनी अधिवेशनाच्या वेळी विलियम वेडरबर्न व अधिवेशनाचे अध्यक्ष हेन्री कॉटन यांच्याशी काँग्रेसला सक्रिय बनविण्याबाबत चर्चा केली.

मुंबई अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी हेन्री कॉटन यांच्या नावाची दादाभाईंनी केलेली शिफारस अर्थपूर्ण होती. ब्रिटिश सरकारच्या सनदी सेवेत असताना भारतात ब्रिटिश सत्तेने उदार धोरणाचा अंगिकार करण्याची गरज त्यांना प्रतीत झाली होती. भारतीयांबाबत त्यांच्या मनात दाट सहानुभूती होती. बंगालच्या फाळणीच्या शासकीय संकल्पाला त्यांनी विरोध दर्शविलेला होता, आणि 'न्यू इंडिया' या आपल्या ग्रंथात भारतात लोकसत्ताक शासन स्थापन केले जावे असे मत त्यांनी प्रतिपादन केले होते. ते आपल्या समन्वयात्मक वृत्तीने काँग्रेसमधील ज्येष्ठ व तरुण पिढीतील वैचारिक अंतर कमी करू शकतील अशी दादाभाईंना आशा होती. तसा प्रयत्न मुंबई अधिवेशनाचे वेळी अध्यक्षांनी केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात काँग्रेसचे महत्त्व प्रतिपादित करताना जनतेत राजकीय जागृती करणे, लोकमताला आकार देणे आणि जनतेच्या गाऱ्हाण्यांची आणि मागण्यांची राज्यकर्त्यांना माहिती करून देणे ही राष्ट्रहिताची कामे करण्यास काँग्रेस इतकी दुसरी कोणती संस्था लायक नाही असे त्यांनी ठासून सांगितले व हे कार्य काँग्रेस प्रारंभापासून प्रामाणिकपणे, संयमाने व समतोलपणे करीत आली आहे असे प्रशस्तीपत्रही त्यांनी दिले. आपसातील मतभेद व दुही यामुळे काँग्रेस कमकुवत बनेल, म्हणून सर्व मतभेद विसरून एकजुटीने कार्य करीत राहण्याचा सल्ला त्यांनी काँग्रेसजनांना दिला. भारताचे भवितव्य इंग्लंडशी निगडीत झालेले आहे, त्यामुळे इंग्लंडच्या मदतीनेच भारताला प्रगतीचा पल्ला गाठता येईल असे त्यांनी बजावून सांगितले. तसेच पुढील वर्षी व्हावयाच्या पार्लमेंटच्या निवडणुकीत भारताचे ब्रिटिश मित्र जास्तीत जास्त संख्येने पार्लमेंटवर निवडून आणण्यास काँग्रेसने मदत करावी असे आवाहन त्यांनी केले. ब्रिटिश साम्राज्यातील वसाहतींना मिळालेले स्वायत्ततेचे अधिकार हे काँग्रेसचे उद्दिष्ट असावे असे त्यांनी सुचविले. भारतापुढील नानाविध समस्यांचा ऊहापोह करताना ट्रान्सवालमध्ये भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाचा त्यांनी निषेध केला आणि मुख्य म्हणजे बंगालची फाळणी करू नये, त्याऐवजी बंगाल इलाख्यात मोडणारा बिहारचा भाग बंगालपासून वेगळा करून बिहारचा स्वतंत्र प्रांत निर्माण करावा असे त्यांनी सुचविले.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

मुंबई अधिवेशनात पारित झालेल्या बावीस ठरावात, प्राथमिक शिक्षणाचा प्रासार केला जावा व ते निःशुल्क केले जावे, शेतकऱ्यासाठी सहकारी बँका स्थापन केल्या जाव्या, ब्रिटिश वसाहतीत भारतीयांना सर्वत्र समान अधिकार असावे, नुकत्याच बंद करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा सुरू केल्या जाव्या, शास्त्रीय पद्धतीने शेती करण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था व तांत्रिक शिक्षण संस्था सर्व प्रांतात स्थापन केल्या जाव्या इत्यादी मागण्या केल्या गेल्या. १९०३ साली तिबेटला पाठविलेल्या लष्करी शिष्टमंडळावर करण्यात आलेल्या भरमसाठ व अनाठायी खर्चाचा बोजा भारतीय तिजोरीवर लादल्याबद्दल शासनाचा निषेध केला गेला. तसेच वंगभंगाच्या संकल्पित योजनेबद्दल जनमनात असलेल्या तीव्र असंतोषाला अभिव्यक्ती देण्यात आली आणि ही योजना अमंलात न आण्याची आवर्जून विनंती केली गेली. काँग्रेसची घटना तयार करण्याबाबतचा ठराव चर्चेला आला असता मेहता आणि लाला लजपतराय यांच्यात बराच वाद झाला. काँग्रेसला घटनाबद्ध करायला मेहता फारसे राजी नव्हते. परंतु टिळक गटाने लालाजींना समर्थन दिले आणि हा ठराव पास करवून घेतला. फिरोझशहांचे चरित्रकार मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे मेहतांच्या नेतृत्वाविरुद्ध हे लहानसे बंडच होते. मात्र काँग्रेस घटनेचा विचार करण्यासाठी जी समिती स्थापन केली गेली, त्यात महाराष्ट्रातील मवाळ सदस्यांचाच अंतर्भाव करण्यात आला. टिळक गटाला त्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसत होता. या अधिवेशनाचे वेळी टिळक गटाकडे दुर्लक्ष करून काँग्रेसच्या पारंपारिक धोरणाचा पाठपुरावा करण्याचा आटापिटा मेहता आदी ज्येष्ठ नेत्यांनी केल्यामुळे या दोन गटात सामंजस्य निर्माण होऊ शकले नाही. उलट आपल्या मतांची दखल घेण्याची मेहता गटाची तयारी नाही आणि मेहता गटाची काँग्रेसवरील पकड शिथील झाल्याखेरीज काँग्रेसच्या परंपरागत धोरणात परिवर्तन होण्याची सुतराम शक्यता नाही याची टिळक गटाला जाणीव झाली. त्यामुळे काँग्रेस सदस्यांत आपल्या मताचा प्रचार करून बहुमताच्या आधारे काँग्रेसच्या धोरणात परिवर्तन घडवून आणण्याची निकड टिळक व त्यांच्या समर्थकांना भासू लागली.

### महाराष्ट्राच्या काँग्रेसमधील मवाळ-जहाल भेद

१८९२ चा कौन्सिल कायदा भारतीयांना प्रतिनिधित्वाचे अधिकार प्रदान करण्याच्या दृष्टीने फुसका असल्याची जाणीव सुशिक्षित भारतीयांना लवकरच झाली. काँग्रेसच्या अर्जविनंत्यांना सरकार कचऱ्याच्या टोपलीची वाट दाखविते, त्यातील मागण्यांचा विचारही करीत नाही असा अनुभव येऊ लागल्यापासून काँग्रेसच्या कार्यपद्धतीबाबत टीकेचे सूर काँग्रेस अधिवेशनांतून अधूनमधून उमटू लागले होते. तशात "हिंदुस्थान शस्त्रबळाने जिंकण्यात आला आहे व तो शस्त्रबळानेच दडपून ठेवला जाईल" अशा उन्मत्त ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या वल्गना, प्रजाकल्याणाबाबतची सरकारची भयावय अनास्था, नानाविध मार्गांनी चाललेले देशाचे आर्थिक शोषण, भारतीयांना शासनाच्या पोलादी चौकटीत प्रवेश शक्य तो करू न देण्याचा सत्ताधाऱ्यांचा निर्धार, यावर कळस म्हणून की काय १८९८ पासून सुरू झालेली लोकमताला पायदळी तुडविणारी, उद्दाम, बेमुर्वतखोर व आत्यंतिक प्रतिगामी कर्झनशाही व तिचा सामना करण्यास काँग्रेसला येत असलेले अपयश टिळकांप्रमाणे देशातील इतर काही पुढाऱ्यांना अस्वस्थ करीत होते. ही मंडळी काँग्रेसच्या प्रचलित कार्यपद्धतीचे परीक्षण करून त्यातील दोषावर बोट ठेऊन काँग्रेसच्या कार्यपद्धतीत परिवर्तन करण्याची गरज प्रतिपादू लागली होती. काँग्रेसच्या निष्क्रियतेवर बोट ठेवताना, "तिला वार्षिक श्राद्धाचे स्वरूप प्राप्त झाले आहे" असे कडक शब्द वापरून, "राजकीय हक्क मिळविणे किंवा राजकीय उन्नती करणे म्हणजे थट्टा नव्हे- त्यासाठी भारतात व इंग्लंडमध्ये सबंध वर्षभर एकसारखी चळवळ सुरू ठेवून इंग्रजास सळो की पळो करणे" आवश्यक आहे, त्याखेरीज यशप्राप्ती व्हावयाची नाही असा परखड इशारा डिसेंबर १९०३ च्या केसरीतील लेखात टिळकांनी दिला होता. तसेच चळवळीचा मार्ग ह्यूम व दादाभाई या काँग्रेस

www.mpscmantra.com

संस्थापकांनाही समंत आहे हेही त्यांनी सप्रमाण प्रतिपादन केले होते. या त्यांच्या विचाराला इतर प्रांतांतील, विशेषतः पंजाब व बंगालमधील काही पुढाऱ्यांचा पाठिंबा मिळू लागला.

### मवाळाची वैचारीक धारणा

यामुळे महाराष्ट्राप्रमाणे काँग्रेसमध्ये राष्ट्रीय स्तरावर काँग्रेस चळवळीचे ध्येय, धोरण, तंत्र, आशय व मर्यादा याबाबत परस्पर विरोधी मतप्रणालीचे दोन तट पडू लागले. या दोन गटांना मवाळ व जहाल अशा संज्ञा रूढ झाल्या. मेहता, वाछा, रानडे इत्यादी काँग्रेसचे संस्थापक हे बर्क, बेंथम, मिल, स्पेन्सर इत्यादी ब्रिटिश उदारमतवादी विचारवंतांच्या लिखाणाने प्रभावित झालेले व त्याच विचारधारणेच्या आधारे भारताची प्रगती घडवून आणणे अगत्याचे आहे अशा मताचे होते. देशाची प्रगती परकीय उदारमतवादी शासनाच्या सहाय्यानेच होऊ शकेल अशी त्यांची धारणा होती. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर त्यांचा गाढ विश्वास होता. इंग्लंडच्या उदारमतवादाचे प्रात्यक्षिक त्यांना काही ब्रिटिश वसाहतीत आढळून आले होते. त्यामुळे ब्रिटिश राज्यकर्ते आपल्या आश्वासनानुसार भारतीयांनाही राजकीय अधिकार देतील व कल्याणकारी शासन प्रस्थापित करतील अशी त्यांची खात्री होती. त्यांमुळे पाश्चात्य शासन उलथून पाडण्याचा विचारही कधी त्यांनी मनात आणला नाही. त्यांना मुख्य चिड होती ती जुलमी, अन्याय्य शासनाची; परकीय शासनाची नाही. आपल्या मागण्या सनदशीर मार्गाने राज्यकर्त्यांपुढे मांडल्यास राजकीय हक्क निश्चितपणे मिळविता येतील अशी त्यांची तात्त्विक श्रद्धा असल्याने काँग्रेसच्या मागण्या पूर्ण न होऊनही त्यांचा सनदशीर मार्गांवरील विश्वास उडला नाही. त्यांच्या मते काँग्रेसच्या मागण्या पूर्ण न होण्याचे मुख्य कारण इंग्लंडचे राज्यकर्ते नसून भारतातील ब्रिटिश नोकरहशाहीची साम्राज्यवादी नीती हे होते. त्यामुळे या नोकरशाहीविरुद्ध त्यांच्या टीकेचा रोख होता.

तसेच देशहिताच्या दृष्टीने देशाची प्रगती उत्क्रांतीच्या मार्गाने होणे मवाळांना श्रेयस्कर वाटत होते. म्हणून संथपणे, संयमाने मागण्या करीत राहावे, फार मागू नये, लवकर प्राप्त होऊ शकेल तेवढेच मागावे, न्याय्य मागणी अंशतः पूर्ण झाली म्हणून निराश होण्याचे कारण नाही; सरकारशी सतत संपर्क ठेऊन, सतत युक्तिवाद करून आपल्या मागण्यांची निकड आणि समर्थनीयता त्यांना पटवून देण्याचे धोरण सातत्याने चालविल्यास प्रातिनिधिक शासनाचे अधिकार मिळाल्याखेरीज राहणार नाहीत असा त्यांचा दृढ विश्वास होता.

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद हा मवाळांच्या राजकीय निष्ठेचा आधार होता. त्यामुळे व्यक्तिगत जीवनात जाज्वल्य धर्मनिष्ठा असलेली रानडेसारखी मंडळी राजकारणात धर्मनिरपेक्ष भूमिकेची कट्टर पुरस्कर्ती होती. राजकारणात लोकजागृतीचे व लोकसंघटनेचे महत्त्व त्यांना कळत होते. परंतु सर्वसामान्य भारतीय जनता अशिक्षित असल्याने ती शांत व सनदशीर मार्गाने चळवळ करू शकणार नाही असा त्यांचा समज होता, आणि लोकसंघटनेसाठी लागणारी सामान्य जनतेत मिसळण्याची तयारी व त्यासाठी लागणारा वेळ त्यांच्याजवळ नव्हता. त्यामुळे जनआंदोलनाबाबत ते सांशकता व्यक्त करीत. त्यांच्या या मूलगामी निष्ठांमुळे आणि साचेबंद कार्यपद्धतीमुळे काँग्रेसला परंपरागत धोरणाला बांधून ठेवण्याचा, त्यात परिवर्तन घडू न देण्याचा त्यांचा मानस होता. चळवळीचा मार्ग पत्करल्यास काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात येईल अशी त्यांना धास्ती होती आणि म्हणून या मार्गाचा अवलंब त्यांना गर्हणीय वाटत होता.

याचा अर्थ काँग्रेसकडे सरकार दुर्लक्ष करीत असल्याची मवाळांना खंत वाटत नव्हती असा नाही. १८ नोव्हेंबर १८९९ रोजी वाछांनी दादाभाईंना लिहिलेल्या पत्रात काँग्रेसच्या अपयशाची कारणमीमांसा करताना

www.mpscmantra.com

काँग्रेसचे कार्य वर्षभर सतत न चालणे व काँग्रेस नेत्यांनी फावल्या वेळेचा उद्योग म्हणून राजकारणाकडे पाहाणे या गोष्टी काँग्रेसच्या अपयशाला कारण आहेत असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. "आम्ही केवळ भुंकतो, चावा घेत नाही, केवळ भुंकून कार्यभाग साधत नसतो, त्यासाठी चावा घेणे आवश्यक असते" असेही विधान त्यांनी केले होते. त्याबरोबरच काँग्रेसला प्रभावी बनविण्यासाठी राष्ट्रकार्याला पूर्णतः वाहून घेतलेले कार्येकर्ते पुढे येण्याची आवश्यकता त्यांनी निक्षून प्रतिपादित केली होती. या जाणिवेतूनच ना. गोखल्यांनी राष्ट्रकार्याला पूर्णतः वाहून घेतले; इतकेच नाही तर निःस्वार्थ सेवाभावाने व सातत्याने राष्ट्रकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची पिढी तयार करण्याच्या हेतूने त्यांनी १९०५ साली भारत सेवक समाजाची स्थापना केली. मेहतांचा मात्र या मार्गाला विरोध होता.

काँग्रेसचे धोरण हवे तितके परिणामकारक होत नाही हे ध्यानात येऊनही टिळक पुरस्कृत करीत असलेले चळवळीचे मार्ग, तंत्र व आशय हे नेमस्त गटाच्या पचनी पडत नव्हते. त्यांची उदार तत्त्वज्ञानावरील व ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या न्यायप्रियतेवरील श्रद्धा अजूनही नष्ट झाली नव्हती. काही काळ शासकांकडून प्रतिसाद मिळाला नाही म्हणून हातपाय न गाळता, त्यांच्याशी सतत संपर्क ठेऊन, त्यांच्याशी सहकार्य करून, आपल्या मागण्यांची निकड त्यांना सतत पटवून देत राहिल्यास हळू हळू का होईना पण कार्यभाग साधेल असा त्यांचा विश्वास कायम होता. एखाद्या विशिष्ट अन्याय्य निर्णयाविरुद्ध क्वचित चळवळ करायला त्यांना फारशी हरकत नव्हती. परंतु अखंड चळवळीचा मार्ग त्यांना धोक्याचा वाटत होता. याच्या मुळाशी जनशक्तीबद्दलची त्यांची मूलभूत साशंकता हे मुख्य कारण होते. लोकशक्ती जागृत करण सोपे आहे, परंतु ती एकदा जागृत केल्यानंतर तिला आटोक्यात ठेवणे न जमल्यास परकीय राज्यकर्ते बलप्रयोग करून ती केव्हाच चिरडून टाकतील अशी त्यांची निश्चित धारणा होती व त्यामुळे जनआंदोलनाचा मार्ग त्यांना पूर्णतः अव्यवहार्य वाटत होता. असा अव्यवहार्य मार्ग पत्करणे म्हणजे आत्मघात करणे ठरेल अशी पक्की खात्री असल्यामुळे युक्तिवादाने सरकारचे मन वळवण्याचा अखंड प्रयत्न करीत राहण्याचा मार्ग राष्ट्रहिताच्या दृष्टीने त्यांना बिनधोक, व्यवहार्य व श्रेयस्कर वाटला.

टिळक गटाला मात्र साम्राज्यवादी शोषक सत्तेचे मतपरिवर्तन शांततेच्या मार्गाने कधी घडवून आणता येईल ही आशा बाळगणे म्हणजे मृगजळामागे धावण्यासारखे वाटत होते. संघर्ष केल्याखेरीज राज्यकर्ते भारतीयांना सुखासुखी राजकीय अधिकार कधीही देणार नाहीत; मात्र संघर्ष करावयाचा तो शस्त्रबळाने नव्हे, तर संघटित लोकशक्तीचे अस्त्र वापरून करायचा, सनदशीर व कायदेशीर मार्गाने करायचा अशी टिळक गटाची धारणा बनली होती.

या वैचारिक मतभेदांमुळे महाराष्ट्रातील काँग्रेसमध्ये दोन तट पडू लागले. जहाल गटाचे अध्वर्यू टिळक होते, तर नेमस्त गटाचे नेतृत्व मेहताबरोबर गोखल्यांनी पत्करले. टिळकांनी लोकशक्तीचा वापर राजकीय अधिकारप्राप्तीसाठी करून घेण्याचा मार्ग अंगिकारला, तर शासकीय यंत्रणेत शिरुन जनतेच्या वतीने राज्यकर्त्यांच्या अन्याय धोरणाला विरोध करीत, जनतेच्या मागण्या तर्कशुद्ध युक्तिवादाने संयमी भाषेत सरकार दरबारी मांडून भारतीयांचे न्याय्यअधिकार मिळवून घेण्याचा मार्ग गोखल्यांनी पत्करला. मुंबई काँग्रेसनंतरचा पंधरा वर्षांचा काँग्रेसचा इतिहास म्हणजे पर्यायाने या दोन कर्तृत्ववान महाराष्ट्रीय नेत्यांच्या राजकीय कार्याचा इतिहास आहे.

वस्तुतः सेवावृत्तीने आजन्म राष्ट्रकार्याला वाहून घेणारे एकाच पिढीतील महाराष्ट्राचे हे दोन राजधुरीण एकमेकांना पूरक व्हावयाचे. परंतु दोघांतील मूळ प्रवृत्तीभेदामुळे आणि त्यांच्या भिन्न विचारधारणांमुळे ते प्रत्यक्ष राजकारणात परस्परविरोधी गटात राहिले आणि परस्परविरोधी गटांचे धुरीणत्व त्यांनी पत्करले. यामुळे साधारणतः

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

१९०० नंतर काँग्रेसचे स्वरूप द्विविध बनू लागले. एक सरकाराभिमुख आणि दुसरे लोकाभिमुख. या द्विविध स्वरूपाचा मुळ गाभा राष्ट्रवादच होता. मात्र या दोन मार्गांचा समन्वय साधला जाणे काँग्रेस प्रभावी बनण्याच्या दृष्टिने आवश्यक होते त्यामुळे तिला आगळे सामर्थ्य प्राप्त झाले असते. परंतु १९०४ पासून महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांची समन्वयाची भूमिका सुटू लागली व त्याचे दुष्परिणाम अल्पकाळातच काँग्रेसला भोगावे लागले.

## नागपूर-अमरावती भागातील मवाळ-जहाल राजकारण

पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसवर्तुळात निर्माण झालेल्या वैचारिक मतभेदांचे पडसाद नागपूरकडील भागात व वऱ्हाडात उठल्याखेरीज राहिले नाहीत. १८९५ साली सामाजिक परिषदेसंबंधी उपस्थित झालेल्या वादापासून अमरावती व नागपूर येथील काँग्रेस गोटात दोन तट पडू लागले होते. याला १९०४ नंतर अधिक चालना मिळाली ती डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांच्या राजकारण प्रवेशाने. डॉ. मुंजे मुंबईच्या काँग्रेस अधिवेशनाला गेले, तेव्हा समाजसुधारणेच्या विषयावर त्यांनी लिहिलेला एक लेख ते बरोबर घेऊन गेले होते. हा लेख त्यांनी टिळकांना वाचायला दिला आणि त्यांच्या सल्ल्यानुसार नागपूरला परत आल्यानंतर तो लेख "Reformed Opinion on Hindu Social Reform" या शीर्षकाखाली त्यांनी छापला. या लेखातील आशयातील ते टिळक गटातील असल्याची नागपूरच्या ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांची खात्री झाली. गंगाधरराव चिटणवीस, वामनराव कोल्हटकर, बापूराव किनखेडे, अमरावतीचे मुधोळकर, मोरोपंत जोशी ही रानड्यांच्या प्रभावळीतील, तर अमरावतीचे दादासाहेब खापर्डे हे टिळकांचे कट्टर समर्थक होते. अशात डॉ. मुंजे हे टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावित होऊन मुंबईहून परत आले आणि १९०५ मध्ये राष्ट्रकार्याला वाहून घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. समविचारी मंडळी संघटित करून नागपूरमध्ये टिळकपक्षाची धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली. मात्र नागपूरच्या ज्येष्ठ नेत्यांशी यामुळे त्यांनी वितुष्ट येऊ दिले नाही. राजकीय जागृतीसाठी ज्येष्ठ मंडळींचे सहकार्य मिळविण्याचे त्यांनी हेतुपुरस्सर प्रयत्न केले.

डॉ. मुंजे यांनी पुढाकार घेऊन एप्रिल १९०५ मध्ये प्रांतिक परिषद आयोजित केली. या भागात होणारी ही पहिली प्रांतिक परिषद होती. ही परिषद आयोजित करण्यात त्यांना नारायणराव अळेकर, नीळकंठराव उधोजी इत्यादी समविचारी मंडळींची मदत झाली. गंगाधरराव चिटणवीस हे स्वागताध्यक्ष होते. दादासाहेब खापर्डे यांनी प्रांतिक समस्या सोडविण्यासाठी अंगिकृत कारावयाच्या उपाययोजनेबाबत आपल्या विनोदप्रचुर शैलीने सदस्यांना मार्गदर्शन केले. तसेच जून १९०५ मध्ये डॉ. मुंजे यांनी एक प्रांतिक महोत्सव नागपूरला आयोजित केला व त्याच्या व्यासपीठावरून भाषण देण्यास त्यांनी दादासाहेब खापर्डे यांनाच आमंत्रित केले. टिळकांच्या विचारप्रणालीचे बीजारोपण आपल्या भागात करण्याचा डॉ. मुंजे यांचा हा प्रयत्न होता. १९०५ मध्ये नागपूरला झालेल्या या दोन अधिवेशनामुळे उत्साही राष्ट्रवादी तरुणांचा गट नागपूरला संघटित होऊ लागला. या गटाने अल्पावधीतच नागपूरचा भाग हा टिळकवादाचा अभेद्य दुर्ग बनविला.

वऱ्हाडात टिळकवादाचे अध्वर्यू टिळकांचे विश्वस्त व निकटचे सहकारी बनलेले दादासाहेब खापर्डे हे होते. त्यांच्याखेरीज दुराणी वकील, श्री. श. तांबे, जयराम पाटील हे ही टिळकांचे समर्थक बनले. वऱ्हाडात अमरावती व्यतिरिक्त टिळकपक्षाच्या प्रचाराचे आणखी एक महत्त्वाचे केंद्र होते ते म्हणजे यवतमाळ. येथे जहाल राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रचार पाच उत्साही कार्यकर्ते करू लागले होते. डॉ. बाबासाहेब परांजपे यांनी आपला वैद्यकीय व्यवसाय बाजूला सारून पूर्णांशी राष्ट्रकार्याला वाहून घेतले होते. ते यवतमाळमधील राष्ट्रीय चळवळीचे जनक होते. पृथ्वीगीर हरिगीर गोसावी यांनी आपले 'हरीकिशोर' हे वृत्तपत्र जहाल राष्ट्रवादाचे मुखपत्र बनविले होते. वामनराव जोशी, पन्नालाल व्यास व शामराव देशपांडे हे स्वखर्चाने गावोगाव हिंडून लोकांत राष्ट्रीय भावना जागृत

www.mpscmantra.com

करण्याचा उद्योग करीत होते. या मंडळींनी राष्ट्रकार्यासाठी तरुणांना संघटित करण्याच्या हेतूने देशी खेळांचे शिक्षण देणारे क्रीडामंडळ सुरू केले, आखाडे आयोजित केले. त्या मंडळात येणाऱ्या तरुणांशी बाबासाहेब परांजपे तत्कालीन राजकीय परिस्थितीवर तासन्तास चर्चा करू लागले. पृथ्वीगीर गोसावींनी स्वदेशी कापडाचे दुकान घालून स्वदेशीचा प्रचार सुरू केला. अमरावतीला खापर्डे आदी मंडळींनी सुरू केलेल्या शिवाजी विद्यालयाच्या धर्तीवर यवतमाळला निःशुल्क शिक्षण देणारे विद्यागृह स्थापन करण्यात आले. गणपती व शिवाजी उत्सवांची प्रथाही सुरू केली गेली. १९०२ नंतर माधव श्रीहरी अणे हे देखील या गटात सहभागी झाले. राष्ट्रीय विचारसरणीचा पुरस्कार करणारे आपले लेख आणि अरविंदांच्या ओजस्वी लेखांचा मराठी अनुवाद अणे यांनी हरीकिशोरमार्फतच जनतेपर्यंत पोचविला. अशा प्रकारे १९०५ पर्यंत नागपूर व वऱ्हाडच्या भागातही राष्ट्रकार्याला मोठ्या प्रमाणात चालना मिळालेली आढळून येते.

*

प्रतिगामी कर्झनशाहीमुळे सुशिक्षित भारतीयांतील असंतोष वाढत जात असतानाच ७ ऑगस्ट १९०५ रोजी सरकारने केलेल्या वंगभंगाच्या घोषणेने बंगाल खवळून उठला. बंगालच्या फाळणीच्या योजनेला बंगाली लोकमताचा तीव्र विरोध आहे याची पुरेपूर कल्पना असूनही लोकमत पायदळी तुडवून लॉर्ड कर्झनने घेतलेल्या या निर्णयाचा सर्व शक्तीनिशी प्रतिकार करण्याचा निर्धार बंगालने केला. वंगभंगाला सक्रिय प्रतिकार करण्यास तेथील जहाल-मवाळ गट एकत्रित आले. इंग्लिश मालावर पूर्णपणे बहिष्कार टाकून प्रतिकाराची चळवळ सुरू करण्याची कल्पना सुरेंद्रनाथांना सुचविली. या चळवळीला बंगाली जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. काँग्रेसपासून काहीसे अलिप्त राहिलेले अनेक प्रतिष्ठित नागरिक चळवळीत सामील झाले. बहिष्काराबरोबर स्वदेशीची घोषणाही ओघानेच आली. मागील काही वर्षांपासून टिळक पुरस्कृत करीत असलेल्या जनआंदोलनाचे प्रात्यक्षिक अशा प्रकारे बंगालने सुरू केले.

## वंगभंगाविरोधी आंदोलनाला महाराष्ट्राचा प्रतिसाद

बंगालमधील जनआंदोलनाने इतर राष्ट्रीय पुढाऱ्यांप्रमाणे टिळकांचे लक्ष आकृष्ट करून घेतले. बंगालच्या चळवळीमागील भूमिका विशद करणारे लेख त्यांनी केसरीतून प्रकाशित केले. त्यात त्यांनी बंगालप्रती महाराष्ट्राची सहानुभूती तर व्यक्त केलीच, पण त्याबरोबर महाराष्ट्रीय बांधवांना बंगालला सक्रिय मदत करण्याचे आवाहनही त्यांनी केले. १५ ऑगस्ट १९०५ रोजी केसरीत 'आणीबाणीची वेळ' या शीर्षकाखाली एक प्रेरक लेख लिहून त्यांनी आंदोलनात्मक राजकारणाचा सूत्रपात महाराष्ट्रात केला. आंदोलनाचे महत्त्व विशद करताना, "लोकमताचे बळ निश्चयात आहे, केवळ समुच्चयात नाही- शब्द नकोत, कृति पाहिजे आणि तीही निश्चयाची कृती पाहिजे" असेही त्यांनी बजाविले. तसेच स्वतंत्र राष्ट्रातील सनदशीर राजकीय चळवळ आणि भारतासारख्या परतंत्र देशातील सनदशीर चळवळ यातील भेद त्यांनी स्पष्ट केला. स्वतंत्र देशात सनदशीर चळवळीकडे राज्यकर्ते लक्ष देतात म्हणून ती फलदायी ठरते, भारतासारख्या परतंत्र राष्ट्रात मात्र राज्यकर्ते सनदशीर चळवळीची दखलही घेत नाहीत हे सोदाहरण दाखवून देऊन त्यांनी भारतात अधिकार प्राप्तीसाठी निःशस्त्र कायदेशीर प्रतिकाराची गरज प्रतिपादन केली. बहिष्कारयोगाचे औचित्य व समर्थनीयता लोकांच्या गळी उतरविण्याची खटपट त्यांनी केली आणि स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीने जनआंदोलनाला तात्त्विक बैठक दिली.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

वंगभंगाच्या वेळी ना. गोखले आणि लाला लजपतराय इंग्लंडला होते. तेथे पार्लमेंटच्या निवडणुका तोंडावर आल्या होत्या आणि लिबरल पक्ष सत्तारूढ होणार अशी स्पष्ट लक्षणे दिसत होती. लिबरल पक्षाच्या सदस्यांनी कंझेर्वेटिव्ह पक्ष अधिकाररूढ असताना भारताविषयी सहानुभूती दर्शविली होती. भारतीयांच्या समस्यांकडे वेळोवेळी सरकारचे लक्ष त्यांनी वेधले होते. त्यामुळे हा पक्ष सत्तारूढ झाल्यास भारतीयांच्या न्याय्य मागण्या लवकर मान्य होतील अशी आशा अनेकांना होती. म्हणून गोखल्यांनी लिबरल पक्ष श्रेष्ठींशी बोलणी करून भारतीयांच्या प्रक्षुब्ध भावनांची माहिती त्यांना करून दिली. स्वदेशी पोशाखात मँचेस्टर या ब्रिटिश भांडवलदारांच्या बालेकिल्ल्यात जाऊन त्यांनी भाषण दिले आणि वंगभंगाविरोधी चळवळीमागील बंगालची भूमिका समजावून सांगून, बंगालने अंगिकारलेल्या बहिष्कारयोगाचे समर्थन केले; इतकेच नाही तर राज्यकर्त्यांनी न्यायाने राज्य न केल्यास लोक जुलुमाला कंटाळून बळाने राज्य घेऊ पाहतील असा अर्थगर्भ इशाराही त्यांनी राज्यकर्त्यांना दिला. गोखल्यांच्या एरवीच्या मिळमिळीत राजकारणावर प्रखर टीका करणाऱ्या टिळकांनी गोखल्यांच्या या कार्याबद्दल त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

## बनारस काँग्रेस

बंगालमध्ये प्रचंड जनआंदोलन पेटलेले असता आणि सर्व राष्ट्रीय नेत्यांचे डोळे बंगालवर खिळलेले असता १९०५ सालच्या बनारस तेथे भरणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद ना. गोखले यांच्याकडे आले. देशात प्रक्षोभक वातावरण निर्माण झालेले असताना काँग्रेसचे अध्यक्षपद लाभणे ही फार महत्त्वाची बाब होती. अध्यक्ष या नात्याने त्यांच्या मतांना व विचारांना विशेष महत्त्व मिळणार होते. काही महिन्यांच्या वास्तव्यानंतर ते नुकतेच भारतात परत आले असल्यामुळे तेथील राजकीय परिस्थितीबाबतचे त्यांचे भाष्य मननीय ठरणार होते. तसेच मवाळ व जहाल गटांना सांभाळण्याची तारेवरची कसरतही त्यांना करावयाची होती. ही जबाबदारी त्यांनी अतिशय कौशल्याने व समर्थपणे पेलली. ही बाब त्यांना व महाराष्ट्रालाही भूषणावह होती.

काँग्रेस अधिवेशनाला आलेल्या ७५७ प्रतिनिधीमध्ये बंगालच्या खालोखाल महाराष्ट्रीय सदस्यांची संख्या मोठी होती. नागपूरहून डॉ. मुंजे, डॉ. लिमये, माधवराव पाध्ये, वऱ्हाडचे खापर्डे, अणे इत्यादी मंडळी अधिवेशनाला उपस्थित होती. उपस्थित सदस्यांच्या भावना संमिश्र स्वरूपाच्या होत्या. एकीकडे वंगभंगामुळे सर्वांची, विशेषतः बंगाली प्रतिनिधींची मने विलक्षण कटुतेने व संतापाने भरली होती, तर दुसरीकडे इंग्लंडमध्ये सत्तारूढ होऊ घातलेल्या लिबरल पक्षाकडून न्याय मिळण्याची आशा काही अंशी शिल्लक होती. अधिवेशनातील चर्चा साहजिकच वंगभंगावर व तो रद्द करून घेण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेवर केंद्रित झाली.

विषय नियामक समितीत वंगभंगाचा निषेध करण्याबाबत सर्वांचे एकमत होते. दोन ठरावांवर मात्र जहाल-मवाळ गटात खडाजंगी झाली. यावेळी भारताच्या दौऱ्यावर असलेल्या ब्रिटिश युवराजाचे स्वागत करण्याच्या ठरावाला बंगाली प्रतिनिधींनी कसून विरोध केला. सरकारविरोधी आंदोलनाने बंगाल पेटलेला असताना, त्याच सत्तेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीचे स्वागत करणे समर्थनीय नाही अशी त्यांची भूमिका होती. नागपूर व अमरावतीच्या डॉ. मुंजे, डॉ. लिमये दादासाहेब खापर्डे यांनीही हा विरोध उचलून धरला. याउलट पंडित मदनमोहन मालवीयांनी मांडलेल्या बहिष्काराच्या ठरावाला वाछा व सेटलवाड या मेहतांच्या अनुयायांनी आक्षेप घेतला. नागपूर-अमरावती गटाने या ठरावाला समर्थन दिले. यावरून खापर्डे व मुंजे यांचे वाछा व सेटलवाड यांच्याशी बरेच वाग्युद्ध रंगले. दोन्ही गट आपली भूमिका सोडण्यास तयार नसल्यामुळे पेच निर्माण झाला. त्यातून शेवटी दाजी खरे, टिळक आणि लाला लजपतराय यांनी मध्यस्थी करून मार्ग काढला. स्वतः गोखल्यांनीही



www.mpscmantra.com

तडजोडीची गळ घातली. तेव्हा बहिष्काराच्या ठरावाला मवाळांनी विरोध करू नये आणि युवराजाच्या स्वागताचा ठराव खुल्या अधिवेशनात मांडला जाईल, त्यावेळी जहाल गटाने मंडपात उपस्थित न राहता तो ठराव पास होऊ द्यावा अशी तडजोड झाली.

ना. गोखल्यांचे अध्यक्षीय भाषण देशातील स्फोटक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अतिशय समयोचित आणि समतोल असे झाले. लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीचे त्यांनी अत्यंत समतोलवृत्तीने मूल्यमापन केले; त्याच्या हितकारक निर्णयाचे श्रेय त्याच्या पदरी टाकले, पण त्याबरोबरच त्याच्या अपयशाची परखडपणे कारणमीमांसाही केली. त्याच्या अपयशाचे मर्म कल्पनाशक्तीच्या अभावात आणि जनमताची अवहेलना करण्याच्या त्याच्या वृत्तीत साठवले आहे, असे ठासून सांगताना त्यांनी मोगल सम्राट औरंगजेबाशी त्याची केलेली तुलना फार समर्पक होती. वंगभंगावर टीका करून, ब्रिटिश नोकरशाहीशी सहकार्य करणे फलदायी ठरेल ही आपली आशा मावळली आहे असेही ते म्हणाले. सर्व सनदशीर मार्ग अयशस्वी ठरल्यानंतरच बंगालने सक्रिय प्रतिकाराचा मार्ग पत्करल्यामुळे तो समर्थनीय आहे असे सांगून, त्या चळवळीमुळे राष्ट्रीय विकासाला चालना मिळेल असे मत त्यांनी व्यक्त केले. भारताची प्रतिष्ठा व आत्मसन्मान आता बंगालच्या हाती आहे असे म्हणून या आणीबाणीच्या प्रसंगी सर्व देश बंगालच्या पाठीशी असल्याची हमी त्यांनी दिली. स्वदेशीचे त्यांनी पूर्ण समर्थन केले. बहिष्काराचा मार्ग मात्र मर्यादित संदर्भात एखाद्या विशिष्ट अन्यायाच्या निराकरणार्थच फक्त पत्करावा, राष्ट्रीय स्तरावर एक कायमचे धोरण म्हणून त्याचा अवलंब होऊ लागल्यास जनतेची निःशस्त्र चळवळ दडपून टाकण्यास बलोद्धत सत्ताधाऱ्यांना यत्किंचितही वेळ लागणार नाही असा धोक्याचा इशारा देऊन, बहिष्काराचा वापर राजकीय अस्त्र म्हणून करू नये असा सबुरीचा सल्लाही त्यांनी दिला. गोखल्यांच्या अध्यक्षीय भाषणाचे काँग्रेसमधील दोन्ही गटांचे काही अंशी समाधान झाले. इंग्लंडमधील नव्या सत्तारूढ पक्षाला वंगभंग रद्द करण्याची गळ घालण्यासाठी काँग्रेसच्या वतीने त्यांनाच पाठविण्याचा निर्णय सर्वसंमतीने घेतला गेला. त्यांच्या मार्दवी परंतु कणखर राजनीतीवरील काँग्रेस सदस्यांचा विश्वास आणि राजदरबारी त्यांना असलेली मान्यता यामुळे ते काँग्रेस व ब्रिटिश राज्यकर्ते यांच्यात मध्यस्थाची भूमिका परिणामकारकरीत्या बजावतील ही खात्री या निर्णयाच्या बुडाशी होती. गोखल्यांच्या यावेळच्या अध्यक्षीय भाषणाने ब्रिटिश नोकरशाहीला आणि साम्राज्यनिष्ठांना धक्का दिला. एरवी गोखल्यांचे कौतुक करणाऱ्या टाईम्स या पत्राने, "डेक्कनच्या राजद्रोही वक्त्यांच्या व लेखकांच्या प्रभावळीत गोखले जाऊ लागले आहेत." असा उपहासगर्भ अभिप्राय यावेळी व्यक्त केला.

बनारस अधिवेशनाचे वेळी देशातील अनेक भागांचे प्रतिनिधी आंदोलनात्मक राजकारणाला अनुकूल असल्याचे ध्यानात येताच या अधिवेशनाच्या अखेरी टिळकांनी राष्ट्रीय पक्षाची मुहूर्तमेढ रोवली. बहिष्कार योगाचा अंगिकार करून जुलुमी शासनाला निःशस्त्र कायदेशीर प्रतिकार करावयाचा ही या पक्षाची प्रमुख धारणा होती. बनारस अधिवेशन समाप्त झाल्यानंतर समविचारी मंडळींपुढे केलेल्या भाषणात बनारस अधिवेशनात पास झालेल्या बहिष्काराच्या ठरावाला काहींचा विरोध असल्याचा उल्लेख करून टिळक म्हणाले, "हे नवे औषध ज्याच्या कोठ्याला पचेल तो खाईल.... पचणार नाही तो खाणार नाही, पण रोगाला औषध योग्य असा तरी निर्णय राष्ट्राने दिला ही काही लहान गोष्ट नाही." या पुढील दोन वर्षात आपले निःशस्त्र प्रतिकाराचे तत्त्वज्ञान काँग्रेसच्या गळी उतरविण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. वंगभंगाविरोधी चळवळीच्या निमित्ताने जी प्रचंड जनशक्ती बंगालमध्ये प्रादुर्भूत झाली होती, तशीच लोकशक्ती इतर प्रांतांत उभी करण्याचा त्याचा मानस होता. याउलट टिळकप्रणीत आंदोलनाचा मार्ग काँग्रेसने अधिकृतपणे मान्य केल्यास, ती शासकीय दमननीतीच्या वरवंट्याखाली चिरडली गेल्याखेरीज राहणार नाही अशा प्रामाणिक धारणेमुळे, तिला आंदोलनाचा मार्ग पत्करू न देता तोवरच्या अर्जविनत्यांच्या मार्गाला बांधून

ठेवण्याचा मवाळ गटाचा प्रयत्न होता. ना. गोखल्यांना या मार्गाचे वैय्यर्थ्य अनुभवाला आले असूनही या मार्गावरील त्यांची तात्त्विक श्रद्धा ढळली नव्हती. त्यामुळे ते मेहता गटाच्या निशाणाखालीच राहिले.

## महाराष्ट्रातील स्वदेशी व बहिष्कार चळवळ

बनारस अधिवेशनानंतर टिळक गटाने महाराष्ट्रात बहिष्कार, स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षणाचे प्रात्यक्षिक सुरू केले. वस्तुतः स्वदेशीची कल्पना महाराष्ट्राला अपरिचित नव्हती. लोकहितवादींनी ती १८५० पूर्वीच मांडली होती. १८७० नंतर 'सार्वजनिक काकांनी' तर महाराष्ट्रात स्वदेशीची मोहीमच उघडली होती. सहकार तत्त्वावर स्वदेशी मालाची दुकाने अनेक शहरी प्रस्थापित करण्यामागे त्यांची आणि न्या. रानड्यांची प्रेरणा होती. १८९४ सालच्या सरकारच्या जकातीबाबतच्या निर्णयाच्या निषेधार्थ सार्वजनिक सभेच्या वतीने कार्यवाह या नात्याने गोखल्यांनीही बहिष्काराचा पुरस्कार केला होता. या तत्त्वाचा व्यापक प्रचार टिळक गटाने १९०५ मध्येच सुरू केला. त्याचा जनसामान्यावरील प्रभावही लवकरच निदर्शनास येऊ लागला. सप्टेंबर १९०५ मध्ये कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी त्यांना दिल्या गेलेल्या विदेशी कागदावर उत्तरपत्रिका लिहिण्यास नकार दिला आणि छड्यांची शिक्षा भोगूनही आपला निर्णय बदलला नाही. बहिष्काराचे समर्थन केल्यावरून राजाराम कॉलेजचे त्यावेळचे प्राध्यापक विष्णू गोविंद विजापूरकर यांना नोकरीला मुकावे लागले. १९०५ च्या ऑक्टोबरमध्ये पुण्याच्या महाराष्ट्र विद्यालयाच्या पटांगणात मोठी जाहीर सभा घेण्यात आली. 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे यांनी स्फूर्तीदायक भाषण केले. विदेशी वस्तूंची होळी करण्याची सूचना त्यावेळी पुण्याला शिकत असलेल्या विनायक दामोदर सावरकरांनी मांडली. त्याबरोबर अनेक श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे विदेशी वस्तू एकत्र केल्या आणि मोठी मिरवणूक काढून समारंभाने या वस्तूंची होळी पेटविली. बेळगावच्या विद्यार्थ्यांनी तेथील ब्रिटिश जिल्हा मॅजिस्ट्रेटने शाळेत वाटलेली मिठाई न खाता, ती मोठ्या समारंभाने होळी पेटवून त्यात फेकली. पुणे, सातारा, धुळे, बेळगाव, फार काय तर मेहतांचा बालेकिल्ला मानला जाणाऱ्या मुंबईतही टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराच्या प्रचारार्थ सभा घेतल्या.

नागपूर व वऱ्हाडही याबाबतीत मागे नव्हते. खापर्डे, मुंजे इत्यादी नेत्यांनी स्वदेशी व बहिष्काराचा मंत्र सामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गावोगावी सभा घेण्यात आल्या. स्वदेशी वस्तूंची दुकाने उघडली गेली. विद्यार्थ्यांना स्वदेशीची शपथ घेण्यास प्रवृत्त केले गेले. एप्रिल १९०६ मध्ये जबलपूरला झालेल्या मध्यप्रांत व वऱ्हाडच्या प्रांतिक परिषदेत डॉ. मुंजे यांनी स्वदेशीचा ठराव मांडला आणि या हिंदी भाषी भागाला त्यांनी व खापर्ड्यांनी स्वदेशी व बहिष्काराचा मंत्र दिला. यवतमाळ भागात हा प्रचार बाबासाहेब परांजपे, शामराव देशपांडे, पृथ्वीगीर गोसावी आदी मंडळींनी केला. काळ, केसरी, मराठा, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, धारवाड वृत्त इत्यादी पश्चिम महाराष्ट्रातील तर हरीकिशोर, देशसेवक ही नागपूर वऱ्हाडकडील वृत्तपत्रे स्वदेशी व बहिष्काराच्या प्रचाराची प्रभावी माध्यमे बनली.

## महाराष्ट्र व बंगालमधील वैचारिक एकात्मता

बंगाल एका मोठ्या अग्निदिव्यातून जात असताना महाराष्ट्रातील टिळक गटाकडून मिळणाऱ्या सहानुभूतीमुळे व सक्रिय मदतीमुळे बंगालच्या नेत्यांत आणि टिळक गटात एक अपूर्व अशी भावनात्मक व वैचारिक जवळिक निर्माण झाली. यातूनच शिवाजी उत्सवासाठी जून १९०६ मध्ये टिळकांना कलकत्त्याला येण्याचे आमंत्रण दिले गेले. टिळकांच्या कलकत्ता भेटीच्या वेळी बंगाल जनतेने त्यांचे केलेले उत्स्फूर्त स्वागत तोवर एकाही

अनुक्रमणिका

गैरबंगाली नेत्याच्या वाट्याला आले नव्हते. आपल्या आठ दिवसांच्या वास्तव्यात टिळकांनी तेथे अनेक सभा गाजविल्या, आपल्या चतुःसूत्रीचा तर्कशुद्ध युक्तिवादाने प्रचार केला व बहिष्कार योगाची व्याप्ती स्पष्ट केली. तसेच बिपिनचंद्र पाल व मोतीलाल घोष या आघाडीच्या नेत्यांशी अनौपचारिक चर्चा करून टिळकांनी त्यांच्याशी वैचारिक एकात्मता साधली.

टिळकांच्या बरोबर खापर्डे व मुंजेही कलकत्त्याला गेले होते. तेथील जनआंदोलनाचा प्रभाव त्यांच्या मनावर पडल्याखेरीज राहिला नाही. कलकत्त्याहून परत आल्यानंतर खापर्डे यांनी जुलैमध्ये एक पत्रक प्रकाशित केले आणि त्याद्वारा काँग्रेसने आपले परंपरागत धोरण सोडून देऊन, सरकारधार्जिण्या मनोवृत्तीचा त्याग करून लोकाभिमुख बनण्याचे आवाहन केले. याबद्दल टाईम्सने खापर्ड्यांच्यावर सडकून टीका केली. ते राजद्रोहाचा मार्ग पुरस्कृत करीत आहेत असा आरोपही टाईम्सने त्यांच्यावर केला. तेव्हा इंदुप्रकाशने १६ जुलैच्या अंकातील लेखाद्वारा टाईम्सच्या आरोपाचे खंडन केले आणि काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांचा काँग्रेसवरील प्रभाव लोप पावू लागला असून, नव्या कार्यक्रमाची निकड अनेकांना जाणवू लागली आहे, त्यामुळे काँग्रेस परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभी आहे असे मत व्यक्त करून खापर्ड्यांच्या सूचनेचे जोरदार समर्थन केले. मद्रासच्या काँग्रेस वर्तुळात असाच प्रचार कृष्णस्वामी अय्यर तर पंजाबमध्ये लाला लजपतराय करीत होते.

## कलकत्ता काँग्रेस

अशा खळबळजनक वातावरणात १९०६ सालच्या कलकत्ता अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी पाल आणि घोष यांनी टिळकांचे नाव सुचविले. या सूचनेने मेहता गट अतिशय अस्वस्थ झाला. देशात स्वदेशी व बहिष्काराची लाट पसरत असता काँग्रेसचे अधिवेशन जर टिळकांच्या अध्यक्षतेखाली बंगालमध्ये झाले तर जनआंदोलनाचा प्रयोग यशस्वीरीत्या करीत असलेले बंगालचे प्रतिनिधी आणि टिळक गट यांची युती होईल आणि ते काँग्रेसला जहाल मार्गावर नेतील याविषयी मेहता-गोखले गटाची खात्री झाली. परंतु बंगालमधील टिळकांची लोकप्रियता लक्षात घेता त्यांच्या नावाला उघडपणे विरोध करणे त्यांना अशक्य होते. या पेचातून त्यांनी मोठ्या मुत्सद्देगिरीने मार्ग काढला. ज्या नावाला कोणीही काँग्रेस सदस्य विरोध करणार नाही अशा ज्येष्ठ पिढीतील सर्वमान्य राजधुरीणांचे, दादाभाई नवरोजींचे नाव त्यांनी पुढे केले. यामागे टिळकांचे नाव डावलण्याचा तर हेतू होताच, त्याशिवाय दादाभाई हे मवाळ गटाची भूमिका उचलून धरतील, काँग्रेस जहाल गटाच्या हाती जाऊ देणार नाहीत ही आशाही होती. मवाळांचा डाव ओळखून टिळक गटाने अधिवेशन सुरू होण्यापूर्वी अनेक पुढाऱ्यांशी चर्चा केली व स्वदेशी व बहिष्काराचे ठराव बहुमताने पारित होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार केले.

डिसेंबर १९०६ च्या अखेर काँग्रेसचे बावीसावे अधिवेशन वयोवृद्ध 'पितामह' दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखाली अपूर्व उत्साहाने सुरू झाले. उपस्थित असलेल्या १६६३ प्रतिनिधीत बंगाल व महाराष्ट्राचा गट मोठा होता. यावेळी तयार करण्यात आलेल्या सभामंडपाचे वैशिष्ट्य म्हणजे तेथील दिव्याखेरीज इतर वस्तू स्वदेशी होत्या. तसेच काँग्रेसच्या मंडपात प्रथमच स्वतंत्रपणे स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. एक स्वदेशी सम्मेलनही घेण्यात आले आणि तेथे केलेल्या भाषणात, देशात सर्वत्र स्वदेशी समित्या स्थापून स्वदेशीची चळवळ देशव्यापी करण्याचा टिळकांनी मांडलेला ठराव सर्वसंमतीने पारित झाला.

वंदेमातरम्च्या मंत्रमुग्ध करणाऱ्या सुरांनी भारावलेल्या मंडपात काँग्रेस अधिवेशनाचे कामकाज सुरू झाले. स्वागताध्यक्षांच्या भाषणानंतर, आपल्या लंडनभेटीचा वृत्तांत सभेपुढे मांडण्यास ना. गोखले पुढे आले. त्यांनी



www.mpscmantra.com

आपल्या भाषणात भारतमंत्री मोर्ले यांच्याशी त्यांनी केलेल्या चर्चेचा संक्षिप्त गोषवारा दिला आणि इंग्लंडध्ये सत्तारूढ झालेल्या लिबरल पक्षाकडून भारताला न्याय मिळेल अशी आशा व्याक्त केली. पुढील दोन वर्षात बऱ्याच राजकीय सुधारणा होणार असल्याचा मोघम उल्लेख करून त्यांनी काँग्रेसजनांना दिलासा दिला, पण त्याबरोबरच देशात सनदशीर चळवळ चालू ठेवावी असा सल्लाही दिला. त्यानंतर दाजी आबाजी खरे यांनी काँग्रेस घटनेचा तयार झालेला मसुदा मान्यतेसाठी सभेपुढे सादर केला.

दादाभाईंचे अध्यक्षीय भाषण आणि विशेषतः अधिवेशनाच्या अखेरी त्यांनी केलेले समारोपाचे भाषण अतिशय प्रभावी झाले. भाषणाच्या प्रारंभी भारतीयांना वेळोवेळी दिलेल्या अभिवचनांची ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी प्रत्यक्षात पूर्ती न केल्यामुळे आपला दारूण अपेक्षाभंग झाला आहे व त्यावेळी कित्येकदा आपल्या संयमी मनानेही राज्यकर्त्यांविरुद्ध बंड करण्यास उसळी मारली आहे असे सांगून, भारतीयांच्या मनात खदखदत असलेल्या तीव्र असंतोषाला त्यांनी समर्पकरीत्या वाचा फोडली, तसेच भारतीय जनता राजकीय अधिकार मागते ती भीक म्हणून नव्हे, ते त्यांचे न्याय्य अधिकार आहेत; हे अधिकार देण्यात भारतीयांचेच नव्हे तर ते इंग्लंडचेही कल्याण आहे असेही त्यांनी प्रतिपादन केले. त्याबरोबरच हे न्याय्य अधिकार प्रदान करण्यास राज्यकर्ते राजी नसतील तर, काँग्रेस कार्यकर्त्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या लोकांना त्यांचे न्याय्य अधिकार समजावून सांगावेत, ते कसे प्राप्त करून घ्यावे याचे शिक्षण त्यांना द्यावे आणि इंग्लंडमधील कॉर्न लॉ विरोधी आंदोलनासारखे जनआंदोलन येथेही करावे असा सल्ला त्यांनी दिला. असा जनआंदोलनाचा मार्ग भारतीयांना दाखवून दिल्याबद्दल त्यांनी बंगालचे अभिनंदन केले आणि बंगाली जनतेच्या पावलावर पाऊल ठेवून त्यागी सेवावृत्तीने आंदोलनाचा मार्ग चोखाळण्याची निकड त्यांनी अतिशय कळकळीने प्रतिपादन केली. त्यांच्या भाषणात मांडला गेलेला दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांनी केलेला 'स्वराज्या'चा उच्चार. सामाजिक, औद्योगिक व राजकीय सुधारणा या परस्पर निगडीत असल्या तरी या सर्व सुधारणांसाठी मूलभूत गरज स्वयंशासनाची, 'स्वराज्या'ची आहे असे ठासून सांगून त्यांनी 'स्वराज्य'प्राप्ती हे काँग्रेसचे ध्येय असावे असे मत हिरीरीने मांडले. 'स्वराज्य' या शब्दाचा इंग्लंडच्या कॅनडासारख्या वसाहतीत प्रचलित असलेले स्वयंशासन असा अर्थ त्यांना अभिप्रेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाषणाच्या अखेरी हिंदू-मुस्लीम ऐक्याचे त्यांनी अतिशय कळकळीचे आवाहन केले आणि आम्ही संघटित असलो तरच ठामपणे, ताठपणे उभे राहू शकू, नाही तर आमचा पराभव अटळ आहे असा धोक्याचा इशाराही दादाभाईंनी दिला.

दादाभाईंचे सडेतोड भाषण मवाळ गटाला काहीसे अनपेक्षित होते. त्यांनी मांडलेले विचार विशेषतः 'स्वराज्य' शब्दाचा केलेला उच्चार जहाल विचारसरणीला पुष्टी देणारा आहे असा त्यांचा पक्का समज झाला. यामुळे विषय नियामक समितीत चर्चा होत असता मवाळ गटाने आपली बाजू सावरून धरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. याच भूमिकेतून त्यांनी स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्याच्या प्रस्तावांना विरोध करताच विषय नियामक समितीत खडाजंगी सुरू झाली. याविषयी खापर्डे आपल्या रोजनिशीत लिहितात, "येथे आम्ही निर्विवाद बहुसंख्येने असल्याने आणि स्थानिक लोकांचा आम्हाला आधार असल्यामुळे हे ठराव जितके प्रगतशील करता येतील तितके करावयाचे असे आम्ही ठरविले." मेहता गटाने बहिष्काराच्या ठरावाला कसून विरोध चालविलेला पाहून खापर्डे व त्यांचे काही सहकारी सभेतून उठून गेले. तेव्हा पहिल्याच ठरावातील आशय वेगळ्या शब्दात मांडून टिळकांनी नवे प्रस्ताव तयार केले आणि मोठ्या नेटाने व कुशल मुत्सद्देगिरीने त्या प्रस्तावांना मेहता गटाची मान्यता त्यांनी मिळवून घेतली.

अशा प्रकारे बऱ्याच वादळी चर्चेनंतर पास झालेल्या सात, आठ, नऊ व अकरा या ठरावांनुसार बहिष्कार, स्वदेशी, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण या मुद्द्यांना काँग्रेसची मान्यता मिळाली. सातव्या ठरावाने बहिष्काराची चळवळ सनदशीर असल्याने प्रतिपादन केले गेले. स्वदेशी उद्योगधंदे वाढवावे आणि काहीसे कष्ट सोसावे लागले तरीही



www.mpscmantra.com

निश्चयाने स्वदेशी वस्तूच वापराव्या असे आवाहन आठव्या ठरावाने केले गेले. स्वराज्य म्हणजे ब्रिटिश साम्राज्यातील स्वायत्त वसाहतीत अस्तित्वात असलेली शासनपद्धती अशी व्याख्या करून ती भारतात लागू करणे हे कॉंग्रेसचे उद्दिष्ट असल्याने नवव्या ठरावाने घोषित केले; तर राष्ट्रीय शिक्षण म्हणजेच राष्ट्रीय स्तरावर, राष्ट्रीय पद्धतीने दिले जाणारे, राष्ट्रीय गरजा भागविणारे आणि राष्ट्राच्या अधिकाराखाली असणारे शिक्षण अशी व्याख्या करून कॉंग्रेसने राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रसाराला अकराव्या ठरावाने मान्यता दिली. टिळकांची चतुःसूत्री कॉंग्रेसच्या गळी उतरविण्यात अशा प्रकारे टिळक गटाला यश आले. बहिष्काराच्या ठरावाला मान्यता देण्यास टिळकांनी मेहतांना भाग पाडले तेव्हा, "तुम्हाला मला मुंबईस अशा रीतीने वागवता आले नसते व तुम्ही असे वागवले नसते," असे मेहता चिडून उद्‌गारल्याचा उल्लेख खापर्ड्यांच्या रोजनिशीत आढळतो. त्यावर "तुम्ही प्रसंगच आणला तर आम्ही तुम्हाला मुंबईसही याचा मासला दाखवू" असे टिळकांनी मोठ्या आत्मविश्वासाने मेहतांना प्रत्युत्तर दिले अशीही नोंद या रोजनिशीत केलेली आहे.

कलकत्ता अधिवेशनाने पारित केलेल्या सोळाव्या ठरावाने कॉंग्रेस घटनेच्या स्थूल स्वरूपाचा कच्चा मसुदा मान्य करण्यात आला. प्रांतिक व जिल्हा स्तरावर कॉंग्रेस समित्या स्थापन करण्याची सूचना यात अंतर्भूत केली गेली. वर्षभर कॉंग्रेसच्या कार्याचे संचालन करण्यासाठी कॉंग्रेसची एक केंद्रीय स्थायी समिती प्रस्थापित केली जावी असाही निर्णय घेण्यात आला. अध्यक्षाच्या निवडीविषयी नवे नियम केले गेले आणि विषय नियामक समितीत समाविष्ट करावयाच्या निरनिराळ्या प्रांतांच्या प्रतिनिधींची संख्या निर्धारित केली गेली.

*

या अधिवेशनात दादाभाईंनी स्वराज्याचे उद्दिष्ट कॉंग्रेसपुढे ठेवल्यामुळे, जहाल गट पुरस्कृत करीत असलेल्या मार्गांना कॉंग्रेसने अधिकृत मान्यता दिल्यामुळे आणि विशेषतः अधिवेशनाच्या समाप्तीनंतर २ जानेवारी रोजी कलकत्त्याला केलेल्या भाषणात बहिष्कार म्हणजे परकीय राज्यकर्त्यांना शासनकार्यात मदत न करणे अशी बहिष्कारयोगाची व्याप्ती टिळकांनी प्रतिपादित केल्यामुळे मवाळ गटाचे धाबे दणाणले. कॉंग्रेसने पास केलेल्या स्वराज्य व बहिष्काराच्या ठरावांवर पुढील वर्षीच्या कॉंग्रेस अधिवेशनात शिक्कामोर्तब झाल्यास कॉंग्रेसच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र परिवर्तन होईल, अर्जविनंत्यांच्या सनदशीर बिनधोक मार्गापासून विचलित होऊन कॉंग्रेस ही जनआंदोलनाच्या धोक्याच्या मार्गाला बांधली जाईल, असे आंदोलन दडपण्यासाठी राज्यकर्ते दमनमार्गांचा मोठ्या प्रमाणावर अवलंब करतील व त्यामुळे शासकीय दडपशाही वाढेल अशी धास्ती मवाळांना वाटू लागली. तसेच जनआंदोलनामुळे देशात निर्माण होणाऱ्या गोंधळाची सबब पुढे करून त्यावेळी राज्यकर्त्यांच्या विचाराधीन असलेला राजकीय सुधारणांचा हप्ता नोकरशाही अडवून धरण्याचा आटापिटा करेल अशी भीती ना. गोखल्यांना भेडसावू लागली. मेहतांच्या मनात तर मुळातच जनआंदोलनाबद्दल तीव्र नापसंती होती. म्हणून कॉंग्रेसच्या पुढील वार्षिक अधिवेशनात या ठरावांना बहुमताने विरोध होईल अशी तजवीज करणे त्यांना अत्यावश्यक वाटू लागले. याच हेतूने पुढील वार्षिक अधिवेशनासाठी लाहोरच्या नेत्यांनी दिलेले आमंत्रण बाजूला सारले जाईल अशी व्यवस्था त्यांनी केली. कारण पंजाब हा लालाजींचा बालेकिल्ला होता, आणि लालाजी टिळकांचे सहकारी असल्याचे सर्वश्रुत होते. शेवटी नागपूरच्या वतीने रा. ब. पंडित आणि मुधोळकर यांनी दिलेले आमंत्रण स्वीकृत करण्यात आले ते दगडापेक्षा वीट मऊ अशा समजुतीमुळे. नागपूर व अमरावती मध्ये चिटणवीस, किनखेडे, बोस, पाध्ये, मुधोळकर यांचा मवाळ गट प्रभावी आहे अशा समजुतीवर मवाळ नेत्यांनी नागपूरला पुढचे अधिवेशन घेण्यास मान्यता दिली.

**जहाल – मवाळ रस्सीखेच**

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

कलकत्ता अधिवेशनांतर काही दिवसांतच नेमस्ताग्रणी गोखल्यांनी कलकत्त्याला घेण्यात आलेले निर्णय अव्यवहार्य आहेत, देशाला ते पेलण्याजोगे नाहीत असे मत व्यक्त करण्यास प्रारंभ केला. ४ फेब्रुवारी रोजी अलाहाबाद येथे केलेल्या भाषणात त्यांनी स्वदेशीचे महत्त्व मान्य केले, बहिष्काराचा वापर मर्यादित क्षेत्रात व विशिष्ट उद्दिष्टपूर्तीसाठी क्वचित करायला हरकत नाही असेही म्हटले; मात्र बहिष्काराचा वापर राजकीय अस्त्र म्हणून निर्धारित धोरण म्हणून सूडभावनेने केला जाऊ नये, असे करणे भारतीयांच्या हिताचे ठरणार नाही असे प्रतिपादन केले. निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग सनदशीर आहे हे त्यांनी मान्य केले, लोकमताची शक्तीही मान्य केली, परंतु राजकीय अधिकार ब्रिटिश सरकारकडूनच भारतीयांना मिळणार असल्यामुळे सरकारवर बहिष्कार टाकणे सुज्ञपणाचे ठरणार नाही असेही त्यांनी बजावले. तसेच स्वराज्य म्हणजे स्वायत्तता नव्हे तर ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वशासन असा 'स्वराज्या'चा अर्थ सांगून ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या कलाने आणि सहाय्यानेच राजकीय प्रगतीचे पाऊल टाकणे भारताला श्रेयस्कर ठरेल असे त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले. सरकारला प्रतिकार करण्याचे धोरण टिळकांनी सोडून द्यावे अशी त्यांना न. चिं. केळकरांच्या मार्फत गळ घालण्याचाही प्रयत्न गोखल्यांनी केला. यामुळे मवाळ गटाच्या ध्येयधोरणाची स्पष्ट कल्पना टिळकांना झाली. कलकत्त्याला पारित झालेल्या ठरावांवर पुढील अधिवेशनात शिक्कामोर्तब करण्यास मवाळ गट खळखळ करणार हे त्यांनी ताडले.

## जहाल विचारांचा प्रसार

मवाळ गटाच्या या पवित्र्याला तोंड देण्यासाठी स्वदेशी, स्वराज्य व बहिष्काराच्या ठरावांना जनतेचा जास्तीत जास्त पाठिंबा मिळवून घेण्याच्या हेतूने जहाल राष्ट्रवादी गटाने आपल्या प्रचारकार्याला अधिक गती दिली. टिळक, न. चिं. केळकर, शि. म. परांजपे, इत्यादी नेते पश्चिम महाराष्ट्रात, तर खापर्डे आणि मुंजे गट नागपूरकडील भागात व वऱ्हाडात प्रचारकार्यात आघाडीला होता. त्यांनी गावोगावी सभा घेतल्या. वृत्तपत्राद्वारा आपले विचार सामान्यांपर्यंत पोचविले. या प्रचाराचा परिणाम विद्यार्थीवर्गावर विशेष प्रकर्षाने दिसून येऊ लागला. अशातच निःशस्त्र प्रतिकारालाही सरकार दाद देत नाही असे ध्यानात आल्यामुळे काही प्रखर वृत्तीचे तरुण सशस्त्र प्रतिकाराच्या मार्गाकडे वळू लागले.

भारतात वाढू लागलेल्या प्रतिकाराच्या लाटेमुळे व जहाल राष्ट्रवादी प्रचारामुळे सरकार अस्वस्थ झाले आणि प्रतिकाराची चळवळ दडपून टाकण्यास त्यांनी नेहमीचे दमनमार्ग अवलंबिण्यास प्रारंभ केला. मुद्रण स्वातंत्र्यावर गदा आणली. पंजाबात लालाजी आणि अजीतसिंग यांना हद्दपार करण्यात आले. महाराष्ट्रात जुलै १९०७ मध्ये रीस्ले परिपत्रक काढून शाळा कॉलेजातून वंदेमातरम् हे गीत गाण्यावर अगर वंदेमातरम्चा उच्चार करण्यावरही बंदी घातली गेली. विद्यार्थ्यांनी सभा मिरवणुकात भाग घेण्यावरही बंदी घालण्यात आली. शाळेत विद्यार्थ्यांवर कडक नजर ठेवण्याचे आदेश व्यवस्थापकांना व मुख्याध्यापकांना देण्यात आले. या आदेशाचा भंग केल्याबद्दल विनायक दामोदर सावरकरांना फर्ग्युसन कॉलेजमधून काढून टाकण्यात आले. प्राचार्य रँगलर परांजपे यांनी हा निर्णय घेतल्याचे कळताच केसरीत "हे आमचे गुरूच नव्हेत" या मथळ्याखाली लेख लिहून टिळकांनी त्यांची कडक शब्दांत निर्भर्त्सना केली.

नागपूरकडील भागात व वऱ्हाडातही जहाल राष्ट्रवाद्यांना विद्यार्थीवर्गाचे मोठ्या प्रमाणात समर्थन मिळाले. नागपूरच्या नीलसिटी स्कूलच्या काही विद्यार्थ्यांनी वर्गात वंदेमातरम् म्हटल्याबद्दल त्यांना शिक्षा झाली असता, केशवराव हेडगेवारांच्या नेतृत्वाखाली सर्व विद्यार्थ्यांनी संप पुकारला आणि या संपाला डॉ. मुंजे, डॉ. परांजपे,

www.mpscmantra.com

अच्युतराव कोल्हटकर या जहालांनी नैतिक पाठिंबा दिला. नागपूरच्या मारिस कालेजच्या विद्यार्थ्यांनी वंदेमातरम् म्हणून वर्गात येणाऱ्या युरोपीय प्राध्यापकाचे स्वागत केले. त्याबद्दल तीस विद्यार्थ्यांना अटक झाली. वऱ्हाड एज्युकेशन सोसायटीने रीस्ले परिपत्रकातील आदेशांची अंमलबजावणी न करण्याचा अधिकृतपणे निर्णय घेतला. असा निर्णय घेण्यात दादासाहेब खापर्ड्यांच्याबरोबर रा. ब. मुधोळकरही होते. लालाजींच्या अटकेचा निषेध करण्यासाठी लिहिलेल्या तीन संपादकीय लेखांबद्दल पृथ्वीगीर गोसावी यांच्यावर खटला भरला गेला, तेव्हा गोसावींच्या बचावाचे काम खापर्ड्यांनी केले. तसेच सार्वजनिक सभेत वंदे वंदेमातरम् म्हटल्याबद्दल शामराव देशपांडे यांच्यावर भरण्यात आलेला खटलाही त्यांनीच देशपांड्यांच्या वतीने चालविला. अशा अनेक घटनांमुळे महाराष्ट्रातील वातावरण अधिकाधिक तप्त होत गेले. सरकारच्या वाढत्या दडपशाहीबरोबर जहाल राष्ट्रवादाचा प्रभाव दडपला जाण्याऐवजी अधिक वाढू लागला.

## नागपूर अधिवेशनाची पूर्वतयारी

अशा वातावरणात नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनाची तयारी सुरू झाली. प्रारंभी नागपूरचे दोन्ही गट परस्पर सहकार्याने अधिवेशन यशस्वी करण्यास उत्सुक होते. २२ फेब्रुवारी १९०७ रोजी डॉ. हरीसिंग गौर यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली. या स्वागत समितीच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्षपद काँग्रेसचे ज्येष्ठ मवाळ नेते गंगाधरराव चिटणवीस यांना, तर कार्यवाहाचे पद डॉ. मुंजे यांना देण्यात आले. स्वागत समितीच्या सदस्यत्वासाठी शंभर रुपये शुल्क निर्धारित करण्याचा मवाळांचा मानस होता. असे करून स्वागत समितीच्या सदस्यांची संख्या मर्यादित ठेवण्याचा मवाळांचा प्रयत्न होता. तो जहालांनी विरोध करून हाणून पाडला. पंचवीस रुपये शुल्क देणाऱ्यास स्वागत समितीचे सदस्य बनवावे असा निर्णय अखेरी घेण्यात आला.

नागपूर अधिवेशनाचे अध्यक्षपद टिळकांना द्यावयाचे आणि कलकत्त्याला झालेले महत्त्वाचे ठराव नागपूरला पुन्हा पारित करवून घ्यावयाचे असा मुंजे – खापर्डे गटाचा निर्धार होता. त्यांना डॉ. परांजपे, धुंडिराजपंत ठेंगडी, डॉ. चोळकर, डॉ. लिमये, अच्युतराव कोल्हटकर, माधवराव सप्रे इत्यादींचा पूर्ण पाठिंबा होता. या सहकाऱ्यांच्या मदतीने डॉ. मुंजे यांनी नागपूरला राष्ट्रीय मंडळाची स्थापना केली व त्याद्वारा स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षणाच्या या मागण्यांचा प्रचार केला. यावेळी कोल्हटकर संपादित असलेले 'देशसेवक' व माधवराव सप्रे यांनी एप्रिल १९०७ मध्ये सुरू केलेले 'हिंद केसरी' ही या गटाची मुखपत्रे होती. टिळकांच्या चतुःसुत्रीच्या प्रचाराला हातभार लावण्यास हेडगेवार, खानखोजे, मंडलेकर, बोबडे, कावरे इत्यादी राष्ट्रवादी विद्यार्थ्यांनी आर्यबांधववीथिका नावाचे मंडळ सुरू केले. खापर्डे आणि मुंजे आपल्या दौऱ्यांनी नागपूर जवळील भाग व वऱ्हाड अक्षरशः पिंजून टाकला. अकोला, मलकापूर, बुलढाणा, वर्धा, हिंगणघाट, जबलपूर, सागर, हौशंगाबाद, इटारसी इत्यादी अनेक ठिकाणी भाषणे देऊन त्यांनी जनमताला आकार देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. यामुळे नागपूर व अमरावतीकडील मुधोळकर, चिटणवीस, किनखेडे ही मवाळ मंडळी हवालदील होऊ लागली. एप्रिल १९०७ मध्ये रायपूरला भरलेल्या प्रांतिक परिषदेत मुंजे व खापर्डे यांना अवमानित करण्याचा मवाळांचा डाव यशस्वी झाला खरा, परंतु अधिवेशनाबाहेर झालेल्या जाहीर सभांतून त्यांना इतका अनुकूल प्रतिसाद मिळाला, की ते नागपूर अधिवेशनाचे वेळी जहाल गटाशी तडजोड केल्याखेरीज भागणार नाही हे त्यांच्या पूर्णपणे ध्यानात आले.

## नागपूरच्या स्वागत समितीतील मतभेद

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

अधिवेशनाचे अध्यक्षपद टिळकांना देण्याचा जहाल गटाचा ठाम निर्णय असला तरी तो स्वागत समितीत बहुमताने मंजूर व्हावयास हवा होता. मवाळ गट या प्रस्तावाला विरोध करेल हे डॉ. मुंजे पुरेपूर ओळखून होते. म्हणून स्वागत समितीत आपले जास्तीत जास्त सदस्य असावेत अशी मुंजे गटाची धडपड होती. जेथे अधिवेशन भरावयाचे, तेथील स्वागत समितीने तीन चतुर्थांश मताने अध्यक्ष निवडावा आणि असे न झाल्यास अध्यक्षाच्या निवडीचा निर्णय काँग्रेसच्या केंद्रीय समितीकडे सोपवावा असा नियम नुकत्याच तयार झालेल्या काँग्रेसच्या घटनेने केला होता. सप्टेंबरपर्यंत मवाळ गटाने आठशे, तर जहाल गटाने अठराशे सदस्य नोंदविल्याचे निदर्शनास आले. हे पाहून चिटणवीस व मुधोळकर गटाने स्वागत समितीच्या कार्यकारी मंडळाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. कार्यकारी मंडळाची संमती न घेता २२ सप्टेंबरला नागपूरच्या टाऊन हॉलमध्ये त्यांनी एक जाहीर सभा बोलाविली. या सभेचा उद्देश ध्यानात आल्यामुळे काही जहाल विद्यार्थ्यांनी सभेत गडबड केली. तेथे उडालेल्या गोंधळामुळे सभा होऊ शकली नाही. यामुळे निराश झालेल्या चिटणवीस व मुधोळकर यांनी नागपूरचे अधिवेशन मवाळ गटाच्या प्रभावाखाली ठेवण्याबाबतची असमर्थता मेहता, गोखले, वाछा यांना कळविली. कारण हे तिघेही चिटणवीस – मुधोळकर गट नागपूरला प्रभावी आहे अशा समजुतीखाली होते. शिवाय ते काँग्रेसच्या क्रेंद्रीय समितीचे सदस्य होते आणि नागपूरच्या मवाळ गटाचे मार्गदर्शकही होते.

## नागपूर अधिवेशन बारगळले

नागपूर अधिवेशनाच्या सिद्धतेत उपस्थित झालेला पेचप्रसंग सोडविण्याच्या हेतूने मेहतांनी नागपूरच्या दोन्ही गटांच्या पुढाऱ्यांना वाटाघाटीसाठी मुंबईला पाचारण केले. १० नोव्हेंबर रोजी त्यांच्याच बंगल्यावर बैठक झाली. घाईघाईने ही बैठक बोलविण्यात आल्यामुळे केंद्रीय समितीचे सर्व सदस्य बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत. मेहतांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला वाछा, गोखले, दाजी खरे, मुधोळकर, खापर्डे, मद्रासचे विजय राघवाचारियर इत्यादी मंडळी हजर होती. बैठकीत अध्यक्षांच्या नावावरून आणि अधिवेशनासाठी गोळा केलेला निधी कोणाच्या ताब्यात द्यावयाचा या मुद्यांवरून बराच वाद झाला. टिळक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी राहतील या समजुतीवर अनेकांनी स्वागत समितीच्या सदस्यत्वाची वर्गणी दिलेली असल्यामुळे टिळकाखेरीज इतर कुणा व्यक्तीची निवड अध्यक्षपदासाठी झाल्यास आपण स्वागत समितीच्या सदस्यांकडून गोळा केलेला निधी अधिवेशनासाठी देणे समर्थनीय ठरणार नाही अशी जहाल गटाची भूमिका होती, तर टिळकांच्या नावाला मान्यता कदापी द्यावयाची नाही असा मेहता गटाचा पक्का निर्धार होता. या पेचामुळे नागपूरला अधिवेशन न घेण्याचा निर्णय मेहतांनी विनाविलंब जाहीर करून टाकला. मद्रासच्या वतीने विजय राघवाचारियर यांनी केलेल्या आमंत्रणाकडेही त्यांनी कानाडोळा केला आणि मेहतांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या सूरतच्या प्रतिनिधींचा अधिवेशन घेण्याचा प्रस्ताव त्यांनी तातडीने संमत करून घेतला. या निर्णयामुळे मुंजे गट खट्टू झाला आणि अधिवेशन नागपूरलाच होऊ द्यावे, त्यासाठी टिळकांच्या नावाचा आपण आग्रह धरणार नाही आणि आपल्या हाती असलेला सर्व निधी आपण स्वागत समितीच्या अध्यक्षांच्या स्वाधीन करू असे अभिवचन त्यांनी गोखले व वाछांना पाठविलेल्या पत्राद्वारे दिले. परंतु झालेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यास मेहतांनी ठामपणे नकार दिला. अखेरीस मेहतांच्या प्रभावाखाली केंद्रीय समितीत घेतला गेलेला निर्णय मान्य करावा आणि सूरत अधिवेशनात सहभागी व्हावे असा टिळकांनी आपल्या समर्थकांना सल्ला दिला.

फिरोझशहा मेहतांनी अधिवेशनाचे स्थानच केवळ आपल्या मतानुसार ठरविले असे नाही तर अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी बंगालचे मवाळाग्रणी रासबिहारी घोष यांचे नावही त्यांनीच निश्चित करून टाकले. वस्तुतः हे पद लालाजींना दिले जावे अशी अनेकांची इच्छा होती. अधिवेशनापूर्वी सरकारने लालाजींना बंधमुक्त केले होते. त्यांच्या

नेतृत्वावरील काँग्रेसचा विश्वास अभिव्यक्त करण्यासाठी यावेळी त्यांना अध्यक्षपद देणे औचित्यपूर्ण ठरेल असे टिळक गटाचेही मत होते. लालाजींची लोकप्रियता यावेळी शिगेला पोचलेली असताना त्यांच्या नावाला उघड विरोध करणे मवाळ गटाला अशक्य होते. परंतु या गटाला लालाजी हे जहाल राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते म्हणून अध्यक्षपदी नको होते. हा उद्देश साधून घेण्यासाठी नामदार गोखले सूरतला गेले. तेथील स्वागत समितीच्या कार्यकारी मंडळाशी त्यांनी या मुद्यावर चर्चा केली. लालाजींकडे सरकारची वक्र दृष्टी वळलेली असताना त्यांना अध्यक्षपद देणे म्हणजे सरकारला डिवचणे होईल आणि राजकीय सुधारणांचा हप्ता अगदी हाताशी येत असता असे करणे सूज्ञपणाचे ठरणार नाही असे त्यांनी तेथील पुढाऱ्यांना पटविले आणि रासबिहारी घोषांचे नाव डावलले जाणार नाही अशी व्यवस्था केली.

## जहाल-मवाळ मतभेदांची परिसीमा

या घडामोडीवरून काँग्रेसमधील जहाल-मवाळ गटातील मतभेद पराकोटीला जात असल्याचे स्पष्ट झाले. अशा परिस्थितीत काँग्रेस फुटणार की काय अशी चिंतेची पाल अनेकांच्या मनात चुकचुकू लागली. मागील दोन अधिवेशनात मवाळ-जहालांना एकत्र ठेवण्याचे अवघड काम ना. गोखले आणि दादाभाई यांनी मोठ्या कौशल्याने केले होते. यावेळी तडजोडीची भूमिका दोन्ही गट घेतील की नाही याबद्दल अनेकांना साशंकता होती. काँग्रेस पुढाऱ्यात यावेळी भिन्न भूमिकांचे तीन गट होते. पहिला होता तो अती जहालांचा; यांचे अध्वर्यू अरविंद घोष होते. दुसरा गट होता अती मवाळांचा; या गटांचे कर्तुमकर्तुम सूत्रधार मेहता होते. ह्या दोन गटांना जवळ आणून काँग्रेसचे ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी तडजोडीला तयार असणाऱ्यांचा तिसरा गट होता; त्यात सुरेंद्रनाथ, लालाजी, टिळक व गोखले हे होते. लालाजी व टिळक जहाल राष्ट्रवादी विचारांचे पुरस्कर्ते असले तरी काँग्रेस ऐक्य कायम टिकविण्यासाठी समन्वयाची लवचिक भूमिका पत्करण्यास ते सिद्ध असत, तर गोखले व सुरेंद्रनाथ यांना जहालांचे निःशस्त्र प्रतिकाराचे मार्ग नापसंत असले तरी काँग्रेसची शकले होऊ नयेत म्हणून तेही काहीशा तडजोडीला तयार असत.

११ ऑक्टोबर रोजी गोखल्यांनी वेडरबर्न यांना लिहिलेल्या पत्रात काँग्रेसमधील मतभेद कळसाला पोचत आहेत असे कळविले व त्यामुळे काँग्रेस फुटेल की काय अशी त्यांना वाटणारी भीतीही व्यक्त केली. काँग्रेसमधील जहाल व मवाळ गटांनी परस्परांपासून फारकत घेतल्यास, ब्रिटिश नोकरशाही दोन्ही गटांना दडपल्याखेरीज राहणार नाही असे मतही त्यांनी मांडले. गोखल्यांना वाटणाऱ्या या भीतीचा सुगावा भारतमंत्री मोर्ले यांना लागताच काँग्रेस फुटल्यास भारतीयांचे कोणत्याही प्रकारे नुकसान न होता उलट कल्याणच होईल. जहालांच्या अडवणुकीच्या धोरणामुळे भारतीयांना राजकीय सुधारणा देण्याच्या मार्गात नेणारा अडथळा आपोआप दूर होईल आणि मवाळ नेते मागत असलेल्या राजकीय अधिकारांपैकी ६० ते ७० टक्के अधिकार लवकरच भारतीयांच्या पदरी टाकले जातील अशी बातमी मवाळ नेत्यांच्या कानी घालण्याची व्यवस्था मोर्लेने केली. यामुळे काँग्रेसचे ऐक्य कायम टिकविण्यासाठी समन्वयाचा मार्ग पत्करण्याची गोखले यांना वाटणारी तीव्र निकड काहीशी बोथट झाली.

## सुरत अधिवेशनाचा बोजवारा

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

सुरत हा मेहतांचा अभेद्यदुर्ग. तेथील स्वागत समितीत त्यांच्या गटाचे बहुमत होते आणि अधिवेशनाचे अध्यक्षपदही मवाळ नेत्याकडे होते. अशा परिस्थितीत सुरत अधिवेशनाची सूत्रे मवाळांच्या हाती राहणार हे निर्विवाद होते. तरीही कलकत्ता काँग्रेसमध्ये झालेले चार महत्त्वाचे ठराव या अधिवेशनात डावलले जाऊ नयेत अशी जहाल गटाची इच्छा होती. हे उद्दिष्ट साध्य करून घेण्याचा एकच मार्ग त्यांना दिसत होता, तो म्हणजे सुरत येथील लोकमताचा कौल आपल्या मागण्यांना अनुकूल बनविणे. जहाल विचारसरणीच्या प्रचारासाठी न.चि. केळकर, अच्युतराव कोल्हटकर आणि दादासाहेब खापर्डे अधिवेशनापूर्वी काही दिवस सुरतला पोहचले. खापर्डेंना गुजराथी भाषा चांगली अवगत असल्यामुळे त्यांची भाषणे विशेष परिणामकारक ठरणार होती. याच सुमारास सुरतच्या स्वागताध्यक्षांनी विषय नियामक समितीपुढे मांडावयाच्या प्रस्तावात कलकत्त्याला झालेल्या चार प्रमुख ठरावांचा अंतर्भाव केला नसल्याची बातमी पसरली. विषय नियामक समितीपुढे ठेवावयाच्या प्रस्तावांची यादी जहाल नेत्यांनी मागितली असता ती त्यांना देण्यात आली नाही. त्यामुळे ते अधिकच साशंक झाले. विषय नियामक समितीपुढे मांडले न जाणारे ठराव चर्चेसाठी पुढे मांडण्याचा अधिकार फक्त अधिवेशनाच्या अध्यक्षालाच होता आणि म्हणून जहाल राष्ट्रवाद्यांच्या दृष्टीने अध्यक्षपदी येणाऱ्या व्यक्तीला विशेष महत्त्व होते.

अधिवेशनाला प्रारंभ होण्यापूर्वी उपस्थित प्रतिनिधींच्यात चर्चेला ऊत आला. लवकरच होऊ घातलेल्या संघर्षाला समर्थपणे तोंड देण्याच्या हेतूने दोन्ही पक्षांनी मोर्चेबंदी केली. उपस्थित सदस्यांना आपल्या पक्षाकडे वळवून घेण्याचा निकराचा प्रयत्न दोन्ही गट करू लागले. अरविंदांच्या नेतृत्वाखाली प्रखर राष्ट्रवादी तरुणांचा गट जहाल राष्ट्रवाद्यांनी आपली वेगळी काँग्रेस भरवावी असे मत मांडू लागला. मवाळ राजकारणावर टीका करणारे टिळक आणि लालाजी हे मात्र काँग्रेस फोडू नये अशा मताचे होते. म्हणून सुरत अधिवेशनात उपस्थित होणाऱ्या पेचप्रसंगातून मार्ग काढण्याची खटपट टिळक आणि लालाजी करू लागले. अधिवेशनाच्या उद्‌घाटनापूर्वी त्यांनी सुरेंद्रनाथ आणि गोखले यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. परंतु कलकत्त्याला झालेले ठराव या अधिवेशनात मांडले जावेत या त्यांच्या मागणीला निश्चित होकारार्थी उत्तर त्यांच्याकडून मिळाले नाही. तेव्हा सुरेंद्रनाथांनीच यासाठी सुरत अधिवेशनांचे स्वागताध्यक्ष माळवी यांची टिळकांनी भेट घ्यावी असे सुचविले. त्याप्रमाणे माळवींची भेट घेण्याचा टिळकांनी आटोकाट प्रयत्न केला. परंतु कधी पूजेला बसले आहेत म्हणून, तर कधी कामात व्यस्त आहेत म्हणून माळवी भेट घेऊ शकत नाहीत असे टिळकांना सांगण्यात आले. त्यावरून माळवी ही भेट टाळत आहेत अशी साहजिकच टिळक गटाची धारणा बनली. यामुळे खुल्या अधिवेशनात आता मवाळांशी खडाजंगी होणार हे ओळखून अधिवेशनात आपला गट सुसंघटित असावा आणि आपल्या मागण्या दमदारपणे मांडता याव्यात म्हणून जहाल नेत्यांनी २५ डिसेंबरच्या सायंकाळी एक बैठक घेतली. त्यात काँग्रेसच्या अंतर्गत राष्ट्रीय पक्षाचा सूत्रपात केला गेला. न. चिं. केळकर हे या पक्षाचे सचिव निवडले गेले.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी स्वागताध्यक्ष माळवी यांचे स्वागतपर भाषण झाल्यानंतर त्यांनी रासबिहारी घोषांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले.त्याला दुजोरा देण्यासाठी सुरेंद्रनाथ उभे होताच काही बंगाली प्रतिनिधींनी त्यांना विरोध दर्शविण्यास इतकी आरडाओरड केली की सभा पुढे चालू ठेवणे कठीण झाले. व त्यामुळे सभेचे कामकाज स्थगित करण्यात आले. त्या दिवशी टिळक आणि लालाजी समेटाच्या हेतूने मवाळ नेत्यांशी वाटाघाटी करण्याचा पुन्हा प्रयत्न करू लागले. पण ते सर्व व्यर्थ ठरले. दुसऱ्या दिवशी अधिवेशनाचे वेळी माळवी व्यासपीठाकडे जात असताना टिळकांनी त्यांच्या हातात एक चिट्ठी दिली आणि अध्यक्षांच्या निवडीबाबत आपल्याला बोलावयाचे आहे असे त्यांना कळविले. त्यांच्या या निरोपाकडे दुर्लक्ष करून माळवींनी सभेचे कामकाज सुरू केले. टिळकांनी पुन्हा माळवींना चिठ्ठी पाठविली. त्याचीही माळवींनी दखल घेतली नाही. तेव्हा टिळक स्वतःच व्यासपीठावर चढले आणि बोलण्यासाठी ते ध्वनिक्षेपक हातात घेतात न घेतात तोच काही स्थानिक स्वयंसेवक

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

त्यांच्या अंगावर धावून गेले. हे पाहून गोखले तात्काळ उठले आणि टिळकांच्या केसालाही धक्का लागल्यास सभामंडपात रक्त सांडेल असे बजावून त्यांनी या स्वयंसेवकांना थोपवून धरले. या प्रकारामुळे सभामंडपात एकच गोधंळ उडाला. दोन्ही गट परस्परविरोधाच्या तयारीनिशी आले होते. टिळक समर्थकांनी त्यांच्याभोवती कडे केले. मंडपातील दोन्ही गटांच्या समर्थकांत झटापट सुरू झाली. खुर्च्या फेकल्या जाऊ लागल्या. हा गोंधळ चालू असताना व्यासपीठावर फेकला गेलेला एक जोडा मेहतांना लागला. शेवटी परिस्थिती आवाक्याबाहेर जात असलेली पाहून सभा विसर्जित केली गेली.

या अनुचित घटनेनंतरही समेटाची आशा पूर्णतः मावळली नव्हती. झाल्याप्रकाराबद्दल खेद व्यक्त करून रासबिहारींच्या नावाला मान्यता देण्याची तयारी टिळक गटाने दर्शविली. फक्त कलकत्त्याला झालेले चार महत्त्वाचे ठराव बारगळले जाऊ नयेत एवढीच आता त्यांची मागणी होती. मोतीलाल घोषांनी बंगालच्या अतीजहाल गटाला सबुरीचा सल्ला दिला आणि काँग्रेसचे ऐक्य टिकविण्यासाठी मध्यस्थीची पराकाष्ठा केली.परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. टिळक गटाशी बोलणी करावी असे सुरेंद्रनाथांसारख्या काही मध्यममार्गी नेत्यांचे मत होते. तशी शिफारसही त्यांनी केली. परंतु मेहतांनी ती धुडकावून लावली. भावनांच्या आहारी जाऊन तडजोड करीत राहण्यापेक्षा विभक्त होणे अधिक श्रेयस्कर आहे असे आपले ठाम मत असल्याचे त्यांनी सांगितले. सुरतची स्वागत समितीही त्यांच्याच पक्षाची असल्याने त्यांचे पारडे जड झाले व काँग्रेस फुटणे उचित नाही हे कळत असूनही गोखले आणि सुरेंद्रनाथ गप्प बसले. मात्र काँग्रेस फुटल्याची रूखरूख सुरेंद्रनाथांना सतावित होती. सुरतहून परत गेल्यानंतर सुरत अधिवेशनातील मेहतांची भूमिका लोकशाही तत्वांना हरताळ फासणारी, अरेरावीची व हेकेखोरपणाची होती असा अभिप्राय व्यक्त केल्याखेरीज त्यांना राहवले नाही.

२७ डिसेंबर रोजी उडालेल्या अभूतपूर्व गोंधळामुळे काँग्रेसचे सुरत अधिवेशन रद्द करण्यात आले. त्याच दिवशी मेहता गटाने एक पत्रक काढून सभा मोडण्याचे सर्व खापर जहाल नेत्यांच्या माथी फोडले आणि २८ तारखेला एक स्वतंत्र बैठक बोलविण्याचा निर्णय घोषित केला. २८ तारखेला झालेल्या मवाळांच्या या बैठकीला सुरत अधिवेशनासाठी आलेल्या सुमारे सोळाशे प्रतिनिधींपैकी सुमारे नऊशे प्रतिनिधी उपस्थित राहिले. या बैठकीला येण्यास जहाल राष्ट्रवादाचे काही समर्थक उत्सुक असूनही त्यांना मवाळांनी परवानगी दिली नाही. मवाळांच्या या बैठकीत कलकत्त्याला झालेल्या चार महत्त्वाच्या ठरावांचा नामनिर्देशही करण्यात आला नाही. ब्रिटिश वसाहतीत अस्तित्वात असलेली शासनव्यवस्था भारतात प्रस्थापित करणे हे काँग्रेसचे अंतिम उद्दिष्ट असावे आणि हे उद्दिष्ट सनदशीर मार्गाने टप्प्या टप्प्याने गाठले जावे असा निर्णय घेण्यात आला. हे दोन मुद्दे मान्य असणाऱ्यांनाच फक्त काँग्रेसची दारे मोकळी राहतील असे स्पष्ट करण्यात आले. त्याचबरोबर काँग्रेसची नवी घटना तयार केली जावी असे ठरविण्यात आले. हे काम मेहता,वाछा,गोखले यांच्याकडे सोपविण्यात आले.

मवाळ नेत्यांनी अशा प्रकारे जहाल राष्ट्रवादी मंडळींना काँग्रेसमध्ये सहभागी होण्यास मज्ञाव केल्यानंतर राष्ट्रीय पक्षाने आपली स्वतंत्र सभा घेतली. कलकत्त्याला झालेल्या ठरावांच्या आधारे राष्टकार्य करीत राहण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्याबरोबरच जहाल व मवाळ गटांना एकत्र आणून मोडलेली काँग्रेस पुन्हा सांधण्याचा प्रयत्न करावा या हेतूने एक समिती स्थापन करण्यात आली.

काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीमुळे बहुतेक सर्वच काँग्रेस सदस्य अस्वस्थ झाले. अविचल व स्वस्थ होत ते फक्त फिरोझशहा मेहता व त्यांचे अगदी निकटचे सहकारी. काँग्रेसच्या विभाजनामुळे टिळक अतिशय बेचैन होते. काँग्रेसमधील फूट टाळण्यास सुरत येथे टिळकांनी आटोकाट प्रयत्न केले, ते तडजोडीलाही तयार होते, परंतु



www.mpscmantra.com

मवाळांनी विशेषतः मेहतांनी तुटेपर्यंत ताणले असा अभिप्राय दोन्ही गटात मध्यस्थी करणाऱ्या मोतीलाल घोषांनी व्यक्त केलेला आढळतो. काँग्रेस दुभंगणे ही टिळकांना घोर राष्ट्रीय आपत्ती वाटली व त्यामुळे त्यांना जबर धक्का बसला असा निर्देश अरविंदांनीही आपल्या स्मृतिचित्रात केलेला आहे.

मँचेस्टर गार्डीयनचा वार्ताहर नेव्हिनसन याने सुरत अधिवेशनापूर्वी टिळकांची मुलाखत घेतली होती आणि काँग्रेसच्या व जहाल गटाच्या ध्येयधोरणाविषयी त्यांच्याशी चर्चा केली होती. या मुलाखतीचा गोषवारा आपल्या “New Spirit in India” या ग्रंथात देताना तो लिहितो, की मवाळांच्या आणि जहालांच्या उद्दिष्टांत भेद नाही, फक्त कार्यपद्धतीतील भेदामुळे जहाल हे बिरूद आपल्याला लावले जाते असे टिळकांनी त्याला सांगितले. काँग्रेसच्या उद्दिष्टासंबंधी जहाल गटाचे मवाळांशी मूलभूत स्वरूपाचे मतभेद नाहीत असे नेव्हिनसला सांगताना जहाल गट अतिरेकी नसून मवाळांशी जुळते घेण्याची त्याची तयारी आहे हे प्रतिपादित करण्याचा टिळकांचा मानस असावा. सुरत काँग्रेसला नेव्हिनसन हजर होता. २७ डिसेंबर रोजी झालेल्या राष्ट्रीय पक्षाच्या बैठकीलाही तो उपस्थित होता. त्यानेदेखील काँग्रेसचे ऐक्य टिकविण्यासाठी टिळकांनी आटोकाट प्रयत्न केले असा निर्वाळा दिला आहे. नेव्हिनसनपुढे टिळकांनी व्यक्त केलेले विचार आणि सुरत अधिवेशनात निर्माण झालेली परिस्थिती यांचा विचार करता, “भारतीय मवाळ नेते हे मवाळपणात अतिरेकी आहेत, तर जहाल नेते जहालपणात मवाळ आहेत” असा ब्रिटिश समाजवादी नेते कीर हार्डी याने व्यक्त केलेला अभिप्राय निराधार आहे असे वाटत नाही.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

प्रकरण ४

# दुभंगलेली काँग्रेस

सुरत अधिवेशनानंतर काँग्रेसचे बहुतेक सर्व सदस्य काहीशा जड अंतःकरणाने आपआपल्या स्थानी परतले. महाराष्ट्रातील जहाल गटाने स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रचाराचे सत्र सुरत अधिवेशनानंतरही चालू ठेविले. टिळकांच्या प्रेरणेने फेब्रुवारी १९०८ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक मंडळाची स्थापना चतुःसूत्रीच्या प्रचाराच्या हेतूने पुण्याला करण्यात आली. टिळकांनीही महाराष्ट्रात शहरोशहरी भेट देऊन प्रचारकार्य केले. नागपूरकडील भागात व वऱ्हाडात या कार्याची धुरा दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, बाबासाहेब परांजपे इत्यादी मंडळींनी सांभाळली. यवतमाळ, नागपूर व अमरावती ही जहाल विचारसरणीच्या प्रचाराची प्रमुख केंद्रे बनली. या सुमारास बंगालच्या तरुण क्रांतीकारांनी सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग अवलंबिला होता. ब्रिटिश अधिकाऱ्यांवर आणि त्यांच्या दमननीतीची अंमलबजावणी करणाऱ्या भारतीयांवर त्यांनी पिस्तूल व बॉम्बचा प्रयोग सुरू केला होता. यामुळे ब्रिटिश सरकार विलक्षण हादरले. मोठ्या प्रमाणावर धरपकड सुरू झाली. तरुण क्रांतिकारकांवर खटले भरले गेले. तेव्हा त्यांच्या बचावाच्या कामाला मदत करण्यासाठी महाराष्ट्रात निधी गोळा करण्याचा निर्णय महाराष्ट्रातील जहाल गटाने मे १९०८ मध्ये झालेल्या बैठकीत घेतला.

## काँग्रेसच्या ऐक्याचा प्रयत्न

सुरतहून परत आल्यानंतर टिळकांनी काँग्रेस ऐक्याचे प्रयत्नही नेटाने चालविले. मार्च १९०८ मध्ये झालेल्या पुण्याच्या जिल्हा काँग्रेसमध्ये टिळक गटाचे स्पष्ट बहुमत असूनही त्यांनी जिल्हा काँग्रेसच्या सभेची दारे सर्वांना मोकळी ठेवण्याचा सल्ला संयोजकांना दिला. बंगालमधील काही जिल्हा काँग्रेस समित्यांनी अशीच समन्वयाची भूमिका घेतली व तेथे जिल्हा स्तरावर मवाळ-जहाल एकत्र येऊ लागले. पुण्याला मात्र मवाळांची समेटाची तयारी नव्हती असे दिसून आले. एप्रिल १९०८ मध्ये धुळे येथे झालेल्या प्रांतिक काँग्रेस परिषदेवरही मवाळ गटाने बहिष्कार घातला. धुळ्याच्या स्थानिक स्वागत समितीत मात्र मवाळ व जहाल प्रतिनिधी एकत्र आले. धुळ्याच्या प्रांतिक अधिवेशनाचे अध्यक्षपद मवाळ गटात वावरणाऱ्या परंतु जहालांशी फटकून न वागणाऱ्या दाजी आबाजी खरे यांना द्यावे अशी टिळकांची सूचना होती. जहाल-मवाळ समेटाचा मार्ग यामुळे सुकर होईल अशी त्यांची समजूत होती. खऱ्यांनी हे आमंत्रण स्वीकारले. परंतु ऐनवेळी ते अधिवेशनाला येऊ शकले नाहीत. या अधिवेशनात काँग्रेस ऐक्याचा ठराव टिळकांनी स्वतः मांडला आणि हे ऐक्य घडवून आणण्यासाठी माधवराव बोडस यांच्या अध्यक्षतेखाली न.चिं.केळकर, चिं.वि. वैद्य व डी.के. देसाई यांची एक समिती स्थापना केली.

## टिळकांना कारावासाची शिक्षा

या समितीचे काम सुरू होते न होत तोच टिळकांना अटक झाल्याची बातमी महाराष्ट्रात वणव्यासारखी पसरली. काँग्रेस दुभंगल्याने ती हतबल झाल्याचा फायदा सरकारने घेतला आणि काँग्रेसबाहेर फेकले गेलेले जहाल नेतृत्व चिरडून टाकण्यासाठी सर्व दमन मार्ग अंगिकारण्यास ब्रिटिश नोकरशाहीने प्रारंभ केला. देशभर अटकसत्र सुरू झाले. बंगाल व पंजाबमधील जहाल नेत्यांना गजाआड केले गेले. अनेक नवे कायदे करून नागरिक स्वातंत्र्याची पायमल्ली केली जाऊ लागली. देशात नानाविध मार्गांनी दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. महाराष्ट्रातील जहालवादाचे पूर्णपणे निर्मूलन करण्याच्या हेतूने टिळकांना अटक करण्यात आली. आणि

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

राजद्रोहाची शिकवण देणारा लेख लिहिल्याच्या क्षुल्लक आरोपावरून सहा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावून त्यांची मंडालेच्या तुरुंगात रवानगी केली गेली. या जबर शिक्षेच्या वृत्ताने सारा महाराष्ट्र हतबुद्ध झाला. त्याबरोबरच खटल्याच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्यांच्या खंबीर व अविचल राष्ट्रनिष्ठेमुळे त्यांच्या धीरोदात्त नेतृत्वाची आगळीच छाप जनमनावर पडली. यानंतर त्यांचे छायाचित्र महाराष्ट्रात अनेकांच्या देवघरात दिसून येऊ लागले. ते महाराष्ट्राचे पूजनीय श्रद्धास्थान बनले.

टिळकांना झालेल्या जबर शिक्षेमुळे महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षाचा आत्माच जणू लुप्त झाला. तरीही खचून न जाता टिळकांनी घालून दिलेल्या मार्गाने जाण्याचा निर्धार या गटाने कायम ठेविला. "आम्ही भांडू, पण मोडणार नाही आणि तुम्ही मोडले तरी आम्ही पुन्हा जोडू." ही केळकरांनी वर्णन केलेली टिळकांची भूमिका डोळ्यांपुढे ठेवून धुळ्याला स्थापन झालेल्या समितीने ऐक्याचे प्रयत्न सोडले नाहीत. माधवराव बोडसांनी मेहता, गोखले, वाछा यांच्याशी वाटाघाटी करण्याची इच्छा प्रदर्शित केली. परंतु मवाळ नेतृत्वाने त्यांची साधी दखलही घेतली नाही. मवाळ नेत्यांच्या या दुराग्रही पवित्र्यामुळे टिळकांचे काही समर्थक संतप्त झाले. सगळा आत्मसन्मान गुंडाळून ठेवून मवाळांना शरण जाण्यात हंशील नाही, त्यापेक्षा सर्व प्रांतातील जहाल गटांची मिळून स्वतंत्र काँग्रेस भरवावी अशी सूचना डॉ. मुंजे करू लागले. यावर विचारविनिमय करण्यासाठी ७ नोव्हेंबर १९०८ ला जहाल नेत्यांची बैठक कलकत्त्याला मोतीलाल घोषांच्या घरी झाली. या बैठकीत महाराष्ट्राचे न. चिं. केळकर, चिंतामणराव वैद्य, शिवरामपंत परांजपे आणि डॉ. मुंजे उपस्थित होते, मवाळांच्या दुराग्रही भूमिकेमुळे मोतीलालही चिडलेले असले, तरी या आणीबाणीच्या वेळी भावनातिरेकात कोणताही निर्णय जहाल गटाने घेऊ नये, स्वतंत्र काँग्रेस भरविण्याचा विचार राष्ट्रहिताच्या दृष्टिने अहितकारक ठरेल, त्यामुळे भविष्यात ऐक्याचे मार्ग कायमचे बंद होतील, आणि राष्ट्रीय चळवळ दमदार होऊ शकणार नाही असे आपले मत मांडून त्यांनी समेटाचे प्रयत्न सोडू नयेत असा सबुरीचा सल्ला दिला. बंगालचे मवाळ नेते भूपेंद्रनाथ बसू समेटाला अनुकूल होते. परंतु कलकत्त्याच्या इतर मवाळ नेत्यांनी मात्र समेटाबद्दल फारशी उत्सुकता दर्शविली नाही. यामुळे महाराष्ट्रातील जहाल गटाचा स्वतंत्र अधिवेशन घेण्याचा विचार अधिक बळावला. महाराष्ट्रात जहाल गटाने काँग्रेसचे स्वतंत्र अधिवेशन घ्यावे असा आग्रह डॉ. मुंजे धरू लागले.

## नागपूरला जहालांचे अधिवेशन घेण्याचा प्रयत्न

या मुद्यावर महाराष्ट्रातील सर्व जहाल मतवाद्यांचे मत अजमाविण्यासाठी २८ नोव्हेंबर रोजी मुंबईच्या राष्ट्रमताच्या कचेरीत चिंतामणराव वैद्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील जहालांची बैठक भरली. त्यात दोनच मते विरुद्ध पडून डॉ. मुंज्यांची स्वतंत्र अधिवेशन घेण्याची सूचना मान्य झाली. बोडस आणि केळकर मात्र या निर्णयाला अनुकूल नव्हते. जहालांनी आपली वेगळी चूल मांडणे राष्टाला हितकारक ठरणार नाही असे त्यांचे ठाम होते. असे अधिवेशन आयोजित केल्यास कदाचित परप्रांतीय जहाल मंडळी अधिवेशनाला येणार नाहीत, त्यामुळे अधिवेशन यशस्वी होणार नाही. शिवाय सरकारही कदाचित या संकल्पित अधिवेशनावर बंदी घालेल असे धोक्याचे इशारे न. चि. केळकरांनी दिले आणि हा विचार सोडून देणे सर्वांच्या हिताचे ठरेल असे आवर्जून सांगितले.

तरीही बहुमताचा कौल आपल्या बाजूने असलेला पाहून डॉ. मुंजे यांनी मोठ्या उत्साहाने नागपूरला अधिवेशन घेण्याची तयारी सुरू केली. नागपूरच्या राष्ट्रीय मंडळाने अधिवेशनाच्या आयोजनाची जबाबदारी पत्करली. स्वागत समिती स्थापन झाली. सर्व प्रांतांतील जहाल गटांना अधिवेशनाचे आमंत्रण दिले गेले. अधिवेशनासाठी मंडपाचे काम सुरू झाले. स्वयंसेवकांची दले उभारण्यात आली. परंतु या सर्व उत्साहावर ११

www.mpscmantra.com

डिसेंबर रोजी विरजण पडले. नागपूरच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटने ११ तारखेला आदेश काढून या अधिवेशनावर बंदी घातली. ही बंदी उठविली जावी म्हणून डॉ. मुंज्यांनी जिवाचे रान केले. पण त्यांना यश आले नाही. अखेरीस नाइलाजाने त्यांना आपला संकल्प सोडून द्यावा लागला. यामुळे जहाल गट अधिकच खिन्न झाला. जहाल गटाचें संघटित कार्य सरकार चालू देणार नाही अशी जहालांची पक्की खात्री झाली व त्यामुळे त्यांच्यातील कार्यप्रवणता ओसरू लागली.

## महाराष्ट्रात मंदावलेली कॉंग्रेस चळवळ

१९०८ ते १९१३ च्या दरम्यान महाराष्ट्रातील जहाल राष्ट्रीय पक्षावर औदासिन्याचे व विफलतेचे सावट पसरले. खंबीर नेतृत्वाचा अभाव आणि आत्यंतिक शासकीय दडपशाही यामुळे जहाल नेत्यांच्या हालचाली मंदावल्या. नेमके याच वेळी टिळकांना झालेल्या शिक्षेविरुद्ध इंग्लंडच्या प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्याचे काम दादासाहेब खापर्ड्यांनी स्वतःच्या शिरावर घेतले असल्यामुळे ते इंग्लडला सुमारे अठ्ठावीस महिने अडकून पडले. त्यामुळे त्यांचेही नेतृत्व जहालांना यावेळी लाभले नाही. या अडचणीच्या काळात टिळक समर्थकांनी महाराष्ट्रात टिळकांची विचारसरणी मात्र जिंवत ठेवली. याचे श्रेय टिळकांच्या अनुपस्थितीत केसरीचे संपादक बनलेले न. चि. केळकर, शिवरामपंत परांजपे, नागपूर व वऱ्हाडाकडे डॉ. मुंजे, डॉ. बाबासाहेब परांजपे, दादासाहेब खापर्डे इत्यादींना आहे. त्यांनी गणपती व शिवाजी उत्सवांचे सत्र पुढे चालविले. स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षणाचा प्रचार चालू ठेवला. नागपूरला फेब्रुवारी १९१४ मध्ये साप्ताहिकाच्या रूपात 'महाराष्ट्र'चा जन्म झाला. त्याद्वारा गोपाळराव ओगल्यांनी नागपूरकडील भागात जहाल राष्ट्रवादाची ज्योत तेवत ठेवली.

या कालावधीत पूर्णतः मवाळ नेतृत्वाच्या हाती गेलेली कॉंग्रेससुद्धा हतप्रभ अवस्थेतच राहिली. जहाल राष्ट्रवाद्यांनी कॉंग्रेसला सक्रिय व ओजस्वी बनविले होते. जहाल गट कॉंग्रेसबाहेर फेकला जाताच ती निष्प्रभ आणि निष्क्रिय बनली. जहाल गट कॉंग्रेसमध्ये असताना कॉंग्रेसमध्ये रंगणारे राजकीय वादविवाद बंद पडले. विषय नियामक समितीत होणाऱ्या जोरदार चर्चा थंडावल्या. सामान्य कॉंग्रेस सदस्यांना आपल्या विचारप्रणालीकडे ओढण्यासाठी मवाळ-जहाल गटात चाललेल्या चुरशीमुळे होत असलेली तडफदार माहितीपूर्ण भाषणे या काळात नीरस व रटाळ होऊ लागली. जहाल-मवाळांच्या वैचारिक रस्सिखेचीमुळे कॉंग्रेसमधील सामान्य सदस्यातही निर्माण होणारे वैचारिक स्फुरण मंदावू लागले. १९०७ पर्यंत सगळी राष्ट्रवादी मंडळी कॉंग्रेसच्या ध्वजाखाली संघटित असल्यामुळे कॉंग्रेसचे जे थोडेफार दडपण सरकारवर येत असे, ते या काळात येईनासे झाले. कॉंग्रेस दुभंगताच जहालांच्या भूमिकेचे समर्थन करणारी बरीच मंडळी कॉंग्रेस अधिवेशनांना जाईनाशी झाली. कॉंग्रेसला कार्यप्रवण बनविण्यासाठी व तिला लोकमताचे समर्थन मिळवून देण्यासाठी लागणारे प्रेरक नेतृत्वाचे गुण मेहता, वाछा अगर गोखले यांच्यात नव्हते. यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस सामान्य सुशिक्षितांपासून दुरावू लागली. लोकजागृती व लोकशिक्षणाच्या मार्गाकडून ती पुन्हा प्रारंभीच्या अर्जविनंत्याच्या मिळमिळीत मार्गाकडे वळली. यामुळे सामान्य कॉंग्रेस सदस्यांतला उत्साह मावळू लागला आणि अधिवेशनाला येणाऱ्या प्रतिनिधींची संख्या रोडावत गेली. १९०७ सालच्या सुरत अधिवेशनाचे वेळी सुमारे सोळाशे असलेली सदस्यसंख्या रोडावत रोडावत १९१२ च्या बांकीपूर अदिवेशनाचे वेळी दोनशे सातपर्यंत घसरली. या वर्षात जनतेची गाऱ्हाणी राज्यकर्त्यांच्या कानी घालण्याचे कार्य केंद्रीय विधिमंडळाचे सदस्य असलेले ना. गोखले, बॅ. इब्राहिम रहिमतुल्ला या कॉंग्रेस नेत्यांनी केले एवढेच. राज्यकर्त्यांशी सतत संपर्क ठेवून, इंग्लंडला शिष्टमंडळे पाठवून, राज्यकर्त्यांशी युक्तीवाद करून त्यांचे मन वळवून आपला कार्यभाग साधून घेण्याचा प्रयत्न करावयाचा एवढ्यापुरती कॉंग्रेस कार्याची व्याप्ती सीमित राहिली.

www.mpscmantra.com

सुरत अधिवेशनानंतरच्या पाच वर्षात काँग्रेसची सर्व वार्षिक अधिवेशने महाराष्ट्राबाहेर मद्रास (१९०८), लाहोर (१९०९), अलाहाबाद (१९१०), कलकत्ता (१९११), बांकीपूर (१९१२) येथे झाली. या कालावधीत काँग्रेसचे दोन्ही सचिव वाछा आणि दाजी खरे हे महाराष्ट्राचे प्रतिनिधी होते. या अधिवेशनांपैकी फक्त बांकीपूर अधिवेशनाचे अध्यक्षपद अमरावतीच्या रा. ब. मुधोळकर यांना लाभले. या अवधीत झालेल्या काँग्रेस अधिवेशनात पश्चिम महाराष्ट्राकडील गोखले, मेहता, वाछा, खरे, सेटलवाड, अब्बास तय्यबजी, नारायणराव समर्थ, भाटवडेकर, देवधर, द्रवीड, तर नागपूर व वऱ्हाडकडील गंगाधरराव चिटणवीस, वामनराव कोल्हटकर, रा. ब. मुधोळकर, वासुदेव रामकृष्ण पंडित, माधवराव पाध्ये, डॉ. हरीसिंग गौर, देवराव विनायक, मोरोपंत जोशी इत्यादी मंडळी चर्चेत पुढे असत. बॅ. महमदअली जिनाही या काळात काँग्रेसमध्ये सहभागी होऊ लागले.

या अधिवेशनाच्या वेळी पारित झालेल्या अनेक ठरावांपैकी महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा असा एक ठराव नागपूर व वऱ्हाडसंबंधी होता. वऱ्हाडच्या लोकांना इतरांप्रमाणे केंद्रीय विधिमंडळात प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार मिळावा, मध्यप्रांत व वऱ्हाडचा भाग चीफ कमिशनरच्या अधिकाराखाली न ठेवता तो लेफ्टनंट गव्हर्नरच्या हाती सोपविला जावा आणि तेथे स्वतंत्र विधिमंडळ स्थापन केले जावे अशा मागण्या करण्यात आल्या. काँग्रेसमध्ये या कालावधीत स्वदेशीचा ठराव पास होत राहिला. बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे विषय मात्र कटाक्षाने वगळले गेले. ना. गोखल्यांनी केंद्रीय विधिमंडळात मांडलेल्या प्राथमिक शिक्षणाविषयीच्या प्रस्तावाला काँग्रेसने पाठिंबा व्यक्त केला. तसेच काँग्रेसची नवी घटनाही या काळात तयार करण्यात आली. काँग्रेसच्या घटनेत अंतर्भूत असणाऱ्या ध्येयधोरणांना समर्थन देणाऱ्या संस्थांनाच फक्त काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांना प्रतिनिधी पाठवता येतील अशी तरतूद या घटनेत करण्यात आली. जहालांना काँग्रेसमध्ये प्रवेश मिळू न देण्यासाठी ही तजवीज केली होती.

याच कालावधीत काँग्रेसच्या निष्क्रियतेविरुद्ध काँग्रेस अधिवेशनात टीकेचे सूरही उठू लागले. १९११ सालच्या कलकत्ता अधिवेशनाचे वेळी कटकच्या एम्. एस्. दासांनी 'स्टेट्समन'या इंग्रजी वृत्तपत्राने काँग्रेसविषयी व्यक्त केलेल्या उपहासगर्भ अभिप्रायाकडे काँग्रेस सदस्यांचे लक्ष वेधले. काही वर्षांपूर्वी भारताच्या सार्वजनिक जीवनात प्रभावशाली भूमिका बजावणारी काँग्रेस आता प्रभावी राहिलेली नाही हे सत्ताधाऱ्यांच्या ध्यानात आलेले आहे असे सांगून त्यांनी काँग्रेसला पुन्हा सक्रिय बनविण्याची निकड आग्रहाने प्रतिपादित केली. बांकीपूरच्या अधिवेशनाचे वळी केलेल्या अध्यक्षीय भाषणातून मुधोळकरांनीही काँग्रेसमध्ये आलेल्या गलथानपणाची व गतिहीनतेची जाणीव उपस्थित सदस्यांना स्पष्ट शब्दात करून दिली आणि काँग्रेसला क्रियाशील बनविण्याचे आणि अधिकाधिक लोकांना काँग्रेसकडे आकृष्ट करण्याचे महत्त्व आग्रहाने प्रतिपादित केले.

## महाराष्ट्रातील काँग्रेसमध्ये नवचैतन्य

सुरतला झालेल्या काँग्रेस विभाजनानंतर काँग्रेसमध्ये पुन्हा नवी चेतना निर्माण होऊ लागल्याची लक्षणे १९१४ साली दिसून येऊ लागली. याला दोन घटना कारणीभूत झाल्या. त्या म्हणजे जून १९१४ मध्ये टिळकांचा मंडालेचा कारावास संपून त्यांचे पुण्याला झालेले आगमन, आणि ऑगस्ट १९१४ मध्ये सुरू झालेले पहिले जागतिक युद्ध या होत. संपूर्ण ब्रिटिश साम्राज्याच्या वतीने इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केल्यामुळे भारत या युद्धात आपोआप गोवला गेला. केंद्रीय विधिमंडळातील भारतीय सदस्यांशी विचारविनिमय न करता अगर काँग्रेसच्या नेत्यांना कोणतीही माहिती न देता भारताला या युद्धात गोवण्यात आल्यामुळे सुबुद्ध भारतीय काहीसे नाराज होते. तरीही जर्मनीच्या लष्करवादाविरुद्ध लोकशाही तत्त्वांसाठी इंग्लंड लढा देत असलेले पाहून इंग्लंडला युद्धकार्यात मदत देण्यास काँग्रेस सिद्ध होती. तसा ठराव १९१४ सालच्या मद्रास येथील काँग्रेस अधिवेशनात पारितही झाला.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

पण या सहकार्याच्या सिद्धतेमागे राजकीय अधिकारांच्या मोबदल्याची कॉंग्रेसची अपेक्षा होती. या अपेक्षेला खतपाणी घालण्याचे काम यावेळी भारतात वास्तव्य करीत असलेल्या श्रीमती ॲनी बेझंट यांनी केले. राजकीय अधिकारांच्या या अपेक्षेतूनच 'होमरूल' चळवळीचा जन्म झाला.

## टिळकांची मुक्तता

युरोपात महायुद्धाला तोंड लागण्यापूर्वी काही दिवस जून १९१४ मध्ये टिळकांची मुक्तता झाली. मंडालेच्या कारावासात अनन्वित हालअपेष्टा सोसून टिळक सहीसलामत परत आल्याच्या वार्तेने महाराष्ट्रात पुन्हा नवे चैतन्य स्फुरण पावू लागले. त्यांचे अनेक समर्थक त्यांच्या भेटीसाठी पुण्याकडे धावले. मंडालेच्या तुरूंगातील सहा वर्षात टिळकांची प्रकृती बरीच खालावली असली तरी त्यांचे मन मात्र पूर्वी इतकेच खंबीर व कार्योत्सुक असल्याची जाणीव त्यांच्या समर्थकांना झाली आणि त्यांच्या मार्गदर्शनाच्या अभावी गलितगात्र झालेल्या महाराष्ट्रात त्यांच्या आगमनानंतर नवे चैतन्य सळसळू लागले अशी त्यांची खात्री झाली. टिळकांच्या सुटकेचा आनंद जाहीरपणे व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्रात गावोगावी सभा घेण्यात आल्या. नव्या स्फुरणाचा प्रत्यय महाराष्ट्रात पुन्हा स्पष्टपणे येऊ लागला.

टिळकांना त्यांच्या सहकाऱ्यांकडून देशातील राजकीय परिस्थितीची व त्यांच्या अनुपस्थितीत चाललेल्या कॉंग्रेस कार्याची माहिती मिळाली. जहाल-मवाळ समेटाचे सर्व मार्ग वांझोटे ठरल्याचे आणि कॉंग्रेसची सूत्रे पूर्णपणे मवाळांच्या हाती असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. त्यांच्या समर्थकांनी राष्ट्रीय पक्षाची विचारसरणी जिवंत ठेवली असली तरी त्यांच्या प्रचारात जोम राहिला नाही हे त्यांनी ओळखले. मवाळांच्या हातातील कॉंग्रेसमध्ये देखील पूर्वीचा उत्साह व कार्यप्रवणता राहिली नसल्याचे त्यांनी ताडले. त्याचबरोबर कॉंग्रेस श्रेष्ठी समेटाला तयार नसले तरी प्रांतिक स्तरावर जहाल-मवाळ कोठे कोठे संघटितपणे कार्य करीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तसेच बंगाल, पंजाब व संयुक्त प्रांतातील बरेच कॉंग्रेस सदस्य कॉंग्रेस ऐक्याला अनुकूल असल्याचे त्यांना कळले. कॉंग्रेसचे उदिष्ट मान्य करणाऱ्यांना कॉंग्रेसमध्ये प्रवेश द्यावा अशा मताचे गोखले आहेत आणि तसा प्रयत्न १९११ मध्ये झाला होता असेही त्यांच्या कानावर आले. शिवाय त्यांच्या सुटकेपूर्वी सातारच्या कॉंग्रेस समितीने सभा घेऊन कॉंग्रेस ऐक्याचा प्रयत्न करावा असा ठराव केला असल्याचे देखील त्यांना कळले. यावरून कॉंग्रेस ऐक्याला वातावरण अनुकूल आहे असे त्यांचे मत बनले.

कॉंग्रेस ऐक्याच्या प्रयत्नांना टिळकांच्या आगमनाने अधिक चालना मिळाली. कऱ्हाडच्या अळतेकरांनी मद्रास अधिवेशनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष सर सुब्रह्मण्यम अय्यर यांना पत्र लिहून मद्रास अधिवेशनाचे वेळी कॉंग्रेसची दारे सर्वांना खुली करण्याबाबत विचार केला जावा अशी विनंती केली. बंगालचे मोतीलाल घोषही याबाबतीत प्रत्नशील होते. १५ नोव्हेंबर १९१४ रोजी गोखल्यांना लिहिलेल्या पत्रात, "तुम्ही आणि टिळकांनी हातमिळवणी करून कार्य करावे अशी माझी तीव्र इच्छा आहे. बंगालचे नेते आता कार्यप्रवण राहिलेले नाहीत. मराठ्यांची तीक्ष्ण बुद्धी आणि राष्ट्रनिष्ठा हीच आज राष्ट्राला तारू शकतील असे माझे मत बनले आहे. तुम्ही दोघांनी आपसातील मतभेद मिटविल्यास भारतीय राजकारणात आशेचा किरण दिसू लागेल अशी आशा मोतीलालांनी व्यक्त केली आणि महाराष्ट्रातील जहाल व मवाळ यांनी एकत्र येऊन राष्ट्रकार्याचे धुरीणत्व पत्करण्याची गरज त्यांनी आवर्जून प्रतिपादन केली. टिळकही कॉंग्रेसच्या बाहेर राहून कार्य करावे अशा मताचे नव्हते. उलट भारतीय राष्ट्रवादाचे केंद्रीय व्यासपीठ असलेल्या कॉंग्रेसमध्ये प्रवेश मिळवून तिला पुन्हा कृतिशील बनविण्याचा त्यांचा कृतसंकल्प होता.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

## काँग्रेसच्या एकीकरणाचे प्रयत्न

या सुमारास जहाल-मवाळांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने श्रीमती ॲनी बेझंट पावले टाकू लागल्या. इंग्लंडच्या अडचणीच्या वेळी भारताने इंग्लंडला युद्धकार्यात आवश्यक ते सहाय्य केल्यास त्या मोबदल्यात राजकीय अधिकारांची मागणी भारतीयांना करता येईल आणि अशी मागणी सर्व भारतीयांच्या वतीने संघटित काँग्रेसच करू शकेल असा विचार त्या प्रतिपादित करू लागल्या. तसेच काँग्रेसला प्रभावशाली बनविण्यासाठी काँग्रेसमध्ये जहालांना प्रवेश दिला जावा अशी मागणीही त्या करू लागल्या. कदाचित टिळकांच्या मुक्ततेनंतर ते आपल्या निःशस्त्र प्रतिकाराच्या मार्गाचा प्रचार पुन्हा सुरू करतील, त्यांना अमाप लोकप्रियता लाभली असल्यामुळे त्यांचा जनमनावर प्रभाव पडून जहाल राष्ट्रवादी राजकारणाला उधाण येईल आणि त्यांनी अडवणुकीचे धोरण अंगिकारल्यास देशात गोंधळ माजून ब्रिटिश सरकारच्या युद्धकार्यात अडथळे निर्माण होतील अशी काहीशी भीतीही त्यांच्या मनात असावी, आणि त्यामुळे टिळकांना काँग्रेसमध्ये आणून काँग्रेसच्या ध्येयधोरणांनी त्यांना बांधून टाकण्यासाठी काँग्रेस ऐक्याचा पुरस्कार श्रीमती बेझंट यांनी सुरू केला असावा. उद्देश काही का असेना, परंतु श्रीमती बेझंट यांनी जहालांना काँग्रेसमध्ये प्रवेश मिळावा यासाठी खटपट सुरू केली हे मात्र निर्विवाद आहे.

डिसेंबर १९१४ च्या प्रारंभी काँग्रेसचे सचिव सुब्बाराव पंतलू यांच्यासह श्रीमती बेझंट टिळकांना भेटण्यास गेल्या. काँग्रेस बाबतची त्यांची भूमिका जाणून घेण्याचा आणि समेटाच्या दृष्टीने प्राथमिक स्वरूपाची बोलणी करण्याचा त्यांचा हेतू होता. टिळकांनी तत्कालीन राजकीय परिस्थितीसंबंधीची आणि समस्यांबाबतची आपली मते त्यांच्यापुढे स्पष्टपणे मांडली. त्यानंतर सुब्बाराव गोखले आणि मेहता यांना भेटले, आणि टिळकांशी झालेल्या बोलण्याचा गोषवारा त्यांनी ह्या नेत्यांना दिला. सुब्बारावांनी सांगितलेल्या वृत्तांतावरून सरकारप्रती बहिष्काराची भूमिका सोडायला टिळक तयार नाहीत आणि म्हणून त्यांना काँग्रेसमध्ये प्रवेश दिल्यास ते पुन्हा आयरिश नेत्यांसारखे अडवणुकीचे मार्ग पत्करतील असा गोखल्यांचा समज झाला. त्याच आधारावर १४ डिसेंबर रोजी गोखल्यांनी मद्रास येथे होणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष भूपेंद्रनाथ बसू यांना खाजगी पत्र लिहून टिळकांना काँग्रेसमध्ये प्रवेश दिल्यास काँग्रेसमध्ये सुसंवाद टिकणार नाही असे आपले मत असल्याचे त्यांना कळविले. गोखल्यांचे हे पत्र बसूंना अधिवेशनापूर्वी मिळाले.

## मद्रास अधिवेशन

मद्रास अधिवेशनाला आलेली बरीच मंडळी जहाल ऐक्याला अनुकूल होती. त्यामुळे काँग्रेसच्या घटनेतील विसाव्या कलमात आवश्यक तो बदल करून काँग्रेसचे दार जहालांना खुले केले जावे अशा आशयाचा प्रस्ताव विषय नियामक समितीत मांडला गेला. मोतीलाल घोष या मागणीचा जोरदार पुरस्कार करीत होते. ही चर्चा सुरू असता अध्यक्षांनी त्यांना आलेले गोखल्यांचे पत्र सदस्यांपुढे मांडले. तसेच पुण्याचे प्राध्यापक व्ही. जी. काळे आणि जी. के. देवधर यांच्यामार्फत गोखल्यांनी पाठवलेला निरोपही त्यांनी सदस्यांच्या कानी घातला, आणि टिळक आपल्या बहिष्कारयोगाला अजूनही चिकटून असल्यामुळे त्यांचा काँग्रेस प्रवेश काँग्रेसच्या दृष्टीने हितकारक ठरणार नाही असे आपले मत बनले असल्याचेही त्यांनी सांगितले. श्रीमती बेझंटना हे सर्व अनपेक्षित होते. काँग्रेसचे ध्येयधोरण मान्य करून काँग्रेस प्रवेशास टिळक उत्सुक आहेत अशी टिळकांशी बोलणी झाल्यानंतर त्यांची कल्पना झाली होती. त्यांनी ताबडतोब टिळकांना विद्युत्संदेश पाठवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी असे आवाहन केले. टिळकांनी त्याला लागलीच प्रत्युतर पाठवले. त्यात सुब्बारावांशी झालेल्या वाटाघाटीत सरकारला प्रतिकार करण्याची आपली भूमिका असल्याचे आपण मुळीच म्हटले नाही, तशी आपल्या गटाची नीतीही नाही, उलट स्थानिक शासन

www.mpscmantra.com

संस्थांतून आपल्या गटाचे लोक शासनाशी सहकार्य करीत आहेत असे त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले. टिळकांच्या या स्पष्टीकरणामुळे बसू पेचात सापडले. त्यांनी लागलीच टिळकांना पत्र पाठवून झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली. तसेच या विषयाबाबत जो गोंधळ निर्माण झाला होता, तो दूर करून या मुद्यावर निश्चित निर्णय घेण्याचे काम त्यांनी एका समितीवर सोपविले.

भुपेंद्रनाथ बसू अध्यक्षपदी असूनही त्यांनी समेटाच्या बाबतीत निर्णायक भूमिका घेतली नाही. याची दोन कारणे होती. एक तर ते समेटाच्या पक्षाचे होते आणि त्याबाबत मोतीलाल घोषांचा तगादाही त्यांच्या मागे लागला होता; तर दुसरीकडे जहालांना काँग्रेसची दारे खुली करू नयेत असे मेहतांनी त्यांना बजावले होते आणि मेहतांच्या सांगण्यावरून मुंबईच्या समर्थ वकिलांनी काँग्रेस घटनेच्या विसाव्या कलमात सुधारणा करण्यास मद्रास अधिवेशनात विरोध दर्शविला होता. अशा रस्सीखेचात निश्चित निर्णय घेण्याचे अध्यक्षांनी टाळले. परंतु काँग्रेसचे ऐक्य साधले जावे असे त्यांना वाटत असल्यामुळे काँग्रेसचे पुढील अधिवेशन कलकत्त्याला घेतले जावे असा प्रस्ताव त्यांनी मांडला. बंगालमधील बहुमत काँग्रेस ऐक्याला अनुकूल असल्यामुळे मद्रास अधिवेशनात घेतला न गेलेला जहालांना काँग्रेसची दारे उघडण्याचा निर्णय कलकत्त्याला घेतला जाऊ शकेल असे त्यांना वाटत होते. परंतु त्यांच्या प्रस्तावाला मुंबईच्या प्रतिनिधींनी विरोध केला आणि पुढील अधिवेशन मुंबईलाच घेतले जावे असा आग्रह धरला. त्यांच्या आग्रहामुळे १९१५ सालचे अधिवेशन मुंबईला घेण्याचा निर्णय पक्का झाला. अशा प्रकारे टिळकांविषयीच्या साशंकतेमुळे महाराष्ट्रातील मेहता-वाछा-गोखले गटाने जहालांच्या काँग्रेस प्रवेशाच्या मार्गात अडथळा आणला.

## टिळक- गोखले वाग्युद्ध

मद्रास अधिवेशनाचे वेळी जहालांच्या काँग्रेसप्रवेशाबाबत झालेल्या अप्रिय चर्चेला वृत्तपत्रातून मोतीलाल घोषांनी वाचा फोडली. बहुसंख्य काँग्रेस सदस्यांना काँग्रेस ऐक्य साधण्याची प्रामाणिक इच्छा असताना, बहुमताची पायमल्ली करून मवाळांनी आपलाच हेका कायम ठेवल्याबद्दल त्यांनी मेहता गटाला दोष दिला. इतकेच नाही तर टिळक राष्ट्रीय सभा ताब्यात घेतील या भीतीने समेटाच्या प्रयत्नाला मवाळांनी हेतुपुरस्सर सुरुंग लावला असा आरोप १२ जानेवारी १९१५ च्या अमृतबझार पत्रिकेच्या अंकातील लेखात त्यांनी केला. महाराष्ट्रातही या विषयावर रणधुमाळी माजली. मद्रास अधिवेशनातील चर्चेचे वृत्त टिळकांच्या कानी जाताच ५ जानेवारी रोजी केसरीत लेख लिहून त्यात, समेटाला आडकाठी करण्याच्या धोरणाचे खरे सूत्रधार मेहता व वाछा हे आहेत असे स्पष्ट विधान टिळकांनी केले. त्याबरोबर गोखल्यांनी भुपेंद्रनाथ बसूंना लिहिलेल्या पत्रातील माहिती सत्य परिस्थितीचा अपलाप करणारी आहे, त्यांच्या पत्राने भुपेंद्रनाथांची दिशाभूल केली गेली असे प्रतिपादन केले आणि गोखल्यांनी ते पत्र प्रकाशित करावे असे आव्हान दिले. टिळकांच्या या आव्हानाला यावेळी अंथरुणाला खिळून असलेल्या गोखल्यांनी गुळमुळीत उत्तर दिले. त्यावर ९ फेब्रुवारीला "चोराच्या उलट्या बोंबा" मथळ्याखाली लिहिलेल्या लेखात मेहता, वाछा व गोखले हे आपल्यावर खोटेनाटे आरोप करून आपल्याविषयी गैरसमज पसरवीत आहेत असा स्पष्ट शब्दात टिळकांनी आरोप केला आणि काँग्रेस ही राष्ट्रीय सभा आहे, ती कोणत्याही एका गटाची मक्तेदारी नाही आणि म्हणून तिचे द्वार सर्वांना मोकळे असले पाहिजे असे ठामपणे प्रतिपादन केले. टिळक असे कठोर प्रहार करीत असतानाच १९ फेब्रुवारीला गोखले कालवश झाले. त्यांच्या निधनानंतर काँग्रेस ऐक्याच्या वाटाघाटी काही काळ मागे पडल्या.

जहालांच्या काँग्रेस प्रवेशाबाबतचा काँग्रेसचा निर्णय लांबणीवर पडलेला पाहून टिळाकांनी आपल्या धोरणाची आखणी स्वतंत्रपणे सुरू केली. काँग्रेसची नाडी मेहतांच्या हाती असेपर्यंत काँग्रेस श्रेष्ठींशी ऐक्याच्या

www.mpscmantra.com

वाटाघाटी फलदायी ठरणार नाहीत याची त्यांना पूर्ण कल्पना आली. म्हणून काँग्रेस ऐक्यासाठी जिल्हा व प्रांतिक स्तरांवरून लोकमत जागृत करावे आणि त्या स्तरावरील काँग्रेस समित्यांचे दडपण काँग्रेस श्रेष्ठींवर आणून त्यांना ऐक्याचा निर्णय घेण्यास बाध्य करावे अशी व्यूहरचना टिळक करू लागले.

ब्रिटिश सरकारला युद्धकार्यात सहकार्य देण्याचाही निर्णय टिळकांनी घेतला. ब्रिटिश सरकारबाबत त्यांनी निर्धारित केलेली ही नीती त्यांच्या व्यवहार्य भूमिकेचे द्योतक होती. इंग्लंड अटीतटीच्या युद्धात गुंतलेले असताना इंग्लंडच्या युद्धकार्याला शक्य ते सहाय्य देण्याची तयारी भारतीयांनी दर्शवावी, आणि त्या मदतीचा मोबदला म्हणून स्वयंशासनाच्या अधिकाराची मागणी करणे बिनतोड ठरणार असल्यामुळे अशी मागणी करणारी देशव्यापी चळवळ आयोजित करावी असा निर्णय त्यांनी घेतला. असे मोठे जनआंदोलन उभे करता आल्यास त्यांचे सरकारवर तर दडपण येईलच, पण काँग्रेस श्रेष्ठींवरही त्याचे दडपण येईल आणि जनमताचा अनुकूल कौल पाहून अशा चळवळीला मान्यता देणे काँग्रेसला भाग पडेल असा टिळकांनी आडाखा बांधला.

## पुण्याची प्रांतिक परिषद

या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने १९१५ साली टिळकांनी मोर्चेबंदी सुरू केली. राष्ट्रीय पक्षाचे बळ अजमावण्याच्या हेतूने प्रांतिक परिषद भरविण्याचा सल्ला त्यांनी आपल्या समर्थकांना दिला. त्यानुसार मे मध्ये बॅ. बॅप्टिस्टांच्या अध्यक्षतेखाली पुण्याला प्रांतिक परिषदेचे अधिवेशन घेण्यात आले. स्वगताध्यक्षपद वयोवृद्ध महर्षी पटवर्धनांनी विभूषित केले. श्री. कृ. खाडीलकर, शि. म. खाडीलकर, शि. म. परांजपे, वासुकाका जोशी, डॉ. मुंजे इत्यादी आपल्या समर्थकांना काँग्रेसच्या ध्येयधोरणाला मान्यता देऊन काँग्रेसमध्ये जाणे मान्य नाही हे टिळकांना ठाऊक असूनही त्यांनी काँग्रेस ऐक्याचा मुद्दा अधिवेशनापुढे उपस्थित करण्याचा निर्णय घेतला. या परिषदेसाठी सदस्यांना आमंत्रित करताना, लोकमतानुसार काँग्रेसचे प्रतिनिधी निवडणे ही पूर्वपरंपरा असून पुढेही ती चालावी इतकाच आमचा प्रयत्न आहे; ही मागणी मान्य झाली की आम्ही काँग्रेसची सर्व घटना मान्य करून काँग्रेसमध्ये प्रवेश करू, असे त्यांनी जाहीर केले तसेच पुण्याच्या परिषदेला जे सदस्य उपस्थित राहतील ते काँग्रेसच्या ध्येयधोरणाला मान्यता देण्यास तयार आहेत असे समजले जाईल असेही त्यांनी जाहीर केले. ही परिषद सर्वांना खुली होती. परंतु मवाळ गट परिषदेत सहभागी झाला नाही. ८ मे रोजी पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरमध्ये ही तीन दिवसाची परिषद सुरू झाली.

अध्यक्षपदी असलेल्या बॅप्टिस्टांनी जहाल-मवाळ भेद कृत्रिम व वरवरचे आहेत, काँग्रेसची सर्व मंडळी मूलतः राष्ट्रवादी आहेत आणि म्हणून हे निरर्थक भेद मिटविणे अगत्याचे आहे असे म्हणून ऐक्याचे आवाहन केले. तसेच भारतीयांनी 'होमरूल' ची मागणी करावी व त्यासाठी भारताप्रमाणे इंग्लंडमध्येही प्रचार करावा असे मत त्यांनी पुरस्कृत केले. टिळकांनी आपल्या भाषणात समेटाच्या आवश्यकतेवर भर दिला. तसेच महायुद्धात दोस्त राष्ट्रांना यश चिंतिणारा ठरावही त्यांनी मांडला. या परिषदेत समेटाच्या उद्दिष्टाचा पाठपुरावा करण्यासाठी टिळक, बॅप्टिस्टा आणि बेळवी यांची समिती नेमण्याचा ठराव पारित केला गेला. पुण्याची ही प्रांतिक परिषद अपेक्षेबाहेर यशस्वी झाली. परिषदेला सर्व भागातून ९६० प्रतिनिधी आले होते. १९०७ नंतरच्या काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनांनाही एवढे प्रतिनिधी उपस्थित नसत. या परिषदेसाठी नागपूर व वऱ्हाडकडून दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, अळेकर, बापूजी अणे, डॉ. परांजपे, बॅ. अभ्यंकर इत्यादी अनेक मंडळी उपस्थित होती. नागपूरच्या "महाराष्ट्र" या पत्राने "देशभक्तांचा कुंभमेळा, देशभक्तीचे व देशोन्नतीचे महातीर्थ" अशा गौरवपूर्ण शब्दात या परिषदेचा महिमा विशद केला.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

आश्चर्याची गोष्ट अशी की या परिषदेनंतर दोन महिन्यांनी जुलैमध्ये पुण्यालाच मवाळांनी आपली वेगळी प्रांतिक परिषद घेतली. त्या परिषदेला उणे-पुरे दोनशे सदस्य उपस्थित होते. मेहतांच्या मतानुसार चालणारी ही मवाळ मतवादी मंडळी होती. ही मंडळी मे मध्ये टिळक गटाने आयोजित केलेल्या परिषदेत सहभागी झाली नव्हती. मे महिन्यात पुण्याला झालेली प्रांतिक परिषद ही कॉंग्रेसचे सदस्य नसलेल्या मंडळींनी भरविली असल्यामुळे ती बेकायदेशीर आहे, ती कॉंग्रेसची परिषद नाही, अशी भूमिका पुण्याच्या मवाळ नेत्यांनी घेतली होती. आणि हेच कारण पुढे करून ते टिळक गटाने आयोजित केलेल्या परिषदेत सहभागी झाले नव्हते. या दोन परिषदांना उपस्थित असलेल्या सदस्यांची संख्या बोलकी होती. लोकमत मवाळ नेतृत्वामागे नसून ते जहालांच्या पाठीशी आहे हे या परिषदांनी सिद्ध केले. मवाळ नेतृत्वाला लोकमताचा आधार नाही या सत्यपरिस्थितीवर पांघरूण घालण्यास "आमचा पक्ष अल्पसंख्य असला तरी महत्त्वाचा आहे" असे विधान जुलैमधील परिषदेच्या स्वागताध्यक्षांनी केले खरे, परंतु त्यांना सामान्य जनतेच्या डोळ्यात धूळ फेकता आली नाही. पुण्याच्या प्रांतिक परिषदेने जहाल विचारसरणीला असलेला लोकमताचा पाठिंबा तर स्पष्ट केलाच त्याशिवाय टिळक गटाची समन्वयाची भूमिकाही जनतेच्या ध्यानात आणून दिली. कॉंग्रेस ऐक्यात अडसर केवळ मवाळ नेतृत्वाचा आहे याची पूर्ण जाणीव सुबुद्ध कॉंग्रेस सदस्यांना यावेळी झाली.

## नागपूरची प्रांतिक परिषद

मेहता गटाने पुण्याला मवाळांची जशी स्वतंत्र प्रांतिक परिषद घेतली, तशीच नागपूर व वऱ्हाडकडील मवाळांची प्रांतिक परिषद घेण्याचा अमरावतीच्या रा.ब. मुधोळकरांचा विचार होता. परंतु डॉ. मुंजे यांनी त्यांना या विचारापासून परावृत्त केले आणि जहाल-मवाळांची संयुक्त परिषद घ्यावी अशी त्यांना गळ घातली. वऱ्हाडातील जहाल-मवाळ नेतृत्वात कोणत्याही प्रकारे वैमनस्य निर्माण झालेले नसल्यामुळे मुंज्यांची कल्पना सर्वांनी उचलून धरली. गंगाधरराव चिटणवीस, डॉ. हरीसिंग गौर, सर मोरोपंत जोशी ही ज्येष्ठ मंडळीही परस्पर सहकार्यास तयार झाली. मुंजे, खापर्डे यांच्या सहकार्याखेरीज प्रांतिक परिषद यशस्वी होणार नाही याची पूर्ण कल्पना येथील मवाळ नेत्यांना होती. त्यामुळे स्वागत समितीवर दोन्ही गटांचे प्रतिनिधी घेण्यात कोणताच प्रत्यवाय आला नाही. त्यामुळे स्वागत समितीच्या अध्यक्षपदी नागपूरचे ज्येष्ठ नेते गंगाधरराव चिटणवीस, कार्याध्यक्षपदी बिपिन कृष्ण बोस, तर परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणून डॉ. गौर आणि कार्यवाह म्हणून डॉ. मुंजे यांची बिनविरोध निवड झाली. परिषदेच्या संयोजकांनी गावोगावी दौरे करून प्रांतिक परिषदेचे प्रयोजन जनतेला समजावून सांगितले आणि मोठ्या संख्येने प्रतिनिधी पाठविण्याचे आवाहन केले. रा. ब. मुधोळकर, मोरोपंत जोशी, वासुदेवराव पंडित, नारायणराव अळेकर, भवानी शंकर नियोगी इत्यादी अनेकांनी परिषदेच्या संयोजनाला उत्साहाने हातभार लावला. प्लेगची साथ असूनही परिषदेसाठी ११४७ प्रतिनिधी नागपूरला आले. विशेष म्हणजे हे प्रतिनिधी टिळक पुरस्कृत करीत असलेल्या तत्त्वाप्रमाणे सार्वजनिक संस्थांनी जाहीर सभा घेऊन निवडलेले प्रतिनिधी होते. तोवर झालेल्या एकाही प्रांतिक परिषदेला इतक्या मोठ्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित राहिले नव्हते.

अधिवेशनाच्या कामकाजातही पूर्ण सुसंवाद होता. सर्वांनी वादग्रस्त मुद्दे टाळून परिषद यशस्वी करण्याचा निर्धार केलेला दिसला. चर्चेच्या वेळी केवळ प्रांतिक समस्यांवर भर देण्यात आला. बिशनदत्त शुक्ला यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपसातील मतभेद विसरून दोन्ही गट सहकार्याला प्रवृत्त झाल्याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले आणि अशीच विवेकी भूमिका राष्ट्रीय नेत्यांनी पत्करल्यास राजकीय अधिकार मिळविणे कठीण होणार नाही असे मत व्यक्त केले. या परिषदेतील उल्लेखनीय बाब म्हणजे द्वारकाबाई देऊस्कर आणि मथुराबाई द्रविड व सुविद्य

www.mpscmantra.com

महिलांनी अधिवेशनातील चर्चेत भाग घेतला. या परिषदेने जहाल व मवाळ गटांच्या एकीकरणांची भूमिका तयार केली. तर परिषदेच्या वेळी जहालांनी काँग्रेसचे ध्येयधोरण मान्य केले, तर परिषदेला येणारे प्रतिनिधी लोकनिर्वाचित असावेत ही जहालांची मागणी मवाळांनी मान्य केली.

मात्र अशी तडजोडीची भूमिका घेण्याची मेहता गटाची अजूनही तयारी नव्हती. १९१५ चे काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन मुंबईला भरावयाचे होते. टिळकांनी या अधिवेशनाला उपस्थित राहावे अशी दाजी आबाजी खरे यांची इच्छा होती. त्या दृष्टीने त्यांनी हालचालही केली. टिळकांना खाजगीरीत्या पत्र पाठवून त्यांनी मुंबई अधिवेशनाला यावे अशी विनंती केली. परंतु मेहता मात्र गप्प होते. काँग्रेस घटनेतील विसाव्या कलमात बदल करून जहालांच्या काँग्रेस प्रवेशाला मवाळांनी अधिकृतरीत्या मान्यता दिल्याखेरीज काँग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहावयाचे नाही असा टिळकांचाही निर्धार होता. तशी सूचना त्यांनी आपल्या समर्थकांनाही केली. मात्र काँग्रेसच्या घटनेतील विसाव्या कलमात बदल करणारा ठराव नागपूर व वऱ्हाडच्या मवाळ सदस्यांनी मुंबईच्या अधिवेशनात पारित करवून घ्यावा असे टिळकांनी सुचविले. त्याचबरोबर श्रीमती बेझंट आणि बॅ. जिना यांना पत्रे लिहून काँग्रेस ऐक्यासंबंधीची आपली भूमिका त्यांनी तपशीलात विशद केली.

## मुंबई अधिवेशन

या पार्श्वभूमीवर मुंबई येथे १९१५ साली झालेले काँग्रेसचे अधिवेशन अतिशय महत्ताचे ठरले. १९०४ नंतर प्रथमच म्हणजे अकरा वर्षानंतर काँग्रेसचे अधिवेशन महाराष्ट्रात भरत होते. स्थानिक नेते मोठ्या उत्साहाने अधिवेशनाच्या तयारीला लागले. जिल्हा स्तरावरील काँग्रेस सदस्यांनी आपआपल्या भागात सभा संमेलने घेऊन काँग्रेस अधिवेशनाची माहिती प्रसृत केली त्यामुळे २२६९ प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित राहिले. काँग्रेसच्या यापूर्वीच्या कोणत्याही अधिवेशनाला इतक्या मोठ्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित राहिले नव्हते. वाछा स्वागताध्यक्ष होते. अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळातील भूतपूर्व विधिसदस्य सत्येंद्रप्रसाद सिन्हा यांची निवड झाली होती.

याच सुमारास मुस्लीम लीगचे अधिवेशनही मुंबईला भरणार होते. १९१२ साली लीगने आपल्या घटनेत व ध्येयधोरणात महत्त्वाचा बदल केला होता. ब्रिटिश वसाहतींना असलेले राजकीय अधिकार भारतासाठी मिळविणे हे त्यांनी आपले ध्येय निश्चित केले होते आणि या उद्दिष्ट प्राप्तीसाठी काँग्रेसशी सहकार्याची तयारी दर्शविली होती. लीगच्या या बदललेल्या भूमिकेचे स्वागत करणारा ठराव १९१३ सालच्या काँग्रेस अधिवेशनात पास करण्यात आला होता. तेव्हापासून या दोन संघटनांत परस्पर सहकार्य वाढू लागले होते. विचारांची देवाण-घेवाण सुरू झाली होती. याचे फलित म्हणून काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी लीगचे अधिवेशन मुंबईला घेण्याचा निर्णय लीगने घेतला होता. यामुळे मुंबई अधिवेशनाचे वेळी दोन्ही संघटनाचे कार्यकर्ते खेळीमेळीच्या वातावरणात काम करीत होते. काँग्रेस व लीगच्या स्थानिक स्वयंसेवकांनी या दोन्ही संघटनांच्या अधिवेशनात जोडीने काम करण्याचा निर्णय घेतला. लीगने तोवरचा काँग्रेसविरोध सोडून राष्ट्रैक्याचे ध्येय मान्य केल्याची ही साक्ष होती.

मुंबई अधिवेशनाच्या सिद्धतेसाठी काही ब्रिटिश अधिकाऱ्यांचाही हातभार लागला. या कालावधीत ब्रिटिश सरकारने भारतीयांच्याबाबत बरेच सौम्य व सहानुभूतीचे धोरण पत्करले होते. युद्धकार्याला भारताकडून होणाऱ्या मदतीचे महत्त्व राज्यकर्ते ओळखून असल्यामुळे दडपशाहीचे मार्ग सरकारने बाजूला सारले होते आणि भारतीयांच्या समस्यांचा सहानुभूतीने विचार करण्याची तयारी राज्यकर्ते दाखवीत होते. या बदललेल्या शासकीय धोरणाचा

www.mpscmantra.com

सुखद प्रत्यय मुंबई अधिवेशनाच्या संयोजकांना आला. अधिवेशनाच्या आयोजनात शासनाकडून बहुधा होणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अडवणूक तर यावेळी झाली नाहीच, उलट काही ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अधिवेशनाच्या तयारीसाठी मदतीचा हात दिला. शासकीय धोरणात झालेल्या या परिवर्तनामुळे भारतीयांच्या राजकीय अधिकारांच्या मागणीचाही ब्रिटिश सरकार सहानुभूतीने विचार करेल अशी आशा अनेकांना वाटत होते. श्रीमती बेझंट, बॅ. बॅप्टिस्टा आणि टिळक हे होमरूलच्या मागणीचा प्रचार करीत होते. यामुळे जनमनात नव्या आशा पल्लवित होत होत्या.

अशा या उत्साहाच्या वातावरणाला गालबोट लागले ते अधिवेशनाच्या काही दिवस पूर्वी झालेल्या फिरोझशहा मेहतांच्या निधनाने. नोव्हेंबर मध्ये त्यांच्या झालेल्या अनपेक्षित मृत्यूमुळे अधिवेशनाच्या संयोजकांना धक्का बसला. मुंबईच्या राजकीय क्षेत्रात त्यांचा मोठा प्रभाव होता. शिवाय मुंबईला अधिवेशन घेण्याचा त्यांचाच आग्रह होता. अध्यक्षांचे नावही त्यांत्याच मतानुसार निश्चित झाले होते. अधिवेशनाची तयारी सुरळीतपणे होण्याचे बरेच श्रेय मेहतांना होते. त्यामुळे त्यांच्या निधनाने स्थानिक नेत्यांच्या उत्साहावर साहजिकच विरजण पडले. यापूर्वी काही महिने गोखलेही दिवंगत झाले होते. मुंबई अधिवेशनाला या दोन अग्रगण्य राजधुरीणांची अनुपस्थिती जाणवणार होती. अनेक वर्षानंतर महाराष्ट्रात होणाऱ्या काँग्रेस अधिवेशनात महाराष्ट्राच्या या आघाडीच्या नेत्यांची उणीव भासणार होती. तरीही काँग्रेसच्या कामकाजाचा गाडा स्थानिक नेत्यांनी कोठे अडू दिला नाही.

अधिवेशनाचे अध्यक्ष सत्येंद्रप्रसाद सिन्हा यांचे भाषण फारसे प्रेरक असे झाले नाही. किंबहुना मवाळ सदस्यांनाही मिळमिळीत वाटावे असेच त्यांचे भाषण झाले. याचे मुख्य कारण म्हणजे काँग्रेसच्या चळवळीत ते कधीच सहभागी झालेले नसल्यामुळे जनतेच्या आशा आकांक्षांची त्यांनी माहिती नव्हती. त्यांनी आपल्या भाषणात स्वयंशासनाच्या मागणीचा उच्चार केला. उत्तम शासन हे स्वयंशासनाचा पर्याय ठरु शकत नाही असेही त्यांनी प्रतिपादन केले. मात्र हे उद्दिष्ट राज्यकर्त्यांना न दुखावता, त्यांच्या कलाने साध्य करण्याचा काँग्रेसने प्रयत्न करावा असा सल्ला त्यांनी दिला.

या अधिनेशनात सत्तावीस ठराव पास करण्यात आले. या ठरावांवर विषय नियामक समितीत उत्साहाने चर्चा झाली. भारतीयांना साम्राज्यरक्षणाच्या कार्यात सहभागी होता यावे यासाठी त्यांना शस्त्रास्त्रे बाळगण्याची परवानगी दिली जावी, आणि भारतीयांची स्वतंत्र लष्करी व नाविक दले उभारली जावीत अशी मागणी न्या. चंदावरकर आणि मोरोपंत जोशी यांनी केली. भारतीयांना स्वयंशासनाचे अधिकार देण्याच्या उद्दिष्टाने आवश्यक त्या घटनात्मक सुधारणा लवकर केल्या जाव्या अशा आशयाचा ठराव रा. ब. मुधोळकरांनी मांडला. भारताला आर्थिक क्षेत्रातही स्वायत्ततेचे अधिकार दिले जावे अशी मागणी करणारा ठराव मांडताना पुण्याच्या व्ही. जी. काळे यांनी रानड्यांच्या आर्थिक विचारप्रणालीचा आवर्जून निर्देश केला. वेठबिगारीची पद्धत म्हणजे एकप्रकारची गुलामगिरीच असल्यामुळे ही प्रथा बंद करण्यास सरकारने आवश्यक ती उपाययोजना करावी अशी मागणी करण्यात आली. मुंबईच्या के. एच्. वकीलांनी देशाच्या औद्योगिक विकासाची निकड प्रतिपादित केली व त्यासाठी शासकीय मदतीचे आवाहन केले. विद्यार्जनासाठी इंग्लंडला जाणाऱ्या भारतीयांपुढील अडचणी रँगलर परांजपे यांनी स्पष्ट केल्या, तर त्या अडचणीचे निराकरण करण्याची मागणी इंग्लंडहून उच्च शिक्षण घेऊन स्वदेशी नुकत्याच परतलेल्या डॉ. जिवराज मेहतांनी केली. सर्वात महत्त्वाचा ठराव काँग्रेस घटनेतील विसाव्या कलमात बदल करण्यासंबंधी होता. दोन वर्ष कार्य केलेल्या कोणत्याही सार्वजनिक संस्थेला आपले निर्वाचित प्रतिनिधी काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाला पाठविता येतील अशी तरतूद पंचविसाव्या ठरावानुसार करण्यात आली; फक्त एका संस्थेने पंधरापेक्षा अधिक प्रतिनिधी पाठवू नयेत असे बंधन घालण्यात आले. या ठरावाने जहाल गटाची काँग्रेस प्रवेशासंबंधीची मागणी अंशतः

अनुक्रमणिका

पूर्ण केली आणि त्यांच्या काँग्रेस प्रवेशाचा मार्ग मोकळा केला. या ठरावाइतकाच एकोणिसावा ठराव देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने अर्थपूर्ण होता. मुस्लीम लीग आणि काँग्रेसने राजकीय अधिकारांची मागणी करणारी योजना तयार करण्यासाठी आपल्या समित्या स्थापन कराव्या, या समित्यांनी परस्पर विचारविमर्ष करून स्वयंशासनाच्या तत्त्वावर आधारित एक योजना तयार करावी आणि ही योजना पुढील वर्षी काँग्रेस अधिवेशनापुढे मान्यतेसाठी मांडली जावी अशी या ठरावातील तरतूद होती.

मुंबई अधिवेशनापूर्वी झालेल्या गोखले आणि मेहतांच्या निधनामुळे काँग्रेसवर असलेली मवाळ गटाची पकड सैल झाली आणि याचवेळी काँग्रेसची दारे जहालांना मोकळी केली गेल्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेस नेतृत्वाची सूत्रे टिळक गटाच्या हाती जाणार हे स्पष्ट झाले. या दोन मवाळाग्रणींच्या मृत्यूमुळे काँग्रेसच्या राष्ट्रीय स्तरावरील मवाळ गटाचे कित्येक वर्षे महाराष्ट्राकडे असलेले नेतृत्व नाहीसे झाले. त्यांच्या निधनाबरोबर महाराष्ट्रातील मवाळ विचारसरणीचा ओघ आटत गेला. मवाळ नेतृत्वाची धुरा यानंतर महाराष्ट्राबाहेरील नेत्यांनी उचलली.

### फिरोझशहांचे व्यक्तिमत्त्व

फिरोझशहा मेहता आणि ना. गोखले यांच्या मृत्युमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली. मेहतांचे प्रभावशाली, रुबाबदार व्यक्तिमत्त्व, मुंबई नगरपालिका आणि मुंबई विद्यापीठाच्या कामकाजात त्यांनी सतत घातलेले लक्ष, मुंबईच्या धनिक वर्गाशी त्यांचे असलेले निकटचे संबंध, सरकारी अधिकाऱ्यांशी त्यांचा असलेला संपर्क, ब्रिटिश न्यायप्रियतेवर श्रद्धा असूनही अन्याय शासकीय निर्णयांवर त्यांनी अनेकदा पारजलेले टीकास्त्र, या अनेक गोष्टींमुळे मुंबई इलाख्यातील राजकीय वर्तुळात त्यांचा विलक्षण दरारा असे. त्यांची मते अनेकदा न पटली तरी त्यांच्या विरुद्ध जाण्याचे धाडस करणारे काँग्रेस सदस्य हाताच्या बोटावर मोजण्याइतके थोडे होते. काँग्रेस अधिवेशनांना ते नियमितपणे जात नसत. तरीही उपस्थित सदस्यांना त्यांचे अस्तित्व जाणवे. त्यांना उघडपणे विरोध करण्याचे धैर्य महाराष्ट्रात फक्त टिळकांनी दाखविले, महाराष्ट्रात लोकमताचा अमाप पाठिंबा टिळकांना मिळाला असला तरी मुंबई हा मेहतांचा बालेकिल्ला टिळक जिंकू शकले नाहीत. टिळक लाटेला महाराष्ट्रात काही अंशी अडसर घातला तो प्रभावशाली मेहतांनी. हा अडसर दूर होताच महाराष्ट्रातील काँग्रेस काबीज करणे टिळक गटाला सुकर झाले.

### ना. गोखल्यांचे योगदान

ना. गोखल्यांच्या देहावसानाने निर्माण झालेली उणीव भिन्न स्वरूपाची होती. पुण्याहून सार्वजनिक कार्याला प्रारंभ करून लंडनपर्यंत त्यांनी आपले कार्यक्षेत्र व्यापक केले होते. न्याय. रानड्यांच्या पायाशी बसून राजकारणाचे पहिले धडे घेत, त्यांच्याच प्रोत्साहनाने गोखले राजकारणात पुढे आले आणि आपल्या गुरूच्याच गटात मिसळून गेले. वस्तुतः ते रानड्यांच्या नंतरच्या म्हणजे टिळकांच्या पिढीतले. परंतु ऋजू प्रकृतीच्या गोखल्यांना टिळकांचे प्रखर राजकारण मानवले नाही. त्यामुळे समान ध्येयाने प्रेरित होऊनही गोखल्यांचे कार्यक्षेत्र आणि कार्यपद्धती भिन्न झाली. निःस्वार्थ राष्ट्रसेवेचे व्रत टिळकांप्रमाणे गोखल्यांनीही आजन्म चालविले. परंतु टिळकांना लाभलेली लोकमान्यता गोखल्यांना मिळाली नाही. लोकसंघटनेचे महत्त्व ओळखून लोकसंघटन करणारे बहिर्मुख वृत्तीचे टिळक लोकमान्य बनले. अंतर्मुख असलेले गोखले मात्र लोकांपासून दूर राहून अध्ययनात गढून गेले. जनकल्याण्याच्या विषयांचा सांगोपांग अभ्यास करून, भरपूर आकडेवारीच्या भक्कम आधाराने आपल्या मागण्या तर्कशुद्ध व बिनतोड युक्तिवादाने राज्यकर्त्यांच्या दरबारी मांडण्यात त्यांचा हात धरणारी दुसरी व्यक्ती त्यावेळी



www.mpscmantra.com

भारतात नव्हती. अंदाजपत्रकांचे विश्लेषण करण्यात व त्यावर अर्थगर्भ भाष्य करण्यात त्यांचा इतका हातखंडा होता की त्यांच्या इतके मुद्देसूद व माहितीपूर्ण भाषण ब्रिटिश पार्लमेंटमध्ये देखील क्वचित ऐकू येते असे शिफारसपत्र त्यांना लॉर्ड कर्झनने दिलेले आढळते. त्यांची भूमिका जणू काँग्रेस आणि राज्यकर्ते यांच्यातील दुभाष्याची होती. केंद्रीय विधिमंडळातील त्यांच्या नेत्रदीपक कार्यामुळे त्यांची नामदाराची भूमिका जनममनावर विशेष ठसली व ते नामदार म्हणूनच ओळखले जाऊ लागले. स्वकीयांच्या मागण्या चिकाटीने राज्यकर्त्यांच्या कानी घालणारा, देशबांधवांवर होणाऱ्या अन्यायाला राजदरबारी वाचा फोडणारा, शासकीय दमननीतीवर टीकेचे प्रहार करण्यास न कचरणारा आणि तरीही परकीय प्रशासकांकडून प्रशस्तीपत्र मिळविणारा गोखल्यांसारखा नेता दिवंगत झाल्याने महाराष्ट्राचीच केवळ नव्हे तर संपूर्ण देशाची हानी झाली.

फिरोजशहा मेहता आणि गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मृत्युबरोबर महाराष्ट्राच्या काँग्रेस चळवळीतील एका पर्वाचा अंत झाला. मवाळ राजकरणाचे युग संपुष्टात आले, आणि काँग्रेसची सूत्रे जहाल गटाच्या हाती येऊ लागली. नेमके याच सुमारास टिळकांनी होमरूल चळवळींची मुहूर्तमेढ रोवली आणि या चळवळीला व्यापक जनमताचा आधार मिळवून देऊन ते लोकमान्यतेच्या शिखरावर पोचले. हा टिळक युगाच्या भरतीचा काळ ठरला.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

प्रकरण ५

# टिळक युग

१९१६ हे वर्ष महाराष्ट्रातील काँग्रेसच्या इतिहासातील एक अतिशय महत्त्वाचे वर्ष ठरले. या वर्षी टिळकांनी महाराष्ट्रात होमरूल चळवळीचा श्रीगणेशा केला. याच वर्षी १९०७ साली झालेली मवाळ-जहाल फारकत संपून काँग्रेस एकसंघी बनली. जहालांच्या काँग्रेसप्रवेशाबरोबर ही संघटना खऱ्या अर्थाने राष्ट्रीय संघटना बनली. टिळकांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाचा व राजकीय विचारप्रणालीचा प्रभाव काँग्रेसवर पडू लागला. काँग्रेस चळवळीतील टिळक युग भरास आले.

मुंबई येथे १९९५ साली अधिवेशन चालू असताना टिळकांनी होमरूलसंबंधी केसरीतून लेख प्रकाशित केले. काँग्रेसने ही मागणी उचलून धरावी असा त्यांचा प्रयत्न होता. या विषयावर वाटाघाटी करण्यास त्यांनी सी. वाय. चिंतामणी सारख्या परप्रांतीय मवाळ नेत्याला पुण्याला आमंत्रित केले. मुंबई अधिवेशनात श्रीमती ॲनी बेझंट यांनी मांडलेला होमरूलचा प्रस्ताव मान्य न झाल्याचे कळल्यानंतर ती चळवळ काँग्रेसबाहेर आयोजित करण्याचा आणि तिला व्यापक लोकमताचा आधार मिळवून देऊन काँग्रेसला ती मान्य करण्यास भाग पाडण्याचा त्यांनी निर्णय घेतला. हेच तंत्र त्यांनी स्वदेशी व बहिष्काराच्या प्रचाराच्या वेळीही अंगिकारले होते. देशातील वातावरण होमरूलची चळवळ उभी करण्यात अनुकूल आहे असा त्यांचा कयास होता. ॲनी बेझंटही या मागणीचा हिरीरीने पुरस्कार करीत होत्या. भारतमंत्र्याच्या कौन्सिलचे सात वर्षे सदस्य राहिलेले कृष्ण गोंविद गुप्ता यावेळी निवृत्त झाले होते आणि तेही इंग्लडंमध्ये भारतासाठी होमरूलची मागणी करीत होते. परंतु ही मागणी अधिक परिणामकारक होण्यास ती काँग्रेसच्या व्यासपीठाने अधिकृतरीत्या करणे आवश्यक आहे असे टिळकांना वाटत होते, आणि त्यासाठी जहालांचा काँग्रेस प्रवेश त्यांना अत्यावश्यक वाटत होता.

## बेळगावाची प्रांतिक परिषद

मुंबई अधिवेशनात काँग्रेस घटनेच्या विसाव्या कलमात बदल करण्यात आल्याचे कळताच, काँग्रेस प्रवेशाबाबत निर्णय घेण्याच्या हेतूने पश्चिम महाराष्ट्र आणि नागपूर व वऱ्हाडातील आपल्या समर्थकांना टिळकांनी बेळगाव येथे व्हावयाच्या प्रांतिक परिषदेला बोलविले. दादासाहेब खापर्ड्यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल १९१६ मध्ये भरलेली ही परिषद महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीला कलाटणी देणारी घटना ठरली. मुंबई काँग्रेसने केलेल्या पंचविसाव्या ठरावाच्या आधारे काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यास डॉ. मुंजे, खाडीलकर, शिवरामपंत परांजपे हे टिळक समर्थक तयार नव्हते. परंतु आपल्या युक्तिवादाने त्यांचा विरोध टिळकांनी खोडून काढला. तेव्हा "काँग्रेस प्रवेशाचा निर्णय घेण्यात तुमची चूक होते आहे. परंतु तुमच्या निर्णयाविरूद्ध मी जाणार नाही" असे टिळकांना सांगून मुंजे काँग्रेस प्रवेशाला तयार झाले. बेळगावच्या परिषदेत शेवटी काँग्रेस प्रवेशाचा ठराव टिळकांनीच मांडला आणि तो पारित झाला. काँग्रेस प्रवेशासंबंधी काँग्रेसच्या पंचविसाव्या ठरावाने केलेली तरतूद असमाधानकारक असली तरी त्यामुळे काँग्रेसबाहेर राहणे राष्ट्रहिताला बाधक ठरेल, काँग्रेसच्या ध्येयधोरणाला मान्यता देणे म्हणजे विरोधकांपुढे शरणागती पत्करणे नव्हे, उलट त्यामुळे राष्ट्रकार्य प्रभावीपणे करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे अशी त्यांची धारणा होती. बेळगाव परिषदेने हा ठराव पास केल्याचे कळताच काँग्रेसच्या पुढील अधिवेशनापासून ही संघटना टिळकांच्या हाती जाणार असे भाकित टाईम्स ऑफ इंडियाने वर्तविले. हे पाहून टिळकांचा काँग्रेसप्रवेशाचा निर्णय अचूक असल्याची त्यांच्या समर्थकांची खात्री पटली.

www.mpscmantra.com

*

याच सुमारास ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्र आणखी एका ज्येष्ठ नेत्याला मुकला. ते होते दाजी आबाजी खरे! खरे यांची मूळ प्रवृत्ती समन्वयवाद्याची. टिळकांचे जहाल राजकारण त्यांनाही मानवले नाही आणि म्हणून ते मवाळ गटात राहिले. परंतु याचा अर्थ मेहता गटाचे अती मवाळ राजकारण त्यांना पूर्णपणे पटत होते असा नाही. काँग्रेसमध्ये निर्माण झालेल्या अनेक पेचप्रसंगांचे वेळी त्यांनी मध्यस्थाची भूमिका यशस्वीपणे केली. जहाल-मवाळ अडकून पडलेले अनेक ठराव त्यांच्या मध्यस्थीमुळे पास झाले. मवाळ गोटात राहूनही टिळकांच्या लोकजागृतीच्या कार्यात ते अधून मधून सहभागी होत. वाछांबरोबर त्यांनी १९०८ ते १९१४ पर्यंत काँग्रेसचे सचिवपद सांभाळले होते. गोखल्यांच्या पाठोपाठ एका वर्षात झालेल्या खऱ्यांच्या मृत्यूने टिळकांना धक्का बसला. तरीही उदंड उत्साहाने त्यांनी होमरूल आंदोलनांचे उत्तरदायित्व आपल्या खांद्यावर घेतले.

## होमरूल लीगची स्थापना

एप्रिल १९१६ च्या बेळगावच्या प्रांतिक परिषदेत होमरूल लीगच्या स्थापनेची घोषणा केली गेली. बॅ. बॅप्टिस्टा हे या संघटनेचे अध्यक्ष आणि न. चि. केळकर सचिवपदी निवडले गेले. ह्या संघटनेच्या सदस्यांनी आपआपल्या विभागात जिल्ह्याजिल्ह्यातून होमरूल समित्या स्थापन करून प्रचाराचा धडाका सुरू करावा असे सर्वानुमते ठरले. काँग्रेसच्या पुढील अधिवेशनापूर्वी ही चळवळ दमदार बनवावयाची असा टिळक गटाचा निर्धार होता. या हेतूने ऑक्टोबर १९१६ मध्ये अहमदाबादला भरलेल्या प्रांतिक परिषदेला टिळक उपस्थित राहिले. बॅ. जिनांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या अधिवेशनात टिळक फारसे बोलले नाहीत. तरी त्यांच्या उपस्थितीचा प्रभाव अधिवेशनावर पडलेला आढळून आला. जहाल गटाने मांडलेले अनेक ठराव अधिवेशनात पारित झाले. त्यानंतर पुढील काँग्रेस अधिवेशनासाठी प्रतिनिधी निवडण्याच्या हेतूने भरलेल्या काँग्रेसच्या सभेलाही टिळक हजर राहिले. या सभेने मुंबई इलाख्याच्या वतीने ऑल इंडिया काँग्रेस कमिटीवर पाठवावयाच्या प्रतिनिधीत टिळकांचे नाव बिनविरोध मान्य केले. तसेच होमरूलच्या प्रचाराचे कार्य काँग्रेसने हाती घ्यावे, या प्रचारासाठी एक स्वतंत्र केंद्रीय कार्यालय मुंबईला स्थापना केले जावे आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी गावोगावी हिंडून होमरूलचा प्रचार करावा. अशा टिळकांनी केलेल्या सूचनाही या बैठकीत संमत झाल्या.

## अमरावतीची प्रांतिक परिषद

याच सुमारास नागपूर व वऱ्हाडनेही होमरूलच्या प्रचाराला प्रारंभ केला. दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, बापूजी अणे, बाबासाहेब परांजपे, शामराव देशपांडे. अळेकर इत्यादी मंडळी प्रचारात आघाडीला होती. तसेच नोव्हेंबर १९१६ मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाडची प्रांतिक परिषद अमरावतीला भरली, त्यातही होमरूलच्या मागणीला सर्वानुमते पाठिंबा देण्यात आला. या अधिवेशनाला सर्व गटांचे लोक उपस्थित होते. अध्यक्षपदी डॉ. हरीसिंग गौर, तर स्वागताध्यक्षपदी सर मोरोपंत जोशी होते. प्रांतिक सुधारणेच्या मागण्याचे ठरावही सर्व संमतीने पास झाले. या ठरावात पाच हजार लोकवस्तीच्या गावात नगरपालिका स्थापन करण्यात यावी, या समितीचे तीन चतुर्थांश सदस्य आणि अध्यक्ष हे निर्वाचित असावे, जिल्हा कौन्सिलचा कारभार शासकीय अधिकाऱ्यांऐवजी लोकप्रतिनिधींच्या मार्फत चालावा, प्रांतात सर्वत्र ग्रामपंचायती स्थापना केल्या जाव्या आणि आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, शाळा, रस्ते बांधणे इत्यादी कल्याणकार्ये त्यांच्याकडे सोपविली जावी इत्यादी मागण्या अंतर्भूत करण्यात आल्या.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

टिळकांच्या होमरूल लीगची स्थापना झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत ॲनी बेझंट यांनीही मद्रास येथे एक स्वतंत्र होमरूल संघटना स्थापन केली. या संस्थेचे नामकरण ऑल इंडिया होमरूल लीग असे करण्यात आले. मुंबई अधिवेशनाच्या वेळी होमरूलची मागणी काँग्रेसच्या गळी उतरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. तो असफल ठरल्यामुळे त्यांनी शेवटी स्वतंत्र संघटना स्थापन केल्याची अधिकृत घोषणा केली, आणि त्यांच्या नेहमीच्या ओसंडत्या उत्साहाने त्यांनी होमरूलच्या प्रचाराची धमाल सुरू केली.

## जहालांचा काँग्रेस प्रवेश

अशा प्रकारे होमरूलच्या मागणीचे सूर देशात जोमाने उठू लागले असता १९१६ सालचे काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन लखनौला भरणार होते. अंबिकाचरण मुजुमदार या ज्येष्ठ बंगाली राष्ट्रवाद्याची निवड अध्यक्षपदी झाली होती. अधिवेशनापूर्वी मुजुमदारांनी टिळकांना पत्र लिहून त्यांनी लखनौ अधिवेशनाला अवश्य यावे असे सुचविले. अधिवेशनाला मोठ्या संख्येने हजर राहून होमरूलचा ठराव तेथे पास करून घ्यावयाचा टिळक गटाचा मानस होता. या हेतूने टिळकांचे सहकारी आणि समर्थक मोठ्या संख्येने टिळकांबरोबर खास गाडीने लखनौला गेले. पश्चिम महाराष्ट्र आणि नागपूर व वऱ्हाडकडून लखनौ काँग्रेसला जाणारे सर्व प्रतिनिधी एकत्रच जावेत या हेतूने ही खास गाडीची व्यवस्था केली होती. म्हणून तिला 'काँग्रेस स्पेशल' असे नाव पडले.

यावेळी सुरत काँग्रेसच्या गोंधळानंतर नऊ वर्षांनी जहाल व मवाळ काँग्रेसच्या व्यासपीठावर एकत्र येणार होते. त्यामुळे काँग्रेस सदस्यांत अपूर्व उत्साह होता. मुस्लीम लीग व काँग्रेस हातात हात घालून यावेळी कार्य करीत असल्यामुळे मुस्लीम नेतेही अधिवेशनात मोकळ्या मनाने सहभागी होत होते. मागील तीन चार वर्षात काँग्रेसच्या अनुभवाला आलेली ब्रिटिश शासकांची सहानुभूती अजून कायम होती. त्यामुळे अधिवेशनात अडथळे येण्याची शक्यता नव्हती. अलाहाबादचे लाला जगत नारायण हे स्वागताध्यक्ष काँग्रेस ऐक्याचा हा अपूर्व सोहळा जास्तीत जास्त यशस्वी करण्याची धडपड करीत होते.

लखनौ अधिवेशनाचे अध्यक्ष अंबिकाचरण मुजुमदार यांनी आपल्या भाषणात प्रथम काँग्रेस ऐक्याचे आणि काँग्रेस-लीग सहकार्याचे सहर्ष स्वागत केले. टिळरांच्या उपस्थितीचा खास निर्देश करून, यापुढे काँग्रेस अधिक बलशाली बनेल अशी अशा त्यांनी व्यक्त केली. तसेच भारतीयांच्या राजकीय अधिकारांची मागणी करण्यासाठी देशातील दोन मोठ्या संघटना एकत्र आल्यामुळे त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणे राज्यकर्त्यांना यापुढे शक्य होणार नाही असे प्रतिपादन करून, भविष्यात लवकरच राजकीय अधिकारांचा नवा हप्ता भारताला मिळेल अशी अपेक्षा त्यांनी बोलून दाखविली.

## लखनौ करार व टिळक

विषय नियामक समितीत काँग्रेसच्या व लीगच्या समित्यांनी तयार केलेल्या योजनांतील कलमांवर तपशीलात चर्चा झाली आणि त्या आधारे एक संयुक्त योजना तयार करण्यात आली. ती सुरेंद्रनाथांनी ठरावाच्या स्वरूपात खुल्या अधिवेशनापुढे मांडली. या योजनेचे दोन भाग होते. एक होता तो राजकीय मागण्यासंबंधीचा आणि दुसरा होता काँग्रेस—लीग तडजोडीचा. ह्या दुसऱ्या भागावर अधिवेशनात बराच वाद झाला. काँग्रेस—लीग करारानुसार मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघांना मान्यता देण्यात आली. तसेच कौन्सिलमध्ये प्रत्येक प्रांतातून



www.mpscmantra.com

किती मुस्लीम प्रतिनिधी पाठविले जावे याचे प्रमाणही निर्धारित करण्यात आले. ज्या प्रांतात मुस्लीम लोकसंख्या अधिक असेल तेथे लोकसंख्येच्या प्रमाणात कमी प्रतिनिधित्व त्यांनी मान्य करावे, तर ज्या प्रांतात त्यांची लोकसंख्या कमी असेल तेथे त्यांना अधिक प्रतिनिधित्व दिले जावे या मूलभूत तत्त्वानुसार मुस्लीम प्रतिनिधित्वाचे प्रमाण निर्धारित करण्यात आले.

या तरतुदीवर वाद होऊ लागताच टिळक तिचे समर्थन करण्यास पुढे आले. ही तरतुद मान्य करणे म्हणजे मुस्लीम लीगपुढे शरणागती पत्करणे नव्हे, फक्त भारतीय राजकारणात ब्रिटिश सरकार, कॉँग्रेस व मुस्लीम लीग असा जो त्रिकोणी संघर्ष चालू आहे, त्याला कॉँग्रेस-लीग तडजोडीने छेद देऊन त्याला द्विपक्षी संघर्षाचे रुप देऊन सीमित करणे एवढाच यामागील उद्देश आहे; मुस्लीम हे भारतीयच आहेत, म्हणून त्यांच्या हितसंबंधांना मान्यता देऊन राष्ट्रकार्यात त्यांना सहभागी करून घेणे अत्यंत निकडीचे आहे असे ठामपणे प्रतिपादन करून कॉँग्रेस सदस्यांचे मत या तरतुदीला अनुकूल करून घेतले. अधिवेशनाबाहेरही त्यांनी केलेल्या भाषणास त्या तरतुदीचे जोरदार समर्थन करताना कॉँग्रेस-लीग सहकार्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. इतकेच नाही तर भारतीयांसाठी स्वयंशासनाचे अधिकार मिळवणे हे कॉँग्रेसचे आद्य उद्दिष्ट आहे, हे स्वयंशासनाचे आधिकार केवळ मुसलमानांनाच देण्यास राज्यकर्ते तयार असले तरी त्याचे आपण स्वागतच करू असेही निःसंदिग्ध उद्‌गार त्यांनी काढले. टिळकांच्या समर्थकापैकी डॉ. मुजे यांचा मुस्लीमांच्या विभक्त मतदारसंघाच्या तरतुदीला तत्वतः विरोध होता. या तरतुदीचे समर्थन करून आणि तरतुदीने कॉँग्रेसला बांधून टाकून टिळक चूक करीत आहेत असे त्यांचे मत होते. परंतु बहुमत लखनौ कराराला अनुकूल असलेले पाहून त्यांनी या तरतुदीला उघडपणे विरोध केला नाही.

राष्ट्रैक्याचा पोटतिडीकीने पुरस्कार करणाऱ्या टिळकांसारख्या दूरदृष्टीच्या राजधुरीणाने मुस्लीमांची विभक्त मतदारसंघाची मागणी कशी मान्य केली असा प्रश्न अनेकदा उपस्थित केला जातो. टिळकांची मुत्सद्देगिरी इथे कमी पडली, कॉँग्रेस-लीग सहकार्य साधण्यांच्या उत्साहाच्या भरात त्यांनी एकराष्ट्रीयत्वाच्या मूलभूत तत्त्वाशी तडजोड केली असे आरोपही केले जातात. या तरतुदीमुळे इतर भारतीयांहून भारतीय मुस्लीमांचे हितसंबंध भिन्न आहेत या मुस्लीम लीगच्या धारणेला कॉँग्रेसची मान्यता मिळाल्यासारखे झाले, आणि कॉँग्रेस ज्या राष्ट्रैक्याचा पुरस्कार करीत होती त्याला तडा गेला. याबाबत दोन प्रश्न उपस्थित होतात. एक तर टिळकांनी या तरतुदीचे समर्थन कसे केले? आणि दुसरा म्हणजे कॉँग्रेसने हा ठराव पारित कसा केला?

यापैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर बॅ. जयकर यांच्या The Story of My Life या आत्मचरित्रात सापडते. बॅ. जयकर लिहितात, की गोखले यांनी १९०९ मध्ये विभक्त मतदारसंघाच्या योजनेस मान्यता दर्शविली होती; १९१६ साली टिळकांनी तिला मान्यता दिली त्यावेळी ती तात्पुरती बाब आहे, अल्पावधीत मुसलमानांनाच त्याचे वैय्यर्थ्य कळून येईल आणि ते स्वतःहून याचा आग्रह सोडून देतील अशी त्यांची पक्की खात्री होती. बॅ. जिनाही यावेळी याच मताचे होते. १९१९ साली पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढे साक्ष देताना जिनांनीही असेच मत मांडले होते. ह्या बॅ.जयकरांच्या निवेदनात टिळकांच्या भूमिकेचे स्पष्टीकरण मिळते.

कॉँग्रेसने हा ठराव पास कसा केला याचे उत्तर तत्कालीन राजकीय परिस्थितीत आढळते. १९०९ च्या कौन्सिल कायद्याने मुस्लीमांना स्वतंत्र, मतदारसंघ मिळालेले होते. त्यामुळे लखनौ करार करून या अस्तित्वात असलेल्या मुस्लीमांच्या अधिकाराला कॉँग्रेस केवळ मान्यता देत होती. शिवाय मुस्लीमांच्या अस्तित्वात असलेल्या कायदेशीर अधिकाराला मान्यता दिल्याने कॉँग्रेस लीग सहकार्य साधता येत असेल, तर राज्यकर्त्यांच्या विरुद्ध लढताना हे हितकारक ठरणार आहे अशी बहुतेक सर्व कॉँग्रेस सदस्यांची धारणा होती. त्यामुळे राष्ट्रीय संग्रामात

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

ब्रिटिशांविरुद्ध कॉंग्रेस-लीग संयुक्त आघाडी उभारण्याच्या तीव्र उत्कंठेतून लखनौ कराराला कॉंग्रेसने मान्यता दिली.

लखनौ अधिवेशनाच्या यशामुळे, विशेषतः कॉंग्रेस ऐक्यामुळे आणि कॉंग्रेस-लीग सहकार्यामुळे सरकारचे धाबे दणाणले. तोवर भेदनीतीकुशल ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मुस्लीम नेत्यांना कॉंग्रेसविरुद्ध चिथावणी देऊन राष्ट्रीय चळवळ बलशाली होऊ न देण्याचा कसोशीने प्रयत्न केला होता. त्या भेदनीतीला लखनौ कराराने छेद दिला. शिवाय लखनौ अधिवेशन संपताच टिळक आणि ॲनी बेझंट यांनी होमरूलच्या प्रचारासाठी देशात तुफानी दौरा सुरू केला. बंगाल, मद्रास, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत या भागात अनेक शहरी, तर महाराष्ट्रात जिल्हा स्तरावरही होमरूल समित्या स्थापन होऊ लागल्या. हजारो लोक स्वयंस्फूर्तीने होमरूल संघटनेचे सदस्य बनण्यास पुढे येऊ लागले. होमरूलच्या प्रचाराची देशभर पसरु लागलेली ही लाट पाहून सरकार सहाजिकच अस्वस्थ झाले. या चळवळीला अंकुश लावण्याचा निर्णय सरकारने घेतला. तसे आदेश प्रांतिक सरकारांना दिले गेले. याचा परिणाम लागलीच दिसून येऊ लागला. फेब्रुवारी १९१७ मध्ये पंजाब सरकारने टिळकांच्या पंजाब प्रवेशावर बंदी घातली. जून १९१७ मध्ये मद्रास सरकारने ॲनी बेझंट यांना त्यांच्या सहकाऱ्यांसह स्थानबद्ध केले. परंतु ह्या आघाडीच्या नेत्यांना बंदिस्त करून होमरूल चळवळीला बांध घालण्याची सरकारची योजना असफल ठरली. शासकीय दडपशाहीमुळे लोकांच्या भावना प्रक्षुब्ध झाल्या. शहरोशहरी निषेधपर सभा घेण्यात आल्या आणि ॲनी बेझंटच्या मुक्ततेची मागणी केली गेली. इतकेच नाही तर त्यांची मुक्तता न झाल्यास सरकारविरोधी आंदोलन सुरू करण्याची भाषाही बोलली जाऊ लागली. सरकारच्या दडपशाहीमुळे होमरूल चळवळ आधिक व्यापक व उग्र होऊ लागली.

## महाराष्ट्रात होमरूल प्रचाराचा धडाका

टिळकांनी लखनौ अधिवेशनानंतर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर प्रचारसत्र सुरू केले. सिन्नर, संगमनेर, चिपळूण, येवला, सातारा इत्यादी अनेक शहरांना भेटी देऊन त्यांनी होमरूलच्या मागणीचे महत्त्व विशद केले. १९१७ च्या मे महिन्यात नाशिक येथे झालेल्या प्रांतिक परिषदेत होमरूलचा पुरस्कार तर केला गेलाच, पण त्याबरोबरच सरकारने दडपशाहीचे कार्य पत्करल्यास निष्क्रिय प्रतिकाराची चळवळ आयोजित करण्याचा विचारही व्यक्त केला गेला. अशा प्रकारे होमरूलची चळवळ ऐन भरात असताना महाराष्ट्राला एक दुःखद धक्का बसला. भारताचे पितामह दादाभाई नौरोजी यांचे यावेळी निधन झाले. १९०८ पासून ते कॉंग्रेस चळवळीत प्रत्यक्ष भाग घेत नसले तरी त्यांचे लक्ष कॉंग्रेसच्या कार्यावर खिळलेले असे. त्यांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्र चवथ्या आघाडीच्या नेत्याला मुकला.

नागपूर व वऱ्हाडच्या भागातही होमरूलची चळवळ ऐन भरात होती. अमरावती, अकोला, यवतमाळ येथील शेकडो लोक होमरूलचे सदस्य बनले. यवतमाळच्या आसपास बाबासाहेब परांजपे, बापूजी अणे, शामराव देशपांडे इत्यादी मंडळींनी मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी केली. नागपूरला हे कार्य डॉ. मुंजे, नारायणराव अळेकर, बिपीन कृष्ण बोस, डॉ. हरीसिंग गौर, रा. ब. दिक्षित, तर मध्यप्रांतातील हिंदी भाषी भागात प. रविशंकर शुक्ला, डॉ. ई. राघवेंद्रराव इत्यादी अनेक स्थायिक पुढारी करीत होते. होमरूलची मागणी बॅ. सुब्रह्मण्यम अय्यर आणि बॅ. बॅप्टिस्टा यांनी देशाबाहेर नेली. यावेळी अमेरिकेत भारतीय क्रांतिकारकांनी सुरू केलेली गदर चळवळ जोरात होती. तसेच इंग्लंडच्या शत्रुराष्ट्राचे सहाय्य मिळवून भारतातील ब्रिटिश सत्तेला सुरुंग लावण्याच्या योजना युरोपातील भारतीय क्रांतिकारक करीत आहेत याची माहिती ब्रिटिश राज्यकर्त्यांना होती.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

### भारतमंत्री मॉंटेग्यूची घोषणा

या स्फोटक परिस्थितीला केवळ दमन मार्गाने आवर घालणे महायुद्धाच्या आणीबाणीच्या काळात शक्य नाही हे ब्रिटिश पूर्णपणे ओळखून होते. भारतातील लोकक्षोभ शमविण्याचा एकच मार्ग ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना मोकळा होता, तो म्हणजे भारतीयांची राजकीय अधिकारांची मागणी अंशतः का होईना पूर्ण करणे. हे ध्यानात घेऊन भारतमंत्री मॉंटेग्यू याने भारतीयांना द्यावयाच्या राजकीय सुधारणेबाबतची इतिहासप्रसिद्ध घोषणा २० ऑगस्ट १९१७ रोजी केली. हिंदुस्थान हा साम्राज्यांतर्गत स्वायत्त घटना बनावा हे ब्रिटिश सरकारचे अंतिम उदिष्ट आहे, हे साध्य करण्यासाठी देशातील सर्व प्रशासकीय शाखांत भारतीयांचा वाढत्या प्रमाणात समावेश केला जाईल आणि देशातील स्वयंशासन संस्थाचा क्रमाक्रमाने विकास घडवून आणून कालांतराने येथे जबाबदार शासनपद्धती प्रस्थापित केली जाईल असे मोघम आश्वासन या घोषणेने भारतीयांना देण्यात आले. त्याबरोबरच जनप्रक्षोभ शमविण्याच्या दृष्टीने सप्टेंबरच्या मध्यात ॲनी बेझंट यांना मुक्त करण्यात आले. त्यांच्या स्थानबद्धतेच्या काळात होमरूलचा प्रचार करीत असताना, पुढील कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद बेझंट यांनाच देऊन त्यांच्याविषयी भारतीयांची कृतज्ञता व्यक्त करावी असा विचार टिळक मांडीत होते. हा विचार कॉंग्रेसने उचलून धरला आणि १९१८ साली कलकत्त्याला व्हावयाच्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद ॲनी बेझंट यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### कलकत्ता अधिवेशन

कलकत्त्याच्या कॉंग्रेस अधिवेशनापुढे भारतमंत्री मॉंटेग्यूनी केलेल्या घोषणेबाबत कॉंग्रेसने काय भूमिका घ्यावयाची हा चर्चेचा महत्त्वाचा मुद्दा होता. भारताला जबाबदार शासनपद्धती देण्याचा उद्देश ब्रिटिश पार्लमेंटने घोषीत केल्याबद्दल कॉंग्रेसने समाधान व्यक्त केले व मॉंटेग्यूंच्या घोषणेचे स्वागत केले. परंतु या घोषणेतील संदिग्धता टिळकादी नेत्यांच्या नजरेत सुटली नाही. शिवाय स्वयंशासन संस्थांचा विकास कशा पद्धतीने केला जाईल याचा तपशील मॉंटेग्यू घोषणेत नव्हता. म्हणून कलकत्ता कॉंग्रेसने लखनौला पारित केलेल्या कॉंग्रेस-लीग योजनेचा पुन्हा जोरदार पुरस्कार केला, स्वयंशासनाचे अधिकार लवकर देण्यात यावे अशी निकडीची मागणी केली आणि या मागणीला बळकटी यावी या हेतूने होमरूल आंदोलन अधिक जोमाने चालविण्याचा निर्णय कॉंग्रेसने घेतला. तसेच स्वयंशासनाची मागणी इंग्लंडमधील सत्ताधाऱ्यांच्या कानी घालावी आणि इंग्लंडमधील लोकमत त्यासाठी अनुकूल बनवावे म्हणून कॉंग्रेसचे एक शिष्टमंडळ लंडनला पाठवावे असेही ठरले. या शिष्टमंडळात महाराष्ट्रातील टिळक, खापर्डे, न. चि. केळकर यांचा समावेश होता. एप्रिल १९१८ मध्ये ते शिष्टमंडळ इंग्लंडला जाण्यास निघाले. परंतु भारत सरकारने त्यांना परवाना नाकारल्यामुळे कोलंबोहून त्यांना परत यावे लागले.

### कॉंग्रेस-मॉंटेग्यू वाटाघाटी

संकल्पित राजकीय सुधारणांबाबत भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांशी आणि भारतीय पुढाऱ्यांची बोलणी करण्याच्या उद्देशाने भारतमंत्री मॉंटेग्यू नोव्हेंबर १९१८ मध्ये भारतात आले. त्यांच्या सहा महिन्याच्या वास्तव्यात भिन्न गटातील भारतीय नेत्यांशी त्यांनी चर्चा केली. संकल्पित सुधारणांबद्दल त्यांचे विचार त्यांनी अजमावून पाहिले. मॉंटेग्यूच्या भेटीला जाणाऱ्यांत महाराष्ट्राचे रा. ब. मुधोळकर, टिळक, दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, निळकंठराव उधोजी, न. चि. केळकर इत्यादी मंडळी होती. मॉंटेग्यूच्या भेटीसाठी टिळक दिल्लीला गेले असता तेथील जनतेने त्यांचे जे अपूर्व स्वागत केले, ते पाहून भारतीय जनमनावर त्यांचा विलक्षण प्रभाव असल्याची भारतमंत्र्यांची खात्री झाली. तशा अर्थाची नोंद त्यावेळी त्यांनी आपल्या रोजनिशीत केलेली आढळते. टिळकांची लोकमान्यता पाहून

www.mpscmantra.com

संकल्पित सुधारणांना त्यांची मान्यता मिळाल्यास त्या काँग्रेसच्या गळी उतरविण्यात कोणताही अडथळा येणार नाही अशी माँटेग्यूची धारणा झाली. म्हणून संकल्पित सुधारणांना टिळकांचा पाठिंबा मिळवून घेण्याची त्यांनी खटपट केली. टिळक मात्र शासकांच्या भूलथापांनी हुरळून जाणारे नव्हते. सुधारणांचा तपशील समजल्याशिवाय त्या सुधारणांना समर्थन देता येणार नाही असे त्यांनी भारतमंत्र्याला स्पष्ट त्यांनी सांगितले तेव्हा टिळकांनी सुधारण्यांच्या नव्या हप्त्याला विरोध केलाच, तर सरकारचे समर्थन करणारा एखादा गट काँग्रेसमध्ये असावा असे वाटून माँटेग्यूंनी मवाळ नेत्यांना विश्वासात घेतले. ब्रिटिश पार्लमेंट जो सुधारणा कायदा करील, त्याला मवाळांनी पाठिंबा द्यावा, त्याविषयी लोकमत अनुकूल बनविण्याच्या हेतूने प्रचार करावा आणि त्या सुधारणा राबविण्यात सरकारला सहकार्य द्यावे अशी गळ माँटेग्यूंनी मवाळ नेत्यांना घातली व तसे आश्वासन मवाळ नेत्यांकडून त्यांनी मिळविले. मवाळांना टिळकांचे जनआंदोलनाचे मार्ग खटकत होतेच. त्यामुळे आणि राजकीय सुधारणा क्रमाक्रमानेच होणे श्रेयस्कर आहे अशी त्यांची तात्त्विक भूमिका असल्यामुळे त्यांनी नव्या सुधारणांना मान्यता देण्याचे अभिवचन माँटेग्यूला दिले. ब्रिटिश कूटनीतीचा हा दुसरा मोठा विजय होता. १९०७ सालच्या सुरत अधिवेशनापूर्वी जहाल गटापासून मवाळांना ब्रिटिश भेदनीतीतज्ज्ञांनी दूर केले होते. तेच भेदनीतीचे जाळे मवाळांवर पुन्हा यावेळी फेकण्यात आले. राष्ट्रीय चळवळीवरील याचे दुष्परिणाम लवकरच दृग्गोचर झाले.

## माँटेग्यू अहवालाविषयीची प्रतिक्रिया

जुलै १९१८ मध्ये माँटेग्यू अहवाल प्रकाशित झाला. या अहवालाने संकल्पित राजकीय सुधारणांच्या तपशीलाची भारतीय नेत्यांना स्पष्ट कल्पना आली. या अहवालावरील टिळकांची पहिली प्रतिक्रिया 'ही योजना स्वीकारार्ह नाही' अशी होती. ॲनी बेझंट यांनीही ही योजना ब्रिटिश सरकारने देण्याजोगी नाही आणि भारताने स्वीकारण्याजोगी नाही असा अभिप्राय व्यक्त केला. महाराष्ट्र आणि नागपूर व वऱ्हाडची ह्याबाबतची प्रतिक्रिया ११ ऑगस्ट १९१८ रोजी अकोला येथे भरलेल्या प्रांतिक अधिवेशनात स्पष्ट झाली. बॉम्बे क्रॉनिकलचे संपादक बी. जी. हॉर्निमन हे या सभेच्या अध्यक्षस्थानी होते. या परिषदेत काँग्रेस-लीग योजनेचा जोरदार पुरस्कार करण्यात आला आणि काँग्रेसने त्याबाबत कोणत्याही प्रकारे माघार घेऊ नये अशी शिफारस केली गेली. तसेच माँटेग्यू अहवालातील सुधारणांचा तपशील भारतमंत्र्यांनी केलेल्या ऑगस्ट घोषणेशी सुसंगत नाही आणि म्हणून स्वयंशासनाचा पहिला हप्ता म्हणून ही योजना मान्य करण्याजोगी नाही असे स्पष्टपणे प्रतिपादन करणारा ठराव पास करण्यात आला.

## मुंबईला खास अधिवेशन

माँटेग्यू अहवालाबाबत काँग्रेसने काय भूमिका घ्यावयाची हे ठरविण्यासाठी काँग्रेसचे खास अधिवेशन मुंबईला घेण्यात आले. २९ ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष सईद हसन इमाम, तर स्वागताध्यक्ष बॅ. विठ्ठलभाई पटेल होते. हे अधिवेशन घाईघाईने बोलविले गेले असूनही ३८४५ सदस्य अधिवेशनाला उपस्थित होते. प्रतिनिधींची ही मोठी संख्या वाढत्या लोकजागृतीची साक्ष देत होती. दिनशा वाछा, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, भूपेंद्रनाथ बसू, अंबिकाचरण मुजुमदार यासारखे काही ज्येष्ठ मवाळ नेते मात्र या अधिवेशनाला आले नाहीत. माँटेग्यूंनी भारतभेटीच्या वेळी पेरलेल्या विषाचा हा परिणाम होता. सर चंदावरकर, चिमणलाल सेटलवाड हे मवाळ नेते अधिवेशनाला आले आणि त्यांनी माँटेग्यू अहवालाचे स्वागत केले जावे असा आग्रह धरला. महाराष्ट्राप्रमाणे बंगाल व पंजाबचे बहुसंख्य सदस्य मात्र माँटेग्यू अहवाल मान्य करण्यास तयार नव्हते. या मतभेदामुळे काँग्रेसमध्ये पुन्हा दोन परस्परविरोधी तट पडणार की काय अशी भीती ज्येष्ठ नेत्यांना वाटू लागली. आणीबाणीच्या काळात ही राष्ट्रीय संघटना पुन्हा फुटू नये या उद्देशाने दोन्ही गटांना एकत्र ठेवण्याचा कसोशीचा प्रयत्न काही भारतीय



www.mpscmantra.com

पुढाऱ्यांनी केला. त्यात टिळक आघाडीला होते. अखेरीस मध्यस्थीचे प्रयत्न यशस्वी झाले आणि फूट टळली, पण ती तात्पुरतीच.

काँग्रेसमध्ये फूट पडू न देण्याच्या खटाटोपामुळे या अधिवेशनात पारित झालेल्या ठरावांचे स्वरूप बरेच मवाळ झाले. अधिवेशनात पारित करण्यात आलेल्या ठरावांद्वारे, माँटेग्यू अहवाल "निराशाजनक व असमाधानकारक" असल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्याचा फेरविचार करावा अशी मागणी केली गेली; काँग्रेस-लीग योजनेचा पुन्हा पुरस्कार केला गेला; प्रांतिक शासनात पूर्णतः जबाबदार शासन प्रस्थापित केले जावे आणि केंद्र शासनात निदान द्विदल शासनव्यवस्था आणली जावी अशा मागण्या करण्यात आल्या. तसेच, ब्रिटिश साम्राज्यातील स्वयंशासित राज्यांना असलेल्या वित्तविषयक सर्व अधिकार भारतातील विधिमंडळांना दिले जावे, सुरक्षा दलातील २५ टक्के अधिकारी भारतीय असावे आणि पुढारी पंधरा वर्षात हे प्रमाण ५० टक्क्यापर्यंत वाढविले जावे, शस्त्र बाळगण्यासाठी भारतीयांना परवाने दिले जावे अशाही मागण्या या अधिवेशनाने केल्या. नव्या सुधारणा कायद्याचा तपशील निर्धारित होत असता, काँग्रेसच्या मागण्या पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढे मांडण्यासाठी काँग्रेसचे शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविण्याचेही ठरले. त्या शिष्टमंडळात महाराष्ट्राच्या टिळक, करंदीकर, वासुकाका जोशी, गणपतराव नामजोशी यांचा समावेश होता. हे शिष्टमंडळ सप्टेंबरमध्ये इंग्लंडला रवाना झाले.

## मवाळांचा काँग्रेस त्याग

मुंबईच्या खास अधिवेशनाला उपस्थित असलेल्या मवाळ नेत्यांनी माँटेग्यू अहवालासंबंधीच्या ठरावाला विरोध दर्शविला होता. परंतु बहुमत ठरावाला अनुकूल असल्यामुळे त्यांच्या विरोधाला अर्थ उरला नाही. या अधिवेशनात जहाल गटाच्या हाती काँग्रेसची सूत्रे जात असल्याची जाणीव मवाळांना झाली आणि त्यामुळे काँग्रेसच्या अधिकृत शिष्टमंडळात सामील न होता त्यांनी आपले शिष्टमंडळ स्वतंत्रपणे इंग्लंडला पाठविण्याचा निर्णय घेतला. तसेच मुंबईच्या खास अधिवेशनात घेण्यात आलेले निर्णय वार्षिक अधिवेशनात सर्वसंमतीसाठी पुन्हा मांडले जातील आणि काँग्रेसमध्ये जहालांचे बहुमत असल्यामुळे आपला गट मागे पडेल याची त्यांना जाणीव झाल्यामुळे मवाळांनी काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनापूर्वीच काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. १ नोव्हेंबर १९१८ रोजी 'ऑल इंडिया लिबरल फेडरेशन' या नावाने आपली वेगळी संघटना स्थापन केल्याची त्यांनी घोषणा केली. त्याबरोबरच माँटेग्यू अहवालात निर्दिष्ट करण्यात आलेल्या सुधारणा अपेक्षेपेक्षा तोकड्या असल्या तरी या सुधारणांनी घटनात्मक विकासाचे पुढचे पाऊल टाकले जाणार आहे आणि म्हणून त्या राबविण्यात सरकारला पूर्ण सहाय्य देण्याची आपली तयारी आहे अशा आशयाचा ठराव या सभेत पास करण्यात आला. काँग्रेसमधून बाहेर पडून ऑल इंडिया लिबरल फेडरेशनमध्ये महाराष्ट्रातील सर चंदावरकर, बॅ. रहिमतुल्ला, चिमणलाल सेटलवाड, रा. ब. मुधोळकर इत्यादी मंडळी सामील झाली.

## दिल्ली अधिवेशन

काँग्रेसमध्ये पुन्हा फूट पडल्यानंतर लवकरच काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन दिल्लीला भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून टिळकांची निवड करण्याचा निर्णय दिल्लीच्या स्वागत समितीने एकमताने घेतला होता. परंतु टिळकांनी चिरोलविरूद्ध केलेल्या अब्रूनुकसानीच्या फिर्यादीबाबतच्या कामामुळे ते यावेळी इंग्लंडमध्ये अडकून पडले असल्यामुळे अध्यक्षपद पंडित मालवीयांना दिले गेले. यापूर्वी काही दिवस मालवीयांनी रौलट समितीच्या निषेधार्थ केंद्रीय विधिमंडळाच्या सदस्यत्वाचे त्यागपत्र दिलेले असल्यामुळे काँग्रेसमधील त्यांचे स्थान उंचावले होते.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

त्यांच्याविषयी आदराची भावना प्रसृत झाली होती. त्याचे निदर्शक म्हणून त्यांना अध्यक्षपद देण्याचा निर्णय सर्वसंमतीने घेतला गेला होता.

मुंबईच्या खास अधिवेशनात पारित झलेल्या ठरावांवर या अधिवेशनाने शिक्कामोर्तब केले. मॉंटेग्यू अहवालावर चर्चा होत असता तत्संबंधी यापुर्वी केलेल्या ठरावातील "निराशाजनक व असमाधानकारक" हे शब्द गाळून टाकले जावेत अशी सूचना श्रीनिवास शास्त्रींनी केली असता, त्याला बंगालच्या प्रतिनिधींनी कसून विरोध केला. बऱ्याच ऊहापोहानंतर शेवटी मूळ ठरावातील हे शब्द कायम ठेवण्यात आले. मवाळांनी यापूर्वीच कॉंग्रेसमधून काढता पाय घेतला असल्यामुळे तडजोडीसाठी मवाळ धोरण अंगिकारण्याची गरज आता कॉंग्रेस नेत्यांना वाटत नव्हती. त्यामुळे या अधिवेशनातील ठरावांचा सूर मुंबईपेक्षा प्रखर होता. रौलट समितीचा निषेध करणारा ठरावही येथे पास केला गेला. प्रांतात पूर्णांशी जबाबदार शासनव्यवस्था स्थापन केली जावी आणि देशाला लवकरात लवकर स्वायत्तता दिली जावी अशा मागण्या केल्या गेल्या. तसेच जागतिक शांतता परिषदेत भारताच्या प्रतिनिधींचा अंतर्भाव केला जावा असी मागणी करण्यात आली आणि या परिषदेसाठी कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून टिळक, सईद हसन इमाम आणि गांधी यांची नावे सुचविली गेली. दिल्ली अधिवेशनासंबंधीची लक्षणीय बाब म्हणजे इंग्लंडच्या राजसत्तेप्रती निष्ठा व्यक्त करणारा यापूर्वीच्या प्रत्येक अधिवेशनात पास केला जाणारा ठराव यावेळी प्रथमच करण्यात आला नाही. तसेच प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमनाचे स्वागत करणारा ठरावही बाजूला सारला गेला. राष्ट्रीय कॉंग्रेस ही टिळकप्रणीत मार्गाने जाऊ लागल्याची ही स्पष्ट लक्षणे होती.

## रौलट विधेयकाच्या प्रतिकारार्थ आंदोलन

सरकारी दमननीतीचे ताट भारतीयांपुढे वाढून ठेवीतच १९१९ चे साल उगवले. भारतातील दहशतवादाला आळा घालण्याच्या तथाकथित हेतूने स्थापन करण्यात आलेल्या रौलट समितीच्या अहवालाच्या आधारे दोन विधेयके केंद्र सरकारने फेब्रुवारी १९१९ मध्ये विधीमंडळापुढे सादर केली. युद्धाच्या आणीबाणीच्या काळात देशात लागू करण्यात आलेल्या भारत सुरक्षा कायद्याची मुदत युद्धबंदीबरोबर संपणार होती. या कायद्यानुसार सरकारला मिळालेले व्यापक अधिकार रौलट विधेयकाद्वारा पुन्हा मिळविण्याचा सरकारचा मानस उघड होता. ही विधेयके पास झाल्यास भारतीयांची विलक्षण मुस्कटदाबी होणार होती, आणि दडपशाहीचे सगळे मार्ग सरकारला मोकळे होणार होते. हे ध्यानात येताच केंद्रीय विधिमंडळातील सर्व भारतीय सदस्यांनी त्याचा कडक शब्दांत निषेध केला. रौलट विधेयकांना विरोध करण्यात महाराष्ट्राचे दादासाहेब खापर्डे, गंगाधरराव चिटणवीस व बॅ. जिना हे होते. जिनांनी तर ही विधेयके सरकारने मागे न घेतल्यास देशात असंतोषाचा भडका उडेल असा इशाराही दिला. परंतु लोकमत बाजूला सारून २० मार्चला रौलट विधेयकांच्या आधारे एक कायदा पास करण्यात आला. जिनांनी वर्तविलेल्या भाकिताप्रमाणे अल्पावधीतच याविरूद्ध चळवळीची लाट देशात उसळली व त्याबरोबरच भारतीय राष्ट्रीय चळवळीत नव्या युगाच्या उदयाची चिन्हे दिसू लागली.

## मुंबई येथे सत्याग्रह सभेची स्थापना

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

रौलट विधेयकावर केंद्रीय विधिमंडळात चर्चा चालू असता, ही विधेयके पास झाल्यास आपण त्याविरूद्ध सत्याग्रहाची मोहीम सुरू करू असा इशारा २४ फेब्रुवारी रोजी मोहनदास करमचंद गांधी यांनी सरकारला दिला होता. त्याप्रमाणे रौलट कायदा पारित होताच गांधींनी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने मुंबईला सत्याग्रह सभा स्थापन केली. होमरूल लीगच्या अनेक प्रमुख नेत्यांनी सत्याग्रहाची शपथ घेतली. ३० मार्चला रौलट कायद्याच्या निषेधार्थ देशात सर्वत्र शांततापूर्ण हरताळ पाळला जावा असा निर्णय सत्याग्रह सभेने घेतला. तशा सूचना देशाच्या सर्व भागातील पुढाऱ्यांना पाठविण्यात आल्या. तेवढ्यात हा निर्णय देशाच्या सर्व भागात वेळेवर पोचेल की नाही अशी शंका वाटल्याने ३० मार्च ही तारीख ६ एप्रिलवर पुढे ढकलण्यात आली.

नागपूर व वऱ्हाडकडे देखील ३० मार्चला शांततेने हरताळ पाळला गेला. मुंबईत ३० मार्च व ६ एप्रिल हे दोन्ही दिवस काळे दिवस म्हणून पाळण्यात आले. सामान्य लोक मोठ्या संख्येने हरताळात सामील झाले. याचे कारण असे की १९१७ च्या मध्यापासून मुंबई व मुंबईच्या परिसरात सरकारविरोधी वातावरण प्रसृत होत होते. मुंबईच्या लष्करी छावणीतील गोऱ्या सोजिरांचा नगरवासियांना विलक्षण उपद्रव होत होता. गोरे सोजीर स्त्रियांवर अत्याचार करीत असल्याच्या बातम्या लोकांच्या कानी पडत होत्या. त्यामुळे लोकमत प्रक्षुब्ध होत होते. अपुऱ्या वेतनामुळे चिडलेले रेल्वे वर्कशॉपचे कामगार संपावर गेले होते. टपाल खात्यातील कर्मचाऱ्यांनीही संप पुकारला होता. गव्हर्नर विलिंग्डनचे स्मारक उभारण्याच्या शासकीय संकल्पाविरुद्ध मुंबईत अनेक ठिकाणी मोठ्या निषेध सभा झाल्या होत्या. अशा स्फोटक परिस्थितीत गांधींनी केलेल्या सत्याग्रहाच्या आवाहनाला लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ६ एप्रिलला चौपाटीवर गांधींच्या अध्यक्षतेखाली प्रचंड सार्वजनिक सभा झाली. या सभेला शेकडो मुसलमानही हजर होते. फ्रेंच ब्रिजजवळ झालेल्या सार्वजनिक सभेत बॅ. जिना आणि बॅ. बॅप्टिस्टा यांची भाषणे झाली. श्रीमती सरोजिनी नायडू आपल्या कर्णमधुर काव्यमय वाणीने सभा गाजवू लागल्या. या सर्व सभा शांततेने पार पडल्या. फक्त गिरगाव व चर्नीरोडवर जमावाने उत्साहाच्या भरात वाहतूक अडविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पोलिसांना जमावावर लाठीहल्ला करण्याची संधी मिळाली. या लाठीहल्ल्यामुळे लोक अधिकच भडकले.

गांधींच्या सत्याग्रहाच्या आवाहनाला देशभर प्रचंड प्रतिसाद मिळालेला पाहून ब्रिटिश सरकारने आपले नेहमीचे शस्त्र पुन्हा उपसले. सार्वजनिक सभा व मिरवणुकांवर बंदी घातली गेली. वृत्तपत्रांवर अनेक कडक निर्बंध लागले गेले. बॉम्बे क्रॉनिकलचे संपादक हॉर्निमन यांना सरकारवर टीका करण्याच्या आरोपावरून हद्दपार केले गेले. गांधी दिल्लीला जात असता त्यांना वाटेत बळजबरीने अडवून मुंबईला परत पाठविण्यात आले. हे वृत्त प्रसृत होताच जनक्षोभ अधिकच वाढला. या वाढत्या जनप्रक्षोभाला आवर घालण्यास सरकार दडपशाहीचे सर्व विहित अविहित मार्ग अंगिकारू लागले. या शासकीय दडपशाहीची परिसीमा १९१९ मध्ये पंजाबात झाली.

## पंजाबमध्ये राक्षसी अत्याचार

पंजाब हा सीमाप्रांत असल्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांना तो नेहमीच महत्त्वाचा वाटत असे. महायुद्धाच्या अवधीत या प्रांतात शांतता व सुव्यवस्था टिकविण्याची विशेष निकड सरकारला वाटली. कारण गदर पक्षाचे क्रांतिकारी पंजाबात सरकारविरूद्ध मोठे कारस्थान रचित आहेत अशा बातम्या सरकारच्या कानी आल्या होत्या. म्हणून पंजाबात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे आदेश तेथील गव्हर्नर मायकेल ओडवायर याला दिले गेले. त्याने नको तेवढे कडक धोरण अंगिकारल्यामुळे तेथील जनक्षोभात अधिकच भर पडली.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

अशा प्रक्षुब्ध वातावरणात अमृतसरला १३ एप्रिल रोजी जालियनवाला बाग हत्याकांड घडले. ही घटना म्हणजे ब्रिटिश सरकारच्या असुरी दमननीतीचे प्रात्यक्षिक होते. ब्रिगेडियर जनरल डायरने जालियनवाला बागेत जमलेल्या सुमारे तीन हजारांच्या निरपराध जमावावर पूर्वसूचना न देता दहा मिनिटे सतत गोळीबार केला. या अमानुष हल्ल्याने शेकडो लोक तात्काळ मृत्यूमुखी पडले. शेकडो लोक जखमी होऊन वैद्यकीय मदतीच्याच केवळ नव्हे तर पाण्याच्या अभावी तडफडून गतप्राण झाले. यावर कळस म्हणून की काय यानंतर पंजाबात सर्वत्र लष्करी कायद्याचा अंमल सुरू करण्यात आला. अनेक शहरांचा पाणी पुरवठा व वीज पुरवठा बंद केला गेला. इतकेच नाही तर पंजाबच्या काही शहरांवर बॉम्बहल्ले करून स्वतःला सुसंस्कृत म्हणविणाऱ्या ब्रिटिश सरकारने निर्घृण अमानुषतेची चरम सीमा गाठली.

पंजाबच्या जनतेवर असे अनन्वित अत्याचार चालू असता पंजाबचा बाहेरच्या प्रांतांशी संपर्क तोडून टाकण्यात आला. पंजाबच्या बातम्या बाहेर जाणार नाहीत याची पूर्ण खबरदारी गव्हर्नर मायकेल ओडवायरने घेतली. तरीही हळूहळू पंजाबमधील बातम्यांना बाहेर वाचा फुटू लागली आणि या बातम्या जशा बाहेर येऊ लागल्या तशा राज्यकर्त्यांच्या अभूतपूर्व राक्षसी कृत्यांच्या कथा ऐकून भारतीय नेते हतबुद्ध होऊ लागले. सरकारविरुद्ध असंतोषाची लाट देशभर पसरली. पंजाबमधील घटनांनी मवाळ नेत्यांनाही विलक्षण धक्का बसला. सरकारला सहकार्य देण्याची भाषा बोलणेही त्यांना अशक्य झाले. अशात केंद्रीय सरकारने आणि ब्रिटिश नोकरशाहीने पंजाबमधील भीषण कृत्याचे केलेले समर्थन पाहून ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या न्यायप्रियतेवर काहींचा असलेला विश्वास उडू लागला. ह्या पार्श्वभूमीवर पंजाबच्या जनतेविषयी सहानुभूती प्रदर्शित करण्यासाठी आणि सरकारी अमानुषतेचा निषेध करण्यासाठी वार्षिक अधिवेशन अमृतसरला घेण्याचा काँग्रेसने निर्णय घेतला. पंजाबमधील जनतेवर चाललेल्या घोर अत्याचारांची माहिती इंग्लंडच्या जनतेला आणि राजकर्त्यांना करून देण्यासाठी महाराष्ट्राचे न. चिं. केळकर आणि विठ्ठलभाई पटेल इंग्लंडला गेले.

## टिळकांची 'प्रतियोगी सहकारिता'

भारतात अशा अनेक खळबळजनक घटना घडत असता इंग्लंडला असलेले टिळक नोव्हेंबर १९१९ मध्ये स्वदेशी परत आले. देशातील परिस्थितीची माहिती करून घेतल्यानंतर त्यांनी गांधींच्या सत्याग्रहाच्या कल्पनेला पाठिंबा व्यक्त केला आणि सत्याग्रहात सहभागी होता आले नाही याबद्दल खेदही प्रदर्शित केला. अमृतसरचे काँग्रेसचे अधिवेशन महत्त्वाचे असल्यामुळे नागपूर, वऱ्हाड आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांतील प्रतिनिधी एका खास गाडीने एकत्र अमृतसरला गेले. नवा सुधारणा कायदा पार्लमेंटने पास केल्याचे वृत्त अमृतसरच्या मार्गावर असतानाच त्यांच्या कानी आले. त्या बातमीबरोबर नव्या सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ब्रिटिश सम्राटाने भारतीयांना सहकार्याचे आवाहन केल्याचे वृत्तही प्रकाशित झाले. ह्या सुधारणा कायद्यासंबंधीचे आपले धोरण प्रतियोगी सहकारितेचे राहील असा विद्युत्संदेश टिळकांनी ताबडतोब भारतमंत्री आणि गव्हर्नर जनरल यांना पाठविला.

## अमृतसर काँग्रेस

अमृतसर काँग्रेसचे अध्यक्षपद पंडित मोतीलाल नेहरू यांच्याकडे, तर स्वागताध्यक्षपद स्वामी श्रद्धानंद यांच्याकडे होते. अध्यक्षांनी आपल्या भाषणात पंजाबमधील रौद्रभीषण घटनांचे अतिशय हृदयद्रावक वर्णन करून सरकारला कटू शब्दांत दोष दिला. मात्र नव्या सुधारणा कायद्याने जे राजकीय अधिकार मिळाले आहेत त्याकडे



www.mpscmantra.com

पाठ न फिरवता, ते पदरी पाडून घेऊन, जे मिळाले नाही त्यासाठी चळवळ चालू ठेवावी असा सल्ला त्यांनी काँग्रेस सदस्यांना दिला. गांधी, जिना, मालवीय, ॲनी बेझंट ही मंडळीही नव्या कायद्याच्या अंमलबजावणीत काँग्रेसने सरकारला पूर्ण सहकार्य द्यावे अशा मताची होती. या विषयासंबंधी महत्त्वाचा प्रस्ताव कलकत्त्याचे चित्तरंजन दास यांनी मांडला. नव्या कायद्यातील तरतुदी अपुऱ्या, असमाधानकारक आणि निराशाजनक आहेत, भारत जबाबदार शासनाला पूर्णपणे लायक आहे आणि म्हणून जबाबदार शासनपद्धती येथे पूर्णांशाने लवकरात लवकर लागू केली जावी अशा आशयाचा हा ठराव होता. ह्या ठरावावर चर्चा करीत असता काही सदस्यांनी या ठरावातील 'अपुरा, असमाधानकारक, निराशाजनक' हे शब्द गाळले जावेत असा आग्रह धरला. अशी मागणी करणाऱ्या मंडळीत ॲनी बेझंट याही होत्या. तेव्हा एक वर्षापूर्वी त्यांनीच वापरलेले हे शब्द आहेत याची त्यांना आठवण करून देण्यात आली. हे शब्द मागील वर्षी पास केलेल्या ठरावात असल्यामुळे ते ह्या वर्षी गाळण्याचे प्रयोजन नाही असा युक्तिवाद करून टिळकांनीही त्याचे समर्थन केले. शेवटी बहुमताने हे शब्द कायम ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. १९१८ साली मॉटेग्यू अहवालावर कडक टीका करणाऱ्या ॲनी बेझंटनी एका वर्षात आपला पवित्रा पूर्णतः बदललेला पाहून दादासाहेब खापर्ड्यांनी आपल्या नेहमीच्या विनोदी स्वभावानुसार त्यांना पूतनेची उपमा दिली आणि ही उपमा सार्थ असल्याचे भाष्य विठ्ठलभाई पटेलांनी केले.

१९१९ साली बेझंट यांच्या भूमिकेत परिवर्तन होत असल्याची जाणीव काही काँग्रेस नेत्यांना होऊ लागली होती. काँग्रेस शिष्टमंडळाच्या सदस्य म्हणून त्या इंग्लंडला गेल्या असताना त्यांनी काँग्रेसच्या अधिकृत धोरणाविरुद्ध मते प्रदर्शित केली होती. यावरून त्यांचे आणि टिळकांचे खटकेही उडाले होते. डॉ. मुंजे तर प्रथमपासूनच श्रीमती बेझंट यांच्या उद्देशाबाबत साशंक होते. आपली शंका त्यांनी १९१४ च्या अखेरी टिळकांच्या पुढे प्रदर्शित केली होती. १९१४ साली जहालांच्या काँग्रेस प्रवेशासंबंधी वाटाघाटी सुरू होत असता बेझंट यांच्या मध्यस्थीने या वाटाघाटी करू नयेत. "या इंग्लिश बाईच्या फसव्या मायावीपणाला" भुलून त्यांच्यावर पूर्ण विश्वस टाकू नये, त्याऐवजी टिळकांनी ना. गोखाल्यांशी स्वतः बोलणी करावी असेही त्यांनी सुचविले होते. यामुळे डॉ. मुंज्यांना मात्र बेझंट यांनी घेतलेल्या नव्या पावित्र्याचे आश्चर्य वाटले नाही.

या अधिवेशनात जहाल गटाचे गांधीशीही थोडे मतभेद झाले. मॉटेग्यूने केलेल्या ह्या कायद्याबद्दल त्याचे आभार मानावे असा ठराव गांधींनी मांडला. तेव्हा बंगालच्या दास गटाने आणि नागपूर व वऱ्हाडच्या खापर्डे व मुंजे गटाने त्याला विरोध दर्शविला. गांधी आपल्या प्रस्तावाला चिटकून होते. शेवटी टिळकांनी मध्यस्थी केली आणि मूळ ठरावातील शब्दांत आणि आशयातही फेरफार करून त्यांनी दोन्ही गटाची संमती मिळवून घेतली. मॉटेग्यूने केलेल्या कायद्यासाठी नव्हे, तर कायदा घडवून आणण्यासाठी त्याने घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्याला धन्यवाद देणारा ठराव अखेरी पास झाला.

## महाराष्ट्रात लोकशाही पक्षाची स्थापना

मॉट-फोर्ड कायद्याच्या अमंलबजावणीसाठी १९२० मध्ये निवडणुका व्हावयाच्या होत्या. या कायद्याच्या अंमलबजावणीत सरकारशी सहकार्य करण्याचा निर्णय काँग्रेसने अमृतसर अधिवेशनात घेतला होता. तेव्हा निवडणुकीच्या वेळी मतदारांच्या पुढे निश्चित कार्यक्रम मांडणारा संघटीत पक्ष असणे अगत्याचे आहे असे टिळकांचे मत होते. या दृष्टीकोनातून लोकशाही पक्षाच्या स्थापनेची घोषणा टिळकांनी जून १९२० मध्ये केली. त्या बरोबरच त्यांनी पक्षाचा जाहीरनामाही प्रसिद्ध केला. टिळकांचा हा लोकशाही पक्ष म्हणजे स्वतंत्र राजकीय पक्ष नाही, तर काँग्रेस संघटनेच्या अंतर्गत संगठित करण्यात आलेला, विशिष्ट मागण्यांचा व विचारांचा पुरस्कार करणारा एक गट



www.mpscmantra.com

आहे असा स्पष्ट खुलासा केला गेला. सरकारने केलेले दडपशाहीचे सर्व कायदे रद्द करवून घेणे, प्रशासनासाठी देशाची भाषावर विभागणी केली जावी अशी मागणी करणे, संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता मिळविणे, हिंदू-मुस्लिम ऐक्य टिकविणे, देशात एक राष्ट्रीय भाषा विकसित करणे, इंग्रजी भाषेबरोबरच हळूहळू देशी भाषांतून शिक्षण दिले जाण्याची व्यवस्था करणे ही पक्षाची उद्दिष्टे घोषित केली गेली. ही उद्दिष्टे मान्य असणाऱ्या उमेदवाराला निवडणुकीच्या वेळी पक्षाचा पाठिंबा दिला जाईल असेही सूचित करण्यात आले. लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळावर जाताना भारतीय उमेदवारांच्या जवळ निश्चित स्वरूपाचा विधायक कार्यक्रम असावा अशी या जाहीरनाम्यामागील टिळकांची भूमिका होती.

## टिळकांच्या भूमिकेचे मर्म

या संदर्भात १९०८ पूर्वी निःशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार करणारे टिळक १९२० मध्ये प्रतियोगी सहकाराची भाषा कशी बोलू लागले ? त्यांची ही वैचारिक उत्क्रांती कशी झाली असा प्रश्न अनेकदा उपस्थित केला जातो. सकृत्दर्शनी त्यांच्या ह्या दोन भूमिकात विरोधाभास वाटला तरी खोलवर विचार केल्यास त्यात विरोध नाही असे दिसते. टिळकांनी निःशस्त्र प्रतिकाराचा मंत्र देशाला दिला, तो प्रतिगामी शासनाची परिसीमा देशात झाली होती तेव्हा. त्यावेळी साम्राज्यवादी ब्रिटिश नोकरशाही नागरिकांचे मूलभूत अधिकार पावलोपावली पायदळी तुडवीत होती, बेमुर्वतखोरपणे लोकमताची पायमल्ली करीत होती. त्यावेळी भारतीयांना प्रातिनिधिक शासनाचे अधिकार देण्याचा विचार करण्यासही ब्रिटिश राज्यकर्ते तयार नव्हते. अशा जुलुमी शासकांच्या डोळ्यात अंजन घालण्यासाठी, दडपली गेलेली भारतीय जनताही सक्रिय विरोध करू शकते हे सरकारच्या प्रत्ययाला आणून देऊन सरकारला नमविण्यासाठी त्यांनी बहिरष्कारयोगाचा पुरस्कार केला होता. १९१९-२० साली देशातील परिस्थिती याहून भिन्न होती. प्रातिनिधिक शासनाचे अधिकार काही अंशी का होईना भारतीयांना मिळणार होते. त्या अधिकारांचा योग्य वापर केल्यास भारतीयांना शासनकार्याचे प्रशिक्षण व अनुभव संपादन करण्याचा मार्ग मोकळा होणार होता आणि म्हणून देशातील जनतेच्या राजकीय जागृतीसाठी कौन्सिल प्रवेश करणे अगत्याचे आहे असे त्यांचे मत होते. म्हणूनच "To work the Reform Act for all its worth" अशी व्यवहारी भूमिका टिळकांनी अंगिकारली. मात्र त्याबरोबरच चळवळ व लोकसंघटन चालू ठेवा असा त्यांचा सल्ला होता. त्यांनी गठित केलेल्या लोकशाही पक्षाचे घोषवाक्य 'शिक्षीत व्हा, चळवळ करा, संघटन करा' असेच होते. म्हणून मंडालेच्या तुरूंगवासातील हालअपेष्टांमुळे टिळक नरमले, आणि पूर्वीची विरोधकाची भूमिका सोडून सहकार्याची भाषा बोलू लागले असे अनुमान काढणे तर्कशुद्ध वाटत नाही. "टिळक जहाल असले तरी काळाच्या मर्यादा जाणून होते" असा त्यांच्याविषयी पट्टाभी सीतारामय्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय वरील विधानांची पुष्टी करणारा आहे. टिळकांचे व्यक्तिमत्व प्रारभांपासून गतिमान होते. अंतिम उद्दिष्टावरील त्यांची दृष्टी अविचल असली, तरी कोणत्याही एका मार्गाला कायम चिटकून बसण्याचा दुराग्रह त्यांच्या वृत्तीत नव्हता. उद्दिष्टपूर्तीसाठी भिन्न मार्गाचा प्रयोग करून पाहण्याची त्यांची तयारी होती. त्यांच्या व्यवहारवादी भूमिकेचा आणखी एक पुरावा म्हणजे ब्रिटिश सरकारवर कठोर टीका करणारे टिळक ब्रिटिश लोकमताचा पाठिंबा मिळविण्यासाठी इंग्लंडला काँग्रेसची शिष्टमंडळे पाठविण्यास तयार असत. तसेच ब्रिटिश सरकारवर दडपण आणण्याच्या कामी मजूर पक्षाचा उपयोग होऊ शकेल असे वाटल्यामुळे त्यांनी महायुद्धानंतर इंग्लंडमध्ये व्हावयाच्या पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळी मजूर पक्षाला दोन हजार पौंडचा निधी दिला होता. टिळकांच्या पूर्वी दादाभाई नवरोजींनीही या मार्गचा अवलंब केला होता. फरक एवढाच की दादाभाईंच्या काळात इंग्लंडमध्ये कंझर्वेटिव्ह पक्ष सत्तारूढ असल्यामुळे दादाभाईंनी त्यावेळच्या विरोधी पक्षाची म्हणजे लिबरल पक्षाची मदत घेतली, तर टिळकांच्या काळात सत्तारूढ लिबरल पक्षाकडून भारतीयांच्या

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

अपेक्षा पूर्ण होत नाहीत असे पाहून टिळक त्यावेळच्या विरोधी पक्षाकडे म्हणजे मजूर पक्षाकडे वळले. या दोन्ही भारतीय नेत्यांची ही भूमिका व्यवहारी मुत्सद्देगिरीची होती.

## टिळकांचे निधन

१९२० साली राष्ट्रीय काँग्रेस नव्या युगाच्या उंबरठ्यापाशी घोटाळत असताना १ ऑगस्ट रोजी टिळकांचे देहावसान झाले. त्यांच्या मृत्यूने काँग्रसमध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली. महाराष्ट्रातील काँग्रेसचा तर जणू आत्माच लुप्त झाला. १९२० सालचे काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला व्हावयाचे होते आणि ह्या अधिवेशनाचे अध्यक्षपद टिळकांना द्यावयाचे असा नागपूर व वऱ्हाडमधील नेतृत्वाचा पक्का निर्धार होता. टिळकांना अध्यक्षपद देण्यास यावेळी कोणाचा विरोधही नव्हता. परंतु देशसेवेसाठी अपार हालअपेष्टा सोसलेल्या व काँग्रेस चळवळीत सतत आघाडीला असलेल्या ह्या लोकमान्य नेत्याने काँग्रेसचे अध्यक्षपद भूषवू नये असा जणू विधिलेखच होता. देशात अतिशय महत्त्वाची स्थित्यंतरे होऊ घातली असता टिळकांची प्राणज्योत मालविल्यामुळे काँग्रेस अनुभवी, व्यवहार, प्रभावी नेतृत्वाला मुकली. जहाल गटाला तर हा वज्राघातच वाटला.

## खिलाफत समस्या

टिळकांच्या निधनापूर्वी काही दिवस भारताच्या राजकीय क्षेत्रात खिलाफत चळवळीचा प्रादुर्भाव झाला होता. महायुद्धाच्या कालावधीत भारतीय मुस्लीमांना दिलेल्या अभिवचनाचा युद्ध संपताच ब्रिटिश राज्यकर्त्यांना विसर पडू लागला होता. मुस्लीमांची अरेबियामधील पवित्र धर्मस्थळे गैरमुस्लीमांच्या ताब्यात दिली जाणार नाहीत, ह्या युद्धकाळात दिलेल्या आश्वासनाला १९१९ सालच्या शांतता कराराने दोस्त राष्ट्रांनी हरताळ फासल्याचे मुस्लीमांच्या ध्यानात आले. तसेच जगातील सर्व मुसलमान तुर्कस्थानच्या सुलतानाला खलीफा, म्हणजे आपला धर्मप्रमुख मानीत. महायुद्धात तुर्कस्थानचा पराभव होताच दोस्त राष्ट्रांनी त्याच्यावर अनेक मानहानीकारक अटी लादल्यामुळे भारतीय मुस्लीम संतप्त झाले.

खलीफाच्या पदाला धक्का लावला जाऊ नये म्हणून ब्रिटिश सरकारवर दडपण आणण्याच्या हेतूने भारतीय मुस्लीम नेत्यांनी खिलाफत समिती स्थापन केली. या समितीचे नेतृत्त्व मौलाना महमद अली, त्यांचे बंधू शौकत अली इत्यादींच्याकडे होते. ब्रिटिश सरकार खिलाफत समितीच्या मागण्या पूर्ण करण्यास तयार नाही असे आढळून येताच ह्या समितीने सरकारशी असहकार करण्याचा निर्णय घेतला. तशी सूचना गांधींनींच खिलाफात समितीपुढे मांडली होती. २८ जुलै १९२० च्या खिलाफत समितीच्या बैठकीला ते हजर राहिले. १ ऑगस्टपासून खिलाफत समिती अहिंसक असहकाराची चळवळ सुरू करेल असे या बैठकीनंतर घोषित करण्यात आले. ह्या चळवळीत भारतीय हिंदूंनी सामील व्हावे असे आवाहन गांधींनी केले.

## काँग्रेसचा असहकाराचा निर्णय

खिलाफत समितीच्या या निर्णयामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीवर विचार करण्यासाठी आणि ह्यासंबंधी काँग्रेसचे धोरण निर्धारित करण्यासाठी काँग्रेसचे खास अधिवेशन ४ संप्टेंबरला बोलविण्यात आले. महाराष्ट्रातील काँग्रेस टिळकांच्या निधनामुळे बसलेल्या धक्क्यातून बाहेर पडलेली नसतानाच लाला लजपतरायांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन कलकत्त्याला भरले. विषय नियामक समितीत गांधींनी आपला असहकाराचा ठराव

www.mpscmantra.com

मांडला. त्यात त्यांनी खिलाफत चळवळीला पाठिंबा देण्याची गरज प्रतिपादित केली. भारतीय मुस्लीमांत निर्माण झालेल्या प्रखर ब्रिटिशविरोधी भावनेच्या राष्ट्रैक्यासाठी उपयोग करून घेण्याची ही उत्तम संधी आहे असे विधान करून, त्यांची असहकार चळवळ सुरू करण्याचे आवाहन काँग्रेसला केले. तसेच पंजाबमध्ये १९१९ साली घडलेल्या हृदयद्रावक घटनांकडे पाहण्याचा ब्रिटिश शासनाचा अमानुष दृष्टीकोन हंट समितीच्या अहवालावरुन आणि हाऊस ऑफ लॉर्डसच्या अनेक सदस्यांनी ओडवायरच्या अत्याचारी शासनाच्या केलेल्या समर्थनावरून स्पष्ट होतो, अशा अमानुष सत्तेशी सहकार्य करणे अशक्य आहे, राष्ट्रीय सन्मान कायम टिकविण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे स्वराज्य संपादन, आणि त्यासाठी अहिंसक असहकाराच्या मार्गाचा अवलंब करणे अगत्याचे आहे असे त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले. आपल्या असहकाराच्या निर्णयाचे समर्थन करताना गांधी म्हणाले की, अमतृसर काँग्रेसपर्यंत ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना आपल्याला आली नव्हती, परंतु त्यानंतर घडत गेलेल्या घटनांवरून 'सुधारणा कायदा म्हणजे केवळ घुसीचा सापळा आहे आणि नामदारपद ही केवळ सोनेरी मुलामा असलेली बेडी आहे' अशी आपली पक्की खात्री झाल्यामुळे आपण असहकाराचा निर्णय घेतला. सरकारने दिलेल्या सन्मानाच्या पदव्यांचा त्याग करणे, सरकारी शिक्षणसंस्थांवर, न्यायालयांवर आणि विधीमंडळावर बहिष्कार घालणे याचा त्यांच्या असहकाराच्या कार्यक्रमात अंतर्भाव होता. भारतीयांनी आपल्या राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापना कराव्या, भारतीयांची स्वतंत्र लवाद मंडळे स्थापन करून त्या माध्यमाद्वारा आपसातील वाद मिटवावेत, विधीमंडळात प्रवेश न करता भारतीयांच्या कामकाजाचे नियमन करण्यासाठी कायदे करणाऱ्या आपल्या समित्या भारतीयांनी स्थापन कराव्या असे त्यात सुचविले होते. तसेच परकीय मालावर बहिष्कार आणि स्वदेशीला उत्तेजन हे ठरावातील महत्त्वाचे मुद्दे होते. असहकाराचा कार्यक्रम अनुशासन, संयम आणि त्यागावर आधारित आणि शांततेने व अहिंसक मार्गाने तो अंमलात आणला जावा असे त्यांनी आवाहन केले.

गांधीच्या ह्या असहकाराच्या ठरावाला तत्त्वतः कोणाचाच विरोध नव्हता. त्यांच्या प्रस्तावावर प्रांतिक काँग्रेस समित्यांची मते कलकत्ता अधिवेशनापूर्वी मागविण्यात आली होती. काही प्रांतिक समित्यांनी त्यासंबंधी आपली प्रतिक्रियाही स्पष्टपणे कळविली होती. १५ ऑगस्ट रोजी मुंबई येथे झालेल्या मुंबई इलाख्याच्या काँग्रेस समितीच्या बैठकीत पंजाब व खिलाफतीच्या प्रश्नाबाबत ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अंगिकारलेल्या धोरणांचा निषेध करण्याचा मार्ग म्हणून असहकाराचे तत्त्व मान्य असल्याचा निर्णय घेण्यात आला होता, आणि असहकार कार्यक्रमाचा तपशील ठरविण्यासाठी काँग्रेसने एक विशेष समिती नेमावी अशी शिफारस केली होती. मद्रास व बंगालच्या काँग्रेस समित्यांनीही असहकाराच्या तत्त्वाला मान्यता दर्शविली होती आणि काँग्रेस अधिवेशनामध्ये यासंबंधी तपशीलात चर्चा व्हावी असे सुचविले होते.

## असहकाराबाबत महाराष्ट्राची भूमिका

कलकत्ता अधिवेशनात असहकाराच्या गांधी पुरस्कृत कार्यक्रमावर बराच वाद माजला. बंगालचे चित्तरंजन दास व बिपीनचंद्र पाल तसेच पं. मालवीय, ॲनी बेझंट, बॅ. जिना, रंगस्वामी अय्यंगार ही मंडळी कौन्सिल बहिष्काराच्या विरोधात होती. पश्चिम महाराष्ट्रातून बॅ. बॅप्टिस्टा, न. चि. केळकर आणि वऱ्हाड व नागपूरचे दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे हेही कौन्सिल बहिष्काराला प्रतिकूल होते. तसेच शाळा आणि न्यायालयावर एकदम बहिष्कार टाकणे हितकारक ठरणार नाही, प्रथम त्यांना पर्यायी संस्था भरतीयांनी स्थापन कराव्या आणि त्या जसजशा स्थापन होतील तसतसा क्रमाक्रमाने सरकारी शिक्षण संस्थावर व न्यायालयावर बहिष्कार घालावा असे त्यांचे मत होते. न. चिं. केळकरांनी कौन्सिल बहिष्काराचे धोके निदर्शनास आणून देताना कौन्सिल प्रवेशामुळे

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

मतदारांना राजकीय शिक्षण मिळेल आणि त्यामुळे स्वराज्यसंपादनाच्या प्रक्रियेला गती मिळेल या टिळकांच्या मताचे स्मरण काँग्रेस सदस्यांना करून दिले.

अनेक अनुभवी ज्येष्ठ नेत्यांचा असहकाराच्या कार्यक्रमातील काही मुद्यांना विरोध होता. त्यामुळे गांधींच्या मूळ ठरावात बदल सुचविणाऱ्या काही उपसूचना मांडल्या गेल्या. गांधी मात्र त्यांच्या मूळ ठरावात यत्किंचितही बदल करण्यास तयार नव्हते. अखेरीस हा ठराव खुल्या अधिवेशनात मतदानाला टाकण्याचे ठरले. खुल्या अधिवेशनातील चर्चेच्या वेळी बॅ. जयकर, दादासाहेब खापर्डे, बॅ. जिना, न. चिं. केळकर, डॉ. मुंजे इत्यादींच्या संमतीने बिपिनचंद्र पाल यांनी ठरावाला उपसूचना मांडली. त्यात गांधींच्या कार्यक्रमातील धोके त्यांनी विशद केले. परंतु गांधीचा ठराव १८२६ विरुद्ध ८८४ मते पडून पारित झाला. मुंबई इलाख्याच्या एकूण प्रतिनिधीपैकी २४३ सदस्यांची मते ठरावाला अनुकूल, तर ९३ मते ठरावाच्या विरोधात पडली. नागपूरच्या भागाकडील एकूण ६३ पैकी ३० मते ठरावाच्या बाजूने तर ३३ विरोधात पडली. वऱ्हाडातील मात्र ४६ पैकी फक्त ५ मते अनुकूल तर २५ प्रतिकूल पडली. यावरून नागपूर व वऱ्हाडकडील भागात असहकाराला विरोध मोठ्या प्रमाणावर होता हे स्पष्ट झाले. मुंबईच्या भागात मात्र टिळकांच्या विचारसरणीचा प्रभाव ओसरून त्या जागी गांधींचा प्रभाव प्रस्थापित होऊ लागला होता, हे मुंबई इलाख्यातील बहुसंख्य मते असहकाराला अनुकूल पडल्याने स्पष्टपणे निदर्शनास आले. काँग्रेसच्या स्थापनेपासून काँग्रेसच्या कामकाजात व नीतिनिर्धारणात आघाडीला असलेला महाराष्ट्र १९२० पासून मागे पडू लागला. याचा आणखी एक पुरावा म्हणजे असहकाराच्या कार्यक्रमाचा तपशील तयार करण्यासाठी काँग्रेसने जी समिती स्थापन केली त्यात महाराष्ट्राचा एकही प्रतिनिधी नव्हता.

## नागपूर अधिवेशनाची तयारी

कलकत्त्याच्या खास अधिवेशनात काँग्रेसने पास केलेल्या ठरावांवर काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात शिक्कामोर्तब व्हावयाचे होते. अधिवेशन नागपूरला व्हावयाचे १९१९ च्या अखेरीज ठरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्षपद टिळकांना देण्याचा नागपूरकरांचा निर्धार नियतीने त्यापूर्वीच त्यांच्यावर घाला घालून पूर्ण होऊ दिला नाही. त्यामुळे दुसऱ्या योग्य व्यक्तीचा शोध स्थानिक पुढारी घेऊ लागले. त्यांचे लक्ष अरविंद घोषांच्याकडे गेले. वस्तुतः अरविंदांनी दहा वर्षापूर्वी राजकारण संन्यास घेतला होता आणि अध्यात्माचा मार्ग चोखाळीत ते फ्रेंचाच्या ताब्यातील पाँडेचरी येथे वास्तव्य करीत होते. तरीही त्यांचे मन वळवून त्यांना अध्यक्षपद मान्य करायला लावण्याचा कसोशीचा प्रयत्न डॉ. मुंजे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. डॉ. मुंज्यांनी स्वतः अरविदांशी पत्रव्यवहार करून देशापुढे नव्या समस्या उभ्या ठाकलेल्या असताना त्यांच्या मार्गदर्शनाची देशाला गरज आहे हे त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. अरविंदांच्या बंधूमार्फतही त्यांना गळ घातली गेली. कलकत्त्याच्या अधिवेशनासाठी गेले असता, डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवारांसह पाँडेचरीला जाऊन अरविंदांना भेटूनही आले. परंतु पुन्हा राजकारणात पडण्याची इच्छा नसल्याचे अरविंदांनी सांगितल्यामुळे मुंजेगटाचा नाईलाज झाला. शेवटी मद्रासचे विजय राघवाचार्य यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

नागपूरचे अधिवेशन यशस्वी करण्याच्या जिद्दीने लोकजागृतीच्या कामाला जानेवारी १९२० पासूनच नेत्यांनी प्रारंभ केला. अमरावती व नागपूरचे दोन मान्यवर नेते, दादासाहेब खापर्डे आणि डॉ. मुंजे संयुक्तरीत्या दौरा करीत हिंडत होते. नागपूरचे 'महाराष्ट्र', अमरावतीचे बाबासाहेब खापर्डे संपादित 'उदय', हिंदी भाषिक लोकांसाठी प्रकाशित होणारे 'संकल्प' या वृत्तपत्रांच्या माध्यमातूनही जोरदार प्रचार सुरू होता. अधिवेशनाच्या कामासाठी तरुणांना संघटित करण्याच्या हेतूने डॉ. हेडगेवारांच्या नेतृत्वाखाली भारत स्वयंसेवक मंडळ स्थापन केले गेले.

www.mpscmantra.com

नागपूरला ३० एप्रिल रोजी दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत खापर्ड्यांनी अधिवेशनासाठी पाचशे रुपये दिल्याचे घोषित करून अधिवेशनासाठी निधी गोळा करण्याच्या कार्याचा शुभारंभ केला. या सुमारास काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला न घेता जबलपूरला आयोजित केले जावे अशी मागणी काही हिंदी भाषिक लोकांनी केली. त्यामुळे काही काळ नागपूर की जबलपूर असा वाद उपस्थित झाला. परंतु मुंजे गटाने यापूर्वीच मोठ्या प्रामाणावर अधिवेशनाची तयारी केलेली असल्यामुळे ह्या वादाचा लवकरच निकाल लागला. अधिवेशन नागपूरलाच व्हावयाचे निश्चित झाले. अधिनेशनात हिंदी भाषिकांचा सहभाग लाभावा म्हणून अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षाचे पद वर्ध्याचे जमनलाल बजाज यांना दिले गेले. डॉ. मुंजे हे स्वागत समितीच्या कार्यकारिणीचे प्रमुख कार्यवाह राहिले. स्वयंसेवक विभागाचे काम डॉ. परांजपे आणि डॉ. हेडगेवार यांच्याकडे सोपविण्यात आले, तर कोषाध्यक्षपदी बॅ. मोरोपंत अभ्यंकर आणि आरोग्य विभागाचे अध्यक्षपद डॉ. ना. भा. खरे यांनी सांभाळले. अपूर्व उत्साहात चाललेल्या या तयारीवर टिळकांच्या निधनामुळे जणू उल्कापातच झाला.

कलकत्ता अधिवेशनात उपस्थित झालेले मतभेद या अधिवेशनात अधिक तीव्र स्वरूपात वर येऊ नयेत आणि त्यामुळे काँग्रेसमध्ये पुन्हा फूट पडू नये असे काँग्रेस नेत्यांना प्रकर्षाने वाटत होते. म्हणून अधिवेशनापूर्वीच स्थानिक नेत्यांशी विचारविमर्ष करण्याच्या हेतूने चित्तरंजनदास २ डिसेंबर रोजी नागपूरला आले. त्यांनी खापर्डे, बजाज, डॉ. चोळकर, न. चिं. केळकर, गंगाधरराव देशपांडे इत्यादींशी असहकाराच्या ठरावाबाबत चर्चा केली. त्यानंतर असहकाराच्या कार्यक्रमात काही फेरफार सुचविणारा एक जाहीरनामा दासांनी तयार केला. त्यात मांडलेल्या सूचना अपुऱ्या आहेत, त्या मूलभूत स्वरूपाच्या नाहीत असे मत व्यक्त करून दादासाहेब खापर्डे अमरावतीला परत गेले, आणि १० डिसेंबर रोजी असहकारासंबंधी त्यांची मते मांडणारे खुलासेवार पत्रक त्यांनी प्रकाशित केले. त्यात त्यांनी असहकाराचे धोके निदर्शनास आणून दिले आणि टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेच्या धोरणाचा निग्रहाने पुरस्कार केला. त्यानंतर आपल्या भाषणांतून त्यांनी अहकाराविरूद्ध प्रचारही सुरू केला. बापूजी अणेही त्यांच्या विचारांची पुष्टी करू लागले.

## नागपूरचे ऐतिहासिक अधिवेशन

डिसेंबर १९२० च्या अखेरी नागपूर येथे झालेले काँग्रेस अधिवेशन अनेक कारणामुळे ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले. ज्या भागात अधिवेशनासाठी भव्य मंडप घातला होता, त्या भागाला काँग्रेसनगर असे पडलेले नाव आजही रूढ आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या अधिवेशनाला हजर राहिले. या अधिवेशनाला आलेल्या सुमारे पंधरा हजार प्रतिनिधीत १०५० मुसलमान आणि १६९ महिला होत्या. या अधिवेशनात असहकाराविषयी अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतला जावयाचा असल्यामुळे बहुतेक काँग्रेस पुढारी अधिवेशनासाठी आले होते. प्रकृतीच्या अस्वास्थामुळे पं. मालवीय तेवढे येऊ शकले नाहीत, परंतु पत्राद्वारे त्यांनी आपले मत स्वागत समितीला कळविले होते. अली बंधू, मौलाना आझाद, बॅ. जिना ही मंडळीही अधिवेशनाला उपस्थित राहिली. याशिवाय इंग्लंडच्या मजूर पक्षाचे सदस्य कर्नल वेजवूड, बेन स्पूर आणि हालफोर्ड नाईट हे अधिवेशनासाठी मुद्दाम इंग्लंडहून आले होते.

नागपूर अधिवेशनात गांधींच्या असहकाराच्या ठरावाला बंगाल आणि महाराष्ट्राकडून कसून विरोध होणार अशी सर्वसामान्य समजूत होती. चित्तरंजन दास त्यासाठी दोनशे पन्नास प्रतिनिधींचा ताफा बरोबर घेऊन आले होते. मवाळ नेते सी. वाय. चिंतामणी हे संपादित असलेल्या 'लीडर'या वृत्तपत्राने, तेरा वर्षापूर्वी काँग्रेस जशी दुभंगली तशी ती यावेळीही फुटणार, या अधिवेशनापासून महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्ष आणि गांधींचे समर्थक यांच्यात झगडे



www.mpscmantra.com

होणार असे भाकित वर्तविले होते. परंतु असे अप्रिय काही न घडता अधिवेशन सुरळीतपणे पार पडले. याचे श्रेय काँग्रेस नेतृत्वाने अंगिकारलेल्या विवेकी आणि समन्वयात्मक धोरणाला होते. या अधिवेशनात विरोधाचे सूर उमटले नाहीत असे नाही, परंतु हे विरोधी सूर एकांडे राहिले. समान्य सदस्यांचा त्यांना दुजोरा न मिळाल्यामुळे अधिवेशनाच्या यशस्वीतेत बाधा आली नाही. नागपूर अधिवेशनात असहकाराच्या कार्यक्रमावर शिक्कामोर्तब होऊन काँग्रेसने अहिंसक असहकाराची तुतारी फुंकली. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या अधिवेशनात काँग्रेसचे उद्दिष्ट व उद्दिष्टसिद्धीचे मार्ग बदलण्याच्या हेतूने तिच्या घटनेत मूलभूत परिवर्तन घडविण्यात आले.

नागपूर अधिवेशनाचे वेळी विषय नियामक समितीची बैठक सुरू झाली ती असहकार ठरावातील आक्षेपाने. बैठकीच्या आरंभीच कर्नल वेजवूड यांनी असहकार आंदोलनात अनुस्यूत असलेले धोके सदस्यांच्या ध्यानात आणून दिले, काँग्रेसने आपले ध्येय व धोरण बदलल्यास भारताच्या ब्रिटिश हितचिंतकांना भारताचा पक्ष इंग्लंडमध्ये उचलून धरणे कठीण होईल, भारतातही या कार्यक्रमात अडथळे निर्माण होतील, काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मागे पोलीसांचा ससेमिरा लागेल, त्यामुळे विधायक कार्य करणे काँग्रेसला दुरापास्त होईल आणि विकासाची गती कुंठीत होईल, म्हणून अशी अज्ञात अंध:कारात उडी घेण्याऐवजी काँग्रेसने विधायक कार्यक्रम अंगिकारावा अशी सूचना वेजवूड यांनी केली. परंतु त्यामुळे गांधी व गांधीचे समर्थक नरमले तर नाहीतच; उलट भारताला भारताबाहेर खरे मित्र नाहीत, भारताचे कल्याण भारतीयांनाच साधावयाचे आहे आणि त्या दृष्टीने असहकाराचा कार्यक्रम स्वावलंबनाच्या तत्त्वाच्या आधारे आखला गेला आहे असे सडेतोड उत्तर वेजवूडना दिले गेले. न. चिं. केळकरांनी 'स्वराज्य' या गांधींच्या ठरावातील शब्दाला घेण्यात आलेला आक्षेप खोडून काढला आणि भारतीयांची राजकीय उद्दिष्टाची मागणी या शब्दात समर्पकपणे व्यक्त होते असे प्रतिपादन करून 'स्वराज्य' या शब्दाचे जोरदार समर्थन केले. बॅ. जिनांनी आपल्या भाषणात गांधींच्या ठरावाने सुचविलेल्या मार्गावर आक्षेप घेतला. गांधींनी 'स्वराज्य' हे काँग्रेसचे उद्दिष्ट असावे आणि ते वैध आणि अहिंसक मार्गाने साध्य केले जावे असा विचार आपल्या ठरावात मांडला होता. काँग्रेस घटनेतील 'सनदशीर' मार्ग या शब्दप्रयोगाला गांधींनी फाटा दिला होता. जिनांनी 'सनदशीर' शब्द कायम ठेवला जावा असा आग्रह धरला आणि जनआंदोलनाचा कार्यक्रम अव्यवहारी ठरेल असे मत व्यक्त केले. त्यावर जनआंदोलनाचा मार्ग पूर्णपणे कायदेशीर असून न्याय आणि अहिंसक मार्गाने उद्दिष्ट साध्य करणे हा ठरावाचा मूळ गाभा आहे असे ठासून सांगून गांधींनी आपल्या भूमिकेचे समर्थन केले. तसेच स्वराज्य प्राप्तीचे उद्दिष्ट ब्रिटिश साम्राज्यात राहून साध्य करणे दुरापास्त झाल्यास, साम्राज्याबाहेर पडून ते प्राप्त करू असे त्यांनी ठामपणे प्रतिपादित केले.

## काँग्रेस दुभंगण्याचा धोका टळला

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी झालेल्या विषय नियामक समितीच्या बैठकीत असहकारावर झालेली चर्चा अनिर्णित राहिल्यामुळे तोच विषय दुसऱ्या दिवशीच्या बैठकीतही चर्चेसाठी ठेवला गेला. त्यावर पुन्हा बरीच खडाजंगी झाल्यानंतर रात्री बाराच्या सुमाराला सर्वसंमत ठराव तयार झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे गांधींच्या ठरावाला विरोध करण्याच्या तयारीने आलेल्या दासांनी स्वतःच हा ठराव खुल्या अधिवेशनापुढे मांडला आणि कलकत्त्याला या ठरावाला विरोध केलेल्या लालाजींनी ठरावाला दुजोरा दिला. गांधींनी या ठरावामागील तात्त्विक भूमिका सदस्यांपुढे विशद करून सांगितली. दादासाहेब खापर्डे ठरावाला विरोध करण्यासाठी उठण्याच्या विचारात होते. त्यांचा कौन्सिल बहिष्काराला असलेला विरोध अजूनही कायम होता. कौन्सिल बहिष्काराने नव्हे, तर कौन्सिल काबीज करूनच स्वराज्य प्राप्तीचे उद्दिष्ट साध्य करून घेता येईल असे त्यांचे ठाम मत होते. परंतु बहुसंख्य सदस्य गांधींच्या ठरावाला अनुकूल असल्याचे, आणि मुख्य म्हणजे दास आणि लालाजींनी विरोध मागे घेतल्याचे

www.mpscmantra.com

पाहून डॉ. मुजे यांनी खापर्ड्यांना विरोध करण्यापासून परावृत्त केले. चित्तरंजन दासांनी मांडलेल्या ठरावाला बॅ. जिना, ॲनी बेझंट यांनी विरोध केला. परंतु त्याचा उपस्थित सदस्यांवर परिणाम झाला नाही. दासांचा ठराव प्रचंड बहुमताने पारित झाला.

या ठरावात असहकाराच्या कार्यक्रमाची व्याप्ती स्पष्ट केली गेली. सरकारने बहाल केलेल्या सन्मानाच्या पदव्यांचा त्याग करण्यांपासून तो कर न देण्यापर्यंत नाना प्रकारचे बहिष्काराचे मार्ग या ठरावात अभिप्रेत असून, ते सर्व मार्ग कोणत्या पद्धतीने व कोणत्या वेळी अंगिकृत करावयाचे याचा निर्णय काँग्रेसच्या कार्यकारिणीवर सोपविण्यात आला. या व्यापक बहिष्कारयोगाची पार्श्वभूमी प्रथम सरकारी व निमसरकारी शिक्षण संस्था, न्यायालये आणि कौन्सिले यावर बहिष्कार घालून तयार करावी असे ठरविण्यात आले. सोळा वर्षांवरील विद्यार्थ्यांना सरकारी व निमसरकारी शिक्षण संस्थातून बाहेर पडून राष्ट्रीय शिक्षण संस्थांत प्रवेश घेण्याचे आवाहन केले गेले. सोळा वर्षाखालील मुलांच्या बाबतीत मात्र यासंबंधीचा निर्णय पालकांवर सोपविण्यात आला. सरकारी न्यायालयात वकीलांनी काम करू नये असे सुचविण्यात आले व आपआपसातील झगडे मिटविण्यासाठी त्यांनी लवाद समित्या स्थापन कराव्या अशी शिफारस करण्यात आली. तसेच सर्व विधिमंडळांवर पूर्ण बहिष्कार घालावा, परकीय मालावर बहिष्कार घालावा, स्वदेशी माल वापरावा, परकीयांशी व्यापारही बंद करावा असेही मुद्दे ठरावात अंतर्भूत करण्यात आले. स्वदेशी व्रताचे प्रतीक म्हणून काँग्रेस सदस्यांनी चरख्यावर सूत कातावे असेही सुचविण्यात आले. सरकारी नोकऱ्यांवरही बहिष्कार घालण्याची सूचना केली गेली. या बहिष्कारयोगासाठी त्यागाची तयारी काँग्रेस सदस्यांनी ठेवावी आणि सामान्य जनतेची देखील अशा त्यागासाठी मानसिक तयारी करण्याच्या दृष्टीने शहरोशहरी स्थानिक समित्या स्थापना करून प्रचार कार्य हिरीरीने करावे असे प्रतिपादन केले गेले. हा कार्यक्रम योजनाबद्ध रीतीने आणि शांततेने अंमलात आणला जावा याची जबाबदारी स्थानिक नेत्यांवर टाकली गेली. असहकार आंदोलनाला भक्कम आर्थिक आधार असावा म्हणून टिळकांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक लाखाचा स्वराज्यनिधी गोळा करावा असा निर्णय घेण्यात आला. तसेच असहकाराच्या कार्यक्रमाबरोबर राष्ट्रैक्याच्या हेतूने अस्पृश्यता निवारण कार्यक्रम सुरू करण्यावर व हिंदू-मुस्लीम सद्भाव टिकविण्यावर भर देण्यात आला. टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात दासपुरस्कृत गांधींच्या कार्यक्रमावर अधिवेशनाने शिक्कामोर्तब केले आणि गांधींच्यावर पुष्पवृष्टी करून त्यांच्या नेतृत्वावरील विश्वास व्यक्त केला. नागपूरला अशा रीतीने काँग्रेसचे नवे राष्ट्रीय नेतृत्व आकाराला आले.

## असहकारासंबंधी महाराष्ट्राची भूमिका

असहकाराच्या कार्यक्रमाबाबतची मराठी नेत्यांची प्रतिक्रिया मात्र संमिश्र स्वरूपाची होती. मुंबईकडील बहुमत गांधींच्या पक्षाचे होते. पुण्याकडील न. चिं. केळकरांच्या नेतृत्वाखाली टिळक समर्थकांचा गट प्रारंभी गांधींनी मांडलेल्या असहकार कार्यक्रमाला अनुकूल नसला तरी असहकाराच्या तत्त्वाला मात्र त्यांचा विरोध नव्हता. टिळकप्रणीत बहिष्कारयोगाशी असहकाराचे काही अंशी साधर्म्य होते. टिळकांनी नव्या सुधारणा कायद्यासंबंधी प्रतियोगी सहकारितेचे धोरण पुरस्कृत केले होते खरे, परंतु असहकाराच्या कार्यक्रमाबाबत टिळकांचे मत गांधींनी विचारले असता, 'जनता तुमच्या मागे येण्यास सिद्ध असल्यास मी तुमच्यासोबत आहे' असे म्हणून असहकाराला टिळकांनी आशिर्वाद दिला होता. अशा परिस्थितीत काँग्रेसमधील बहुमत गांधींना अनुकूल असता त्यांच्या कार्यक्रमाचा प्रयोग करून पाहावयास हरकत नाही, लोकजागृतीचे माध्यम म्हणून असहकाराच्या कार्यक्रमाची उपयुक्तता पारखून घेण्यास प्रत्यवाय नाही अशा भूमिकेतून न. चिं. केळकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी असहकाराला पाठिंबा दिला. नागपूर अधिवेशनानंतर लागलीच केसरीत लेख लिहून त्यांनी काँग्रेस अधिवेशनात घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वागत व समर्थन केले.

अनुक्रमणिका

www.mpscmantra.com

नागपूर अधिवेशनात काँग्रेसने काय साध्य केले याचा खुलासा "नागपूरची यशस्वी राष्ट्रीय सभा," या मथळ्याखाली ४ जानेवारी १९२१ च्या लेखात न. चिं. केळकरांनी केला. "नागपूरच्या लोकोत्तर व यशस्वी सभेचे वर्णन ऐक्य व प्रगती यांचा विजय या शब्दात करता येईल" असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. काँग्रेसच्या स्वरूपात झालेला बदल विशद करताना केळकरांनी लिहिले की यंदाच्या राष्ट्रीय सभेचे धोरण व्यापक असून ती आता मूठभर सुशिक्षित ब्राम्हण वकीलांची राहिलेली नाही. त्यात ब्राह्मणेतरही आहेत. "यंदाच्या वैष्णव अध्यक्षांनी विषय नियामक कमिटीत अंत्यज व अस्पृश्य वर्गाचे पुढारी विठ्ठलराव शिंदे यांचाही सत्कार केला व त्यांना आंत घेतले. एवढेच नाही तर असहकारीतेच्या ठरावातील शेवटच्या कलमात राष्ट्रीय सभेने सर्व हिंदू लोकांना हिंदूधर्मावरील अस्पृश्यतेचा डाग धुवून काढण्याची आज्ञा केली आहे. राष्ट्रीय सभा ही आता गरीबांची म्हणजे खऱ्या अर्थाने जनतेची होऊ लागली आहे." तसेच काँग्रेसमध्ये त्यावेळी पुढे येऊ लागलेल्या नेतृत्वात व काँग्रेसच्या प्रारंभीच्या नेतृत्वात असलेला मूलगामी फरकही त्यांनी नेमक्या शब्दात टिपला. राष्ट्रीय सभेचे नेते आता नबाबी थाटाचे, आढ्यतेखोर व श्रीमंती दिमाखाचे नाहीत हे स्पष्ट करताना केळकर लिहितात, "मेथांच्या कारकीर्दीत राष्ट्रीय सभा हा श्रीमंती दिमाख व आढ्यता यांचा मामला होऊन बसला होता. लो. टिळक यांच्याकडे राष्ट्रीय सभेची सूत्रे आल्यापासून ही स्थिती पालटण्यास सुरवात झाली. राष्ट्रीय सभेच्या छावणीतही टिळक म्हटले म्हणजे सर्वांना मुक्तद्वार! व आता महात्मा गांधी यांनी टिळकांचा क्रम पुढे चालविला, इतकेच नव्हे तर काही बाबतीत पुढेही नेला असे म्हणावयास हरकत नाही." काँग्रेस अधिवेशनाला पूर्वी व यावेळी येणाऱ्या सदस्यांच्या पोषाखाबद्दल केळकर लिहितात, "जुन्या राष्ट्रीय सभेकडे पाहिले म्हणजे, जो तो नटून थटून आलेला दिसे. ठेवणीतले पोषाख व अलंकार यांचे प्रदर्शन करण्याचा राष्ट्रीय सभा हा एक सणच वाटे. पण टिळक व गांधी यांनी आपल्या साधेपणाने राष्ट्रीय सभावाल्यांना सर्वच नवे वळण लावल्याने हल्ली या सभेच्या मेळ्याकडे पाहावे तो मी अधिक श्रीमान् किंवा दिमाखदार कसा दिसेन यात कोणास भूषण न वाटता, मी अधिक गरीब किंवा लीन कसा दिसेन व होईन यातच जो तो भूषण मानू लागला आहे." काँग्रेस सदस्यांच्या पोषाखातच केवळ नाही तर त्यांच्या मनोवृत्तीत झालेल्या लक्षणीय परिवर्तनाचे असे मोठे गमतीदार परंतु अर्थगर्भ वर्णन केळकरांनी वरील लेखात केलेले आढळते.

## नागपूर व वऱ्हाडची प्रतिक्रिया

नागपूर व वऱ्हाडकडील नेतृत्वात असहकाराच्या कार्यक्रमावर मतैक्य झाले नाही. नागपूरच्या डॉ. मुंजे गटाने असहकाराला मौन बाळगून संमती दिली. कारण या कार्यक्रमाविषयी हा गट द्विधा मन:स्थितीत होता. टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेच्या धोरणावर त्यांचा पूर्ण विश्वास असल्यामुळे कौन्सिल बहिष्काराचा कार्यक्रम त्यांच्या बुद्धीला पटत नव्हता. परंतु दास आणि लालजी यांसारख्या जहाल राष्ट्रवाद्यांनी त्या कार्यक्रमाला मान्यता दिलेली पाहून आणि बहुमत ठरावाच्या बाजूने असलेले पाहून बहुमताचा निर्णय मान्य करण्याचा सूज्ञपणाचा मार्ग त्यांनी पत्करला. 'टिळकांच्या मृत्यूने आम्ही दिङ्:मूढ झालो होतो, अधिवेशनाचे काम आम्ही निर्जीव यंत्राप्रमाणे रेटले,' या काँग्रेस अधिवेशनाच्या प्रतिवृत्ताला डॉ. मुंजे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील शब्दावरून टिळकांच्या नेतृत्वाच्या अभावी नागपूरच्या नेत्यांची कशी हतबुद्ध अवस्था झाली होती हे निदर्शनास येते. अशा परिस्थितीत असहकाराला दुबळा विरोध करून काँग्रेस फोडण्याची चूक करू नये असे वाटून मुंजे गटाने बहुमताचा निर्णय शिरोधार्य मानला. वऱ्हाडचे दादासाहेब खापर्डे आणि माधव श्रीहरी अणे हे मात्र अशा तडजोडीला तयार नव्हते. खापर्डे यांनी कौन्सिल बहिष्काराला असलेला आपला विरोध १० डिसेंबर रोजी काढलेल्या पत्रकात स्पष्ट केला होता. बापूजी अण्यांनीही त्यांना समर्थन दिले. त्यामुळे या दोघांनी असहकाराच्या कार्यक्रमाबाबत आपली विरोधकाची भूमिका कायम ठेवली.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

### काँग्रेसच्या घटनेत मूलभूत बदल

नागपूर येथील काँग्रेस अधिवेशनाने काँग्रेसच्या ध्येयधोरणात जसे मूलभूत परिवर्तन घडवून आणले, तसेच काँग्रेसच्या रचनेतही लक्षणीय बदल केले. काँग्रेसला कार्यप्रवण व गतिमान बनविण्याचा आणि तिला व्यापक लोकमताचा आधार मिळवून देण्याचा यामागील हेतू होता. काँग्रेसने निर्धारित केलेला कार्यक्रम वर्षभर सातत्याने राबविला जावा म्हणून काँग्रेसच्या एकवीस प्रांतिक समित्या गठित करण्यात आल्या. देशाच्या निरनिराळ्या भागात दृढ असलेल्या भाषांच्या आधारे देशाचे एकवीस प्रांत कल्पून त्या प्रत्येक भागात एक काँग्रेस समिती स्थापन करण्यात आली. या समित्यांनी ग्रामीण भागापासून शहरापर्यंत सर्व स्तरावर स्थानिक कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांना तेथे स्थानिक समित्या गठित करण्यास मदत करावी व त्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवावी असे ठरविण्यात आले. तसेच वार्षिक अधिवेशनाला अनिर्बंध संख्येने येणाऱ्या प्रतिनिधींमुळे होणारा गोंधळ टाळावा म्हणून प्रत्येक प्रांतातून पन्नास हजार लोकांच्या मागे एक प्रतिनिधी या प्रमाणात यापुढे काँग्रेस अधिवेशनाला प्रतिनिधी पाठविले जावेत असे बंधन प्रांतिक काँग्रेस समित्यांवर घातले गेले. प्रत्येक प्रांतिक समितीने ऑल इंडिया काँग्रेस कमिटीवर पाठवावयाचे प्रतिनिधी निवडावयाचे होते. प्रत्येक प्रांताने या केंद्रीय समितीवर पाठवावयाच्या प्रतिनिधींची संख्या निश्चित करण्यात आली. यापुढे ३५० सदस्यांच्या या केंद्रीय समितीने विषय नियामक समिती म्हणून काम करावे, या समितीच्या बैठकी वार्षिक अधिवेशनापूर्वी तीनचार दिवस घेतल्या जाव्या आणि अधिवेशनाचे उद्‌घाटन झाल्यानंतर लागलीच केंद्रीय समितीने तयार केलेले ठराव खुल्या अधिवेशनापुढे मांडले जावेत असेही ठरविण्यात आले. यामुळे तोवर होत असलेला अधिवेशनाच्या कामाचा घोळ कमी करता येईल अशी कल्पना होती. तसेच वर्षभर काँग्रेसचे कामकाज चालविण्यासाठी आणि अधूनमधून उपस्थित होणाऱ्या तातडीच्या समस्यांवर विचारविमर्श करण्यासाठी केंद्रीय समितीने आपली एक पंधरा सदस्यांची कार्यकारी समिती निवडावी असेही ठरले.

### नागपूर काँग्रेसचे महत्त्व

काँग्रेसच्या घडणीत व उद्दिष्टात करण्यात आलेले हे बदल क्रांतिकारक ठरले. काँग्रेस ही केवळ अल्पसंख्य सुशिक्षितांची संघटना न राहता तिचे सर्व कार्य जनसामान्यापर्यंत पोचण्याची त्यामुळे सोय झाली. काँग्रेसला खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सभेचे स्वरूप प्राप्त होण्याचा मार्ग त्यामुळे मोकळा झाला. असहकाराची मोहीम अहिंसक मार्गाने चालविण्याचा निर्णय घेतल्यामुळे हिंसक मार्गाचा अवलंब करण्यास धजू न शकणारे लक्षावधी लोक काँग्रेसकडे वळणे शक्य झाले. अस्पृश्यतेविरूद्ध संघटित व निर्णायक मोहीम सुरू करण्याच्या निर्णयामुळे काँग्रेस ही उच्चवर्णीयांची संघटना आहे हा प्रसृत झालेला अपसमज दूर झाला आणि या राष्ट्रीय संघटनेपासून चार हात लांब राहिलेला दलितांचा वर्ग काँग्रेसकडे वळू लागला. तसेच दोन वार्षिक अधिवेशनांच्या दरम्यान काहीशी निष्क्रिय राहणारी काँग्रेस संघटना यानंतर वर्षभर क्रियाशील राहील असा कार्यक्रम आखला गेला. तसेच तोवर बरेच काँग्रेस नेते आपआपले खाजगी व्यवसाय सांभाळून फावल्या वेळात काँग्रेसचे कार्य करीत; ही परिस्थिती बदलून काँग्रेसच्या कार्याला पूर्णपणे वाहून घेतलेल्या पुढाऱ्यांची पिढी पुढे येऊ लागली. काँग्रेस ही राष्ट्रीय चळवळीच्या संयोजनाचे केंद्रस्थान बनली. काँग्रेसने आखलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी देशात सर्वत्र होईल अशी व्यवस्थाही करण्यात आली. महाराष्ट्राच्या भूमीत महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी जन्माला आलेल्या या राष्ट्रीय संघटनेचा अशा रीतीने कायापालट झाला तोही महाराष्ट्राच्या भूमीवरच!

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

## असहकार चळवळीत महाराष्ट्राचा सहभाग

गांधीप्रणीत असहकाराच्या कार्यक्रमातील कौन्सिल बहिष्काराचा भाग महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षाला तत्त्वतः संमत नसला तरी काँग्रेसने ऐक्य आणि प्रतिष्ठा कायम टिकविण्यासाठी राष्ट्रीय पक्षाने काँग्रेसमध्ये बहुमताने घेण्यात आलेला निर्णय शिरोधार्य मानला. कलकत्ता अधिवेशनानंतर लागलीच १९ सप्टेंबरला टिळकांनी स्थापन केलेल्या लोकशाही पक्षाची बैठक घेण्यात आली आणि कौन्सिल बहिष्काराबाबतचा निर्णय सर्वसंमतीने मंजूर करण्यात आला. यासंबंधी पारित केलेल्या ठरावात कौन्सिल बहिष्कार या पक्षाला तत्त्वतः मान्य नाही हे निःसंदिग्धपणे नमूद करण्यात आले. त्याबरोबरच "काँग्रेसने ठरविले म्हणून आम्ही पंजाब व खिलाफत प्रकरणासंबंधीच्या तक्रारी दूर होईपर्यंत, अथवा संपूर्ण स्वराज्य मिळेपर्यंत अगर काँग्रेसकडूनच पुन्हा तशी परवानगी मिळेपर्यंत कायदे कौन्सिलच्या निवडणुकीत कोणताही भाग घेऊ इच्छित नाही," असे प्रतिपादन करण्यात आले. तसेच मतदारांनी मतदान करू नये असा प्रचार करण्याचाही निर्णय ह्या बैठकीत घेतला गेला. बैठकीतील ह्या निर्णयानुसार मुंबईचे बॅ. बॅप्टिस्टा, डॉ. साठ्ये, डॉ. वेलकर, एफ. जे. जीनवाला, डॉ. पवार, बॅ. मेथा, पुण्याचे न. चिं. केळकर, साताराचे सोमण, देशपांडे, कडुसकर, करंदीकर, वऱ्हाडचे अणे, काळे, नागपूरचे डॉ. मुंजे, डॉ. चोळकर, नियोगी, अळेकर, वैद्य इत्यादी अनेकांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. खापर्ड्यांनी मात्र असे करण्यास स्पष्ट नकार दिला. ते टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेला चिकटून राहिले. रत्नागिरी, ठाणे, सोलापूर, नगर, बेळगाव, कुलाबा, नाशिक, जळगाव, मलकापूर, वर्धा इत्यादी अनेक शहरांतील सदस्यांनीही आपली उमेदवारी सोडून दिली. तसेच बेळगावचे टिळकांचे निकटचे सहकारी गंगाधरराव देशपांडे, पुण्याचे सी. के. दामले, नागपूरचे नीळकंठराव उधोजी व वैद्य, यवतमाळचे अब्दुल रौफ, गद्रे इत्यादी अनेकांनी आपल्या वकिलीच्या व्यवसायावर तुळशीपत्र ठेवले. अशा प्रकारे महाराष्ट्रात बहुतांशी मंडळींनी काहीशा अनिच्छेने का होईना पण यावेळी काँग्रेसच्या नव्या धोरणांना व नव्या नेतृत्वाला मान्यता दिली.

काँग्रेसच्या जन्मापासून १९२० पर्यंतच्या महाराष्ट्रातील काँग्रेस चळवळीचा इतिहास हा असा अनेक स्फूर्तीप्रद घटनांनी, प्रेरक चळवळींनी आणि प्रभावशाली नेत्यांच्या कार्यसिद्धीने भरगच्च भरलेला आहे. काँग्रेसच्या जन्मापासूनच काँग्रेस संघटनेच्या कामकाजात महाराष्ट्र आघाडीला राहिला. दादाभाई, फिरोजशहा, न्या. रानडे यांसारखे काँग्रेसचे काही आद्य संस्थापक महाराष्ट्रात पुढे आले. तिचा आवाज राज्यकर्त्यांच्या कानी घालणारा, जनतेच्या रास्त मागण्या तर्कशुद्ध युक्तीवादाने त्यांच्या गळी उतरविण्यासाठी जिवापाड खटपट करणारा आणि हे करूनही राज्यकर्त्यांच्या प्रशंसेला पात्र ठरलेला नामदार गोखल्यांच्यासारखा धुरंधर राजधुरीण महाराष्ट्राने काँग्रेसला दिला. त्याबरोबरच 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असे साम्राज्यवादी ब्रिटिश राज्यकर्त्यांना ठणकावून सांगणारा आणि लोकजागृती, लोकसंग्रह व लोकसंघटनेच्या कार्याला आजन्म वाहून घेऊन, राष्ट्रकार्यासाठी कोणत्याही त्यागाला सदैव सिद्ध असलेला टिळकांसारखा 'लोकमान्य' पुढारीही महाराष्ट्राने घडविला. या आघाडीच्या नेतृत्वाला बळकटी आणण्यासाठी महाराष्ट्राच्या विभिन्न भागांतून शेकडो लहान मोठे स्थानिक कार्यकर्ते पुढे सरसावले. नागपूरच्या भागात व वऱ्हाडात काँग्रेसची चळवळ रुजविण्याचे आणि व्यापक बनविण्याचे कार्य गंगाधरराव चिटणवीस, बापूराव किनखेडे, नायडू, भगीरथप्रसाद, डॉ. मुंजे, रा. ब. मुधोळकर, सर मोरोपंत जोशी, दादासाहेब खापर्डे, मा. श्री. अणे इत्यादी अनेकांनी नेटाने केले. या सर्वांनी आपआपल्या कुवतीनुसार आणि विचारधारणेनुसार अविरत कार्य करून काँग्रेसला भारतीय राष्ट्रवादाचे व राजकीय चळवळीचे प्रभावी माध्यम बनविले. स्थानिक पातळीवरुन राष्ट्रकार्याचा श्रीगणेशा करून महाराष्ट्राच्या काही प्रज्ञावंत नेत्यांनी केवळ राष्ट्रीय पातळीवरच नव्हे तर राष्ट्राबाहेरही प्रभावी कार्य केले. परकीय राज्यकर्त्यांच्या घरात शिरून त्यांनी तेथे काँग्रेसचा आवाज पोचविला. प्रांतिक राजकारणाच्या सीमित कक्षा ओलांडून या कालावधीत महाराष्ट्राचे नेतृत्व

www.mpscmantra.com

राष्ट्रीय नेतृत्वात परिवर्तित झाले. महाराष्ट्रातील या रथी महारथींची पिढी १९२० पर्यंत राष्ट्रीय मंचावरून लुप्त झाली, आणि नेमके याच सुमारास भारताबाहेर आकाराला आलेले, दक्षिण आफ्रिकेतील गौरवर्णी व वर्णविद्वेषी जुलुमी शासकांच्या विरुद्ध केलेल्या अभिनव लढ्यात तावून सुलाखून यशस्वी ठरलेले गांधीजींचे राष्ट्रीय नेतृत्व साकार झाले. याबरोबर कॉंग्रेसमध्ये नेतृत्वांचे केंद्रीकरण होऊ लागले, आणि इतर प्रांतांप्रमाणे महाराष्ट्रही गांधीजींच्या नव्या राष्ट्रीय नेतृत्वाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला.

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

# संदर्भ ग्रंथ सूची

## मूळ साधने


### इंग्रजी

१) Source Material for a History of the Freedom Movement in India. (Vol. I 1818-1885)
-Collected from Bombay Government Records.
Bombay Government Press. 1957

२) Source Material for a History of the Freedom Movement in India. (Vol. II 1885-1920)
-Collected from Bombay Government Records.
Bombay Government Press. 1958

३) The History of the Freedom Movement in M. P.
Chief Editor. D. P. Mishra. 1956

४) Reports of Indian National Congress Sessions.

५) The Encyclopaedia of India National Congress.
(Vol. I to VII Zaidi & Zaidi 1976-79)

६) Dadabhai Naoroji's Correspondance with Dinshaw Wacha.
(Vol. II Edited by R. P. Patwardhan. 1977)

७) Jayakar M. R. The story of my life.
(Vol. I 1958. Vol. II 1959)

८) Khare : N. B. My Political Memoirs. 1959

### मराठी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९) | लोकहितवादी | : | लोकहितवादींची शतपत्रे संपादित-ना. र. इनामदार | १९६३ |
| १०) | चिपळूणकर | : | निबंधमाला | १९१७ |
| ११) | लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख | : | संपादक न. चिं. केळकर राजकीय खंड १-१९२२, खंड २-१९२४ खंड ३-१९२६, खंड ४-१९२८ | |
| १२) | आगरकर गो. ग. | : | निबंधसंग्रह संपादित- आळतेकर | १९३७ |


www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

# दुय्यम साधने


## इंग्रजी

| | | |
|---|---|---|
| १३) | Bipin Chandra : Nationalism and Colonialism in Modern India. | 1979 |
| १४) | Keer, Dhananjaya, Mahatma Jyotirao Phooley. | 1974 |
| १५) | Masani, R. P. Dadabhai Naoroji. | 1939 |
| १६) | Mody, H. Sir, Pherozshah Mehta. | 1963 |
| १७) | Nanda, B. R. Gokhale, the Indian Moderates and the British Raj. | 1977 |
| १८) | Nanda, B. R. Gokhale, Gandhi and the Nehrus. | 1974 |
| १९) | Sitaramayya, Dr. P. History of the Indian National Congress (Vol. I) | 1946 |
| २०) | Tahmankar, D. V. Father of Indian Unrest and the Maker of Modern India. | 1956 |
| २१) | Amraoti District Gazetteer. | 1968 |
| २२) | Nagpur District Gazetteer. | 1966 |

## मराठी

| | | | |
|---|---|---|---|
| २३) | काळे, या. मा. | नागपूर प्रांताचा इतिहास. | १९३४ |
| २४) | काळे, या. मा. | वऱ्हाडचा इतिहास. | १९२४ |
| २५) | करंदीकर, अ. ज. | क्रांतिकारक टिळक व त्यांचा काळ. | १९६९ |
| २६) | करंदीकर, म. अ. | आधुनिक भारताचे शिल्पकार, बाळ गंगाधर टिळक. | १९७२ |
| २७) | फाटक, न. र. | लोकमान्य | १९७२ |
| २८) | फाटक, न. र. | न्या. महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र. | १९६६ |
| २९) | केळकर, न. चिं. | लोकमान्य टिळक यांचे चरित्र. भाग १-१९२३, भाग २-१९२८ | |
| ३०) | केळकर, न. चिं. | गेली पाच वर्षे. | १९२६ |
| ३१) | हरदास, बाळशास्त्री | डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांचे चरित्र भाग-१ | १९६६ |
| ३२) | हरदास, वीणाताई | लोकनायक अणे व त्यांचा काळ. भाग-१ | १९८२ |
| ३३) | खापर्डे, बाबासाहेब | दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र. | १९६२ |
| ३४) | कीर, धनंजय. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | १९७६ |
| ३५) | पाध्ये, टिकेकर | आजकालचा महाराष्ट्र | १९३५ |
| ३६) | जावडेकर, आचार्य. | आधुनिक भारत. | १९६८ |
| ३७) | पंडित, नलिनी | महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास | १९७२ |
| ३८) | सरदार, गं. बा. | महाराष्ट्र जीवन भाग-१ | १९६० |



अनुक्रमणिका



www.mpscmantra.com

| | | | |
|---|---|---|---|
| ३९) | अभ्यंकर, नाना | वशिष्टेचे पाणी, अर्थात मोरेश्वर वासुदेव अभ्यंकर, यांचे चरित्र. | १९६५ |
| ४०) | माडखोलकर, ग. त्र्यं | आधुनिक महाराष्ट्राचा वारसा. | १९७३ |
| ४१) | जोशी, यशोदाबाई | आमचा जीवनप्रवास. | १९६५ |

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र (खंड पहिला भाग-१) | शां. भा. देव | रु. १२७/- |
| २) | महाराष्ट्राचा इतिहास (मध्ययुगीन कालखंड भाग-१) | संपादक गो. त्र्यं. कुलकर्णी | रु. १४५/- |
| ३) | मध्ययुगीन महाराष्ट्र (सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन) | प्रा. म. श्री. माटे | रु. ७५/- |
| ४) | समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह (भाग पहिला) | अनुवादक हेमकांत बळकुंदी | रु. २९५/- |
| ५) | पं. जवाहरलाल नेहरू व्यक्ती आणि कार्य | संपादक बा. ह. कल्याणकर | रु. १४०/- |
| ६) | भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा. ना. कुबेर | रु. १०९/- |
| ७) | मराठी वाङ्मयकोश खंड- ४ | समन्वय संपादक डॉ. विजया राजाध्यक्ष | रु. ३२०/- |
| ८) | दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| ९) | भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| १०) | खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सूर्यवंशी | रु. ६०/- |
| ११) | लैंगिक नीती आणि समाज | श्रीमती शकुंतला क्षीरसागर | रु. १४५/- |
| १२) | मराठी वाङ्मयकोश खंड २, भाग-१ | डॉ. गो. म. कुलकर्णी | रु. १३०/- |
| १३) | महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड, भाग-१ (शिवकाल) | डॉ. वि. गो. खोबरेकर | रु. २७५/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे***
सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

***अधिक माहिती/चौकशीसाठी***
**सचिव,**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
पु. ल. देशपांडे कला अकादमी,
दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत,
सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई- ४०० ०१४
दूरध्वनी -२४२२६१५६/२४३२५९२९

www.mpscmantra.com

**अनुक्रमणिका**

**महाराष्ट्र व महाराष्ट्रीय नेते यांबद्दल**

**महात्मा गांधी यांचे अभिप्राय**

■ 'महाराष्ट्रात जी शक्ती आहे ती हिंदुस्थानातील इतर कोणत्याही भागात नाही. आत्मक्लेश व त्यागवृत्ती हे दोन गुण महाराष्ट्राजवळ आहेत हे मी पूर्णपणे जाणतो... महाराष्ट्रात जर का एकदा श्रद्धा उत्पन्न झाली तर महाराष्ट्राचा हात कोणीही धरू शकणार नाही.'

■ 'असहकारिता ही गोष्ट नवीन नाही. ती फार जुनी आहे. ती गोष्ट विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीच महाराष्ट्राला शिकविली आहे.'

■ 'सर फिरोझशहा हे मला हिमालयासारखे भासले तर लोकमान्य सागरासारखे; पण गोखले गंगेसारखे होते.'

■ 'देशाभिमानाला त्यांनी (टिळकांनी) धर्म बनविले... स्वराज्याशिवाय अन्य कोणतेही स्मारक त्यांची स्मृती योग्य प्रकारे कायम ठेऊ शकणार नाही.'

■ 'श्री टिळकांचा जनतेवर होता तितका पगडा दुसऱ्या कोणीही विद्यमान पुढाऱ्याचा नव्हता लाखो लोकांची जी भक्ती त्यांनी मिळवली तो असामान्य होती... (त्यांच्या मृत्यूने-) मानवातील एक महापुरुष पतन पावला. सिंहगर्जना स्तब्ध झाली.'

■ 'निष्ठुर दैवाने आपल्यामधून लोकमान्यांना जेव्हा हिरावून नेले, तेव्हा मी पोरका झालो असे मला वाटले.'

www.mpscmantra.com

अनुक्रमणिका